नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.


वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

जाने - मार्च १९९५

१) जाने - मार्च ९५

२) एप्रिल - मे - जुन १९९५

युगवाणी

जाने-मार्च १९९५



अनुक्रमणिका

आवाहन

मराठीतील दर्जेदार नियतकालिकांच्या दुरावस्थेची समस्या गेल्या काही वर्षांपासून विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र 'युगवाणी'च्या संघटित प्रयत्नानंतर मराठी वाङ्मयीन संस्कृतीतील एक सर्वाधिक अग्रक्रमाची समस्या म्हणून आता पुरेशी जाणवू लागली आहे.
मात्र त्यावरील तोडगा, उपाययोजना व त्याकरता आवश्यक त्या सामूहिक कृतीकरता पुरेशी इच्छाशक्ती अद्यापही अभावानेच आढळते.
विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' या नियतकालिकाने मराठीतील पहिलीवहिली नियतकालिक विकास परिषद घेऊन त्याद्वारे केवळ युगवाणीच नव्हे तर तत्सम सर्वच वाङ्मयीन नियतकालिकांच्या उपजीविकेच्या समस्यांची शासनाने दखल घेतली. त्याबाबत एक समिती नियुक्त करून त्यावर विचारही केलेला असून समितीने मांडलेल्या सूचनांची स्वीकृती व अंमलबजावणी याबाबत मात्र अद्याप कोणताच निर्णय घेतलेला नाही. तो जसा जलद घ्यावा अशी मागणी सर्वच वाङ्मयीन नियतकालिकांकडून होणे आवश्यकही आहे. दुसरी वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषद शासनाच्या या संबंधातील निर्णयानंतरच आयोजित करावी असा मानस असल्याने त्या संदर्भातही पुढील हालचाल तूर्तास स्थगित आहे. दरम्यान पहिल्या वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषदेने सुचविल्याप्रमाणे प्रत्येक वाङ्मयीन नियतकालिकांनी आपआपला स्थायी निधी उभारण्याच्या सूचनेची अंमलबजावणी विदर्भ साहित्य संघाने करावी असे कार्यकारिणीने ठरविले असून 'युगवाणी' या विदर्भ साहित्य संघाच्या नियतकालिकाने आपला स्वतःचा स्थायी निधी उभारावा या हेतूने सर्व वाचक, वर्गणीदार, संस्था, व्यक्ती व वाङ्मयप्रेमी यांना हे आवाहन करण्यात येत आहे.
'युगवाणी' या नियतकालिकाला पुढेही स्थिर पायावर कायम उभे राहता यावे याकरता एक 'स्थायी निधी' उभारण्याचे ठरविण्यात आले असून त्यास सर्व संबंधितांनी सढळ हाताने मदत करावी व ही वाङ्मयीन संस्कृती कायम राखण्यास, अधिक समृद्ध करण्यास सहकार्य करावे ही विनंती आहे. या निधीत रुपये पाचशे व अधिक रक्कम जमा करणाऱ्यास 'युगवाणी'चा अंक आजीव प्राप्त होत राहील. 'युगवाणी'चा स्थायी निधी हा मराठी वाङ्मयीन संस्कृती टिकवून धरण्याच्या कार्यातील एक सर्वाधिक महत्त्वपूर्ण दुवा समजून समस्त वाङ्मयप्रेमी यथाशक्ती सहकार्य करतीलच या विश्वासासह हे आवाहन!

संपादक/प्रकाशक
'युगवाणी'
विदर्भ साहित्य संघ, नागपूर.

●●

टीप : निधीची रक्कम चेक/ड्राफ्टने 'सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ' या नावे कृपया **'युगवाणी स्थायी निधीकरता'** असे नमूद करून पाठवावी ही विनंती.

अनुक्रमणिका

युगवाणी

॥ विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र ॥

संपादक : श्रीपाद भालचंद्र जोशी

॥ भाषा, साहित्य, संस्कृती, संवाद व कलाविषयक अभिरुचीचे जोपासन, संवर्धन-संशोधन ॥

प्रबंध संपादक केशव जोशी

संपादक मंडळ : डॉ. विश्वास कानडे/डॉ. दमयंती पांढरीपांडे/मनोहर तल्हार/कमलाकर धारप/प्रा. कृष्णा चौधरी/भगवान ठग

वर्ष पन्नासावे/अंक ५०-८ ते १२ **जाने.-मार्च १९९५.**

मूल्य १० रु./वार्षिक वर्गणी ५० रु. ■ त्रैवार्षिक वर्गणी १२५ रु.

अनुक्रम

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त.

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

■ **मुखपृष्ठ चित्र व संकल्पन : वसंत चव्हाण**

शीर्षक 'उत्क्रांती एक चैत्र-तार्किक परिणती' (Evolution a picto-logical consequense)

■ आतील चित्रे : संजय धोतरकर/भ. मा. परसवाळे/सुभाष शर्मा/वसंत चव्हाण

■ **संपादकीय पत्रव्यवहार : संपादक, युगवाणी, वि. सा. संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२ / भाष : ५२३९२९**

■ प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२.

■ मुद्रक : मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १२.

संपादकीय निरोपाचे !

विदर्भ साहित्य संघाचा माझा संबंध आला त्याची विदर्भ साहित्य संघाच्या कार्यवृत्तातील पहिली लेखी नोंद कविवर्य ग्रेस यांच्या संपादनाखालील 'युगवाणी' च्या डिसेंबर १९७३-जानेवारी १९७४ च्या अंकात (पृ. ८१०) आढळते. ४ नोव्हेंबर १९७३ रोजी स्थानिक नाट्यसंस्थांचा एक मेळावा प्रा. माधव मनोहर यांच्या उपस्थितीत त्या अगोदर तीन दिवस झालेल्या त्यांच्या व्याख्यानमालेच्या शेवटी, आयोजित करण्यात आला होता. नागपुरात नाट्यसंस्थांच्या मधून त्यावेळी विस्तव जात नसे. नाट्यसंस्थांच्या प्रतिनिधींना एकत्र आणण्याचा तो पहिलाच स्तुत्य प्रयत्न होता असे त्या कार्यवृत्तात म्हटले आहे. या मेळाव्याची कल्पना सुचवल्यावर ती मूर्त रूपात उतरवण्याचे विदर्भ साहित्य संघातले कार्य नाट्य समितीचे तेव्हा आमंत्रक असलेले व आताचे गेले पाच कार्यकाळ सरचिटणीस असलेले श्री. मनोहर म्हैसाळकर यांनी केले होते. मेळाव्याचे संचालन आमंत्रक श्री. मनोहर म्हैसाळकर व सहआमंत्रक श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी केले अशी ती नोंद आहे. तो काळच स्वातंत्र्योत्तर वाङ्मयीन व एकूणच नवचैतन्याचा, जुन्या मतांच्या, प्रस्थापित-विस्थापितांच्या आणि नवतेच्या संघर्षाचा, विशेष म्हणजे या साऱ्यांना असलेल्या सांस्कृतिक प्रतिष्ठेचा होता.

जे जे म्हणून सारे आधुनिक अभिरुचीसंपन्न, नव मानवतावादी, परिवर्तनकारी, नव्या मूल्य व्यवस्थेचे म्हणून असेल ते सारे या समाजात आधुनिक अर्थाने प्रथमच घडत होते. नव्हे, ते घडवण्यात आपलाही सहभाग आहे याचा आनंदही आम्ही उपभोगावा असा तो काळ होता. त्या वातावरणात, संस्कारात घडत होतो. मुक्तिबोध, ग्रेस, भाऊ समर्थ, वसंत वरखेडकर, अशी विदर्भातील त्या काळातील या घटिताची प्रमुख प्रतीके होती. त्यांच्या सारख्यांच्या केवळ सावल्यातच माझी पिढी घडत होती असे नव्हे तर त्यांचा प्रत्यक्ष सहवास, चर्चा, बैठकी आणि रात्र-रात्र चाललेले खाजगीतले संवाद हेही तेव्हा वाट्याला येत होते आणि अशातच गावात चाललेल्या आमच्या नव्या नवतेच्या मूल्यांनी झपाटलेल्या नाट्य-संस्कृती-वाङ्मय-साहित्य-सामाजिक क्षेत्रातील धडपडी-चळवळी-उपक्रम यावर अचूक लक्ष ठेवून असलेल्या मनोहर म्हैसाळकरांनी नेमके उचलून त्यांच्या वाट्याला विदर्भ साहित्य संघात आलेल्या पहिल्या कार्यसमितीत अस्मादिकास कार्यास लावले. आणि वरती नोंद म्हटली त्या कार्याने म्हैसाळकरांनी विदर्भ साहित्य संघात माझा प्रत्यक्ष कार्यप्रवेश घडवला. तेव्हा वय होते २३ वर्षे. त्यानंतर चार वर्षांनी झालेल्या कार्यकारिणीच्या निवडणुकी दरम्यान विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारिणीत कार्यकारिणी सदस्य म्हणून माझा प्रत्यक्ष प्रवेश झाला. तेव्हापासून आजपावेतो या संस्थेतील विविध प्रकारच्या कार्याशी आलेल्या माझ्या प्रत्यक्ष संबंधाचे वर्तमान व इतिहास सर्वश्रुतच आहे. त्याचा पुनः पाढा इथे वाचण्याची गरज नाही.

शब्द-चित्र-नाट्य-शिल्प-संगीत इ. विषयीच्या सांस्कृतिक समितीच्या कार्याने दणाणून सोडला गेलेला विदर्भ साहित्य संघाचा परिसर, नाट्य समिती, अन्य भाषा साहित्य विभाग, चर्चासत्रे, संमेलने, मेळावे, परिषदा, व्याख्यानमाला, वाङ्मय पारितोषिक समिती, घटनादुरुस्ती (आणि आता संमेलन विभाग व कार्याध्यक्ष) अशा कितीतरी प्रकारच्या कार्य समित्यांचे या संस्थेत सोबतच्या अनेक तत्कालीन सहकाऱ्यांच्या मदतीने जे कार्य करता आले त्याचा आनंद लाभला. या सहकाऱ्यांच्या, म्हैसाळकरांच्या व कार्यकारिणीच्या अन्य सदस्यांच्या सहकार्य, मार्गदर्शन व मदतीने प्रत्येक सांभाळलेल्या जबाबदारीच्या कार्यात काही नवीन, काही नियमित, काही वेगळेही तर काही प्रथमच करता आले. वाङ्मयीन उत्साह संघटित करता आला, जोपासता, संवर्धित करता आला. विदर्भात गेल्या दोन दशकातील वाङ्मयीन - नाट्य - कला - संस्कृती क्षेत्रातील जडण-घडणीत आपलाही वाटा आहे याचा आनंद या मंडळीमुळेच लाभू शकला. साहित्य संघाबाहेरही मांडलेल्या, राबवलेल्या अनेक नव्या संकल्पना, चळवळी, उपक्रमांचाही याच मंडळीमुळे साहित्य संघानेही उदारपणे स्वीकार करून त्याला आपल्या कार्यक्रमात स्थानही दिले, प्रतिष्ठा दिली. माझ्या या वाङ्मयीन संवेदनशीलतेची व कार्याची तर तेव्हा पक्की पावतीच मिळाली असे साऱ्यांना वाटले जेव्हा प्रा. राम शेवाळकर यांच्या अध्यक्षीय कारकिर्दीतील कार्यकारिणीने 'युगवाणी' च्या संपादनाची जबाबदारी माझ्यावर सोपवली आणि ती पार पाडण्यासाठी प्रा. राम शेवाळकर व कार्यकारिणीने पुरेसे बळही दिले.

'युगवाणी 'चे संपादन करण्याची संधी कधीतरी लाभावी अशी मनीषा विदर्भातल्या साहित्य क्षेत्रातील प्रत्येकच कर्तृत्ववान वाङ्मयीन-सांस्कृतिक संवेदनशील मन असणाऱ्याने बाळगली आहे. आणि ते स्वाभाविकही आहे. अगोदरच्या पिढीतही ही मनीषा राहिलेली होतीच.

वा. ना. देशपांडे, ग्रेस यांच्यासारख्या संपादकांच्या स्पर्शाने सोने झालेल्या 'युगवाणी 'च्या संपादन परंपरेच्या जबाबदारीची ही धुरा स्वतंत्रपणे, एका नव्हे तर ३ वर्षांच्या सलग दोन कालखंडाकरिता अशी सहा वर्षे व त्या अगोदरची डॉ. आशा सावदेकरांच्या मुख्य संपादक असण्याच्या कालखंडातील तीन वर्षे संपादक म्हणून धरून एकूण नऊ वर्षे विदर्भ साहित्य संघाने सोपवून मजवर जो विश्वास प्रकट केला त्याबद्दल मी या संस्थेचा व या निर्णयप्रक्रियेत सहभागी अध्यक्ष प्रा. राम शेवाळकर, त्यानंतरचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार, सरचिटणीस मनोहर म्हैसाळकर आणि या नऊ वर्षातील तीनही कार्यकाळातील कार्यकारिणींचे सर्व ज्येष्ठ व नवागत सदस्य आणि त्यांच्या या निर्णयास सहकार्य केलेले विदर्भ साहित्य संघाचे सर्व आजीव व साधारण सदस्य यांचा व्यक्तीशः ऋणी आहे. एवढा प्रदीर्घ कालखंड 'युगवाणी 'च्या संपादकपदी एखादीच व्यक्ती राखली जाण्याचा 'युगवाणी 'च्या पाच दशकांच्या इतिहासातील हा पहिलाच व अपवादात्मक कालखंड माझ्या वाट्याला आला याबद्दल मी तो देऊ केलेल्या साऱ्यांचा अंतःकरणपूर्वक आभारी आहे.

मराठीतील दर्जेदार वाङ्मयीन नियतकालिकांच्या आजवरच्या इतिहासातही गेल्या सुमारे दशकाचा हा कालखंड आपली नोंद ठेऊन जाणार आहे. कारण याच कालखंडात वाङ्मयीन नियतकालिकांच्या अस्तित्वाचा, उपजीविकेचा आणि त्या निमित्ताने समग्र मराठीतील वाङ्मयीन संस्कृतीचाच प्रश्न छोट्या मोठ्या गटागटातील चर्चेपासून तो वर्तमानपत्रांची संपादकीये, आकाशवाणी, दूरदर्शनवरील चर्चा, साहित्य संमेलनातील चर्चा-परिसंवाद, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची अध्यक्षीय भाषणे येथपासून तो या मराठी राज्याच्या निर्मितीपासून प्रथमच विधीमंडळाच्या सभागृहाच्या कामकाजाचा भाग होईपर्यंत चर्चिल्या गेला. केवळ चर्चिल्याच गेला नाही तर त्यावरील उपाययोजनेकरता प्रत्यक्ष कृतिच्या दृष्टीने प्रयत्न केले जाऊन लक्षणीय असे काही यश लाभावे या प्रकाराने मांडता झाला. या कालखंडातील या प्रमुख वाङ्मयीन-सांस्कृतिक समस्येचा वेध घेऊन तिच्यामागे मराठीतील सारी वाङ्मयीन संस्कृतीपीठे उभी व्हावीत, मराठी राज्यातील मराठीभिमानी जनतेच्या सर्वोच्च अशा विधीमंडळाचेही लक्ष वेधले जावे व त्या योगे वाङ्मयीन संस्कृती, तिची मुखपत्रे असणारी 'युगवाणी' सारखी नियतकालिके ही केवळ मूठभरांची मूठभर साधने नसून तमाम मराठी जनतेच्या वाङ्मयीन संस्कृतीची ती समकालीन प्रतीके आहेत हे जनमानसावर बिंबवण्याचा प्रयत्न व्हावा हा जो उद्देश होता तो सफल झाला. या कालखंडातील या समस्येला साऱ्याच अशा नियतकालिकांच्या वतीने वाचा फोडून त्यात पुढाकार घेण्याचे व ते इथवर आणण्याचे कार्य 'युगवाणी' ने आयोजिलेल्या पहिल्याच नियतकालिक विकास परिषदेतर्फे करता आले याचा सार्थ अभिमान आहे. युगवाणीचा संपादक म्हणून हे कार्य करण्याची संधी मला लाभली याचा आनंद आहे. मराठीतील सर्वच वाङ्मयीन नियतकालिकांच्या संपादकांनी त्या करता केलेल्या प्रत्यक्ष सहकार्याचा व हे कार्य आज जिथवर पोहचले आहे तिथवर ते आणून पोहचवण्यात सहभागी असलेल्या साऱ्याच माध्यमांतील प्रत्यक्ष सहभागी व्यक्तींचा त्यात मोठा वाटा आहे.

'युगवाणी 'च्या संपादनाचा हा कालखंड इतरही अनेक अर्थाने वैशिष्ट्यपूर्ण आहे. एकतर सत्तरीच्या दशकोत्तर भारतीय समाजात जनमानसाला एकीकडे लागलेला धनसंस्कृतीचा हव्यास, आदर्शवादाचा व पारंपारिक आणि नवमतवादी मूल्यव्यवस्थांचाही क्षय, तर दुसरीकडे ऐंशीच्या दशकातील प्रच्छन्न भोगवादी बाजाराच्या अर्थव्यवस्थेची मानव ही साधनसामुग्री तेवढी असल्याची जाणीव वृद्धिंगत करणारी दृक-श्राव्य माध्यमे व दूरचित्रवाणी यांनी सुमारे गेल्या पंधरा-सोळा वर्षातील वाङ्मयीन विश्वाचा नूरच पालटून टाकला आहे. हा नूर वाङ्मयीन उदासीनतेचा करून टाकला आहे.

विविध साहित्य प्रवाहांची कुंठितावस्थाही याच काळात तीव्रतेने अनुभवली गेली आहे. घोर वाङ्मयीन उदासीनता, बधीरता, संवदेन विहीनता, भाषेच्या सर्जनशील वापराच्या प्रेरणांपेक्षा व्यावहारिक, लाभदायी व तत्सम उपयोजनेकडेच तेवढे वाढलेले लक्ष आणि परिणामी प्रादेशिक साहित्य संस्थांच्याही बाबतची वाढती उदासीनता व त्यांच्या वाट्याला येणारी आर्थिक कोंडी अशा या कालखंडातील वातावरणाची अस्सल वाङ्मयीन संस्कृती ही बळी ठरलेली आहे. त्यामुळे अशा कालखंडात वाङ्मयीन नियतकालिकांची जणू गरजच संपुष्टात आल्यासारखे जाणवणारे वातावरण अशा या पार्श्वभूमीवर

'युगवाणी' सारख्या सर्वच सर्जनशील वाङ्मयीन नियतकालिकांच्या संवेदनशील संपादकांना आपआपल्या नियतकालिकांचे संपादन ही या कालखंडात तारेवरची आव्हानात्मक कसरतच वाटली आहे. 'युगवाणी' व तिचे प्रस्तुत संपादकही त्याला अपवाद नाहीत.

एकीकडे साहित्य संस्थांची आर्थिक कोंडी व त्यापोटी संस्थेच्या वाङ्मयीन मुखपत्रासारखे आत्यंतिक महत्त्वाचे व प्राथमिक जबाबदारीचे कार्य हे देखील खर्चिक व संस्थेवर बोजा पाडणारे असे वाटायला लावणाऱ्या उदासीन अशा मानसिकतेची निर्मिती, नियत अंकांची वर्षभरातील त्यामुळे रोडावणारी संख्या, प्रकाशनातील अनियमितता, त्यामुळे वाचकांशी संवाद साधण्यात होणारा कालापव्यय व यामुळे निर्माण होणारा दुरावा, लेखकांना दिलेला शब्द पाळता येईलच याची नसलेली खात्री, परिणामी सर्जनशील व संवदेनशील लेखकास सतत संपर्कात राखून लिहिते राखण्यात संपादकासमोर निर्माण होणाऱ्या अडचणी व परिणामतः जुन्या-जाणत्या लेखकांशी तुटणारा व नवे लेखक व लेखन फुलते करण्यासाठी, त्याचा वेध घेण्यासाठी ते जोपासण्यासाठी आवश्यक असणारा परंतु न घडू शकणारा संवाद, पर्यायाने योजलेले वारंवार विस्कटून जाणे व ठरलेले आणि ठरविलेल्या उद्दिष्टांची पूर्तता होऊच न शकणे, त्यातूनही येणारे नैराश्य आणि त्यालाही छेद देऊन न उतता, न मातता; घेतला वसा न टाकता, 'शो मस्ट गो ऑन' या व्रताचा संपादकास करावाच लागणारा पाठपुरावा, हे एकीकडचे वास्तव. तर दुसरीकडे लेखनाची नवी रूपे, आयाम, आशय जिद्दीने शोधण्याच्या, घडवण्याच्या, जीवनातील सर्जनशील उर्मीच्या, सौंदर्यबोधाच्या गरजेच्या दुष्काळापोटी वाढत जाणारी सामाजिक-वाङ्मयीन सपकता आणि सपक वाङ्मयीन आविष्काराच्या ढिगातून अभावानेच आढळणारी लेखनकृतीतील सर्जकता हेही एक नवे वाङ्मयीन वास्तव. तर पलीकडे अभिरुचीवरील आक्रमणाच्या 'हजारो हातांच्या आक्टोपसाच्या' विळख्यात सापडलेल्या सामाजिक सांस्कृतिकतेने घडवायला घेतलेले अभिरुचीविहीन, सौंदर्यबोध शून्य समाजबांधणीचे वास्तव. परिणामी दर्जेदार वाङ्मयीन नियतकालिकांचे आवर्जून, आपण होऊन वर्गणीदार असण्याची, ती संस्कृती जगवण्याची मनीषा-अभिलाषा असणारी संपुष्टात येत चाललेली लोकसंख्या अशा विविध आयामी कैचीत दर्जेदार वाङ्मयीन नियतकालिके आज सापडलेली आहेत. जी काही टिकून आहेत ती केवळ 'युगवाणी' म्हणजे विदर्भ साहित्य संघ, हे मुखपत्र टिकणे म्हणजे विदर्भ साहित्य संघ टिकणे, अशी स्पष्ट आणि कणखर भूमिका घेणारे प्रा. राम शेवाळकरांसारखे, पुढे याच भूमिकेचा पाठ पुरावा करणारे प्रा. सुरेश द्वादशीवारांसारखे, अध्यक्ष, मनोहर म्हैसाळकरांसारखे जाणते सरचिटणीस व कार्यकारी सदस्य अशी नियतकालिके चालवणाऱ्या संस्थांना लाभले म्हणून. या तळमळीचे व भूमिकेचे अध्यक्ष, संस्था चालक व संपादक लाभलेले असे पर्यंत ही नियतकालिके टिकाव धरू शकणार आहेत. पर्यायाने अशीच मंडळी अशा साहित्य संस्थांना लाभत राहणे ही किमान अग्रक्रमाची बाब असायला हवी आहे.

'युगवाणी'च्या माझ्या संपादकीय कारकिर्दीत या अशा बाबींची विस्तृत कारणमीमांसा व सविस्तर चर्चा मी संपादकीयातून वेळोवेळी केलेल्या असल्याने त्याचाही पुनरुच्चार येथे करीत नाही. फक्त या कार्यकाळात अग्रक्रमाने जाणवलेल्या अत्यंत महत्त्वाच्या बाबींचे सार म्हणून हे नोंदवीत आहे एवढेच.

उपरोक्त सर्व पार्श्वभूमीवर 'युगवाणी'चे संपादन हाती घेतांना या कार्यकाळातील ठरवलेल्या साऱ्याच उद्दिष्टांची मला पूर्ती करता येणे अशक्य असल्याचे भान पहिल्याच कार्यकाळातील पहिल्याच अंकापासून होते. तरीही मुळात मासिक असलेल्या परंतु त्रैमासिक होऊन बसलेल्या 'युगवाणी'चे संपादन दुसऱ्यास सोपवतांना 'युगवाणी' हे किमान दर महिन्यात प्रकाशित होणारे नियतकालिक ठरेल असे बघावे असे योजले होते. त्यानुसार माझ्या पहिल्या कार्यकाळात ते बरेच अंक द्वैमासिका पर्यंत आणता येऊन पुढे काही काळ मासिक अंकापर्यंतही आणून ठेवता आले होते. विदर्भ साहित्य संघाचे उत्पन्नाचे धनवटे रंग मंदिरासारखे स्वतःचे साधन तेव्हा अस्तित्वात होते. परंतु पुढील नियोजित विकासाचे दृष्टीने उभारण्यात येत असलेल्या सांस्कृतिक संकुलाकरता पुढील कार्यकाळात हे साधन देखील तात्पुरते स्थगित झालेले असल्याने 'युगवाणी'ची अनियमितता पुनः पुढील कार्यकाळात वाट्याला आली असली तरी ही कायमची नव्हे तर तात्पुरती अवस्था आहे हे लक्षात घ्यायला हवे. उद्याच्या नव्या नियमिततेच्या उषःकाला आधीची ही अवस्था आहे एवढेच. एकूण ७२ मासिक स्वरूपात अंक या काळात प्रकाशित व्हायला हवे होते. परंतु विदर्भ साहित्य संघ या काळात हे ७२ अंक, ४ मासिक, ८ द्वैमासिक, ८ त्रैमासिक व इतर अशा एकूण २४ अंकाच्या स्वरूपात प्रकाशित करू शकला.

वाङ्मयीन नियतकालिकांच्या या पडझडीच्या काळीही 'युगवाणी' मात्र आज आपली परंपरा, दर्जा अभिरुची व लेखक, वाचक, वर्गणीदार आणि प्रकाशन टिकवून असलेले व केवळ वैदर्भीय अस्मितेचे व विदर्भ साहित्य संघाचेच नव्हे तर समग्र मराठीचे, सर्वच प्रदेश व प्रवाहांना आपले वाटणारे प्रातिनिधीक असे वाङ्मयीन मुखपत्र झालेले आहे व युगवाणीची आज हीच ओळख आहे. याचा संपादक म्हणून मला सार्थ अभिमान आहे.

'युगवाणी'च्या माझ्या संपादन कार्यकाळात 'युगवाणी'ची ही लक्षणीय ओळख व हे सर्वप्रवाही एकजिनसी असे आपलेपण साकारण्यात या कालखंडात ज्या ज्येष्ठ, श्रेष्ठ तसेच नवोदित लेखक, कवी, अभ्यासक, संशोधकांनी लेखन केले त्या साऱ्यांचा तसेच 'युगवाणी'तून हे लेखन वाचकांपर्यंत पोहचते करण्याच्या निर्मिती व व्यवस्थापकीय प्रक्रियेत, निर्मितीचा दर्जा टिकवून धरण्यात युगवाणी चे संपादक मंडळ, प्रबंध संपादक केशव जोशी, मुखपृष्ठाचे तसेच आतील रेखाटनांचे चित्रकार, कै. भाऊ समर्थ, सर्वश्री संजय धोतरकर, भ. गा. परसवाळे, वसंत चव्हाण, प्रा. अरविंद मोरे, प्रकाश कामतीकर, प्रमोदबाबू रामटेके, सुभाष शर्मा, राजू महाजन, अरुण मोरघडे, विठ्ठल वाघ अशा चित्रकारांचा तसेच संदर्भ सेवा प्रदान करणारे पहिल्या कार्यकाळातील विदर्भ साहित्य संघाच्या शिवाजी संदर्भ ग्रंथालयाचे चंद्रकांत कुळकर्णी व नंतरच्या कार्यकाळात कुंदा केळापुरे, मुद्रित शोधन व तत्सम सहकार्य केलेले सौ. शोभा उवगडे, श्यामकांत कुळकर्णी, विलास चिंतामण देशपांडे, तसेच विदर्भ साहित्य संघाशी संबंधित श्री. पंचभाई, श्री. घोडे, पद्मनाभ जोशी इ. व संबंधित अन्य कर्मचारी गण साऱ्याचाच सहभाग आहे. या साऱ्यांनीच माझ्या कार्यकाळात मला केलेल्या अंतःकरणपूर्वक सहकार्यामुळेच हा कालखंड सुकर आणि अविस्मरणीय झाला आहे. त्या साऱ्यांचाच मी मनःपूर्वक आभारी आहे.

अंधश्रद्धेला, मग ती वाङ्मयाच्या अंगाने येणारी धार्मिक अंधश्रद्धा असो वा सांस्कृतिक, व्यक्तिगत, थारा मिळू नये असा डोळस झुकाव तेवढा या कालखंडात 'युगवाणी'ने कटाक्षाने पाळला. एवढा आरोप या कालखंडावर निश्चित करता येईल व तसा तो केला गेल्यास या कालखंडातील यासंबंधीच्या धोरणाची ती यशस्वी फलश्रुतीच ठरेल. संत व संत साहित्या संबंधाने प्रकाशित मजुकराबाबत देखील हीच दृष्टी बाळगली गेली होती. डॉ. सु. बा. कुळकर्णी यांचे 'युगवाणी'तून या कार्यकाळात प्रकाशित झालेले ज्ञानेश्वर, नामदेव, इ. विषयक महत्त्वपूर्ण संशोधन ही याच दृष्टीने महत्त्वाची उपलब्धी. 'युगवाणी'च्या या कालखंडात अंक उघडल्याबरोबर मजकुर सुरू होतांनाच्या पहिल्या पानावरील वाङ्मय प्रकाराचा मान कविता या वाङ्मय प्रकाराला लाभला होता, त्याचे कारणही या कालखंडातील कविता या वाङ्मय प्रकारात लेखन व उत्तम कविता लेखन देखील विपुल व अधिक्याने असणारे वास्तव नोंदले जाणे तसेच अवांछनीय कवी व कवितेमुळे एकूण काव्यप्रांता बद्दलच अनास्था निर्माण होण्याच्या या कालखंडात अस्सल कवितेचे महत्त्व व प्रतिष्ठा जाणवून देणे हे होते. तो त्या दृष्टीने जाणीवपूर्वक केला गेलेला प्रयत्न होता. 'युगवाणी'च्या या पृष्ठावर कविता प्रकाशित होणे हा त्या संबंधातील सन्मानाचाही एक मापदंड ठरावा एवढी मान्यताही या प्रयोगाला लाभली होती. मराठीतून प्रथमच लिहिले गेलेले आनंद आडे यांचे 'गझलचे छंदःशास्त्र' याच कालखंडात 'युगवाणी'तून प्रकाशित केले गेले.

नियतकालिकांमधून हद्दपार झालेल्या परंतु सर्जनशील आविष्कार असणारा, एकांक-एकांकिका या नाट्य लेखन प्रकारालाही स्थान देऊन त्याचे प्रकाशन पुनरुज्जीवीत करून, उत्तम एकांक, नाट्य लेखन कुठे प्रकाशित करायचे या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्नही 'युगवाणी' ने या कालखंडात केला. दृश्य कलांची, छापील शब्द माध्यमांनी कलात्मक व गांभीर्याने दखल घेण्याची मराठी नियतकालिकातून लोप पावलेली संस्कृती देखील श्रेष्ठ व उत्तमोत्तम चित्रकारांच्या सहकार्याने, त्यांची मुखपृष्ठे व तत्सम अंकामधून विखुरलेली रेखाटने व लेखन या माध्यमातून 'युगवाणी' ने या कालखंडात पुनरुज्जीवीत करून शब्द, चित्र व अन्य कला माध्यमांच्या व कलावंतांच्या परस्पर संवादाच्या लोप पावणाऱ्या संस्कृतीतही थोडा प्राण फुंकून या संस्कृतीची गरज व नाते जीवित राखण्याचा प्रयत्नही जाणीवपूर्वक केला. हा प्रयत्न एवढया पुरताच मर्यादित नव्हता तर या कालखंडात विविध विषय आशयाची देखील क्षितिजे 'युगवाणी'च्या कक्षेत आणून त्या कक्षांमधून 'युगवाणी' हे विदर्भ साहित्य संघाचे केवळ वैदर्भीय मुखपत्र न राखता "भाषा, साहित्य, संस्कृती, संवाद व कलाविषयक अभिरुचीचे जोपासन, संवर्धन, संशोधन." करणारे अभिरुचीसंपन्न ब्रीद असलेले प्रातिनिधिक नियतकालिक करण्याचा प्रयत्नही केला गेला. आणि हे सारे करतांना प्रत्येकच अंकाचा निर्मितीचा दर्जा देखील सांभाळण्याचा व तो अधिक उन्नत करण्याचा प्रयत्नही केला गेला.

याच कालखंडात 'युगवाणी'ने 'हँड-कंपोझिंग' व 'लेटर प्रेस' तंत्रावरून कॉम्प्युटर कंपोझ व ऑफसेट छपाई

तंत्राच्या युगातही प्रथमच प्रवेश केला. या संक्रमणामुळे अर्थातच 'युगवाणी'चा निर्मितीचा दर्जा उन्नत करण्यास मदत झाली. निर्मितीचा हा दर्जा उन्नत करण्याचे कार्य या कालखंडात सुकर झाले ते वसंत चव्हाण यांच्या मांडणी संकल्पन व मुखपृष्ठ नियोजन, कै. भाऊ समर्थ, प्रकाश कामतीकर, अरविंद मोरे, प्रमोद बाबू रामटेके, संजय धोतरकर इ. ची मुखपृष्ठावरील चित्र, रेखाटने व अन्य चित्रकारांची रेखाटने तसेच 'युगवाणी' छपाई परंपरेने ज्या वनहट्टी कुटुंबाकडे राहिलेली आहे त्या कुटुंबातील मधुसूदन व त्यांच्या नंतरच्या पिढीतील बाळासाहेब व भूषण वनहट्टी या साऱ्यांनी जीव ओतून केलेल्या सहकार्यामुळेच.

थोडीशी लांबलेली वाङ्मयीन परिघातील विस्तृत संपादकीये या करता देखील 'युगवाणी' चा हा कालखंड नोंदला गेला आहे. 'युगवाणी'चे पहिले संपादक, थोर लेखक व मराठीतील मुक्तछंदाचे प्रवर्तक वा. ना. देशपांडे व मराठी ज्यांचा सार्थ अभिमान बाळगून आहे असे थोर मराठी कवी व ललित गद्यकार ग्रेस यांच्या वाङ्मयीन, साहित्यविषयक, आशयघन व विचारसंपन्न संपादकीयांचा तत्कालीन अपवाद वगळता एवढी विस्तृत संपादकीये युगवाणीतून लिहिली जाण्याचा एवढा दीर्घ कालखंड 'युगवाणी'च्या अर्ध शतकाच्या वाटचालीच्या इतिहासात माझ्या वाट्याला आला हे मी माझे भाग्य समजतो.

या संपादकीय संस्कृतीला या कालखंडात वाङ्मयीन नियतकालिकांच्या प्रांतात कदाचित अन्य समांतर असा कोणताच पर्याय नसल्याने ती भरभरून वाखाणल्या गेली असावीत, उचलून धरली गेली असावीत. केवळ 'युगवाणी' नेच एकाकीपणे चालवलेली ही वाङ्मयीन संपादकीय संस्कृती हा या कालखंडातील एवढा महत्त्वाचा व प्रिय असा विशेष ठरला की ज्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात प्राध्यापक म्हणून माझी नियुक्ती झाली (पण मी रुजु झालो नाही) तेथील मुलाखती दरम्यान देखील निवड समितीतील एका तज्ञाने मुलाखतीचा मूळ विषय थोडा वेळ बाजूला राखून युगवाणीतून एवढी विस्तृत संपादकीये लिहिली जाण्याच्या संबंधातील चर्चा उपस्थित केली होती. 'युगवाणी'च्या या कालखंडातील व्यापक पोहोच व स्वीकाराची एका अर्थी मिळालेली ती पावतीच होती.

या संपादकीयांवरील सर्व प्रातिनिधिक असा निवडक पत्रव्यवहार वेळोवेळी प्रकाशित केलेला आहेच. 'अंतर्मुख करणारे संपादकीय' (पुरुषोत्तम पाटील, धुळे), विचारांचे गांभीर्य विचार करण्याला लावणारे' (प्रभाकर बागले, मनमाड), 'वैशिष्ट्यपूर्ण विपुल सामुग्रीयुक्त संपादकीय, मौलिक चिंतन व्यक्त करणारे', (भ. मा. परसवाळे), "त्यात कवितेची भावोत्कटता व ललित निबंधाची चिंतनशीलता आहे. तुमचे सारेच विचार चिंतनीय आहे (डॉ. द. भि. कुळकर्णी, नागपूर), 'लक्षणीय संपादकीय' (सुधीर वेडेकर, पुणे), 'संपादकीय चिंतनीय. विचार करायला लावणारे, अंतर्मुख करणारे. प्रत्येक अंकातील संपादकीय चिंतनीय असते. (डॉ. सुरेश भृगुवार, वाराणसी), 'संपादकीय फार आवडले' ते मुद्दाम कळवण्यासाठी'.... (यशवंत देव, मुंबई), 'आपली संपादकीय आवाहने आणि विश्लेषणे मनःपूर्वक आणि मार्मिक असतात' (त्र्यं. वि. सरदेशमुख, सोलापूर), (डॉ. श्रीपाल सबनीस, धुळे), प्रत्येक संपादकीय वाचण्याची सवय लागून गेली आहे (पंकज कुरूलकर), 'संपादकीय बरेच काही सांगून सूचवून जाणारे आहे, प्रसंगोचित आहे' (वा. के. लेले, वाराणसी). "आजकाल संपादकीय त्यातल्या त्यात वाङ्मयीन नियतकालिकांचे वाचणे बरेच जण टाळतात परंतु आपले संपादकीय माझ्याप्रमाणे बरेच जण आवर्जून वाचत असतील कारण त्यात नुसत्या तक्रारीच नसतात तर काही विचार आणि उपायही असतात. (दासू वैद्य, औरंगाबाद), अशा शब्दात व ठिकठिकाणच्या ज्या मान्यवरांनी, नवोदितांनी, समीक्षक, चित्रकार इ. नी आवर्जून व्यक्तिगतरित्या आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करण्याची काळजी घेऊन माझी ही संपादकीये लिहिती राखण्याचे प्रोत्साहन दिले आणि बधीरतेच्या वाटणाऱ्या या कालखंडातही आपला आवाज केवळ आपणच तेवढे ऐकत नसून त्याचे प्रतिध्वनी देखील उमटतात हा जो सांस्कृतिक दिलासा त्यांनी दिला हे त्यांचे ऋण मी कधीच विसरू शकणार नाही.

याशिवाय, "उत्सुकतेने अंकाची वाट पहावी असे तुमचे संपादन कौशल्य. युगवाणीचे अंक ही संग्राह्य कलाकृती, प्रादेशिकतेच्या सीमारेषा ओलांडलेल्या आहेत" म्हणणारे समीक्षक-लेखक प्रा. मधु जामकर, 'या कार्यकाळात युगवाणी हे लेखकांचे मुखपत्र होते आहे' हे पाहून समाधान वाटणारे लेखक वसंत चिंचाळकर, ललितेतर, चर्चात्मक, वैचारिक लिखाणाला प्राधान्य मिळालेले पाहून मनोधैर्याचे कौतुक वाटते' म्हणणारे हे. वे. वलकुंद्री, 'युगवाणी' ची प्रदीर्घ साहित्यिक परंपरा प्रदीर्घ काळ चालविली याचा आनंद' व्यक्त करणारे डॉ. यू. म. पठाण, 'वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषदेने

'ऐतिहासिक कार्य निर्माण झाले, वाङ्मयीन नियतकालिकांना दिलासा, उजाळा मिळाला, म्हणणारे डॉ. भा. व्यं. गिरधारी, 'लोखंडाला परिस लागताच सोने व्हावे तसे झाले, आपल्या संपादनाने ही किमया केली' अशी भावना व्यक्त करणारे विदर्भ साहित्य संमेलनाचे एक अध्यक्ष, प्रख्यात लेखक, मनोहर तल्हार, 'प्रत्येक अंक वैशिष्ट्यपूर्ण, सखोल विवेचनात्मक व लक्षणीय असतो, 'रत्नाकर' मासिकाची आठवण येते' म्हणणारे वि. म. कुळकर्णी व नरेश कवडी, 'प्रत्येक अंकाची आतुरतेने वाट पाहाते' म्हणणाऱ्या धर्मावाद, नांदेडच्या प्रा. अरुणा चौधरी, 'अंक सुरेख निघतात' म्हणणारे कवी वसंत सांवत, 'आपल्या स्वअर्जित चोखंदळपणाच्या पाऊलखुणा एकूणच साहित्य निवडीत उलगडत जातांना दिसतात' असे म्हणणारे डॉ. विश्वास पाटील, 'युगवाणी' सत्यकथेची पोकळी भरून काढत आहे. आज चेहेरा नसलेल्या मासिकांच्या गर्दीत युगवाणी विचलित होत नाही.' म्हणणारे सोलापूरचे सुनील साळुंके, 'युगवाणी चे अंक म्हणजे समाज व साहित्यिक यांना साधणारा महत्त्वाचा दुवा होय' असे लिहिणारे वेलतूरचे प्रभाकर तांबेकर व 'परंपरेला साजेसा अंक' असे लिहिणारे माधव कोंडविलकर, 'वाङ्मयीन रूप व दर्जा पाहून आनंद वाटला' असे नोंदवणारे डॉ. वसंत स. जोशी, 'अंक खरेच चांगला आहे' असे आवर्जून कळवणाऱ्या ज्येष्ठ विदुषी दुर्गाबाई भागवत, अंकाबद्दल आवर्जून कळवणारे शंकर सारडा, शंकर रामाणी, डॉ. मधुकर वाकोडे, नामदेव चं. कांबळे, प्रा. सुनंदा देशपांडे, प्रभाकर तेलंग, नलिनी वापट, व. वि. कुळकर्णी, भास्कर निनावे, शुभांगी भडभडे, अशोक जोशी, 'माझी सारी जळमटे दूर झाली' म्हणणारे भगवान ठग, प्रशांत वि. गौतम, अशोक मांजरखेडे, 'दर्जेदार अंक काढायचे म्हणजे तारेवरची कसरत. तरीपण नव्या उमेदीने 'युगवाणी' उभी राहिली' असे लिहिणाऱ्या वसमत, परभणीच्या शकुंतला आंभोरे 'युगवाणी प्रगल्भ आणि प्रौढ झाली आहे' असे म्हणणारे ज. वा. कुळकर्णी, 'अंकाला हेतू आहे (जुलै-सप्टें. '९३) बहुतांशी नाटकासंबंधी असा विचारपूर्वक वैचारिक स्वरूपाचा काढलेला अंक, प्रकाशन अनेक वर्षात प्रसिद्ध झालेले नाही', असे लिहिणारे प्रख्यात नेपथ्यकार बापू लिमये, 'युगवाणी' संपादनासंबंधी त्यात प्रकाशित होणाऱ्या लेखनासंबंधी आपण प्रतिक्रिया मागवून त्यातील निवडक प्रतिक्रिया प्रसिद्ध करता अशाने सत्याप्रत जाण्यात मदत होते हे निश्चित' असे मत व्यक्त करणारे राजेंद्र डोळके, अशा कितीतरी लेखक, वाचक, मान्यवर व ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक यांनी युगवाणीच्या या कालखंडात आपल्या प्रतिक्रिया, विचार, सूचना मांडून प्रस्तुत संपादकाला त्याने घेतलेली भूमिका, वळण व दिशा यथायोग्य असल्याचे जे आश्वासित केले त्यांचेही युगवाणीचे त्यांना या कालखंडात जाणवलेले अंतर्बाह्य स्वरूप व प्रकाशन टिकवून धरण्यात फार मोठे अप्रत्यक्ष असे नैतिक सहकार्य झालेले आहे हे आवर्जून नोंदवले पाहिजे. वाङ्मयीन संस्कृतीच्या अपलापाच्या जाणवणाऱ्या या कालखंडात या अशा नामवंतांचे, जाणकारांचे व वाङ्मयीन अभिरुचीच्या दर्जा बाबत दक्ष असणाऱ्यांचे महत्त्व विशेषत्त्वाने जाणवणारे आहे. अशा मंडळीत वाशिमचे मोहन शिरसाट, चंद्रपूरचे मोहन धनकर, अकोल्याचे डॉ. हणमंत पाटील, नागपूरचे डी. एस. चामट, ज्योती लांजेवार, अमरावतीचे के. व्ही. वरोटे, नवरगावचे विजय हवर्डे, इसलामपूरचे रा. पा. निपाणीकर, भास्कर निनावे, नागपूरचे आर्किटेक्ट अशोक जोशी, मोहन मुजुमदार, धनंजय देशपांडे, शरच्चंद्र बुचे, मेहेकरच्या विजयीनी जोशी, भिलाईच्या सुधा डोंगरे, इ. यांचाही समावेश आहे. या साऱ्या मंडळीनी या कालखंडात 'युगवाणी'शी जो संपर्क राखला त्याने युगवाणीला अधिकचे बळ दिले आहे.

'युगवाणी'च्या संबंधात वाचक, लेखक व एकूणच वाङ्मय विश्व किती सजग आणि सतत संपर्क राखून असणारे व 'युगवाणी' च्या संबंधातील घडामोडी किती आपुलकीने व संवेदनशीलतेने टिपणारे आहे याचा प्रत्यय या कालखंडात प्रस्तुत संपादकास विशेषत्त्वाने आला हे नोंदवलेच पाहिजे. "अतिशय प्रतिकूल परिस्थितीत अनेक अडचणी, विवंचना अडथळे असतांना देखील नैराश्याने न ग्रासता नेटाने, संयमाने व दूरदृष्टीने आपण या साहित्यरथाचे सारथ्य केले' असे विदर्भातील एक महत्त्वाचे तरुण अभ्यासक-संशोधक श्रीपाद के. चितळे यांनी केलेले कौतुक व अभिनंदन हे युगवाणीच्या सद्यःस्थितीचे आकलन समकालीनांना कसे आहे, याचा जणू समर्पक पुरावाच. वर्ध्याचे अनंत लिखितकर यांनी देखील अनियत परिस्थिती, अध्यक्षांचे बदल, युगवाणी अंकाची वर्षभराची प्रकाशन स्थगिती आदि विचारात घेता श्रीपाद भालचंद्र जोशी हे संपादक म्हणून सुयशस्वी ठरले व त्यांच्या कारकिर्दीत युगवाणीचे अंक वाङ्मयीन दृष्ट्या भरभराटीस आले' ही व्यक्त केलेली प्रतिक्रिया किंवा 'अंक वाचनीय आणि संग्रही ठेवावे असेच. आर्थिक अडचणींना तोंड देत असतांनाही युगवाणी अंतर्बाह्य देखणे होत चालले आहे हे आपल्या कुशल संपादनाचे यश आहे' हे म्हणणारे भंडाऱ्याचे प्रमोदकुमार

अणेराव यांच्यासारख्या सुहृदांच्या प्रतिक्रियांमधून युगवाणी वर लोभ असणाऱ्या वाचक-लेखक व विदर्भ साहित्य संघाचे सदस्य यांची जी प्रातिनिधिक जाण, सहृदयता, समंजसपणा व 'युगवाणी' सारख्या वाङ्मयीन नियतकालिकांना संपूर्णपणे जाणून घेण्याची वृत्ती-संस्कृती डोकावते तिच्याच आधारावर वाङ्मयीन नियतकालिकांचा प्रवास व युगवाणीचाही गेल्या एकोणपन्नास वर्षांचा पन्नासाव्या वर्षात पदार्पण करणारा प्रवास अव्याहत सुरू आहे. अशाच लेखक, वाचक, वाङ्मयप्रेमी यांच्या बळावर युगवाणी आपल्या पुढील अर्ध शतकाकडे देखील वाटचाल करील असा ठाम विश्वासही आहे. तो विश्वास देणारे सुहृद या कालखंडात माझ्या व युगवाणीच्या वाट्याला आले यातच या संपादन कार्यकाळाचे चीज झाले असे मी मानतो. सुहृदांच्या अशा प्रतिक्रिया हेच या कालखंडातील संपादनाला व युगवाणीला लाभलेले अमोल पारितोषक आहे. ही संवेदनशीलता युगवाणीला पुढेही अशीच लाभत राहो.

या कालखंडासंबंधाने प्रस्तुत संपादकास जाणवलेली अशी अन्य काही निरीक्षणे नोंदवणेही आवश्यक आहे. एकीकडे वर नोंदवल्याप्रमाणे समकालीन वाङ्मयीन संस्कृतीतील श्रेष्ठ, ज्येष्ठ व नवागत आस्थेवाईकांनी राखलेला संपर्क, आवर्जून नोंदवलेल्या प्रतिक्रिया व वाङ्मयीन उत्साहाला पुरवलेली चेतना जशी या कालखंडात प्रस्तुत संपादकाने अनुभवली तशीच दुसरीकडे बऱ्याच प्रस्थापित व ज्येष्ठ लेखकांची दर्जेदार वाङ्मयीन नियतकालिकातून स्वतःहून काही लेखन करण्याची व्यक्तिगत गरजच संपलेली असावी असे वाटणाऱ्या या कालखंडास युगवाणी देखील फारशी अपवाद नसल्याचेही निदर्शनास आले.

काही प्रस्थापित ज्येष्ठ लेखक समीक्षकांनी तर युगवाणीने मानधन द्यावे तरच लिहिणे शक्य असल्याचेही स्पष्ट बोलूनही दाखविले. त्यात गैर काहीच नाही. आज खरोखरच एक उत्तम लेख लिहायचा झाला तरी ग्रंथालयातील संदर्भ चाळणे, ते प्राप्त करणे, छायाप्रत काढणे, व वाहन व्यय, लिखाणाचा कागद, प्रती काढणे, पोस्टेज इ. खर्चच किमान शंभर रुपयांच्या तरी वर जाणारा आहे. मात्र तेवढेही मानधन लेखकांना ही नियतकालिके देऊ शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. प्रस्तुत संपादकाने स्वतःच विदर्भ साहित्य संघाच्या वार्षिक सभा, कार्यकारिणी सभा इ. मधून ठराव मांडून व संस्थेकडून मानधनास तत्त्वतः मंजुरी घेऊन लेखकास मानधन हे मिळालेच पाहिजे हा आग्रह धरलेला आहे. मात्र संस्थेस तत्त्वतः मंजूर करूनही ते देणे शक्य झाले नाही हा अनुभवही घेतलेला आहे. मात्र त्याचबरोबर युगवाणीच्या केवळ प्रस्तुतच नव्हे तर अगोदरच्याही अनेक संपादकांनी पारिश्रमिक, वाहन व्यय अथवा या संस्थेकडून युगवाणी च्या संपादन कार्यासंबंधाने एक पैसाही न घेता निःशुल्कच सेवा दिलेली आहे ही देखील याच वाङ्मयीन संस्कृतीची एक बाजू आहे याचाही विचार लेखनाबाबतच्या मानधनाबाबत जागरूकता बाळगणाऱ्यांनी करणेही आवश्यकच आहे.

ज्येष्ठ व प्रस्थापित लेखकांची अशा वाङ्मयीन नियतकालिकांमधून लेखन करण्याबाबतची उदासीनता ही देखील चिंतेची बाब असून वाङ्मयीन संस्कृतीच्या विविध आयामांच्या चर्चेच्या आजच्या युगात याचाही विचार व त्यावर चर्चा उपस्थित व्हायला काहीच हरकत नसावी.

प्रस्तुत संपादकाच्याच पहिल्या संपादकीय कार्यकाळात नियोजित एका विशेषांका करता विविध उपविषयांची योजना करून महत्त्वाच्या अभ्यासक, समीक्षक, लेखकांना सुचविलेले विषय उपविषय अथवा त्यांना शक्य वा सुचवावेसे वाटेल ते या संबंधात केलेल्या पत्रव्यवहार-स्मरणपत्रे यांना प्रा. के. ज. पुरोहित व डॉ. वा. के. लेले यांचा अपवाद वगळता अन्य कोणाकडूनही पत्राची साधी पोच देखील पाठविली न जाण्याइतकी घोर उदासीनताही अनुभवाला आली आहे.

वाङ्मयीन नियतकालिकातून एकूणच विविध विषय उपविषयांचा वेध घेऊन लिहू इच्छिणाऱ्यांची व त्यातही चिंतनशीलता, सातत्य, सघनता व दर्जेदार लिखाण करू इच्छिणाऱ्यांच्या संख्येतील झपाट्याने होणारी घट व या वृत्तीचा लोप ही देखील एक गंभीर बाब या कालखंडात जाणवते. मात्र याहूनही गंभीर बाब ही लेखनाकरिता विविध प्रकारचे विषय पुरवणारी, विषय सुचवणारी यादी नियतकालिकातून प्रकाशित करीत राहूनही अशाही विषयांवर लेखणी उचलायला लेखक तयार नसावेत ही आहे. विषयांची ही यादी प्रकाशित करीत राहणे म्हणजे केवळ संपादकाच्याच सृजनशीलतेचा आवाका किती मोठा आहे याचीच तेवढी एकाकीपणे जाहिरात करीत राहण्यासारखे संपादकास वाटावे व त्यामुळे केवळ तेवढ्याकरता अशा यादीचे प्रकाशन करणे इष्ट ठरणार नाही म्हणून ती प्रकाशित करणे थांबवावे अशीही वेळ आलेली आहे.

निबंध, संशोधनाधारित लेख व प्रत्यक्ष संशोधन या प्रकारच्या लेखनातील सीमारेषा देखील धूसर होत चालल्याचे जाणवते आहे. विशेषतः निबंध या लेखनप्रकाराची तर गरजच संपुष्टात आली असल्यासारखी परिस्थिती जाणवते. चिंतनशील, आत्मपर ललित लेखन, चिंतन, समकालीन वास्तवाचे सर्वस्पर्शी दर्शन घडविण्याची गरज, विशेषतः सामाजिक-राजकीय-व्यक्तिगत-आर्थिक-सांस्कृतिक इ. परिस्थितीचे निर्मिती घटकांशी असणाऱ्या आंतर संबंधाबाबतची सूक्ष्मता, विविध कला प्रकारांचे आंतरसंबंध, साहित्य व कलारूपांच्या घडणीची चर्चा अशा मूलभूत स्वरूपाच्या लेखनाचीही बरीच वानवा जाणवते.

मराठीच्या एम. ए., एम. फिल., बी. ए. इ. अभ्यासक्रमात नेमलेले (विशेष) लेखक (स्पेशल ऑथर्स) शताब्द्या, स्मृती दिवसांचे निमित्त अथवा अन्य लेखन किंवा तेच ते चार-दोन थोर लेखक यांच्यावरील वाङ्मयीन लिखाणाचे मात्र एक पेव नव्याने फुटलेले आहे व त्याचे कारण बरेचसे लेखक हे ज्या शिक्षण व्यवसायाशी संबंधित आहेत त्यातील व्यावहारिक-व्यक्तिगत-व्यावसायिक उन्नतीशी असलेले सरळ नाते हेच दिसते.

या नियतकालिकांच्या मर्यादेत मावेल अशी उत्तम लघुकथा हा देखील या कालखंडात एक दुर्मिळ असा लेखनप्रकार असल्याचे जाणवले. दीर्घ होत चाललेली कथा-कादंबरी-महाकादंबरी ही दर्जेदार वाङ्मयीन नियतकालिकांना वगळूनच सरळ ग्रंथरूपाकडेच जाणार कारण अशा नियतकालिकांच्या पृष्ठसंख्येमध्ये ती कितीही उत्तम असली तरी मावणे शक्य नाही आणि या नियतकालिकांना नियमितता नाही ही व्यावहारिक मर्यादा या नियतकालिकांना आहे. 'लघुत्त्व' सोडून कथा दीर्घ होण्याचे एक महत्त्वाचे कारण जीवनाचे बहुकेंद्रित्त्वही सांगितले जात असले तरी कथा म्हणजे अशा केंद्रांच्या, पात्रांच्या व प्रसंग घटनांच्या जीवाचे, जीवनाचे 'डाक्युमेंटेशन' वा वर्तमान लेखनही नव्हे की ज्यात साऱ्याच केंद्रांचा जाणीवपूर्वक समावेश व्हायलाच हवा. अर्थात हा वेगळ्या चर्चेचा मुद्दा आहे. इथे या पार्श्वभूमीवर उत्तम लघुकथा या कालखंडात हरवली आहे एवढे निरीक्षण नोंदवणे पुरेसे आहे.

कविता मात्र या कालखंडात उदंड लिहिली गेली, लिहिली जात आहे आणि कवितेचे वाढते तण म्हणून तिला कितीही नांवे ठेवली गेली तरी उत्तम कविता देखील बरीच लिहिली जाते आहे. या वास्तवाचाही स्वीकार करणे आवश्यक आहे. 'युगवाणी' ने या कालखंडात या वास्तवाचा यथोचित स्वीकारच नव्हे तर सन्मानही केला आहे.

एकूण वास्तव हे सुज्ञ वाचकांच्या पातळीवर उच्च जीवनाभिरूचीची गरज असल्याचे दर्शविणारे तर निर्मितीच्या पातळीवरील मात्र बरीचशी उदासीनता, सामाजिक-राजकीय अंतःस्तरांबाबतच्या अभिरूची व जाणीवांचा अभाव, दर्जेदार निर्मितीमध्येही लोकप्रियतेकडील झुकाव (Populist in Classic) थोरांवरील लेखनातील वृद्धी, सखोलतेपेक्षा व्यापकतेचे प्राधान्य व चिंतनशीलतेपेक्षा माध्यमानुकूलतेचा स्वीकार, लेखक संपादक नात्याच्या लाभातून लेखन घडत जाण्याच्या वृत्तीची नवलेखकास न भासणारी गरज यांनी घडत चाललेले दिसते आहे.

या कालखंडाच्या या सर्व प्रकारच्या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संपादकास 'युगवाणी' विषयक मनात ठरवलेले सारेच नियोजित कार्य पूर्ण करताच आले असे नाही हे देखील नोंदवलेच पाहिजे.

सहा वर्षाच्या या कालखंडात एकूण ७२ अंक (मासिक) प्रकाशित व्हायला हवे होते. मात्र तसे गृहीत धरून केलेल्या आखणीत केवळ २४ अंकच संस्था प्रकाशित करू शकल्याने संपादकाला त्याच्या संपादनात कशा मर्यादा पडू शकतात याच्या अधिक विश्लेषणाची गरज भासू नये.

मात्र जे जे आणि जेवढे झाले त्याचाही उदार अंतःकरणाने विदर्भ साहित्य संघाचे भूतपूर्व अध्यक्ष प्रा. राम शेवाळकर, विद्यमान अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार, सरचिटणीस मनोहर म्हैसाळकर व सर्वच ज्येष्ठ व नवागत कार्यकारिणी सदस्य यांनी, युगवाणीच्या लेखक-वाचक-वर्गणीदारांनी, विविध वृत्तपत्रे, त्यांचे अग्रलेखन, वृत्तांत, विविध माध्यमे यांनीही जो स्वीकार केला, जे तोंड भरून मनःपूर्वक कौतुक व स्वागत केले. ते 'युगवाणी'च्या पुढील प्रवासाला बळ देणारे संचित तर आहेच परंतु प्रस्तुत संपादकाचे देखील 'युगवाणी'च्या निमित्ताने ते व्यक्तिगत संचितही झालेले आहे.

याच कार्यकाळातील 'युगवाणी'च्या संपादनावर विद्यापीठ पातळीवरील एम. फिल. च्या एका संशोधन प्रबंधिकेत

जी अध्ययनपर नोंद आली, तरुण भारताचे मुख्य संपादक लक्ष्मणराव जोशी यांनी युगवाणीच्या मी संपादित केलेल्या अगदी पहिल्या वहिल्याच अंकावर दै. तरुण भारतातून स्वतःहून लिहून ज्या प्रकारे स्वागत केले होते, 'युगवाणी' ने आयोजिलेल्या मराठी वाङ्मयीन नियतकालिकांच्या इतिहासातील पहिल्याच परिषदेला मराठीतील सर्व दर्जेदार वाङ्मयीन नियतकालिके व त्यांचे संपादक यांनी जो प्रत्यक्ष सहभाग देऊन सहकार्य केले होते, त्यातील 'मायमराठी' व 'अनुष्टुभ'चे संपादक श्री. प्रभाकर तेलंग व प्रा. प्रभाकर वागवे यांनी 'युगवाणी'तील प्रस्तुत संपादकाची ती संपादकीये आपआपल्या नियतकालिकातून प्रकाशित करून जो सहयोग दिला, लेखक-कवी-आमदार ना. धो. महानोर व लक्ष्मण माने यांनी ते सारे विदर्भ साहित्य संघास प्रत्यक्ष भेट देऊन जाणून घेऊन या मराठी राज्याच्या विधीमंडळापर्यंत पोहचवण्यात, युगवाणी सह सर्वच अशा नियतकालिकांचे अस्तित्त्व सुरक्षित राखण्याच्या व त्यांच्या पुढील संपादकांचा मार्ग अधिक सुकर, अधिक निष्कंटक करण्याच्या संघर्षात जे सहकार्य करून आपले विधीमंडळातील लेखकांचे वाङ्मयीन प्रतिनिधित्व त्या निमित्ताने सार्थ करून दाखविले त्या साऱ्याच्या परिणामी 'युगवाणी' च्या व या प्रकारच्या नियतकालिकांच्या अनुदानाच्या रकमेत दीड पट वाढ झाली आहे व अन्य भरीव लाभही पदरात पाडून घेता आले आहेत. त्या करता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. मनोहर जोशी, सांस्कृतिक कार्य मंत्री ना. प्रमोद नवलकर (ते विदर्भ साहित्य संघाचे आजीव सदस्यही आहेत) यांचेही सहकार्य झाले त्यावद्दल या साऱ्यांचा मी 'युगवाणी'चा संपादक या नात्याने तसेच व्यक्तीशः मनःपूर्वक आभारी आहे.

याच कालखंडात वाङ्मयीन नियतकालिक परिषेदच्या उपरोल्लेखित कार्याचा परिणाम म्हणनू पुरी येथे झालेल्या देशातील विविध भाषातील वाङ्मयीन नियत-अनियतकालिकांच्या परिषदेत विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी'चे प्रस्तुत संपादकाने प्रतिनिधित्व केले व या परिषदेत विविध भाषातील अशा वाङ्मयीन नियतकालिकांच्या संवंधात स्थापण्यात आलेल्या 'अखिल भारतीय नियतकालिक परिषदेचे' सहसचिव म्हणून प्रस्तुत संपादकास नियुक्त केले गेले.

टी. एस. इलियट या जगविख्यात कवीच्या 'द वेस्टलँड' या गाजलेल्या दीर्घ अशा काव्यकृतीचा डॉ. विश्वास कानडे यांनी केलेला मराठी भाषेतील पहिलाच अनुवाद याच कालखंडात 'युगवाणी'तून प्रसिद्ध झाला. तसेच गौरी देशपांडे यांची त्यावरील तितकीच महत्त्वपूर्ण प्रतिक्रिया देखील. लंडनच्या टी. एस. इलियट फाऊंडेशनने त्याकरता उदारपणे जी संमती 'युगवाणी'ला ज्या वेगाने त्यांच्या त्यावावतच्या देय रकमेत मोठी सूट देत दिली त्यांचेही मोठेच सहकार्य झाले. (एस. एन. डी. टी. विद्यापीठात हा अनुवाद मराठीच्या अभ्यासक्रमात समाविष्टही करण्यात आला आहे. या संपादन काळातील ही एक महत्त्वाचीच घटना होय.)

अजून एक महत्त्वाची गोष्ट आवर्जून नमूद केली पाहजे की 'युगवाणी'ला आपले स्वतःचे रुप, स्वत्त्व आणि दर्जा वहाल करण्यात महत्त्वाचे ठरलेले संपादक ग्रेस यांच्या, 'युगवाणी'तील संपन्न व गाजलेल्या संपादकीय कारकीर्दीचे त्या काळात एवढ्या जवळून अवलोकन करण्याचा योग मला आला नसता तर कदाचित 'युगवाणी'च्या संपादनाची धुरा कधी काळी सांभाळण्याच्या प्रेरणेचा उद्भवही झाला नसता. या प्रेरणेचा उद्भव होण्यात कविवर्य ग्रेस यांचा तेव्हा जो अप्रत्यक्ष सहभाग राहिलेला होता त्याचे मला विस्मरण कदापिही होणे शक्य नाही.

सरतेशेवटी पुनः एकदा माझ्या संपादनाच्या दोनही कार्यकाळातील अध्यक्ष अनुक्रमे प्रा. राम शेवाळकर व प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी तसेच सरचिटणीस मनोहर म्हैसाळकर व दोनही कार्यकाळातील कार्यकारिणीचे ज्येष्ठ व नवागत सदस्य तसेच विदर्भ साहित्य संघाचे सर्व आजीव व साधारण सदस्य यांनी 'युगवाणी'च्या या संपादनाची जवावदारी ज्या विश्वासाने सोपवली, कायम राखली व संस्थेच्या अहवालात माझ्या एकूण संपादन कार्यावद्दल व कार्यकाळावद्दल जे गौरवद्गार व्यक्त केले तसेच ती जवावदारी पार पाडण्यात त्यांचे व दोन्ही कार्यकाळातील संपादक मंडळातील मान्यवर सदस्यांचे तसेच प्रवंध संपादक केशव जोशी, या कालखंडातील 'युगवाणी'च्या कार्याशी संवंधित विदर्भ साहित्य संघातील सर्व कर्मचारी वृंद व १९८६-८९ या कार्यकाळात मुख्य संपादक राहिलेल्या डॉ. आशा सावदेकर यांचेही जे सहकार्य झाले त्या साऱ्यांचेच मनःपूर्वक आभार. आणि 'युगवाणी' पन्नासाव्या वर्षात पदार्पण करीत असतांना लाभणाऱ्या नव्या संपादकांना अंतःकरणपूर्वक शुभेच्छा!

श्रीपाद भालचंद्र जोशी

सांस्कृतिक संचिताचे मूल्यगर्भ प्रतीक : ' युगवाणी '

डॉ. श्रीपाल सबनीस

'युगवाणी'सारख्या दर्जेदार नियतकालिकाचे संपादन-कर्तृत्व सिद्ध करताना संपादक श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी विदर्भासह उर्वरित महाराष्ट्रीय सांस्कृतिक श्रद्धेची व सामर्थ्याची डोळसपणाने नोंद घेतली. त्यामुळे अनेक नवे-जुने लेखक-कवी-समीक्षक वाङ्मयीन प्रवाहात आपल्या नव्या जाणिवांचे संचित घेऊन सामील झाले. या काळात महाराष्ट्राच्या एकूण सांस्कृतिक पर्यावरणात 'युगवाणी'च्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा ठसा विशेषत्वाने उमटला. अभिरुचीच्या प्रांतातील विविध माध्यमांच्या प्रदूषणाने निर्माण झालेली आव्हानात्मक दुःस्थिती, 'युगवाणी'च्या वाङ्मयीन परंपरेने सुधारण्याचा जाणिवपूर्वक प्रयत्न केला. 'युगवाणी'चे हे कार्य सांस्कृतिकदृष्ट्या मला ऐतिहासिक स्वरूपाचे वाटते.

श्रीपाद भालचंद्र जोशी यांचे संपादकीय नेतृत्व 'युगवाणी'स बरीच वर्षे लाभले. तेव्हा 'युगवाणी' आणि श्रीपाद भालचंद्र जोशी यांचा हा अनुबंध परस्परांना अर्थपूर्ण संवादाचा सामाजिक दस्तऐवज ठरतो.

एखाद्या व्यक्तीस दर्जेदार मासिकाचे संपादन करण्याचा सन्मान परत व बरीच वर्षे मिळतो याचा सरळ अर्थ संपादक या पदाची आव्हाने आणि मूल्यात्मकता त्या व्यक्तीने पचवलेली असते. अर्थातच संपादनाच्या अनुभवातून काही नवीन शिकण्याची संधी संबंधित व्यक्तीला मिळते. आणि व्यक्तीच्या मूलभूत भूमिकेचा व सामर्थ्याचाही संपादनकार्यात विशिष्ट ठसा उमटतो. श्रीपाद भालचंद्र जोशींनी मिळालेली संधी सर्वार्थाने सार्थक केली.


त्यांच्या खास आवडीच्या कविता आणि नाट्य या प्रांतापलिकडे जाऊन श्री. जोशी यांनी वाङ्मयाच्या सर्व फॉर्म्सना न्याय देण्याचा प्रयत्न केला. काही नवे प्रयोग - नव्या योजनाही सिद्धीस नेल्या. वाङ्मयीन जाणिवेच्या प्रगल्भतेचा ध्यास केंद्रस्थानी ठेवून प्रत्येक अंकाची उभारणी केली. असंख्य कलावंतांना 'युगवाणी'च्या परिवारात सहभागी करून घेतले. नव्या वाङ्मयीन प्रवाहामधील ठळक आणि उपेक्षित प्रवृत्तींना युगवाणीत स्थान दिले. विविध प्रकृती-धर्माच्या लेखक-कवी-समीक्षकांचे सामर्थ्य व उणिवा यांची दखल घेऊन त्यांना वाङ्मयाच्या जीवंत प्रवाहात 'युगवाणी'चा टिळा लावून त्यांनी उभे केले.

तत्त्वज्ञान, व्याकरण, संस्कृती, संगीत, नाट्य, बहुतेक ललित कला, समाजशास्त्र या विषयांवर स्त्रीवादी, जनवादी, दलित, मार्क्सवादी या नव्या संज्ञांचे साहित्यप्रवाह सुद्धा 'युगवाणी'च्या कक्षेत कोरून ठेवण्याचे भान या डोळस संपादकाने कायमचे नोंदवले आहे. युगवाणीच्या अनियमित प्रकाशनाची नोंद करूनही 'युगवाणी'चा चेहरा अधिक प्रगत, गतिमान विशेषतः प्रगल्भ ठेवण्याचा प्रयत्न श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी निश्चितपणे केला आहे. एकाच विचारसरणीच्या रंगात, मग तो भगवा, निळा, लाल कोणताही असो. 'युगवाणी'ला बुडवण्याचा हट्ट श्रीपाद भालचंद्र जोशींनी धरला नाही. ही बाब मला महत्त्वाची वाटते.

विशिष्ट तत्त्वज्ञान, झेंडा आणि घोषणाबाजीत राजकारणासह संस्कृतीचे ठेकेदारही नाचण्यात दंग असलेल्या काळात, वाङ्मयीन शुद्धता आणि सभ्यता जपण्याची व्यापक जाणीव संपादन-कार्यात जपणे अत्यंत कठिण असते. पण हा संपादक सर्व रंगाच्या प्रवाहाचे सामर्थ्य जपूनही त्यांच्या मर्यादांचे भान ठेवूनच 'युगवाणी'ची तटस्थ पण व्यापक मूल्यपरंपरा अस्तित्वात राखू शकला.

समाजाचा इतिहास वाङ्मयांच्या इतिहासाविना अपूर्णच असतो. म्हणूनच वाङ्मयीन विश्वातील 'युग-वाणी'ने केलेली सांस्कृतिक कामगिरी, विषय, शैली,

अभिरुची या विविध अंगाने मोलाची ठरलीय. अर्थात् या वाटचालीत 'युगवाणी' परिवाराच्या सर्व लहान-मोठ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचा, संपादक मंडळातील प्रत्येक सदस्याचा, लेखक-कवी-समीक्षकांचा आणि मुख्यतः वाचकांचाही महत्त्वाचा वाटा आहे. या सर्वांच्या विवेकाचा-सौंदर्यात्मक जाणिवेचा आदर्श व अस्सल प्रतिनिधी म्हणून संपादक श्रीपाद भालचंद्र जोशी ठरतात. श्रीपाद जोशी आणि संपादकत्वातील हे सांस्कृतिक प्रतिनिधित्व - प्रतीक यांचा संवाद - यांचा अर्थपूर्ण अनुबंध, हे व्यक्ती जोशी आणि 'युगवाणी' यांचे निर्णायक यश आहे. आणि हे यशच प्रत्येक कलावंत-वाचकाच्या अभिमानाचा - समाधानाचा विषय ठरावा! म्हणूनच 'युगवाणी'चे ऋण नोंदवून उभयतांना शुभेच्छा! ■ ■



वैरागड येथील किरातवेषधारिणी पार्वती प्रतिमा

डॉ. प्रदीप शालिग्राम मेश्राम

चंद्रपूर जिल्ह्यातील आरमोरी तहसीलमध्ये आरमोरी पासून सुमारे १३ कि. मी. अंतरावर वैरागड नावाचे एक प्राचीन गाव आहे. प्राचीन साहित्यात वैरागडचा उल्लेख वजिरागर असा आढळतो. प्राचीन काळी येथे हिऱ्यांची खाण होती. आजही येथे किल्ला असून अनेक प्राचीन वास्तू, मंदिर व शिल्प इतस्ततः पाहायला मिळतात.

डिसेंबर, १९८६ मधे वैरागड-सिर्सी रोडवर एकोरी देऊळ विभागात रस्ता साफ करताना श्री. सीताराम क्षीरसागर नावाच्या व्यक्तीस प्रस्तुत मूर्तीच्या डोक्याचा भाग अचानक दिसला. उत्सुकतावश खोदण्यास सुरुवात केली तेव्हा ही मूर्ती उघडकीस आली. सध्या ही मूर्ती जिथे मिळाली त्याच्या जवळच एक छोटेसे मंदिर बांधून प्रतिष्ठापित करण्यात आली आहे. ही मूर्ती पार्वतीच्या नावाने प्रसिद्ध असून अत्यंत आकर्षक व विलोभनीय आहे. या मंदिराजवळच अष्टदुर्गा, एकोरी आदि मंदिर समूह सुद्धा आहे.

प्रस्तुत मूर्ती चतुर्भुज, स्थानक असून किंचित काळपटलेल्या तांबूस रेताड दगडात कोरलेली आहे. पादपीठासहित या प्रतिमेची उंची ३ फूट, ६ इंच आहे ? पैकी पादपीठाचा ६ इंच भाग आता सिमेंटच्या ओट्याच्या बांधणीत गेला आहे. प्रतिमेची रुंदी १ फूट, ८ इंच इतकी आहे. या मूर्तीच्या डोक्यावर जटा मुकूट असून मागे नक्षीयुक्त अलंकृत प्रभावलय आहे. कानामधे मोठे गोलाकार कुंडले, धनुष्याकार भुवया, अर्धोन्मीलित नेत्र असून ती किंचित डावीकडे पाहत असल्याचे जाणवते. नाक सरळ, अंडाकार चेहरा, पातळ ओठ व हनुवटीच्या खास ठेवणीमुळे चेहरा अत्यंत आकर्षक आहे. ग्रिवा तीन आडव्या रेषांनी दाखविली असून त्या खाली चिकटलेल्या चपट्या हाराने छाती अलंकृत आहे. यामधे पद्मक वर व खाली मण्याची नक्षी आहे. यावर स्तनहार स्तनावरून खाली येतो. मधे शंकरपाळ्याच्या सारखे अलंकरण आहे. स्तन पूर्ण विकसित असून स्तनाग्र उन्नत आहेत.

चारही हातामधे कंगण, दंडामधे केयूर, नाभी खाली मेखला ज्यातून निघणारे दोन सर कमरेवरील कापडास बांधल्याचे दिसतात. कमरेखालील वस्त्र चर्मवस्त्र असावे. पायात जाड तोडे (किंवा नुपूर), पायपट्ट्या (किंवा तोरड्या) व दोन्ही पायाच्या अंगठ्यामध्ये जोडवे व खडावा परिधान केलेली ही मूर्ती त्रिभंगासनात उभी आहे.

डावीकडील दोन हातामधे क्रमशः त्रिशूळ व धनुष्य आहे. धनुष्याचे एक टोक जमिनीला टेकले असून ते खांद्यापर्यंत उंच आहे. याचा काही भाग तुटला असून हातही खंडीत आहे.

उजवीकडील दोन्ही हात खंडीत आहेत. पैकी मागील हाताचा पंजा तुटला आहे. पण बोटांनी मात्र डमरू धरून ठेवला आहे. शिवाय हा डमरू एका यष्टीवर स्थित आहे. डमरू समोरील चौथा हात पूर्णपणे नष्ट झाला आहे. पण शेजारी पडलेल्या हाताच्या अवशेषावरून असे जाणवते की डमरू समोरील हातात बाण असावा. या बाणाचे अंकण काहीसे त्रिशुळासारखेच जाणवते.

पादपीठावर डावीकडे सिंह उजवा पाय उंच करून बसला आहे. त्याच्या मागे चामरधारिणी उजव्या हाताने चामर हलवित असून विविध अलंकाराने युक्त आहे.

उजवीकडे एक व्यक्ती हात जोडून आसनस्थ आहे. त्याच्या गळ्यात व दंडात रुद्राक्षाच्या माळा असून त्याची दाढी वाढलेली आहे. याच्या मागे अशीच जरा पोट सुटलेली एक व्यक्ती उभी चामर ढाळीत आहे.

विदर्भात आजपर्यंत मार्कंडा, मांढळ, नेरी येथे पार्वती प्रतिमा मिळाल्या आहेत. पण ही मूर्ती या सगळ्यापेक्षा वेगळ्या धाटणीची आहे. मांढळची पार्वती गुप्त वाकाटककाळची असून अत्यंत साधी



वैरागडची किरातवेषधारिणी पार्वती

आहे. या मूर्तीमधे स्त्री देहाच्या सौकुमार्यपिक्षा पुरुर्षीपणा अधिक जाणवतो.[२] आपल्यावर रुसून वनांत निघून गेलेल्या शंकराला प्रसन्न करण्याकरिता पार्वतीने भिल्लिणीचा वेष घेतला होता. वैरागडची ही मूर्ती अशाच प्रकारात सहज मोडता येईल. यामुळे हिला किरातवेषधारिणी पार्वती म्हणून संबोधता येईल. गुजराथ मधील शामळाजी येथे अशीच एक सुंदर प्रतिमा मिळाली आहे.[३] उजवा हात कमरेवर ठेवून उभ्या असलेल्या पार्वतीने साडीवर वाघाचे कातडे गुंडाळले आहे. भिल्लाजवळ असणारा कुत्राही तिच्या पाठीशी उभा आहे. वैरागडच्या मूर्तीमधे कुत्र्याचा अभाव असला तरी कलाकाराला पार्वतीस किराती किंवा भिल्लीण रूपात अंकन करण्याचा उद्देश होता हे स्पष्ट आहे.

तशी ही मूर्ती फार प्राचीन वाटत नाही. पण सूक्ष्म निरीक्षण केले असता या मूर्तीचा काळ इ. स. चे ९ वे १० वे शतक असावा असे निश्चित करता येते. अशा प्रकारच्या प्रतिमा हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या काही प्रमाणात उपलब्ध असल्याने ही प्रतिमा मूर्तिशास्त्रातील एक अप्रतिम असे उदाहरण आहे यात शंका नाही. ■ ■

संदर्भ (१) दैनिक लोकमत, दि. १.२.८७ मध्ये २॥ फूट उंची दिली आहे. श्री. चितळे यांनी ४ फूट ७ इंच (युगवाणी, एप्रिल-जून, ९० पृ. ५८) तर प्रा. सुपारे, आरमोरी यांनी २॥ फूट (महासागर दैनिक, चंद्रपूर १.३.८७) दिली आहे.
(२) विदर्भ प्रज्ञा, पृ. ५४
(३) नि. पु. जोशी, भारतीय मूर्तिशास्त्र (नागपूर १९७९) पृ. २३६.

डॉ. प्रदीप शालिग्राम मेश्राम
पत्ता : अ-७, प्राध्यापक निवास, अमरावती रोड, नागपूर-४४० ०१०

टिपण

परभाषांतील साहित्याच्या अभ्यासाचे माध्यम : स्वभाषा

प्रभाकर ऊर्ध्वरेषे

भारतात इंग्रजीचा परभाषा म्हणून व त्या भाषेतील साहित्याचाही अभ्यास फार मोठ्या प्रमाणावर होतो. त्याचे कारण अर्थातच ऐतिहासिक आहे. इंग्रजांचे राज्य दीर्घ काळ राहिले व त्यांनी तो अभ्यास आपल्यावर लादला. पुढे आपल्या प्रादेशिक भाषांचा विकास झाला त्या भाषांतील साहित्यही इंग्रजी साहित्याच्या अभ्यासानेच परपुष्ट झाले. ललित साहित्यच नव्हे तर राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र अशा सर्व सामाजिक शास्त्रांचा अभ्यासही इंग्रजी ग्रंथांच्या आधारेच वाढला. विज्ञान व तंत्रज्ञान तर आजही मुख्यत्वेकरून इंग्रजी माध्यमातून अभ्यासले जाते.

यापैकी समाजशास्त्रीय विषयांच्या अभ्यासात इंग्रजी ग्रंथांचा उपयोग मोठ्या प्रमाणावर होत असला तरी परीक्षांचे माध्यम बव्हंशी प्रादेशिक भाषांचे वापरले जाते व त्यामुळे त्या विषयांवर थोडी ग्रंथनिर्मिती व लेखन भारतीय भाषात होऊ लागले आहे. इंग्रजी साहित्य या विषयाच्या अभ्यासाला मात्र इंग्रजी हेच माध्यम असले पाहिजे अशा आग्रहामुळे त्या विषयाला स्नातक व स्नातकोत्तर पातळीवर विद्यार्थ्यांची संख्या रोडावत आहे आणि तो विषय घेणाऱ्यांचीही बहुधा सखोल अभ्यास करण्याऐवजी कशीवशी परीक्षा पास करण्याची प्रवृत्ती असते. शिवाय इंग्रजी भाषेवर उत्तम प्रभुत्व फारच कमी असल्यामुळे स्वतंत्र विचार व लेखनाचे प्रमाण अत्यंत कमी असते. इंग्रजी साहित्य क्षेत्रातील संशोधनही अत्यंत असमाधानकारक व बऱ्याच वेळा भारतीय जीवनाच्या वा साहित्याच्या दृष्टीने निरर्थक असते. त्यापैकी बराच भाग इंग्रजी ग्रंथ व नियतकालिकांतील, संशोधनपर लेखनावर आधारित असतो व त्या संशोधनालाही इंग्रजी भाषिकांमध्ये फारसे महत्त्व नसते.

याचे मुख्य कारण असे की कोणत्याही परभाषेतील साहित्याचा (परभाषेचा नव्हे) अभ्यास त्याच भाषेच्या माध्यमातून होणे हे अनावश्यक व अस्वाभाविक असते. क्वचित काही थोड्या व्यक्ति विशिष्ट कारणामुळे तसे करू शकतात, पण सर्वसामान्यपणे जगात सर्वत्र परभाषांतील साहित्याचे अभ्यासक स्वभाषेच्या माध्यमातूनच करतात - म्हणजे त्या विषयाची जाण, रसग्रहण, समीक्षण, संशोधन हे तर स्वभाषेतून करतातच, पण अनेक वेळा त्या परभाषेतील साहित्याचे वाचन सुद्धा त्या भाषेतून न करता त्याच्या अनुवादातून करतात. यासाठी सर्वात उत्तम उदाहरण इंग्रजीच्या क्षेत्रातच सापडते. इंग्रजी भाषा ही स्वभाषा म्हणून वापरणारे लोकच नव्हे तर इंग्रजी 'ही जागतिक ज्ञानाची खिडकी' म्हणून तिचा अवलंब करणारे आपण भारतीय सुद्धा शेक्सिपअर, मिल्टन, चॉसर, वर्डस्वर्थ, हार्डी, डिकन्स, बर्नार्ड शॉ वगैरे इंग्रज लेखकांचे साहित्यच इंग्रजीतून वाचतो असे नव्हे तर होमर, व्हर्जिल, सोफोक्लिस, ईस्किलस, सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल वगैरे प्राचीन ग्रीक व रोमन ग्रंथकारांचे साहित्य आणि टॉलस्टॉय, पुश्किन, पास्टरनॅक, सार्त्र, पिरांदेलो, गटे, रोमां रोलां, लु शुन, वगैरे रशियन, फ्रेंच, जर्मन, इटालियन चिनी वगैरे सर्व भाषांतील लेखकांचे साहित्य इंग्रजी अनुवादांच्या रूपानेच वाचतो. किंबहुना इंग्रजीत अनुवादित नसलेले अनेक भाषांतील उत्तमोत्तम साहित्य, आपल्याला अपरिचितच राहाते. तसेच या साहित्याचे इंग्रजी अनुवाद व इंग्रजीतच प्रकाशित झालेली निरनिराळ्या भाषांच्या साहित्याची समीक्षा एवढ्यापुरतेच आपले त्या विषयाचे ज्ञान मर्यादित असते. (साहित्येतर इतर विषयांचे आपले अद्यावत ज्ञानही बहुधा इंग्रजीतूनच आपण घेत असतो.) म्हणजे

टॉलस्टॉयचे 'वॉर अँड पीस, रिसरेक्शन, वगैरे कादंबऱ्यांची मूळ रशियन भाषेतील नावे सुद्धा आपल्याला माहीत नसतात, टॉलस्टॉय हे नावही रशियन भाषेत 'तोल्स्तोय' असे काहीसे आहे हे सुद्धा आपल्याला माहीत नसते, तरी टॉलस्टाय ही व्यक्ती व त्याचे साहित्य याविषयी आपल्याला इंग्रजीद्वारा विपुल माहिती असते. (सुमती देवस्थळे यांचा टॉलस्टॉयवरील मराठी ग्रंथही इंग्रजीतील अनुवाद व इंग्रजी-भाषी लेखकांचे त्याविषयीचे ग्रंथ यांच्या आधारेच सिद्ध झाला आहे.)

मग रशियन, जर्मन, फ्रेंच, इटालिअन, स्पॅनिश, जपानी वगैरे भाषांच्या साहित्याचा अभ्यास व त्यासंबंधीचे रसग्रहण, समीक्षा (व काही वेळा संशोधन) हे जर इंग्रजी माध्यमातून होऊ शकते तर मूळ इंग्रजी व इंग्रजीतील अनुवादित साहित्य याविषयी आपण आपले रसग्रहण, संशोधन वगैरे आपापल्या भाषांतून केले तर त्यात अस्वाभाविक वाटण्याजोगे वा अमान्य करण्याजोगे काय आहे ? खरे तर असे आहे की आपल्या भाषा जर इंग्रजी इतक्याच समृद्ध व संपन्न झाल्या तर होमर, ॲरिस्टॉटल, शेक्सिपअर, टॉलस्टॉय, सार्त्र, वगैरे जागतिक कीर्तीच्या साहित्यिकांचे लेखन आपापल्या भाषांतून अनुवादित होऊन प्रकाशित होईल व मग आपल्याला इंग्रजीची मदतही घ्यावी लागणार नाही. पण आपल्या सारख्या बहुभाषी देशात अगदी अत्यावश्यक अशा विज्ञान व तंत्रज्ञानी विषयाची पाठ्यपुस्तके सुद्धा अनुवादित वा रूपांतरित स्वरूपात उपलब्ध होणे फार कठीण असल्यामुळेच त्या क्षेत्रात इंग्रजी माध्यम कायमचे स्वीकारणे आपल्याला क्रमप्राप्त झाले आहे, तिथे अनेक भाषातील उत्तमोत्तम असे अगदी निवडक साहित्य सुद्धा आपल्या भाषांतून अनुवादित होऊन प्रसिद्ध होईल ही गोष्ट येत्या ४०-५० वर्षात तरी शक्यतेच्या कोटीत उतरेलसे दिसत नाही. तेव्हा या कालावधीत तरी जागतिक साहित्य (व इतरही विषयांवरील महत्त्वाच्या ग्रंथांचा) इंग्रजीतूनच परिचय करून घ्यावा लागेल व त्यासाठी उत्तम इंग्रजी बोलणे, संभाषण व लेखन ही कौशल्ये फार चांगली आत्मसात करता आली नाहीत तरी इंग्रजीतून वाचलेले चांगल्या प्रकारे ग्रहण करण्याचे कौशल्य (Reading Comprehension) मात्र इंग्रजीतून वाचन करू इच्छिणाऱ्यांनी आत्मसात केलेच पाहिजे. तसे ते आजही बऱ्याच प्रमाणावर सुशिक्षितांमध्ये आढळते व इंग्रजीच्या अध्यापनातील लेखन कौशल्यावरचा अवास्तव भर काढून टाकला तर हे वाचलेले ग्रहण करण्याचे कौशल्य अधिक वाढविण्यावर भर देता येईल व इंग्रजी वाचनाची गोडी वाढीला लागेल.

याच अनुषंगाने एक अत्यंत महत्त्वाचा बदल असा केला पाहिजे की समाजशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र वगैरे विषयात बरेचसे वाचन इंग्रजीतून करावे लागले तरी त्या विषयांच्या परीक्षांचे व इतर लेखनाचे माध्यम प्रादेशिक भाषांचे असते त्याचप्रमाणे इंग्रजी साहित्याचे रसग्रहण, समीक्षा वगैरेचे माध्यमही प्रादेशिक भाषांचेच ठेवले पाहिजे - म्हणजे इंग्रजी चांगले लिहिता येत नाही एवढ्याच कारणामुळे विचकून इंग्रजी साहित्य या ऐच्छिक विषयापासून दूर राहणारे अनेक विद्यार्थी तो विषय घेण्याला प्रवृत्त होतील व इंग्रजी साहित्याचा (इंग्रजीत उपलब्ध असलेल्या प्राचीन ग्रीक व रोमन व अनेक आधुनिक भाषांतील साहित्याचा) अभ्यास या देशात मोठ्या प्रमाणावर होऊ लागेल. त्यामुळे आपल्या भारतीय भाषांतील साहित्यही अधिक समृद्ध व संपन्न होईल आणि आपल्या भाषांमध्ये लेखन करण्याची पात्रता असलेले लेखक इतर भाषांतील साहित्याचा अनुवाद, परिचयपर लेख, समीक्षा वगैरे मार्गांनी ते साहित्य आपल्या देशातील वाचकांसाठी उपलब्ध करून देऊ शकतील. (इंग्रजी साहित्याच्या अध्यापनासाठी प्रत्येक राज्यात तेथील प्रादेशिक भाषा न येणारे काही प्राध्यापक असतात, त्यांनी वर्गातून इंग्रजीतून अध्यापन करण्याला काहीच हरकत नाही. किंबहुना प्रादेशिक भाषा येणाऱ्या प्राध्यापकांनीही काही प्रमाणात इंग्रजीतून अध्यापन केले तर विद्यार्थ्यांची इंग्रजीची ग्रहणशक्ती वाढण्याला मदत होईल. तसेच काही विद्यार्थ्यांना कोणत्याही कारणाने परीक्षेसाठी इंग्रजी माध्यम हवे असेल तर ते घेण्याला प्रत्याय नसावा.)

इंग्रजी (व जागतिक) साहित्याचा अभ्यास इंग्रजी माध्यमातून पण परीक्षा व इतर अभिव्यक्ती विद्यार्थ्यांच्या प्रादेशिक भाषांतून करणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे स्वभाषेखेरीज इतर भारतीय भाषांच्या साहित्याच्या अभ्यासाला

अनुक्रमणिका

प्रोत्साहन देण्यासाठी वाचलेले ग्रहण करून समजण्यापुरत्या त्या भाषा शिकाव्या व नंतर त्यासंबंधीचे रसग्रहण वगैरे स्वभाषेतून ग्रहण करण्याला परवानगी असावी. यातही त्या लेखकांचे व साहित्याचे चांगले अनुवाद आपल्या भाषेत उपलब्ध असतील तेवढे साहित्य अनुवादाद्वारे अभ्यासण्यातही काहीच गैर नाही. (उदा. प्रेमचंद, रविंद्रनाथ टागोर, शरतबाबू वगैरे) किंबहुना भारतीय भाषांतील उत्तमोत्तम साहित्याचे सर्व प्रादेशिक भाषांतून अनुवाद करण्याचा साहित्य अकादमीचा कार्यक्रम अधिक चांगला व अधिक जोमाने चालविण्याला त्यामुळे मोठीच मदत होईल, व कालांतराने अनेक जण एकाद-दुसरी भारतीय परभाषा शिकले तरी सर्व भाषा शिकणे अशक्य असल्यामुळे त्यांना इतर भाषांतील उत्तम साहित्याचा अनुवादांच्या द्वारे परिचय होऊ शकेल. (यासाठी सर्व भारतीय भाषांतील उत्तम साहित्याचा हिंदीत अनुवाद केला तरी काम भागेल असे काही जणांना वाटते. परंतु तो समज अत्यंत भ्रामक आहे. मराठी भाषिकांना हिंदीच्या बाबतीत लिपीची अडचण नाही. हिंदी बरेच समजते. तरी सुद्धा हिंदी साहित्याचे व नियतकालिकांचे वाचन करणारे मराठी भाषिक फारच थोडे असतात. गुजराती, बंगाली वगैरे हिंदीला जवळ असणाऱ्या भाषिकांचे हिंदी वाचनही फार थोडे असते. मग हिंदीशी जवळीक नसलेल्या व हिंदीबद्दल किंतु बाळगणाऱ्या द्राविड भाषिकांनी हिंदी साहित्याचा हिंदीतून अभ्यास करण्याचा प्रश्नच नाही.)

तेव्हा इंग्रजी, इतर परदेशी भाषा किंवा स्वभाषाखेरीज इतर भारतीय भाषांच्या अभ्यासाचे, रसग्रहणाचे, समीक्षेचे (व पुढे संशोधनाचे) माध्यम स्वभाषा असेल तरच त्या भाषांतील साहित्याच्या अभ्यासाची रुची व दर्जा वाढेल व त्यांचे अनुवाद, समीक्षा वगैरेंनी आपल्या भाषाही समृद्ध होतील.

यासाठी आणखी एक गोष्ट करणे इष्ट होईल. आपल्या भारतीय भाषांच्या साहित्याच्या स्नातक व विशेषतः स्नातकोत्तर अभ्यासक्रमात इंग्रजी साहित्य जागतिक साहित्य, प्राचीन ग्रीक व रोमचे साहित्य, स्वभाषेखेरीज इतर एखाद्या भारतीय भाषेचे साहित्य यांच्या प्रत्येकी दोन अशा ऐच्छिक प्रश्नपत्रिकाही ठेवाव्या (यांत संस्कृत, पाली, अर्धमागधी, फारशी, अरेबिक अशा Classical भाषांच्या साहित्याचाही समावेश असावा) व त्यांच्या परीक्षांचे माध्यम स्वभाषा (किंवा कोणाला हवे असल्यास ती भाषा) हे असावे. विशेषतः इंग्रजी साहित्य व इंग्रजी भाषेत उपलब्ध असलेले (अनुवादित) जगाच्या इतर भाषांतील उत्तमोत्तम साहित्य, त्या भाषा व साहित्यांचे इतिहास व समीक्षाग्रंथ, यांच्या अभ्यासाची त्या निमित्ताने रुची वाढेल व आपल्या भाषा समृद्ध करण्याला व त्याचबरोबर साहित्याच्या तुलनात्मक अभ्यासालाही त्या योगे मदत होईल.

या कामी साहित्य अकादमी, साहित्य संस्था व विद्यापीठे यांत प्रमुखपदी असणाऱ्या साहित्याच्या अभ्यासकांनी व प्राध्यापकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. जगातल्या सर्व प्रगत देशांत परभाषांतील साहित्याचा (शेक्स्पीअरपासून सार्त्रपर्यंत सर्वांचा, व टागोर प्रेमचंद वगैरेंचाही) अभ्यास स्वभाषेच्या माध्यमातूनच होतो व मोठ्या प्रमाणात होतो. तसेच भारतातही होणे आवश्यक आहे. ■ ■

[सौजन्य : "अक्ष" त्रैमासिक]



टिपण

गडकऱ्यांची कल्पकता

धनंजय वसंतराव मुजुमदार

कल्पकतेच्या आहारी गेलेले, तिचे प्रेयसीप्रमाणे चिंतन करणारे, भक्तांप्रमाणे आरती गाणारे कवि कोण म्हणून नुसता विचार केला तरी 'गोविन्दाग्रज' उर्फ 'राम गणेश गडकरी' यांचेच नाव सुचेल हे निःसंशय. कल्पना विश्वांत रंगून जाण्यांची स्वच्छंदवादी कवींची वृत्ति गडकऱ्यात पुरेपूर मुरली होती. कल्पनाशक्तीच्या जोरावर कल्पनांचा पाऊस पाडणे हाच त्यांच्या प्रतिभेचा लाडका उद्योग होता. त्यांच्या कल्पनाविलासाला नाट्यवाङ्मयात त्याचप्रमाणे काव्यातहि स्थान आहे. ५-६ नाटकें व काव्यसंग्रह एवढाच त्यांचा लक्षात घेण्यासारखा वाङ्मयविस्तार आहे. तरीही त्यांतून त्यांच्या हिंमालयाप्रमाणे उंच, सागराप्रमाणे अफाट विस्तार असलेल्या कल्पनाशक्तीचे दर्शन झाल्याविना राहात नाही.

नाट्यवाङ्मयात कल्पकतेचा अविष्कार त्यांनी दोन प्रकारे केला आहे. कल्पना चित्रांच्याद्वारे आणि अनुप्रासादि अलंकारांचा उपयोग करून आकर्षक कल्पनाचित्राची ओळख गडकऱ्यांनीच प्रथम मराठी वाचकाला करून दिली. अनुप्रास, उत्प्रेक्षा इत्यादि अलंकारांमुळे त्यांची नाटके काव्यमय बनली.

'असफल प्रेमाची कहाणी' सांगणाऱ्या 'प्रेमसंन्यास' नाटकात कल्पनाचित्रांची ओसंडून वाहाणारी भाषा दिसून येते. लिला आणि जयंत भावनावश मनोवृत्तीची दाखवून त्यांच्याद्वारे गडकऱ्यांनी आपली कल्पकता वाचकांना उकलून दाखविली. परंतु कल्पनांच्या भोवऱ्यात सापडून गडकरी पुस्तकातले नाट्य विसरले आणि नाट्यांचे नाटक करून बसले हे चिकित्सक मनाला टोचल्यावाचून राहात नाही. कल्पकतेच्या आत्यंतिक हव्यासामुळेच प्रेमसंन्यास नाटकातील खलनायक कमलाकर काव्यात बोलतो. लीलेची चिता जळत असताना जयंताचा आत्मविष्कार करुण असूनहि कल्पनाविलासात्मक आहे. ह्या नाटकात अनुप्रासांची आसक्ति, मात्र मर्यादित असते. स्मृतिचित्रात रममाण होण्याची आसक्ति, गूढरम्यतेचे आकर्षण, गोड हुरहुर हे गडकऱ्यांचे विशेष 'पुण्यप्रभाव' या नाटकात प्रकर्षाने आढळतात. पुण्यप्रभावच्या पानापानावर गडकऱ्यांनी कल्पनामौक्तिके उधळलेली दिसून येतात. वसुंधरेची प्राप्ती न झाल्यामुळे विरक्त बनलेला ईश्वर म्हणतो, "विश्ववैभवाची वैजयंती लक्ष्मीवल्लभासारख्या लौकेकपुरुषाच्या कंठी पडली तर तिच्याकडे आशेने पहाणाऱ्या भणंगाने आपल्या भिकारी भाग्यदेवतेला बोल लावावा. त्यात वैजयंतीचा काय दोष ?"

कल्पकतेच्या दृष्टीने या कल्पनांचे मूल्य बिनतोड आहे. परंतु कालिंदी सारखी भोळी-भावडी, साधी, सनातनी वृत्तीची स्त्री एखाद्या असल कवीलाच शोभतील अशाप्रकारच्या कल्पना अगदी सहजतेने करते हे पाहून गडकऱ्यांनी तिच्यावर ह्या कल्पना लादल्या आहेत हे सहज ध्यानात येते. 'दगडाने दुर्दैवाला दोष देत बसावे', 'परिस्थितीचे पटांगण', 'मनाचा मुका मार' 'जिवंत जादूने जिवाला भारून टाकल्यामुळे', अशा अनुप्रासाची कलात्म असलेली, ठायी, ठायी केलेली परंतु अनाठायी असलेली पखरण कृत्रिमतेचा दोष गडकऱ्यांच्या पदरी पडल्यावाचून राहात नाही.

'एकच प्याला' ह्या नाटकाचे कथानक फिरते आहे. मागील नाटकांत दिसून येणारी काव्यात्मता येथे आपला पसारा आवरून बसलेली दिसते. तरीसुद्धा काही ठिकाणी ती डोकं वर काढल्यावाचून राहात नाही. उत्कंठित सिंधूला सुधाकरला दारूचे व्यसन लागले आहे, हे सांगण्यासाठी रामलालने केलेल्या भाषणातील काव्यात्मता औचित्यहानि

करणारी आहे. येथे रामलाल बोलत नाही, हे गडकरी बोलत आहेत असे वाचकाला वा प्रेक्षकाला वाटल्यावाचून राहात नाही.

काही ठिकाणी भगिरथ देखील स्वतः बोलत नाही. ह्याची जाणीव वाचकाला रसिकाला होते. एकदा दारू सोडल्यानंतर कटु अनुभवाने निराश होऊन पुन्हा दारूचा प्याला सुधाकर हातात घेतो, त्यावेळी सुधाकर जी भाषणे करतो ती कल्पकता, मद्यपानाची चिकित्सा यादृष्टीने महत्त्वाची असली तरी रंगभूमी, स्वाभाविकता या दृष्टीने सदोषच आहे.

'भावबंधन' या नाटकात अनुप्रासाची आसक्ती जवळजवळ नाहीच. स्वाभाविकता आणि औदार्य यांनी युक्त असलेल्या भावनांपुढे कल्पनाविलास फिक्का पडतो. तरीही कल्पना चित्रांची प्रखरता मात्र दृग्गोचर होतेच. "सौंदर्याचे चालतेबोलते काव्य सर्वांगपरिपूर्ण केल्यावर काव्यरसाची सीमा झाली हे दाखविण्यासाठी विधात्याने या तिळाचा गालावर हा सुंदर पूर्णविराम देऊन टाकला आहे." "तुझ्याकडे पाहताना डोळ्यांनी आत्मा चरणी अर्पण करताना मालतीने मनःसंकल्पाने काय बोलायचे ठेवले होते?" अशा तऱ्हेची काव्यमय वाक्ये प्रभाकर - मालती बोलताना आढळतातच. वडिलांच्या प्रेमाचा होम करावयास तयार झालेली मालती व तिचे वडिल धुंडिराज यांच्यातील संवाद करुण व काव्यमय आहे. प्रसंग करुण आहे. पण तो काव्यमय केला गडकऱ्यांनीच. विकल झालेल्या मनोहराने तागपुष्पांची काव्ये केली तर त्यात काही गैर नाही.

दुर्दैवाने अपुऱ्या राहिलेल्या 'गर्वनिर्माण' नाटकातही गडकऱ्यांची कल्पकता दिसून येते. 'राजसंन्यास' नाटकही अपुरेच राहिले. पण त्या अपूर्णतेतच कल्पकता किती पूर्णत्वाला पोहचली हे नाटक वाचताना सहज लक्षात येते. कल्पकतेचा स्वैर संचार या नाटकात दिसून येतो.

रौद्रस्वरूप धारण केलेल्या सागरात तुळशीचा स्वीकार करताना संभाजी म्हणतो, 'प्यारी, मानवलोकींची लग्ने रद्द करून रायगडचा राजा आज तुझ्याशी पुन्हा लग्न करीत आहे! मरतकावरून सुटणाऱ्या या थेंबाची - सौंदर्याच्या या मोत्यांची-विनसरांची मुंडावळ तुझ्या कपाळी शोभत आहे. समोर संध्याकाळचा होम पेटला आहे! तुफान दरियात मरणाचा नेम नसल्यामुळे काळाचा एकच पाश आपल्या दोघांच्या कंठात आहे. त्याचीच ती लगीनमाळ करून डोंगर लाटेच्या बोहल्यावर, मावळत्या देवाच्या साक्षीने, मरणाचा मुहूर्त साधून रायगडचा राजा मनाच्या मुक्या मंत्राने तुळशी, तुझ्याशी लग्न लावीत आहे.

विवाहविधीचे हे कल्पनाचित्र रमणीय आहे. अनुप्रासांची आसक्तीदेखील येथे कळसाला जाऊन पोहोचलेली दिसते. 'संसाराच्या सफरीतला सच्चा सोबती', 'नव्या नवतीचा नवरंग', 'मराठी मनाच्या माळावर मोत्याचे पीक' अशा तऱ्हेची विलक्षण अनुप्रासयुक्त भाषा त्यांच्या या (राजसन्यास) नाटकात सर्वत्र दिसून येते. खरं पाहतां 'राजा म्हणजे जगाचा उपभोगशून्य स्वामी, राज्य उपभोग म्हणजे राजसंन्यास' ह्या तत्त्वावर अधिष्ठित असलेले हे नाटक आहे. परंतु या तत्त्वाचा विकास मात्र नाटकात पाहावयास मिळत नाही. कारण नाटक काव्यमय करण्याच्या भरीस पडलेले गडकरी तत्त्व विसरून गेले. काव्याने ओथंबलेली आणि अलंकाराने नटलेली अशी ती भाषा तत्त्वाचा विकास करण्यास समर्थ ठरत नाही. तेव्हा नाट्याचे नाटक होते ते ह्यामुळेच! ज्या कल्पकतेमुळे त्यांची नाटके काव्यमय भासतात त्याच कल्पकतेमुळे वस्तुस्थितीचा विसर पडून गडकऱ्यांच्या कडून विसंगत कल्पना मांडल्या गेल्या. म्हणूनच नाट्यगुणांची हानि झालेली रसिकमनास पहावयास मिळते.

एखाद्या फुलांनी बहरलेल्या वृक्षाने आजूबाजूच्या भूमीवर एक-एक फूल टाकावे आणि थोड्याच वेळात त्या फुलांच्या गर्दीमुळे ती भूमी आच्छादिली जावी, त्यावर फुले-फुलेच व्हावीत, त्याच प्रमाणे गडकऱ्यांच्या नाटकाचे झाले आहे. एकामागून एक कल्पना त्यांच्या नाटकात प्रगट होतात आणि नाटक संपल्यावर होते काय? नाटकाचा विषय, तत्त्व, कथानक, सारे काही या कल्पनांच्या सड्यामुळेच झाकून जाते आणि मनाला, बुद्धीला जाणवते ते गडकऱ्यांच्या कल्पकतेची टपोरी फुले आणि त्यामुळे निर्माण झालेले काव्यसौंदर्य.

त्यांच्या काव्यसंग्रहाकडे दृष्टी टाकली तर तेथे त्यांच्या कल्पकतेला योग्य वाव मिळाला नाही असेच दिसून येईल. प्रेम कवितेत तर त्यांच्या कल्पकतेला जागा नाहीच असे खेदाने म्हणावे लागते. त्यांच्या कल्पकतेचा वासंतिक बहर प्रेमाच्या पावसाने ओसरला की काय नकळे!

'राजहंस माझा निजला' ही कविता म्हणजे त्यांच्या कल्पकतेने गुणदोष या दोन्ही बाबतीत केलेला कळसच होय. दुःखी आईने वात्सल्यामुळे केलेल्या करुण विलासापेक्षा कल्पनाविलासच जास्त आकर्षक वाटतो. प्रसंगाचे गांभीर्य वाढविण्यास या कल्पनांची काहींच मदत होत नाही त्यातील प्रत्येक कल्पना कल्पकता यादृष्टीने अतिशय उच्च आहेत. पण परिस्थिती, घटना पाहू जाता त्या कवडीमोलाच्याच ठरतात. कारण वात्सल्याचा जन्म मनातून होतो, बुद्धीतून नव्हे.

आकाशातील तारकांना पाहून त्यांनी वेगवेगळ्या कल्पना प्रगट केल्या आहेत. 'पुण्यप्रभाव'मध्ये तारका हे देवांचे डोळे होत अशी पवित्र कल्पना गडकरी करतात. 'पुण्यवंतांचे आत्मे आकाशात तारे होऊन राहतात.' व 'अनंत कालापासून तारका या पापी पृथ्वीला शिवल्या नाहीत म्हणूनच त्यांचे तेज चिरकाल चमकत आहे' या प्रेमसंन्यासातील वाक्यातून त्यांना वाटणारी तारकांची ओढ प्रतीत होते. कमलाकरच्या जीवनात तारका या आकाशातील दिवट्या ठरतात. 'घुवडास' या कवितेत तारका ह्या मनुष्याच्या दग्ध आशांच्या ज्योति आहेत अशी कल्पना गडकरी करतात. 'गुलाबी कोडे' ही कविता म्हणजे उत्कृष्ट कल्पनाविलासाने नटलेले एक श्रृंगारगीतच होय. 'अरुण', 'प्रेमपाठ' या कवितातूनही त्यांचा कल्पनाविलास पाहावयास सापडतो. त्यांच्या सामाजिक कवितांकडे दृष्टी टाकली तर असे दिसून येते की केशवसुत, आगरकर यांच्याच विचारांचे प्रतिध्वनि त्यांनी आपल्या या कवितातून काढलेले आहेत. कोणत्याही गोष्टीविषयी आस्थेने, आपुलकीने विचार करण्याची प्रवृत्ति गडकऱ्यांच्या ठायी नसल्यामुळे या सामाजिक कवितांमध्येही कल्पनांच्या भराऱ्यांवाचून दुसरे काही आढळत नाही. 'कलगीचे गाणे', 'मुरली' यासारख्या त्यांच्या तत्त्वज्ञानविषयक चिंतनात्मक कवितातून देखील कल्पकता बेफाम सुटलेली दिसून येते. त्यामुळे कवितेतील मूळ अनुभवाची अभिव्यक्ति अपरिहार्य आहे, असे वाटत नाही.

गडकऱ्यांच्या कल्पकतेचा विलास त्यांच्या विनोदी कवितांना मात्र मानवलेला दिसतो. 'विरामचिन्हे', 'विहिणींचा कलकलाट' अशा मोजक्याच कविता औचित्यविचाराने युक्त आहेत व त्यांची 'घुंगुरवाळा' ही कविता देखील या दृष्टीने उल्लेखनीय आहे.

एकंदरीत गडकऱ्यांच्या लेखनातून जाणवणारा कल्पनाविलास हा केवळ कल्पनाविलासासाठीच आहे असे म्हटल्यास वावगं ठरणार नाही. खरे पाहिले तर कल्पनाचित्रे येतात ती अनुभवावर प्रकाश टाकण्यासाठीच. अनुभव सरूप करणे हे कल्पनाचित्राचे कार्य आहे.

सामान्य माणसाला गडकऱ्यांच्या कल्पकतेचा अतिरेकीपणा भुरळ घालील पण खऱ्या रसिकाला, प्रज्ञावंताला तो टोचल्यावाचून राहाणार नाही. गडकरी कल्पकतेच्या आहारी गेले. स्थळकाळाची पर्वा न करता त्यांनी कल्पकतेला थारा दिला. कल्पकतेवर त्यांना तावा ठेवता आला नाही. वास्तविक पाहता त्यांच्या कल्पकतेत सर्व काही आहे. खांडेकरांच्या मते त्यांची कल्पकता विश्वसंचारी आहे. त्यांची प्रतिभा नवनवोन्मेषशालिनी आहे. पण दुर्दैवाने त्याचा मनसोक्त आस्वाद घेता येत नाही. कारण गडकरी विषयाशी एकरूप होत नाहीत. कल्पनेशी एकरूप होतात. कल्पकतेच्या ह्याच अनावर ओढीत त्यांच्या कवितांच्या लांबीची गंमत आहे. विषयानुरूप सहजपणा, सडेतोडपणा त्यांच्या वाङ्मयात आढळत नाही. त्यांच्या नाटकातील विनोदी प्रवेशातून कल्पकतेचा सुसंगतपणा दिसून येतो. विनोदी प्रवेशात दिसून येणारा कोटिबाजपणा, लकब सारे काही आकर्षक व बांधेसूद आहे. परंतु ह्या विनोदी प्रवेशांचा नाटकातील कथानकाच्या प्रगतीला काहीच उपयोग झाला नाही असे वाटते. ■ ■

धनंजय वसंतराव मुजुमदार, एम. ए. बी. अेड्.
पदेशास्त्रींचा वाडा, मुन्शींचा खाचा, लहेरीपुरा, वडोदरा - ३९० ००१

संत बहिणाबाई व तिची विचार मौक्तिके

प्राचार्य गो. मो. कोलते

'**जो** जाणे भगवंत त्या नाव संत' - असे जे म्हटले आहे ते संत बहिणाबाईला लागू पडते. संत बहिणाबाई जशी महान कवयित्री होऊन गेली तशीच ती महायोगिनी होती हे विसरता येत नाही. बहिणाबाईचे चरित्र विविध चमत्कारांनी भरलेले आहे. बहिणाबाई म्हणते - 'देवगाव माझे माहेर साजणी.' बहिणाबाईला औरंगाबाद जिल्ह्यातील आपल्या जन्मभूमी देवगावचा मोठा अभिमान होता. 'देवांचा समूह सर्व जया ठायी' - असे देवगाव देव पुरुषांचे गाव. याच्या पूर्वेस जगप्रसिद्ध वेरूळची कोरीव लेणी व पश्चिमेला शिवनदी. या नदीच्या किनाऱ्यावर लाक्षाग्राम हे गाव असून तेथे जे तीर्थ आहे त्याचे वर्णन 'तीर्थ हे अद्‌भुत तीर्थामाजी' असे बहिणाबाई करते. हिचा जन्म देवगावचे आऊदेव कुळकर्णी व माता जानकी यांच्या पोटी शके १५५० मध्ये झाला.

बहिणा ३ वर्षांची झाली व तिचे लग्न तीस वर्षांच्या विजवराशी केले. तिच्या आयुष्यात ज्या काही चमत्कारिक घटना घडल्या त्यामधील ही पहिली घटना म्हणावी. तीन वर्षांची पोर कुठे व तीस वर्षांचा विजवर कुठे. ती त्याची मुलगी शोभून दिसली असती. तिच्या लग्नासाठी जे कर्ज काढले होते ते फेडणे आऊजीला शक्य न झाल्याने मध्यरात्रीच्या सुमाराला जावया समवेत सर्व परागंदा झाले. तीर्थाटन करीत करीत ते पंढरपूरला आहे. नंतर कोल्हापूरला ते बहिंरमभट ब्राह्मणाकडे बिऱ्हाड करून राहिले. बहिणा १८ वर्षांची झाली होती. बहिंरमभटाला स्वप्न पडले. गाय ब्राह्मणाला दे. आणि म्हणून बहिणाबाईच्या पतीला सवत्स धेनूचे त्याने दान दिले. बहिणाबाईला गाय वासराचा खूप लळा होता. वासरू तर वात्सल्यभावाने तिच्या नेहमी मागोमाग राही. रात्री सुद्धा तिच्याजवळच झोपी जाई. एके दिवशी ती जयरामस्वामीच्या कीर्तनाला आपल्या आईवडिलाबरोबर गेली. वासरूही तिच्या बरोबर गेले. कथा ऐकू लागले. लोकांना हे आवडले नाही. तिचे पती गंगाधरपंत स्नान करून आले आणि काय विचारता त्यांनी बहिणाबाईची वेणी धरली आणि तिला खूप मारले. बहिणाबाईने देवाचा धावा केला. गाईवासरांना दुःख होऊन त्यांनी गवत खाणे बंद केले. जयरामस्वामींना हा प्रकार कळताच त्यांनी बहिणाबाईच्या पतीला समज दिली. ते म्हणाले - पंत काय मारता हो तिला. अहो तिचे सुकृत म्हणून तुम्हाला तिचा योग घडला. इकडे आपल्यामुळे बहिणाबाईला मार पडला म्हणून वासराने प्राण सोडला. बहिणाबाई बेशुद्ध झाली. पुढे शुद्धीवर आल्यावर तिला तुकारामाचा ध्यास लागला. संत तुकारामाला तिने गुरू केले. तिला स्वप्नात गुरुमंत्र मिळाला. गंगाधरपंताला हे आवडले नाही. ते म्हणाले - 'कैचा शूद्र तुका स्वप्नीचे दर्शनी। बिघडली पत्नी मी काय करू ?' गंगाधरपंतानी संसार त्याग करून अरण्यात जाण्याचा मार्ग धरला. बहिणाबाईची परीक्षाच झाली. पती की देव ? शेवटी पती रवि तर पत्नी त्याची प्रभा असा विचार तिने केला व - 'प्रपंच परमार्थ चालवी समान। तिनेच गगन झेलीयेले' असे उद्‌गार काढले. तरी गंगाधरपंताचा निश्चय ढळला नाही.

गंगाधरपंत जाणार होते पण त्यांच्या नशिबात वेगळेच होते. त्यांच्या अंगाची आग भडकली. ते बेचैन झाले. बहिणाबाईने त्यांची सेवा केली ह्या आजाराने त्यांचे मन पालटले. त्यांच्या देहाची आगही नाहीशी झाली. सर्वजण कोल्हापूरवरून कपिला गाईसह देहूला तुकारामाजवळ आले. तुकारामाच्या देऊळवाड्यात त्यांच्या आनंद ओवरीत ते राहू लागले. रात्रंदिवस तुकाराम महाराजांची संतसंगती त्यांना लाभली होती. जणु वैकुंठ त्यांच्या मनात नांदत होते. पण हे सुख मंबाजी गोसाव्याला बघवले नाही. त्याने गंगाधरपंताचे कान फुंकायला सुरवात केली. अरे, तुकाराम हा शूद्र

त्याला काय गुरू करता. मी ब्राह्मण आहे मला गुरू करा. पण गंगाधरपंत म्हणाले - आम्ही आधीच तुकारामाला गुरू केले आहे. परंतु मंबाजी त्यांचा छळ करू लागला. त्याने बहिणाबाईची गाय चोरली, तिला बेदम मारण्याचा सपाटा सुरू केला. इकडे तुकाराम महाराजांच्या पाठीवर वळ उमटू लागले. तुकोबाच्या स्वप्नात गाय आली. मला यातून मुक्त करा म्हणून धावा केला. मंबाजीच्या घराला आग लागली. गाय मरणाला टेकलेली आढळली. लोकांनी तिची सुटका केली. पुढे बहिणाबाईला मुलगी झाली. वासरूच पुन्हा कन्या म्हणून त्यांच्या पोटी आले. तुकारामानी त्यांनी आशिर्वाद दिला. ओंकाराचा उपदेश केला. विठ्ठलाच्या नामस्मरणात ती दंग झाली. तिला विठ्ठलाचे दर्शन घडले.

बहिणा म्हणे देव विठ्ठल पहिला
द्वैतभाव गेला हारपुनी

बहिणाबाईचे जीवन धन्य झाले. तुकारामासारखा सद्‌गुरू त्यांना भेटला होता.

'तुकाराम भेटला धन्य जिणे माझे
कृतकृत्य झाले सहजचि'

— असे उद्‌गार बाहेर पडले.

डॉ. सरोजिनी बाबर म्हणतात - 'बहिणाबाई एक दैवी शक्ती होती. केवळ देवादिकांच्या गुणगानावर विसंबून न राहता तेरा जन्मांची हकीकत सांगू शकणाऱ्या बहिणाबाईची किती तारीफ करावी!

'अवघेची जन्म आठवती मज डोळा' असे बहिणाबाई म्हणते. त्यावर त्यांचा तिच्या प्रामाणिकपणावर विश्वास होता. कै. शिवराम महादेव परांजपे म्हणतात बहिणाबाईचे जन्म अगदी अलिकडच्या काळातील असल्यामुळेच विश्वासार्ह वाटणे स्वाभाविक आहे. आपले पूर्वजन्म पाहता येणे ही एक योगमार्गातील शक्ती आहे. त्याला 'जाति स्मरत्वाची सिद्धी' म्हणतात. ही दिव्यता त्यांना प्राप्त झाल्यामुळे ती महायोगिनी होती. तिला ७२ वर्षाचे आयुष्य लाभले. तुकारामाच्या निर्वाणानंतर ती देहू सोडून ५० वर्षे शिऊरला राहिली.

संत बहिणाबाई रामदासी होती की वारकरी होती? असा विवाद्य प्रश्नही काही लोक उपस्थित करतात तेव्हा मोठे नवल वाटते. श्रीमती शालिनीबाई जावडेकर यांनी ह्या विवाद्य प्रश्नाला चांगले उत्तर दिले आहे. 'समर्थ प्रताप' हा गिरीधर कृत समर्थ संप्रदायाचा ग्रंथ पण त्यामध्ये समर्थांच्या शिष्यिणींच्या यादीत बहिणाबाईचे अजिबात नाव नाही. याबद्दल स्वतः बहिणाबाई काय म्हणते ते महत्त्वाचे नाही का? बहिणाबाई म्हणते, 'मला तुकाराम महाराजांनीच स्वप्नात गुरुउपदेश दिला व त्यांच्या कृपेनेच मी उद्धरून गेली. बहिणाबाई म्हणते -

विवेक बहेणि सांगे लोका।
सद्‌गुरु माझा राम तुका

जग जागविले तेणे।
आता नाही येणे जाणे

श्री. वा. सि. बेंद्रे म्हणतात - बहिणाबाईच्या लेखनात रामदासांना अनुलक्षून एकही असा ठोस उल्लेख नाही. श्रीमती शालिनीताई आपल्या बहिणाबाई दर्शन ग्रंथाच्या प्रस्तावनेत लिहितात 'दासविश्रामधाम आत्मारामबोवा आणि महिपती या दोघा मातब्बर चरित्रकारांनी बहिणाबाईला समर्थशिष्या ठरविण्याचे कार्य केले नसते तर लोक ती रामदासी की वारकरी या संशयात पडले नसते त्यांच्या चारित्र्याला निष्कारण कलंक लागला व त्यामुळे बहिणाबाई सर्वत्र उपेक्षितच राहिल्या.' -

मुख्य कारण असे दिसते की बहिणाबाई ही ब्राह्मण असताना तुकारामासारख्या शुद्राकडून तिने शिष्यत्व पत्करावे म्हणजे काय? तुकाराम व रामदास हे समकालीन होते त्यामुळे बहिणाबाई ही समर्थशिष्या होती असे त्यांनी उद्‌धृत केले असले पाहिजे. रामदासांच्या ज्या शिष्या झाल्या त्यांच्या काव्यात समर्थवाङ्‌मयाची जशी छाप दिसते तशी बहिणाबाईच्या काव्यात दिसत नसून उलट तुकारामाच्या वाणीचेच ठसे त्यांच्या कवितेत उमटलेले दिसून येतात हे कशाचे द्योतक म्हणावे!

दुसरा एक विवाद्य प्रश्न. 'संतकृपा झाली इमारत फळा आली' - हा अभंग कुणाचा? - संत तुकारामाचा की बहिणाबाईचा? कारण दोघांच्याही अभंगगाथेत हा अभंग आढळून येतो. तुकाराम गाथेत हा अभंग असा -

संतकृपा झाली। इमारत फळा आली
ज्ञानदेवे रचिले पाया। रचियेले देवालया
नामा तयाचा किंकर। तेणे केला हा विस्तार
जनार्दन एकनाथ। ध्वज उभारिला भागवत
भजन करा सावकाश। तुका झालासे कळस

बहिणाबाईचा अभंग असा -

ज्ञानदेवे घातला पाया। उभारिले देवालया
नामा तयाचा किंकर। तेणे रचिले आवार
जनार्दन एकनाथ। खांब दिला भागवत
तुका झालासे कळस। भजन करा सावकाश
बहेणि फडकती ध्वजा। निरोपण केले वोजा

कै. ह. भ. प. धुंडामहाराज म्हणतात कळसाजवळ ध्वजा असते ती दुरुनही दिसते. ते कार्य संत बहिणाबाईने केले. आपले गुरु तुकारामाच्या अभंगाची छाप अशा तऱ्हेने बहिणाबाईच्या कवितेवर पडली होती हे त्याचे दर्शक म्हणावे.

बहिणाबाईची अभंगगाथा माणसाचे हृदय हेलावून सोडते. तिचा अभंगातील प्रत्येक शब्द कसा हृदयाला जाऊन भिडतो. उदाहरणे देखील मोठी मार्मिक अशी वाटतात. देह हा आत्मा नव्हे हे सिद्ध करण्यासाठी त्या लिहितात

आकाशीचा सूर्य जळात बिंबला
तरी काय बुडाला तयामाजी
तैसा या शरीरी अलिप्तचि असे
इंद्रिय समग्रे असोनिया

आकाशीचा सूर्य मावळताना समुद्रात बुडाला असे वाटते पण तो खरच का समुद्रात बुडतो तसा आत्मा देहात असून अलिप्त असतो. ताकात लोणी, काष्ठात अग्नी, पाण्यामध्ये कमलिनी कधी अलिप्त असतात. आत्म्याच्या संगतीने अचेतन जड देह हा चैतन्यमय होतो. डोळ्यातून पाहतो. मुखातून बोलतो. पायांनी चालतो. बहिणाबाईचा दृष्टांत मोठा मजेदार आहे.

पूर्ण होता सिंधूसी भरते
तैसा देह वर्ते आत्मयाने
आलिया वसंत येती पुष्पे फळे
तैसा देह चळे आत्मसत्ता

पौर्णिमेच्या दिवशी समुद्राला भरती येते. वसंताचे आगमन झाले की फळे आणि पुष्पांची बहार दिसते तसा आत्म्यामुळे देह क्रियावान होतो. संताचा महिमा कसा असतो याबद्दल बहिणाबाई म्हणते -

संत केवळ ते ज्ञान। निजखूण दाविती
संत होती खरे भवार्णवी तारु।
जाणती उतारु प्राणियांचा
संत ते जाणावे धैर्य मेरुपरी।
पडता नभ वरी ढळती ना

सद्गुरु कसे ? -

गुरु ते जाणावे समुद्रासारिखे।
कदाकाळी देखे नुचंबळती ।

भक्तीची व्याख्या ज्ञानेश्वरांनी केली -

जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत
हा भक्तियोग निश्चित। जाप माझा
भक्ती ते कैसी। पर्जन्याची सूटिका जैसी
धरावाचुनी अनारसी। भक्तीच नेणे

बहिणाबाईची भक्तीची व्याख्या बघावी

संताचे वचनी दृढ जया भाव
भक्ति अभिनव हेच खरी
बहेणि म्हणे संतपायी तया आर्त
हाचि भक्तिपंथ वोळखवा -

तुकारामादि संतावर त्यांची केवढी श्रद्धा होती - त्या म्हणतात -

संतापायी असे ज्ञानाची निजशक्ती
अज्ञान निवृत्ति होय तेणे
संताचिये कृपे विपयमळनाश
सापडे अविनाश परब्रह्म
बहेणि म्हणे संत देव हे प्रत्यक्ष
का रे न घ्या साक्ष मनामाजी

पुढे ते म्हणतात -

संतसंगे होय वैराग्य मनासी।
आणील शांतीसी संतसंग
संत महावैद्य भवरोग फेडिती।
सांगेन ते गति ऐक त्याची
अर्धमात्रा रस देऊनिया जीव।
रोग दूरी सर्व करताती

संत हे भवरोग नाहिसा करणारे धन्वंतरी असून

ओंकाराच्या अर्धमात्रेने ते रोग नाहिसा करतात. विषयत्याग हेच पथ्य आहे असे सांगतात.

देवहि इच्छिती संग त्यांचा घडो
देह कार्यी पडो संताचिये

देवसुद्धा संतसंगाची इच्छा करतात. तुकाराम महाराजांना काय हवे होते ?

नलगे मुक्ती धनसंपदा। संतसंग देई सदा

त्यांना मुक्ती नको होती, धनसंपदाही नको होती तर त्यांना हवा होता संतसंग. कारण संताचे संगतीतच देवत्वाचा लाभ होतो. संत तुलसीदासही आवर्जून सांगतात -

बिनु सतसंग विवेक न होई।
रामकृपा बिनु सुलभ न सोई


सत्संगाशिवाय विवेक निर्माण होत नाही. चांगले कोणते वाईट कोणते अशी हंसक्षीरन्याय छबि संतांच्या संगतीतूनच निर्माण होते. पुढे ते उदाहरण देतात - गगन चढै रज पवत प्रसंगा। कीचहि मिलही निच जल संगा। धुळीच्या कणाला वर जाणाऱ्या वायुची संगत लाभली की तो आकाशात विहार करतो पण त्याच रजःकणाला खाली पडणाऱ्या जलाची संगत लागली की त्याचा चिखल होतो. धुराची जलमटे होतात पण त्याच धुराला अग्नी, वायु व जलाची संगत लागली तर त्याचा जीवनदायी मेघ बनतो.

भक्ती हे कलियुगातील अमृत आहे. भक्तीशिवाय अंतःकरण कोरडे, शुष्क व व्यर्थ आहे. ज्या हृदयात भक्ती नाही ते हृदय कशाचे ? ज्या आकाशात सूर्य नाही ते आकाश कशाचे ? बहिणाबाई म्हणतात -

भक्ती हे कारण साधन वरिष्ठ।
रोकडे वैकुंठ हाती वसे
भक्तीपाशी ज्ञान वैराग्य आंदणे।
सर्वहि साधने लया जाती

भक्ती मुळे काय होत नाही ? एकनाथ महाराज म्हणतात - 'सकललक्षणा जन्मस्थान। माझी भक्तीजाण उद्धवा' - भक्तिहृदयात असली की मग सर्व गुण विवेक, वैराग्य, त्याग, ज्ञान, सेवा सारे काही हृदयात धावत येतात. भक्तिमुळे चित्तशुद्धि होते. मन विरक्त झाले की संसाराची आसक्ती नाहिशी होते. माणूस सर्व विश्वावर प्रेम करायला लागतो. विषमता नाहिशी होऊन समतेचा ध्वज फडकत राहतो. भक्त आपले जीवन ईश्वराला समर्पण करतो. पण अभक्त ? गाढवाला गाणे शिकविले तरी तो गोड गाणार आहे का ? श्वानाला उटी लावली तरी तो मातीत लोळल्या शिवाय राहणार आहे का ? 'बहिणी म्हणे तैसे अभक्ताचे स्वभाव। शिकविण्या ठाव न मांडिती' बहिणाबाईने अभंगरचना केली. किर्तने केली. स्वतःची आत्मिक उन्नती करून समाजाला अध्यात्माची दिशा दिली. ■ ■

प्राचार्य गो. मो. कोलते
खैरलांजी रोड, तिरोडा (भंडारा) ४४१९११



स्वप्न आणि रेषा

सुनील साळुंके

(स्वयंपाक खोली, पण टेबल खुर्ची व काही पुस्तके आवश्यक)

(कमलेश्वर दबकत दबकत येतो. इकडेतिकडे पहात हळूच खुर्चीवर जाऊन बसतो. तेवढ्यात शांतम्माचा आवाज येतो.)

शांतम्मा - आत्ता आलास होय रे ? (कमलेश्वर गप्पच). शेणासारखं झालंय कीरं तुझं थोबाड, शेणही बरं गोवऱ्या थापून स्वयंपाक तरी करता येतो. पण तू म्हणजे, तू म्हणजे - मुडदाच बघ थडग्यातला. मेलेलं आहे रे तुझं आयुष्य फुक्कटचं. वाघाच्या छातीचा असतास तर सोन्याहून पिवळं झालं असतं माझं आयुष्य.

कमलेश्वर (उसन्या अवसानाने) पण झालंय तरी काय ?

शांतम्मा - (आश्चर्याने) झालंय काय ? जसं ठाऊकच नाही असं विचारतोस की रे! साजूक कुठला! (थांबून) नाही रे देवा, फसले मी. हा पुळचट नवरा नाही शोभत मला. काय पाप होतं मागच्या जन्मीचं कुणास ठाऊक. तुझे काळीजच मेलेलं. मेणचट आहेस मेणचट (कपाळावर हात बडवित) कसे दिवस काढायचे रे तुझ्यावरोबर! तू भांडखोर म्हणतोस मला. पण आज कसा भांडला तो माझ्याशी. मुकाट्याने माघार घ्यावी लागली मला. नाही. नाही सहन होत. अजून त्याचे शब्द जळजळतेत. माझ्या कानांत.

कमलेश्वर तू बारीक-बारीक कारणावरून भांडत बसतेस अन् मला नाही आवडत भांडत बसणं. माणसानं कसं सामोपचारानं घ्यावं. शवेटी शेजारी असतात. नेहमीचा संबंध, चूकभूल ही होणारच.

शांतम्मा - अग्गोबया, ही चाळ आहे माझ्या भावल्या! अपार्टमेंट नाही. आहेस नां शुद्धीवर ? इथं नजरेला नजर दिली तरी तोंड फुटत भांडणाला. एकाला गप्प बसलो तर दुसरा असतोच उरावर बसायला. असा कसा रे निपजलास तुझ्या आईबापाच्या पोटी. माझा बापू होता बघ. त्याचे डोळेच असे भयानक होते की माशी सुद्धा फिरकायची नाही नजरेसमोरून. विडीच्या जळत्या तुकडयासारखी त्याची नजर. कुणाची हिम्मत नव्हती त्याच्या सावलीला उभं राहायची. (रडू लागते) आज तो असता तर चांगलच थापलं असतं तुला. (रडायचे थांबवते)

(कमलेश्वर शांतपणे टेबलवरील एक पुस्तक काढून चाळू लागतो. पुनः शांतम्माचा राग वाढतो.)

पुस्तक वाचून काय होतं रे ? मिळतं समाधान ? की कसलं कौतुक ? काय असतं पुस्तकात ? किडे....चार दळभद्री अक्षरं ? नुसते शब्दच वटवटीत... मेलेले. शूरांच्या गोष्टी कधी वाचल्यास ? अरे माझा मामा लष्करांतून आला होता - तेव्हा चेहऱ्यावर समाधानानं बळ पाहलं होतं आम्ही. अन् तू ? वाचता आलं का तुला तुझं आयुष्य ?

(कमरेवर हात ठेवून क्षणभर शांतम्मा कमलेश्वरकडे रोखून पाहते. स्वयंपाकघरात जाता-जाता "मेलेलं आहे रे तुझं आयुष्य. फुक्कटचं मेलेलं." कमलेश्वर शांतपणे विचार करीत असतो. हळूहळू अंधार होत जातो. शांतम्मा आपले अंथरुण आणते. अन् त्यांच्यासमोरच त्वेषाने अंथरूण टाकून झोपी जाते. कमलेश्वर तिच्याकडे पाहात नाही. हळूहळू त्यालाही झोप येऊ लागते.)

दृष्य २ रे

(लाटांचा आवाज येतो आहे. एक कोळ्याच्या वेशातला तरुण समुद्रात जाळे टाकून बसलेला आहे. पुरुष आपली थकलेली पावलं उचलीत

शांतपणे तेथे उभा राहतो.)

पुरुष - अहो.

(कोळी पहात नाही.) अहो मी तुम्हाला -

(कोळी पहात नाही म्हणून मोठ्या आवाजात) अहो इकडे पाहताय नं ? (आता कोळी त्यांच्याकडे नुसता पाहतो. अन् तोंडावर बोट ठेवून पुरुपाला गप्प राहण्याचा आदेश देतो. पुरुप गप्प उभा राहतो. काही वेळ रिकामाच जातो. पुरुप अस्वस्थपणे येरझारा मारत स्वतःशीच वडवडतो आहे. "गप्प बसा म्हणे जणू काही फार मोठं काम करतोय. मूर्ख कुठला. दरिद्रीच लेकाचे प्रापंचिक आयुष्य जगणारे."

काहीवेळ लाटांचा व पाण्याच्या आवाजा-व्यतिरिक्त कसलाही आवाज नाही. कोळी आता उठतो. जाळे ओढून येतो. त्यातले चार-सहा मासे पाहून समाधानाने ते जाळे खांद्यावर टाकतो अन् जायला लागतो.

पुरुष - अहो मी तुम्हालाच मघाशी -

कोळी - कां म्हणून टोकलंस ?

पुरुष (अडखळत) मला-मला. तुम्ही कुणीकडे निघालात ?

कोळी - या रस्त्याने.

पुरुष - (हळूच हसत) मला इकडे जायचं होतं.

कोळी - जा नां.

पुरुष - नाही म्हणजे (चुळबुळत) हा मार्ग कोठे संपतो ते विचारायचं होत मला. (कोळी त्या रस्त्याकडे मान उंचावून पाहू लागतो.) काय पाहतांय ?

कोळी - ऊं हूं दिसत नाही.

पुरुष - काय दिसत नाही ?

कोळी - ही वाट कुठे संपते ते.

पुरुष - कमालच आहे. तुम्ही इथे राहात असून सुद्धा ठाऊक नाही म्हणजे.

कोळी - (निर्विकारपणे) ठाऊक नाही.

पुरुष मासे पकडायला तिकडे कधी गेला नाहीत काय ?

कोळी - फारसे नाही जात. कारण तिकडे गाळ आहे. शिवाय मासेही मिळत नाहीत. (स्तब्धता)

पुरुष - थोडीतरी कल्पना असेलचं नां.

कोळी - काहीच कल्पना नाही. इकडे आम्ही पाहतो तेव्हा सूर्य मावळत असलेला आम्हाला दिसतो. आम्ही थांबतो. आणि घराच्या ओढीने परत निघतो (पुरुप गप्पच आहे. लाटांचा आवाज अधून-मधून येतो आहे.) आत्ताच तिकडे काय काम काढलंत ?

पुरुष - (भांबाऊन) आत्ता म्हणजे ?

कोळी सूर्य मावळत आलाय. रात्र होईल. म्हणून आपलं....

पुरुष - (काहीतरी उत्तर द्यावं म्हणून) निघालोय आपलं सहज.

(स्तब्धता)

कोळी - जेवण केलंय ना ?

पुरुष - हो पण तुम्ही हा प्रश्न कां विचारलात ?

कोळी -(हसत) सहजच.

पुरुष - (हसतो) येथेच काही अंतरावर कंदमुळे मिळाली. तुम्हीही जा. भरपूर मिळतील तुम्हालाही. (कोळी फक्त हसतो) मासे मिळाले ?

कोळी - होय. थोडे.

पुरुष - म्हणजे किती ?

कोळी - चार-सहा.

पुरुष - बस्स. एवढेच ?

कोळी - (हसत) होय.

पुरुष - पुरतात कां एकवेळच्या जेवणाला तरी ?

कोळी - अं-नाही. तसे आम्ही दोघंच आहोत मी व माझी बायको. पण समाधानी आहोत. ती हट्टी नाही.

पुरुष - (स्वतःशीच) तुमच्या पत्नी विपयीच्या काही अपेक्षाच नाहीत म्हणून तुम्ही समाधानी आहात. असो.

कोळी - काही म्हणालात ?

पुरुष - अं-नाही. पण जाळे केव्हा टाकून बसला होता तुम्ही ?

कोळी -चार दिवस झाले.

पुरुष - (आश्चर्याने) चार दिवसांत फक्त चारसहाच मासे ?

कोळी - इकडे येण्याची माझी ही पहिलीच वेळ नां ? पुन्हा नाही येणार या बाजूला. चारसहा तरी मिळाले नां. एवढंच समाधान.

(कोळी हसतो. पुरुषही अंमळ हसतो. दोघेजण आता काय बोलावं या विवंचनेत आहेत. दोघेजणही अवघडल्या अवस्थेत उभे राहतात. पुनः एकदा एकमेकांस पाहून हसतात उगाचच.)

कोळी - चलतो मी.

(पुरुष काहीच बोलत नाही. फक्त हसतो. कोळी निघून जातो. पुरुष तेथेच उभा राहतो. काही क्षणानंतर त्या दिशेला तो जायला निघतो. काही पाऊल चालून गेल्यानंतर अचानकपणे तो थांबतो. (बाहेर घोडागाडी येत असल्याचा आवाज येतो आहे. आवाज जवळ-जवळ येत अचानकपणे थांबतो. पुरुष त्या दिशेला आश्चर्याने पहातो आहे. त्यानंतर "कमल-कमल" अशा हाका ऐकू येतात. त्यापाठोपाठ शुभ्र रंगाचा गाऊन व हातात फूल असलेली एक सुंदर तरुणी तिथे प्रवेशते. पुरुषाला पाहताच पुन्हा एकदा "कमल-कमल" अशा हाका मारत आनंदानेच पुरुषाला मिठी मारते. पुरुष घाबरतो. बावरतो. चोहीकडे पाहू लागतो. तिचे गळ्यातले हात काढायचा प्रयत्न करतो.)

तरुणी - कमल, कमल.

पुरुष - (आश्चर्याने) कोण कमल ?

तरुणी - अरे मी-मी बरं, होतास तरी कोठे तू इतके दिवस ?

पुरुष - मी कमल नाहीये. सोडा मला. (गळ्यातले हात काढायचा प्रयत्न करतो)

तरुणी - कमल कमू- माझ्या कमला.

पुरुष - पण मी तुमचा कमल नाहीये. भिती वाटतेय मला. सोडा पाहील कोणीतरी तुम्ही-तुम्हाला ओळखलं नाही मी.

तरुणी - (गळ्यातले हात काढत) काय ? मला ओळखत नाहीस तू ? कमल बोलतोस तरी काय हे. आत्मभानाला पारखा झालास होय रे माझ्या राजा.

पुरुष - अहो पण, मी-मी कुठल्या भाषेत सांगू तुम्हाला खरंच मी तुमचा कमल नाहीये.

तरुणी हाय रे देवा! कुणी शिकवली तुला ही शिष्टाचाराची भाषा ? हे कुणाच्या पापाचे फळ समजावे मी ?

(त्याचा हात पकडते.)

पुरुष - पण खरंच मला माफ करा. मी ओळखलं नाही तुम्हाला.

तरुणी - करं, करं रे माझ्या दुर्देवा. या जिभेवर तुझे नाव पवित्र झाले. ईश्वरनामाचा एक थेंब उच्चारला नाही कधी. कुणाच्याही सहानुभूतीची अपेक्षा न करता सरळ ही अशी धावत आले तुझ्याकडे, अन् तू-तू माझ्या राजा तुझा स्मृतिभ्रंश तर झाला नाही नां ? की कुणी चेटूक केलंय तुझ्या स्मृतिवर ? की करत्या आनंदाने ती बहिरी झालीय ? बोल ना रे गप्प कां तू ?

पुरुष - कोठून आलीस ?

तरुणी - (आनंदाने) मी तुला न्यायला आलेय कमल.

पुरुष - पण कोठे ?

तरुणी हाय राम हे सुद्धा विचारतोस तू? अरे, तुझ्यासाठीच तर आहे ना हा माझा जन्म. विसरलास होय तू, मंदिरात घेतलेल्या शपथा ? चल येतोस त्या परमेश्वरासमोर ?

पुरुष - (आकाशाकडे पहात) एवढ्या प्रचंड जनभूमीतून त्यांचे आपल्याकडे लक्ष जाईल असे मला नाही वाटत. तसेच ह्या मोठ्या पसाऱ्यामधून तो एक दोघांनाच न्याय देऊ शकेल.

तरुणी - म्हणजे तू कुठे यायला सुद्धा तयार नाहीस. आठव तरी थोडं. आठवण्याचे दिवस संपलेत असे आज. पण आता थोडा त्रास घे. माझ्यासाठी-तुझ्यासाठी अरे, मी म्हणजे आत्मा आहे आत्मा तुझ्यात वसलेला. अन तूच स्वतःला ओळखण्याच्या पलिकडे गेलास ? हे दुर्देव तुझे समजावे की माझे ? कुठल्या पापाची ही फलश्रुति आहे ? प्राक्तन, योग ह्यालाच म्हणतात काय ?

(स्तब्धता)

आठवतं तुला कमल ? आपण दोघेच होतो. धुक्यात वेढून गेलेल्या पुलावर. विसरलास या तळहातावर झेललेला पहिला पाऊस. गात्रागात्रात

झिरपलेला तो पाऊस. आठवतं तुला, कावळ्यांची शाळा भरत असलेल्या पिंपळाखाली तू माझ्या कुशीत जनविस्मरणाचा आनंद अनुभवत होतास. आणखी कशाची आठवण करून देऊ तुला (काही वेळानंतर)

पुरुष - हो-हो मला आता पटू लागले आहे. स्वतःची ओळख असेल. तुझा माझा जुना परिचय असेल सुद्धा. कारण आत्ता माझीच अवस्था बोलून दाखविलीस तू. आज कित्येक दिवसाच्या भटकंतीनंतर माझं आत्मरूप मला गवसलं. मला जे हवंय ते आज मिळालं. जे हवंय ते मिळालं.

तरुणी - (आनंदाने) आजच्या दिवसातील शुभ घटना म्हणजे तुला मला जोडणारा तो अखंड पूल आहे. ईश्वराचे आभार मानावे म्हटले तर तो नजरेसमोरच येत नाहीये. सर्व परींनी व्यापून राहिला आहेस तू मला. आज प्रथमच अनुभवत आहे मी एखाद्या समाधानामागचा आनंद.

पुरुष - हा मार्ग इथेच संपला. हे बरंच झालं. आता आपण दोघे अशा ठिकाणी जाऊ जिथे फक्त आपण दोघेच असू. तिथे आपल्याला हा गृहस्थी धर्म स्विकारावा लागणार नाही. आणि इथल्या व्यवहाराचा संबंध असणार नाही. अन् कुठलीही सत्ता आपले स्वातंत्र्य हिरावून घेणार नाही. तू माझी प्रेरणा आहेस. माझी बुद्धी, माझे जीवन आहेस तू. इथला एक क्षणसुद्धा मनाप्रमाणे मी जगू शकणार नाही - तुझ्याशिवाय. आणखी काही क्षण आपण इथे थांबलो तर हे-हे पाहतेस नं माणसांचे क्लिष्ट जीवन आणि कुणीही आढळणार नाही-इथे तुला आपल्या हृदयनक्षत्राचे मोल जाणणारे. इथली सत्ता आपले खच्चीकरण करेल. त्यांचे डोळे सतत पेटलेले असतात, मत्सर अन् सूडाने. त्यांच्या रक्ताचे प्रखर किरण आपल्या पवित्र हृदयावर पडले तर क्षणात माती होईल आपल्या देहाची.

तरुणी - पण तू आपल्या निरागस प्रेमळ दृष्टीने मला गोंजारलेस तर मला त्यातच गवसते माझे सुख. माझे प्रतिबिंब माझा परमार्थ आढळतो त्यांत. आपण अशा ठिकाणी जाऊ जिथे अचल स्वाभिमानी पहाडांची मातृसावली असेल. आपल्या पुत्रांना स्तनपान देत असल्याप्रमाणे भारणाऱ्या झाडांच्या तृप्त प्रेमळ मोरपंखी सावल्यांचा पदर असेल. निरोपाच्या जाणिवेने गलितगात्र झालेली संध्याकाळ असेल आणि काळोखाच्या उबदार पंखात असतील आपले समाधिस्थ देह.

पुरुष - होय. आपल्या सुखाची कल्पना निश्चितच सफल होईल. कारण आपण दोघेही एकाच विचारांनी बांधलेले आहोत. अशा प्रांतात जाऊ जेथे माणसांच्या स्वार्थी वृत्तीचे किंवा त्यांच्या कल्पनीय, अनैतिक देहभोगाची कल्पनाच अस्तित्वात असणार नाही. मनातून सतत वात्सल्याचा नम्रतेचा श्रद्धेचा झरा पाझरत असेल. तिथे मृत्यूनेही शरणागती पत्करावी. आज खरंच मी या जगापासून वेगळा झालो. मला माझे सुख लाभले. मी सहनशील नाही. जे सहनशील आहेत त्यांना माझा प्रणाम. माझा आत्मा आज एका प्रदीर्घ वेदनेतून मुक्त होणार आहे. माझ्या देहात आज कुणीही डोकावून पहा. तेथे साऱ्यांना पवित्र घंटानादाचे स्वर ऐकू येतील. हृदयांवरून हात फिरवाल तर तुम्हाला त्यावरची रोमांचक थरथर जाणवेल. चल निघूया. इथल्या जगात वेळेला फारच महत्त्व आहे. आपणही त्यांच्या प्रमाणेच आपले माणूसपण गमावून वराण्याची भिती वाटते मला. मी पुनः माझेच मन नुसते भोगत राहीन.

तरुणी - (आनंदी चेहऱ्याने) चल तर, माझी घोडागाडी बाहेर उभी आहे. (दोघंही जातात. काहीवेळ आपणांस घोडागाडी जात असल्याचा फक्त आवाज येतो आहे. काही क्षणानंतर घोडागाडीचा आवाज अचानकपणे थांबतो. रंगमंचावरील काळोख विरळ होत जातो. प्रकाशात आपणास वेगवेगळ्या चेहऱ्यांच्या व्यक्ति वेगवेगळ्या पोषाखातील आपल्याच नादात फिरताना आढळतात. वृद्धांच्या अंगावर मोठमोठे झवले आहेत. तरुणाच्या अंगावर नेहरू शर्ट, तंग विजार आहे. स्त्रिया सुद्धा लमाणपद्धतीच्या वेषात आहेत.

त्या काहीतरी विकत बसलेल्या आहेत. तेथे जणू बाजार भरलेला आहे. तेवढ्यात ती तरुणी व पुरुष तेथे प्रवेश करतात. तेव्हा त्या तरुणीच्या चेहऱ्यावरील भाव अचानकपणे पालटतात. ती साऱ्यांकडे भयभीत डोळ्याने पाहू लागते. काही क्षणानंतर वेशुद्ध पडते. आता तेथील लोक एकत्र जमून आश्चर्यचकित नजरेने पुरुषांकडे व वेशुद्धावस्थेतील तरुणीकडे पाहू लागतात. पुरुष सुद्धा घावरतो. हे लोक आपणाकडे असे कां पहात आहेत हेच त्याला उमजत नाही. तो तिच्या शेजारी बसून तिला जागे करण्याचा प्रयत्न करतो. पण ती उठत नाही. तेव्हा तेथील जनसमुदायाकडे तो भेदरून फक्त पहात राहतो.

वृद्ध-१ - कोण आहे हा ?

तरुण-१ - कुणास ठाऊक ?

वृद्ध-२ - कुठून आलाय ?

तरुण-२ - ठाऊक नाही.

वृद्ध-१ - पण विचारलं पाहिजे नं.

(स्तब्धता)

वृद्ध-२ - पण विचारणार कोण?

वृद्ध-१ - आपल्यातला काही दिसत नाही.

तरुण-१ - कळतंय ते.

(स्तब्धता)

तरुण-२ - माथेफिरू असावा.

वृद्ध-१ - पटत नाही.

तरुण-२ - असेलही कदाचित.

वृद्ध-२ - असेल ह्याला काही अर्थ? उगाच....

(स्तब्धता)

तरुण-१ - कितवा दिवस आहे हा.

वृद्ध-३ - कशावद्दल म्हणतोस ?

तरुण-१ (तरुणी व त्या पुरुषांकडे पहात) त्यांच्यावद्दल.

तरुण-२ - हा पाचवा दिवस असावा.

तरुण-३ - छेरे दोन दिवस तरी झाले.

वृद्ध-१ - नाही आज आठवा दिवस आहे.

वृद्ध-२ - कशावरून म्हणतोस.

वृद्ध-१ - तसा हा माझा अंदाज आहे.

वृद्ध-२ - आपले अंदाज विनवुडाचे असतात. चुकीचे असतात वेड्या (स्तब्धता) हा कदाचित वेडा असेल.

वृद्ध-३ .- नव्हे. हा निश्चितच वेडा आहे.

तरुण-१ - असेलही.

तरुण-२ - नाहीतरी आता वेडाच ठरवायला हवा.

तरुण-३ - त्याची आवश्यकता नाही. काही वेळानंतर हा खरोखरीच वेडा होईल.'वेड्यासारखा वागेल.

वृद्ध-१ - मुळीच नाही. संधी मिळणार नाही त्याला वेडं व्हायला. (यावर सारे जण हसतात. त्याच्याकडे रोखून पांहू लागतात. पुरुष फक्त भयचकित दृष्टीने पाहतो आहे साऱ्यांना)

वृद्ध-२ - (हसत) एवढं मात्र खरं.

(स्तब्धता)

वृद्ध-१ - कदाचित अनभिज्ञ असावा.

वृद्ध-३ - विचारून पहा तरी.

तरुण-१ - आता इलाज नाही.

वृद्ध-१ - पण अनिभज्ञ असणं हा काही त्याचा गुन्हा म्हणता येणार नाही.

(स्तब्धता)

वृद्ध-१ खरंच तो अज्ञानी, पापभिरू असेल तर (आकाशाकडे पाहतो)

(स्तब्धता)

तरुण-१ - नसेलही.

वृद्ध-२ - कशावरून म्हणतोस ?

तरुण-२ - ठाऊक असावं सारं.

(स्तब्धता).

वृद्ध-१ - पण तो जाणूनवुजून सुद्धा करणार नाही.

वृद्ध-२ - शक्य आहे.

तरुण-१ - मी म्हणतो. त्याने जाणून-बुजून हे सारं घडवून आणलं नसेल कशावरून.

तरुण-२ - तर काय मोह कोणाला सुटला आहे ?

(स्तब्धता)

वृद्ध-३ आपण आपल्या पायांनी फक्त आपल्या पुरत्याच आखलेल्या पाऊलवाटेवरून चालत येतो. आपल्या पायदळी एक नियतिचक्र असते. त्याचा पुन्हा एकदा मला प्रत्यय आला. आज विचाऱ्याच्या समाप्तिचा दिवस.

तरुण-२ आता फक्त पाहणेच उरले आहे त्याच्यासाठी.

वृद्ध-२ - अन् आपण मात्र पहायला उरलेले आहोत.

(स्तब्धता)

तरुण-१ - नशिबवान आहोत दुसरे काय ?

तरुण-३ - दयायाचनेचा एखादा शब्द निघाला तर तो सुद्धा छाटला जाईल.

वृद्ध-३ एखाद्याच्या मृत्यूसाठी नियतीला एखादे निमित्त घडवून आणावे लागते.

वृद्ध-१ अन् आपण निमित्ताला सारेजण जमलो आहोत.

(स्तब्धता)

पुरुष - (मोठ्या चिडक्या स्वरांत) तुम्ही आहांत तरी कोण ? (स्तब्धता) आहांत कोण तुम्ही ?

(सारेजण एकमेकांकडे पाहतात. मग मंदपणे हसतात.)

वृद्ध-१ - आम्ही कोणीच नाही.

तरुण-१ आम्ही फक्त साक्षीदार आहोत. पुढल्या क्षणांचे तुझ्या आयुष्यातील पहिल्या आणि शेवटच्या क्षणाचे.

तरुण-२ - तोपर्यंत चंद्र पाहून घे हा. (तरुणीकडे बोट करतो)

तरुण-३ - तिच्या ओठांचे एखादे चुंबन घे.

वृद्ध-२ - आणखी काहीही कर. आमची काही हरकत नाही.

वृद्ध-३ - हो नं. ही शेवटचीच संधी.

वृद्ध-१ - तू गप्प कां ?

(स्तब्धता)

तरुण-१ - आम्ही हे तुझ्यासाठीच बोलतो आहोत.

तरुण-२ - आलेल्या संधीचा फायदा घ्यावा.

वृद्ध-३ - तू नाही केलंस, तर आम्ही समजू तू दुबळा आहेस. जगण्याची हिंमत तुझ्यात नाही.

(स्तब्धता)

वृद्ध-२ - उद्याची पहाट पहायला तू असणार नाहीस हे केवढे भयानक सत्य आहे. ह्याचा तू नाही पण आम्ही अनुभव घेत आहोत.

वृद्ध-१ असले नागडे सत्य पहायला कुणी जवळपाससुद्धा असू नये. (स्तब्धता)

पुरुष - (त्राग्याने) तुम्ही-तुम्ही हे सारे काय बोलता आहात ? काय ठरवता आहात आपापसात ? सारेजण शुद्धीवर आहात नं ? (यावर पुनः एकदा सारेजण एकमेकांकडे पाहून हसतात.)

तरुण-३ - आम्ही शुद्धीवर आहोत.

वृद्ध-३ - अन् ठरवणारे आम्ही नाहीतच मुळी. (हसतो) (पुरुष आता पळण्याच्या तयारीत आहे. पण चोहीकडे पुरुषांचे कडे असल्यामुळे जागीच तो रेंगाळतो आहे.)

तरुण-१ - बिच्चारा. पळण्याच्या तयारीत दिसतोय.

वृद्ध-१ - दुर्दैवी आहे.

वृद्ध-३ - कसल्या तरी हव्यासात स्वतःकडे इकडे चालत आलाय. अन् पुढे घडणाऱ्या घटनेपासून पळणं सोपं असते होय ? (स्तब्धता)

वृद्ध-२ - तो किती भावडा आहे नं.

तरुण-१ - इथे भावडेपणाला किंमत नाही. आपण कशा प्रकारे व्यवस्थित जगतो ते महत्त्वाचं. (स्तब्धता)

वृद्ध-१ त्यांच्याबद्दल मला आता खरंच प्रेम वाटू लागलंय.

तरुण-१ - उपयोगाचं नाही ते.

तरुण-२ - खरंच आहे.

वृद्ध-१ - पण माझे हृदय भरून आलेय नकळतपणे. त्यांच्याबद्दल सहानुभूती, दया वाटू लागलीय.

तरुण-१ - बाबा, आहात कोठे तुम्ही ? भानावर या. आत्मभान हरवणं म्हणजे आपलं अस्तित्वच गमावणे. समजलं कां ? एखाद्या विषयी आपणांस दया वाटली, त्यांच्यासाठी आपले थोडे आयुष्य खर्च घातले तर होतं काय ते ठाऊक असेलंच तुम्हाला.

वृद्ध-१ - याक्षणी तरी मला काही आठवत नाही. काय होत असेल ?

तरुण-२ - आपण सुद्धा गुन्हेगार ठरतो.

तरुण-३ - तुम्हाला कदाचित शिक्षा होऊ शकेल.

वृद्ध-३ आपल्या जवळ दुसऱ्याला प्रेमाने जिंकून घेण्याची नैसर्गिक शक्ती असते. पण तिच्यावर पहारा असतो. कधी सत्तेचा. तर कधी नियतीचा.

तरुण-१ - तुम्हाला त्याच्याबद्दल प्रेम वाटणं साहजिकच आहे. पण त्याच्या मनात तुमच्या बद्दल तिरस्कार नसेल कशावरून ?

वृद्ध-२ - शक्य आहे.

वृद्ध-३ - तू असं उघड उघड प्रेम व्यक्त करणंसुद्धा चुकीचं आहे.

तरुण-२ आपल्यातला एखादा फितूर झाला तर त्यांनाही पुढच्या परिणामाला निमूटपणे सामोरं जावं लागेल.

वृद्ध-१ - (काहीवेळानंतर परमेश्वराची प्रार्थना करीत, आकाशाकडे पहात) नाही नाही रे परमेश्वरा. यापुढे नाही बोलणार कधी. कधीच बोलणार नाही. हा अनुभव जपेन मी यापुढे. घरी माझी म्हातारी बायको आहे. मेंढ्या, कोंबड्या आहेत. त्यांना नेमाने चरायला न्यावे लागते. संध्याकाळी आठवणीने घरी परतावे लागते. तिला खूपच आनंद होतो. ती माझ्यासाठी आळूच्या वड्या करते. दारात सडा टाकते. रांगोळी घालते. मातीच्या हळव्या सुवासात माझे ताट करते. चंद्राच्या सौम्य प्रकाशात आम्ही एकमेकांस धारा भरवितो. खरंच माझे जीवन किती सुंदर आहे. तिला माझ्याशिवाय अन् मला तिच्याशिवाय आहेच कोण. आस्थेनं बोलायला. एकमेकांची विचारपूस करायला. (स्तब्धता) आपण आपल्या आखून दिलेल्या रेषेपर्यंतच जगणं समाधानाचं असते.

(स्तब्धता)

पुरुष-१ - (नम्रतेने) मी कोठे आहे तेवढं सांगता कां ?

वृद्ध-२ तू जेथून परतलास, तेथेच तर आहेस. (सारेजण हसतात.)

पुरुष - तुम्ही काय बोलता आहोत तेच नीटसं समजत नाहीये मला.

वृद्ध-३ - समजणारच नाही नं. अन् कुणालाही समजलं नाही आत्तापर्यंत, आता आमची राजकन्या तुझ्यासमोर कशी तेच गूढ उकलेनासं झालय आम्हाला.

पुरुष - (आश्चर्याने) म्हणजे ही तुमची राजकन्या आहे ?

वृद्ध-१ - होय.

तरुण-१ - पण बाबा ती बेशुद्ध कशी पडली ?

वृद्ध-१ - जेथून ती निघाली होती पुनः तेथेच ती आली. आपणा साऱ्यांना पाहून कदाचित तिची शुद्ध हरपली असेल. (स्तब्धता) अधूनमधून तिला वेडाचे झटके येतात म्हणे.

तरुण-१ प्रत्येकजण केव्हाना केव्हा तरी आपल्या घराकडे आपल्याही नकळत परतत असतो तर.

तरुण-२ - असला कसला शाप या सौंदर्याला.

तरुण-३ - अन् सत्ता तरी काय कामाची ? (स्तब्धता)

तरुण-१ - काही कारण असेलच नं बाबा.

वृद्ध-२ आहे नां. कारणाशिवाय काही घडतं होय इथं ?

वृद्ध-१ - राजकन्येचं प्रेम होतं एका सामान्य युवकावर.

तरुण-२ - सामान्य ?

वृद्ध-२ - हो साधा कामगार होता तो.

वृद्ध-१ पण त्याच्यासाठी ती कुठल्याही प्रसंगाचा सामना करायला तयार होती. साऱ्यांचा द्वेष तिने डोळ्याआड केला होता. तो सामोरा आला म्हणजे एका वस्त्राशिवाय कसलेही भान नसायचे तिला. (स्तब्धता) एखाद्या दुर्मिळ अलंकाराप्रमाणे तिने जपलं होतं त्याला. (स्तब्धता)

तरुण-३ छे, राजकन्येनं प्रेम करणंच स्वाभाविक वाटत नाहीये.

तरुण-१ - मनाला पटत नाही.

तरुण-२ - होनं. त्यांनी फक्त प्रजेच्या भल्याचाच विचार करावा.

वृद्ध-१ - काहीतरी वेड्यागत बरळू नकोस. माणसानं कोणत्याही वयात कुणावरही प्रेम करावं. या जगात प्रेम ही एकच गोष्ट अशी आहे की कसल्याही पापापासून आपण काही काळ तरी परावृत्त होतो.

परंतु या युवकाला मात्र आपल्या प्रेमापायी प्राण गमवावे लागले.

तरुण-३ - अरेरे, फारच वाईट झाले.

वृद्ध-१ एक दिवस त्याचा मृतदेहच आणला राजकन्येसमोर. आपल्या अत्यंत प्रिय व्यक्तीला मृत पाहताच ती भयानकपणे ओरडली. पण आश्चर्य म्हणजे तिचा आवाज उमटला नाही. नंतर काही क्षणातच ती बेशुद्ध पडली.

तरुण-१ - राजाने कां दाखवावा तो मृतदेह ?

वृद्ध-१ तिने त्याचा नाद सोडावा म्हणून राजाने जाणूनबुजून हे घडवून आणले. पण घडले उलटेच. त्या दिवसापासून तिला वेडाचे झटके येऊ लागले.

तरुण-२ - हे तर फारच भयानक झाले.

वृद्ध-२ - होय त्या भ्रमात ती कुठेही जाते. भटकत राहते. राजाला दवंडी पिटवावी लागते. आणून देणाऱ्यास बक्षीस जाहीर करावे लागते. गावोगाव रक्षक जातात. पण सहजासहजी ती हाताशी लागत नाही.

तरुण-३ - मग राजाने आता तिचा नाद सोडून द्यावा.

वृद्ध-२ - कसं शक्य आहे ते. राजाची अत्यंत लाडकी आहे ती. (स्तब्धता)

तरुण-१ - आमचा राजा आमच्यापेक्षाही दुःखी आहे तर. (स्तब्धता)

वृद्ध-१ - हा पुरुषदेखील तिच्या भ्रमाचाच बळी ठरलेला आहे.

वृद्ध-२ - प्रचंड असे सुखाचे दालन त्याला गवसले. म्हणून कदाचित...

तरुण-२ - आता तो स्वतः आपल्या तळहातावर मृत्यू घेऊन आला आहे.

वृद्ध-३ - माणसाची कशी फसगत होते. हे एक उत्तम उदाहरण आहे.

वृद्ध-१ - आपण एका निरपराध व्यक्तीच्या मृत्यूचे साक्षीदार आहोत. म्हणजे आपण सुद्धा त्याच्यापेक्षा कमी दुर्दैवी नाही. त्याचा मृत्यू ही एक चिरंतन निद्रा आहे. पण आपले जगणे एक चिरंतन वेदना बनून धुमसत राहील आपल्यात. (स्तब्धता)

तरुण-१ - संध्याकाळ झाली.

वृद्ध-१ - कदाचित येत असतील ते बहुंधा.

(काहीवेळानंतर घोड्याच्या टापांचा आवाज येऊ लागतो. सारा जमाव हळूहळू दूर सरकू लागतो. जमावातून आवाज उमटू लागतो. "बाजूला सरका" "दूर व्हा, कदाचित त्यांचा गैरसमज होईल त्याला संरक्षण दिले म्हणून" पुरुषाचा चेहरा घामाने डबडबलेला आहे. डोळ्यात भय साठलेले आहे. तो त्वराताच चोहीकडे कसल्या तरी आवेशाने पहातो आहे.

टापांचा आवाज थांबलेला आहे. सारा जमाव खालमानेने उभा आहे. काही क्षणानंत दोन तलवारधारी रक्षक तेथे येतात. त्यांचे चेहरे काळे आहेत. राजकन्येला पाहताच त्यांचा चेहरा समाधानाने फुललेला आहे.)

रक्षक-१ - कोठून आलास तू ?

पुरुष - (अडखळत) मी-मी मला ठाऊक नाही. खरंच मला ठाऊक नाही.

रक्षक-२ - काय ठाऊक नाही तुला.

पुरुष - (गडबडून) मी... माझे नाव कमल नाही. खरंच देवाशपथ मी कमल नाहीये.

रक्षक-१ - आम्हाला तुझे नांव नकोय.

पुरुष - पण. पण महत्त्वाचं तर हेच आहे.

रक्षक-२ - काय महत्त्वाचं आहे अन् काय नाही ते चांगलं समजतंय आम्हाला (स्तब्धता)

रक्षक-१ - आमची राजकन्या तुझ्याबरोबर कशी ?

पुरुष- मी नाही आणलं तिला. तिनेच इकडे आणलंय मला.

रक्षक-२ -(हसत) म्हणजे तू भलतेच धाडस केले म्हणायचे.

रक्षक-१ -(हसत) तिच्याबरोबर येण्याचे.

पुरुष - पण मला तरी काय ठाऊक. मला काहीही माहिती नाही. या भागातसुद्धा मी प्रथमच आलोय.

रक्षक-१ - तेही राजकन्येबरोबर. होय नां.

पुरुष - पण माझा गुन्हा तरी काय आहे ?

रक्षक-२ - तू राजकन्येबरोबर आहेस.

पुरुष - (त्वेषाने) एवढ्यावरून तुम्ही मला गुन्हेगार ठरवू शकत नाही.

(दोघं रक्षक मोठमोठ्याने हसू लागतात)

रक्षक-१ - वेडा आहेस तू. ज्याच्या हातात सत्ता असते तो सर्व काही ठरवू शकतो.

पुरुष - पण मी काही अपराधी नाही. मला शिक्षा व्हावी असा कुठलाही अपराध माझ्या हातून घडलेला नसतांना....

रक्षक-१ - तू या क्षणी आम्हाला राजकन्येबरोबर दिसतो आहेस. हा तिळा एवढा क्षणच तुझ्या मृत्यूस कारणीभूत होत आहे.

पुरुष - (भाबडेपणाने) नाही. तुम्ही अशी घाई करू नका. तिला जाग येऊ द्या. ती चांगली शुद्धीवर येऊ द्या. म्हणजे सारा खुलासा करेल ती. कृपया मला मारू नका. आणखी थोडा वेळ तरी द्या.

रक्षक-२ - आम्ही हुकुमाचे बांधील आहोत. राजकन्येचं ऐकण्यात आम्हाला स्वारस्य नाहीये. राजाचा असा आदेश आहे. राजकन्येबरोबर जी कुणी व्यक्ती दिसेल त्याला जागीच ठार करा. कुठल्याही परिस्थितीत तो दयेस पात्र झाला नाही पाहिजे.

पुरुष - पण कां म्हणून ? कशासाठी ठरवलीय शिक्षा.

रक्षक-१ - कदाचित असंही असेल. तुझ्यासारखे तरुण राजकन्येबरोबर भलतंसलतं काही करत असतील होय नां रे.

रक्षक-२ हो, चल रे आपणाला ह्याच्याशी हुज्जत घालायला वेळ कुठंय. ऐ, आता आपले प्राण जपण्याचा तू व्यर्थ प्रयत्न करू नकोस. सामोरा ये. इथून तुझी सुटका करणे कुणालाही शक्य नाही. तुला अन् प्रत्यक्ष मलाही. आमच्या दृष्टीने फक्त एवढाच क्षण जिवंत आहे.

पुरुष - नाही, नाही मला वाचवा. मला वाचवा. इतक्यात मरायचं नाहीये मला. नको-नको मला मारू नका. (रडण्याचा स्वर) मारू नका. (तेवढ्यात एक रक्षक आपली हातातील तलवार वर उचलतो. अन् सप्पकन् त्याच्या छातीवर वार करीत असतानाच रंगमंचावर काळोख होतो. पुरुषांच्या ओरडण्याचा आवाज फक्त उमटतो. पुनः काही वेळातच प्रकाश. कमलेश्वर जागा झालेला आहे. त्याच्या चेहऱ्यावर भय दिसत आहे. चेहरा भयाने ओला चिंब झालेला आहे.) ■ ■

(टीप - एकांकिकेचा प्रयोग करण्यापूर्वी लेखकाची अनुमती घेणे आवश्यक.)

सुनील साळुंके
७०१/६ कसबा, साळुंकेवाडा, शिंदे चौक, सोलापूर ७



अनुक्रमणिका

हाकारे पावश्या

हाकारे पावश्या
'पाव्सा गो' असा
झाडांत आडोसा
        शोधोनियां
रात्रभर असा
सतत ओरडे
मला मात्र कोडे
        पडलेले
ऐकली कहाणी
होती एक कुणी
सासुरवाशिणी
        पूर्वजन्मीं
भरलेले घर
गुरावासरांनी
भरायची पाणी
        रात्रंदिस
न मिळे उसंत
ना सासर-माहेर
सदाची घागर
        भरीतसे
एकदां दुष्टावा
आला तिच्या मनीं
पिऊ नये पाणी
        गोरवांनी
कालविले शेण
पाण्यांत तियेने
गुरांनी टाळलें
        पाणी पिणें
तेव्हांपासोनियां
शापिलें देवांनी -
"पाखरांची योनी
        लाभो तुला-
सारखी तहान
लागेल गा तुला
जरी मृग आला
        पृथ्वीवरी
पावसाला साद
घालित राहसी
अखंड ऋतूशी
        नाही जोड.....

वसंत सावंत
सावंतवाडी-४१६५१०

संवाद

इलेक्ट्रिकच्या तारेपर्यंत उतरलेल्या ढगानं
तारेवरच्या पक्ष्याला विचारलं,
'असा एकटाच?'
पक्ष्यानं ढगाकडे नुसतं पाहिलं.

पक्ष्याच्या डोळ्यांत दाटत गेला
आभाळापासून दुरावलेला ढग
आणि ढगाच्या नजरेत
तारेवरचा एकटा पक्षी....

■ ■

निरोप

ह्या शहरावर लटकलेल्या
कोरड्या ढगांचं सावट
तुझ्या-माझ्या तरसून थकलेल्या
पापण्यांना आता असह्य झालंय्.

आपण शोधीत असलेल्या घराची
पुसटशी छाया देखील दिसत नाही
ह्या हुकुमती प्रासादांच्या
आणि लक्तरलेल्या फुटपाथांच्या शहरात.

तर प्रिये,
आंता मला निरोप दे.

मी नक्कीच परत येईन,
ह्या उध्वस्त वहरांचे निःश्वास
दूरवर पालवलेल्या रानांच्या कुशीत ठेवून,
मी नक्कीच परत येईन म्हणतो -

निरंजन उजगरे
सी ९/१, वीणा नगर, शास्त्री मार्ग, मुलुंड (प.)
मुंबई ४०० ०८०

ईश्वर

पोरांना शाळेत सोडल्यावर भल्यापहाटे
ईश्वरालाही पोहचवावे लागते मला
शहरापासून दूर
रानावनात, डोंगरदऱ्यात

गाईगुरे सोबत करतात वन्यप्राणीही
झरे, झाडे, पक्षी गाते वनराई

पोरांबरोवर ईश्वराला
जाणूनबुजून शाळेत घातले नाही

ईश्वराला वाचता येत नाहीत वृत्तपत्रे
अथवा ललित पुस्तके
इतिहासाला ठेवलंय त्याच्यापासून चार हात
दूर
रेडिओ टिव्ही तर तो चुकून ऐकत पाहत नाही
राजकारणातलं क म्हणता ढ त्याला कळत
नाही
(माझ्या पदवीतून झिरपणारे कोंडमारे पाहून
ईश्वराचे भरून येतात डोळे)

हा सगळा जन्म गेलाय वाया हे आता कळतेय
देवकीच्या पुत्रांवरोवर मीही मारला गेलो
'असतो .
तर किती बरे झाले असते?

नीळकंठ महाजन
१९/१, गाणं, शिव कॉलनी,
जळगाव-४२५००२

स्वस्तिक

पेरील पेरील म्हणालो
माझ्या जमिनीत,
सोन्याचं, नवसाचं-
पीक काढील म्हणालो,
पण नवसाचं सोडून-
जवसाचंही पीक काढू शकलो नाही.

दरम्यान जमिनीला
बांध्यानं, कुंध्यानं-
जखडून टाकलं.
बोरी-बाभळीचं
बेरकी बेशरमाचं
जंगल वाढलं.
तण-तणकटही
दणकट झालं.
आणि माझ्याच मातीत उगवून-
हे परदेशी बेणं,
माझ्यावरच डोळं वटारू लागलं,
भूमी काय किंवा भाषा काय-
कुणाची मिरास नाही म्हणू लागलं

आता तर पाऊलही-
ठेवता येणार नाही,
असं दिसतं!
खरंच मातृभूमी,
आता हे कर्मदरिद्री पाय
तुझ्यावर मी ठेवणार नाही,
दुरूनच तुला मी अभिवादन करतो.

तुझ्या कणावरही
माझा अधिकार नाही
पण चिमूटभर माती-
उचलून तुझी-
कपाळाला लावतो.

- २ -
पोटासाठी तुला सोडून,

अनुक्रमणिका

आडरानात भटकत राहिलो,
कळकट दगडांनाही
बळकट म्हणालो,
नावाजून, शेंदूर फासून-
त्यांना देत म्हणालो.
वाणीचं पाणी केलं.
घामाचं धाम केलं
पण खरंच सांगतो माते,
तुला दूर सारून-
वाऱ्यावर वार केले,
चिल्लर चिल्हारीवर वार केले.
वांझोट्या वाळवंटात-
नुसते नुसते-
एरंड वाढविले.

\- ३ -

पांढरीतून काळे केले,
काळीला उघडे टाकले,
सरळला करळ म्हणणाऱ्यांच्या
दुनियेत पाऊल ठेवले.
पिठाच्या-मिठाच्या
काळजीनं मेलो,
नये त्याच्या
दारात गेलो,
कागदी घोड्यांनी बिथरलो.

खरच माऊली,
तुला विसरून-
चाकरीत-
भाकरीच्या भीतीनं
विचारांना गाडून-
मूर्खांच्या राज्यात वावरलो.

\- ४ -

कधी कुणाला
आपलं वा तुपलं-
म्हटलं नाही,
भाव हमीचा असताना
जातीच्या बाजारात बसलो नाही.
पण कोणत्याही किनाऱ्यावर
लागलं नाही गलबत,
अलबत !
धारेत सापडूनही
स्वतःला सत्त्वापासून
ढळू दिलं नाही.
तरतमाच्या ताणलेल्या तारेवर-
नाचावं लागलं,
खडकावर आदळून
फुटू आलं गलवतं-
पण मुठीतलं बीज
सुटू दिलं नाही.

\- ५ -

तूच पेरलंस ना-
त्या सत्त्वशील पेशींचं,
स्वस्तिक माझ्या हाडामासात ?
मग सांग माते,
हे पराभव -
तुला सांगू नको तर
कुणाला सांगू ?
आता तूच एकटी उरलीस-
दाही दिशा फिरून झाल्यावर.
कोणत्या अनामिक नक्षत्राची
वाट पाहत बसलीस,
तमाम ढग पळून गेल्यावर ?

\- ६

तूच प्राण फुंकलेले
पंख लावून
गावोगाव फिरलो
नाथांच्या नगरीत
रांजण आटलेले दिसले,
गाथांचे सुवर्णकण
रस्त्यातून वाहताना दिसले
माणसालाच बाद-बरबाद करणारा
धर्म पाहिला
कंद-हारचा काबुली

तावूत पाहिला,
पिंडीखाली-
इंगळ्या-वृश्चिकांचा-
वेलविस्तार पाहिला.

माते गोदे,
तुझ्या काठा-काठानं फिरून,
तुझ्या काठावर बसून,
तुझा पूर.
आणि माझ्या चितेचा
तुझ्या काठावर-
धूर पाहिला.

भवगंत क्षीरसागर
भाग्यनगर, नांदेड ४३१६०२

शाप

कुठल्या जन्माचा
भोगतो हा शाप ?
कुणी मायबाप / नाही माझा

सोबती जिवाचे
दूर दूर गेले
वात्सल्य उरले / अक्षरांचे

काय मी कुणाची
ठोठवू कवाडे ?
रोजचे उमाळे / भिकाऱ्याचे

आता या झोळीचे
पेलवेना ओझे
जिणे मला माझे / जड झाले

बबन सराडकर

पाऊस आला पाऊस आला

पाऊस आला
पाऊस आला
डाफरत खडसावत
पाऊस आला....

झाडांना
झोंबाडत झंझाडत
पाखरांना
चिडीचिप खबरदार करीत
पाऊस आला....

गल्ली बोळातील
उनाड पोरांना
दाटत धमकावत
(सर्दी झाली म्हणजे मग
बसाल बोंबलत)
त्यांच्या आयांना जतावत
पाऊस आला....

कधी कधी पावसाचाही
(माणसांसारखाच)
भडकतो पारा
पाहात नाही आराधुरा
बेमुर्वत हाणतो
घरांच्या मुस्काटीत
तेव्हा कौलारू पापण्यांना
दरदरून फुटतात धारा....

असा उसांडत फुसांडत
पाऊस आला
प्रपातांच्या पताका फडकावत
पाऊस आला....

पाऊस आला
फासफाळांना धारेवर धरीत
बैलांना आयाळ जुंपीत
खोंड वशिंड हलकारत
पाऊस आला....

रानामनातून
हिंदोळत आंदोळत
नदी ओढ्यातून
हल्लोळत कल्लोळत
पाऊस आला.....

पाऊस आला
ओटीतील दाण्यांचा
हाकारा करीत
हिरवेवंबाळ होईस्तो
मातीच्या मणक्यांना ठोकत
पाऊस आला...

पाऊस आला...
पाऊस आला...
डाफरत खडसावत
पाऊस आला....

सुखदेव ढाणके
आ. म. वि., धामणगाव रेल्वे
जि. अमरावती

कविता
आभाळ खचलेल्या भिंतीची

कुठलाहि
स्वप्न आधार प्रवासाची साथ देईल असे नाही.
आपलाच जन्म
स्वतःसाठी गहाण ठेवावा इतकेही व्याज नाही.
कुणाकुणासाठी गहाण व्हावे.
पत्नी-एक आयुष्य तिच्यासाठी गहाण,
लग्नापूर्वीची अवस्था,
प्रेयसीसाठी गहाण.
वापासाठी कर्तव्य-त्यागाच्या नावाखाली
गहाण
माय प्रेम देणारी आधार
म्हणून जन्मभर गहाण
कुणाकुणासाठी गहाण व्हावं.
यासाठी जन्माच्या फेऱ्या
त्यांनी जन्म दिला.
म्हणून गहाण
माझ्या जन्माची कथा
पैदा व्हावं
म्हणून नवस झालेत. देवाच्या वाऱ्या झाल्यात.
मी वंशाचा दिवा. जन्मलो.
तेव्हा बापानं व्याजानं पैसे काढले
गहाण ठेऊन झालेला माझा जन्म
माझ्याच पिढ्यांचा इतिहास असा.
गहाण झालेलं आयुष्य
गहाण ठेवण्यासाठी झालेला जन्म
मी कुठपर्यंत सोसू ?
हा गहाण आयुष्याचा लिलाव माझा.
मी आत्ता दुःख सागराचा एक स्वतःचा
दुःखभोग
मी कुणाला लुटु शकत नाही
किंवा कुणाला लुटता येऊ शकत नाही.

माझा जन्मच गहाणगाऱ्हाणं.
सकाळी दुःखाचा लेप लावून संध्याकाळी पुसत
जाणारा.

मी आता थकलो.
मी आता रुतलो.
मी आता थांबलो.
ही माझ्या अवस्थेची चित्रणे एकदा तुम्ही
समजुन घ्यावी.
गहाणीत जन्मलेला माझा वंश, त्याने
कुणालाही गहाण रहावं..
याची एक यादी घ्यावी.
तो वापासाठी गहाण राहू शकेल काय ?
त्याला आईचे प्रेम मिळाले नाही. म्हणून त्यांनी
गहाण रहाव काय ?

माझा वंशज कसाही असेल.

तो मात्र माय-वाप ठेवेल गहाण
त्याचा जन्म त्याच्या साठी वजावाकी करीत
गहाण राहिलेला
त्याचे दुःख
त्याचे सुख
त्याच्या पावलातील संघर्षाचे घुंगरु राहतील.
कदाचित
तो ही व्यवस्था गहाण ठेवील?
त्यांच काहीच सांगता येत नाही.
त्याचा जन्म त्याच्यासाठी मृत्युही ठरेल
कारण,
जखमांशी खेळणे त्याचा गुन्हा नाही.
हा कायदा असेल किंवा नसेल.
काहीच सांगता येत नाही. कारण.
दुःख ही त्यांनी स्वतःला
लावून घेतलेली एक खाज आहे.

उल्हास मनोहर
प्लॉट नं. २९८, गांधीनगर, नागपूर

अपरात्र

बेभान होऊन महिरपीत झोपलेली ती
आणि तिच्या उष्ण श्वासांच्या भाल्यांनी
डिवचलेला मी,
हळूच बाहेर आलो जखमी होऊन
दवचिंब काळोखाच्या शांततेत गुरफटलेला
निर्मम रस्ता - कात टाकल्यासारखा
क्षितीज कडेला मंदपणे लुकलुकणारा
तारा सुद्धा गारठून गेलाय्.
वळ्यात दूरवरून आले जात्याच्या
घरघरीत वेढलेले ओवींचे हळूवार कातर
सूर, माझ्या जखमांना कुरवाळीत
ती तर केव्हाची माझ्या मागे येऊन उभी!
म्हणाली - 'का उठलात एवढ्या अपरात्री?'
'अपरात्र? छे! - केव्हाच
येऊन ठेपलीय् पहाट गावशिवेवर -
ओवी बंद होण्याची वाट पहात' -
- मी नकळत बोलून गेलो.

नीलकृष्ण देशपांडे
मु. पो. पोहंडुळ, ता. पुसद, जि. यवतमाळ

डोळे

डोळे आपलेच असतात
म्हणून माणसाने आधाशीपणाने
सगळेच कांही
पाहू नये
डोळ्यात येवू देऊ नये
कधीही मनातले
आणि मनाला काय?
ते डोळ्यासारखे
मिटून टाकावे एकदम.....

■ ■

मूळ

आता मी झालो उन्मळून
पडलेल्या झाडांच्या मुळासारखा
झाड पेलवतही नाही
झाड सोडवतही नाही

शंकर बडे
पेशवे प्लॉट, यवतमाळ

कितीदा

कितीदा तरी वडबडलो
खरेपणाच्या नखऱ्यात
नि डवडवलोही उरन्भरतीच्या खोऱ्यात
आता मात्र गोंधळलो आहे पुरता
उधळलो जरी नावापुरता

उंबरठ्यावर उलथलेले
वटवाघुळाचे हे प्रचंड धूड
धड दूरही येत नाही सारता
नि जवळही करवत नाही
दिवसांनी दिवस मोजावे
नि रात्रीने रात्र सजवावी
अशी ही बकाल निर्मनुष्यता,
वारा थांबला तरी पदर फडफडतच रहावा
तारा उगवला तरी
काळोख चढतच जावा....

हरताळ फासलेल्या
पांढऱ्या फट्ट अंतराळाला
इंद्र नी मण्यांचा वर्ख फासून
सांकेतिक निर्झरांच्या तळतळाटात
पाखरांच्या शिखर-परिषदांच्या
हा खळखळाट
आता कुठवर खेचत न्यावा
तात्पुरतेपणाचा हा सोस
कुठवर पोसावा
कुणा नावाड्यांच्या नावाकरता
आणि कुठल्या नावांकरिता

बाळकृष्ण बन्नोरे

८१, शंकर नगर, नागपूर-१०

प्रश्न

गळालेल्या पारिजाताचा मी धनी
ज्यावर आता झाडाचा हक्क उरलेला नाहीय
ती फुले मी आता कस्तुरीमृगाच्या शिरी
खोवून
सुरक्षित ठेवलेली आहेत

गंधवेलीवर साप वस्तीला येतात म्हणे
म्हणून कदाचित तू दचकशीलही
पण गंधवेध घेत उधळणाऱ्या मृगापासून
वेलींनी एवढे सावध असण्याचा प्रश्न यांत
येतोच कुठे?

देवानंद गोरडे

जैन मंदिराजवळ, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

बाबासाहेब काही टिपणे

(१) तुम्ही एकच बोट उंचावलंत
आणि क्षणात कोसळून पडले
प्रकाशाच्या टाक्यांचे वारसदार
टाक्यांसहित....
तुमचा संपूर्ण देह जागला तेव्हा
सूर्य तुमच्या पायाशी येवून पडला....

(२) चौकातून जाणारा फाटका
हातगाडीवाला
प्रथम तुमच्याकडं नजर टाकतो
- त्याच्या पायाला आपोआप चाकं
फुटतात....

(३) मला तुमच्या डोळ्यांवरचा चष्मा
व्हायचंय
आणि पाह्यचेत ते डोळे
ज्यात आहे दलित आक्रोशांना
समजून घेणारी कारुण्यता
आणि आकाश हलवून सोडणारा
कटाक्ष.....

(४) तुमच्या चवुतऱ्यापाशी आम्ही
जोरजोरात गप्पा मारतो चळवळीविषयी
वगैरे...
पण शेवटी सगळं फोल वाटतं
खरं तर तुमचे पाय
आमच्या खांद्यावर असायला हवेत,
चवुतरा म्हणून...

(५) तुम्हाला गरजच नाही
हातात हे पुस्तक घेण्याची

तुम्ही स्वतःच आहात
जगातल्या सगळ्या ग्रंथांचा संदर्भग्रंथ !

अंजूम मोमीन
६१. भूषणनगर-२, वांगी रस्ता,
सोलापूर ४१३ ००४

गाव काही टिपणे

झाडांच्या डोळ्यांतून वगळला जातो गाव
पाखरांच्या चोचीतून गळून पडतं गाणं
अशावेळी रस्त्यांवर फसफसणाऱ्या
डांबराखाली
दावली जाते आसक्ती उद्याची आणि
शक्यतांच्या काळ्या सावल्या
धुमसत राहतातं रात्रभर रस्त्यांच्या
कडेकडेला.

मध्यरात्री जाग येते तेव्हा
आक्रोशांत झोपलेला असतो गांव.
झाडं झाडांना देत असतात संयमाचे पाठ
गांवमाथ्यावर शोकांच्या भडाग्नीत उडी घेतो
गांवातील पारंपारिक वारसा
पारावर कण्हत असतात गावाच्या योजना
सवंध गावाला आपला अजस्त्र विळखा घालून
उभा असतो गावाचा रक्षणकर्ता
तरी ही रात्रीचे गहिरेपण
अधिकच गडद होत जातं गावाच्या छातीवर.

कॉलनीतील नखरेल मोहिनी
सांडत जाते हास्य कॉलनीतल्या घराघरांवर
गल्लीतल्या कोवळ्या रोपट्यांच्या डोळ्यात
भरत जाते चांदण्यांचा शीतल प्रकाश.
तिच्या पावलांच्या मंद आवाजाने ही
पाखरं बिथरतात. आपल्या पंखातील
अवसानाशिवाय अस्मान गाठतात
पडतात.... कोलमडतात....
मोहिनी सांडतच जाते हास्य कॉलनीतल्या
घरांघरांवर.

ऐन दुपारी -
रस्त्यांवरून जात असतो जत्था माणसांचा
घोषणांचा आणि मागण्यांचा
भडिमार सहन करीत
उभी असतात बिचारी झाडं
रस्त्यांच्या कडेला.
माणसांच्या जगण्याच्या उर्मितील संघर्ष
पहावत नाही पाखरांना -
म्हणून ती ही बिचारी दिवसा
शहरापासून गेलेली असतात लांब.....

अशोक कोतवाल
खान्देश मील कॉलनी, प्लॉट नं. १८-ब,
जळगाव-४२५ ००१

१.

पाऊसगाणी चोचीत घेऊन
पाखरं
तुझ्या बागेतल्या झाडावर बसली
तेव्हा तू
बागेला काटेरी कुंपण घातलंस,
कौलावरून सरकणारे ढग
काटेरी कुंपणानं अडवता येत नसतात,
बाहेरच्या झंझावाती तुफानापेक्षा
श्वासातला वारा अधिक तीव्र असतो,
मातीची स्पंदनं आभाळाला भिडली की
आभाळ
आभाळपण विसरून ओघळतं,
तुझ्या रोजनिशीतल्या आजच्या पानावर
तू
पावसाची नोंद करशील
पण
पाखरांच्या बंदीवासाचं काय- ?

२.

असह्य आनंद
स्पर्शातून जाणवणारा
दृष्यतेच्या अगदी आतील पडद्यावर
उमटणारा
शब्दांकित करायचा नसतो,
एक अनिर्वंध भावना
एवढंच त्याचं स्वरूप असू दे
नातं म्हणून त्याला
मर्यादेचं आवरण घालायचं नसतं,
तुझ्या कुंडीतल्या कलमावर
कितीही गुलाब फुलले तरी
रस्त्याच्या कडेला वाढलेला
वेडावाकडा पिंपळच
येणाऱ्या जाणाऱ्याला सावली देतो
आभाळाला
कधीच लांबी रूंदी नसते -

सुधाकर नेर्लेकर

१०२, रास्ता पेठ, इस्त्राईल गल्ली, पुणे ४११ ०११

संदर्भ जुने नवे

तुझ्या विस्तीर्ण भालप्रदेशावर
आपलीशी वाटणारी एक लाल चंद्रकोर
किती खुलून दिसते नाही ?
तू हसतेस मधाचं बोट लावलेल्या
ओठांमधून,
अंऽ हऽ हसणं कसलं ग !
ते तर नदीच्या सौम्य प्रवाहाचं झुळझुळणं
हो, अगदी जीवन प्रवाहाचं झुळझुळणं की ग !
तुझ्या गालावर उमलणारी इवलीशी खळी
नाही ग ! खळी कसली अमृत कुपीचं की !
तुझं स्मित म्हणजे शीतल चांदणं पावसाचं
त्या चांदणपावसात भिजून आम्ही बघ बघ
बघावं.
डोळे दुखेस्तोवर,
पण तुझा निमिषार्धी कटाक्ष
सारं जग भूलवून टाकणारा
अन् मग तुझं तरंगत जाऊन हलकेच
दार बंद करणं
हे तर अगदी काळजात सेरिपी खुपसल्यागत
व्हायचं.
मग मी माझ्या दहावाय दहाच्या
रूममध्ये येऊन, तुझा चंदनसुगंध
असलेला देह आठवू लागायचो.
पण का कोण जाणे
मला वेगळच काही आठवायचं.
तुझा विस्तीर्ण भालप्रदेश
खडकाळ वाटायचा,
तुझ्या टिकलीचे रंग बदलायचे
कधी काळा कधी पाढरा
तर कधी बटबटीत पिवळा.
तुझं सिंथेसायझरी किणकिणनं, सौम्य
फेसाळणं
रौद्र व्हायचं मोवाडच्या पुरासारखं.
तुझी ब्लेंडेड व्हिस्कीने ओथंबलेली खळी
आठवायला गेलो ना की खांडातील
खोबळ्याच आठवायच्या
तुझ्या आईस्क्रिमी ओठांवरच स्मित बघून
मलाही स्फुरायला लागलं होतं
मॉडर्न शाकुंतल
पण तव्यावर हसणारी भाकरी जास्त मोहक
वाटली म्हणून तिचंच गीत गातोय.
तुझा लेझर बीमसारखा कटाक्ष
एखाद्या बॉंबस्फोटातील कुट कारस्थान्याने
केलेला शेवटचा इशारा वाटतो
"उडादो सालो को"
तुझं मॉडेल सारखं तरंगत जाऊन
हलकेच अदृश्य होणं
या पृथ्वीवरील मानव्याची व नितळ
प्रेमाची भिक मागणाऱ्या तमाम भिकाऱ्यांना

लाथाडून एअर कंडीशंडमध्ये
जाण्यासारखं वाटतं ग!

विनोद देशमुख
केशव नगर, वॉर्ड-१७, बुलडाणा-४४३ ००१

आरंभ

त्वचेच्या भाषेत
जे मी बोलायला लागलो
आणि मनाच्या लिपीत
लिहायला शिकलो
आहे आरंभच पुन्हा माझा
कुठे कुठेच कसाही नसण्याचा.

मला नकळत
आघात अपघाताशिवाय
जे झिरपायला लागले माझ्यात
किंवा माझ्यातून
स्त्रवायला लागले वारंवार
घामासारखे
आहे आरंभच पुन्हा माझा
माझ्यातून वेगळा.

मी काही काही करू पाहतो
काहीवाही स्वतःला
इथेतिथे विनाकारण धरू पाहतो
नास्तित्वालाच मुळासकट
पृष्ठभागावर आणत राहतो
आहे आरंभच पुन्हा माझा
प्रतिबिंबपार

हेमकिरण दत्तात्रय पत्की
' प्रतिभा ', ब्लॉक नं. १७, लक्ष्मी विष्णू सोसायटी
कुमठा नाका, सोलापूर ३.

भास!

जन्मोजन्मीची ओळख देऊनही
अनोळखी करूनच
परतवितेस
प्रत्येक वेळी तू मला!
रुप,
स्त्रीत्व,
पूर्णत्व
कसचा आलाय हा गर्व?

एरवी मी तर
अस्तित्वहीनच असतो
तुझ्या लेखी
सूर्यातील
सूर्यफुलाच्या प्रतिबिंबासारखा....
तथापि
तुझ्या डोळ्यात
आयुष्य
सुखात कंठीत असल्याचा
भास मात्र
अमर होऊन बसलाय
कधीचाच.

■ ■

शब्द!

जगणारा
माणूस नसतो.
असते एक कथा
जी मानवी शरीरात
धुमसत असते
त्याअर्थी
आपल्या जीवनाला
एखादं कथेचं पुस्तकच
म्हणायला हवं

आता पुस्तक म्हटलं
की आली ना गोष्ट
शब्दांवरच!
शब्द,
ज्यांना चेहरा नसतो
पण भाव असतात.
शब्द,
ज्यांना मन नसतं
पण स्वप्नं असतात.
शब्द,
ज्यांना वाट नसते,
पण प्रवास असतो.
शब्द,
सृष्टीच्या अणूरेणूंना
जन्म देणाऱ्या
एखाद्या
निरुद्देश्य
निर्भेळ सत्यासारखे!

शंकर विटणकर
प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षक संस्था, गडचिरोली

एखाद्या सोनचाफी उत्कट वासाच्या फुलांचा
न राहवून कडकडून चावा घ्यावा
तशी ही वैरी संध्याकाळ गंधांचा पसारा मांडून
झडझडून आठवणी सांडणारी.....!
भावविश्वातल्या संवेदनांचा घटनाक्रम
मनामध्ये गोंधळ घालीत तडतडावा
तशी सगळी नातीगोती नाचत रहावी!
आता सगळी जंगलं पालथी घालताना
कुठल्या पावसाच्या सरीवर भरवसा ठेवून
झुडुपं अवलंबून ठेवायची?
असेच वाटेवाटेने जाताना
एकदोन टप्प्यांवर थांबून
एखाद्या कडकडीत तिन्ही सांजेचा रंगीत ढग
सोबत घ्यावा......
झडझडून आठवणी सांगणारा एखादा थवाही
मग
बरोबर यावा....!

वासंती दनामदार जोशी
ॐगणेश गडकरी हौसिंग सोसायटी, २९/२, फ, सर्किट हाऊसनजीक, ताराबाई पार्क, कोल्हापूर

आकाक्षांची होळी

देहात जळते
आकाक्षांची होळी
आयुष्याची मोळी
चितेवरी

सुन्या देहवाटा
पावलांचे ठसे
अनोळखी भासे
माळरानी

देह व्यथा चिंब
मनात पोकळी
अंधाराची कळी
उमलली

देह दावणीला
हंवरणे मनाचे
वासरू दुःखाचे
तळमळे

मुबारक शेख
सोलापूर-४१३००७

फुलांच्या कविता

१.
फुलांना निर्घृणपणा कळत नाही
खुडून घेतल्यावरही
ती हसतच असतात
उद्याची गोष्ट करून
पुन्हा भेटण्याची हमी देतात.

२.
फुलांची स्वप्नं पडली तर
मोहरून आल्यागत वाटतं
आपलीही स्वप्नं
फुलांना पडत असतील काय?
फुल डुलतय....

३.
फुलं खोटं कधी बोलत नाहीत
तसं वाटलं तरी
ते आपला गंध सोडत नाहीत.

४.
फुलं सुखदुःखाची जीवंत प्रतीक
काटे असूनही
ते कधीच नसतात
आपल्यासारखे अगतिक

५.
आठवणीसाठी
पुस्तकांत ठेवलेली फुले
काही दिवसांनी वाळून गेलेली असतात
पण आठवणीत मात्र
ती तशी टवटवीतच असतात.

६.
फुलांना अखेरची इच्छा विचारली तर
ते मागतील तुमचे हात.
आणि गळून पडतील मग
अलगद ओंजळीत.

७.
तू फुलांना पाहून हसलीस
की फुलं तुला पाहून हसलीत
मी गोंधळात पडलोय
तुम्हा दोघांचेही हसणं
मला सारखंच वाटतय.

नीळकंठ घोडे
२४९/१, अशोकनगर, नागपूर-१७

अर्धोन्मिलीत

झाड
पानं अंगभर पांघरून
स्तब्ध उभे
तू
मला अलगद पांघरून
कुशीत विसावलेली....

झाड
फांदी-फांदीत अडकलेले
आडवे तिडवे
तुझी बोटे
माझ्या बोटात गुंफलेली
पंचप्राणांसारखी....

झाड
फांदी फांदीवर मोहरलेले
फुललेले
तू
गात्रोगात्री वहरून आलेली
अर्धोन्मिलीत....

बाळ राणे
बी-३, विमान दर्शन,
मगन नथुराम मार्ग, कुर्ला, मुंबई-४०० ०७०

आदम आणि इव्ह

मी
येईपर्यंत
तू
येथले शिल्प कोरून ठेव
जरा जपूनच
आल्यानंतर मात्र
तुझे रक्ताळलेले वोट
मला दाखवू नकोस
येथल्या मातीशी
असंवद्ध
मी
जगाच्या प्रवासाला निघालेला
प्रत्येक तिर्थावरील
दोन थेंव
कमंडलूत भरून घेतो
सर्व दिशा भोगल्यावर
परतीच्या प्रवासातील
अखेरच्या
शिळेवर
आदम इव्हला
पाणी पाजतांना
विस्फारित नजरेने पाहतो
लगवगीने घरी परततो,
तो
घराचे दार वंद असलेले -
मला उशीर झालेला पाहून
तिही प्रवासाला निघालेली
अखेरची
शिळा
डोळाभर झालेली.

रेषा आकोटकर

तू

तू अमृता प्रितमचा संदर्भ देऊन
आयुष्याचे मोजमाप करण्याचा प्रयत्न केला
अनेक आयामी जगणे मान्य नसले
की, असेच होते वघ.
मनुष्यावे जगणे म्हणजे काय !
परिपूर्ण जीवन म्हणजे तरी काय !
मग अपूर्ण म्हणजे.....
असाही असू शकतो संदर्भ.
संदर्भाचे अर्थ
मनाची खोली
सेंटिमेंटल अटॅचमेंट
किंवहुना आयुष्यच
निर्जीव वाटू लागत
अशावेळी
सर्व काही खरही
खोट वाटू लागतं

प्रभु राजगडकर
पंचायत समिती निवासस्थान, वरोरा ४४२९०७

हरकत

मृत्युपत्रातील अनुभवी अक्षरासारखं आयुष्यं
आत्मचरित्राचा विषय व्हावे
असे त्यातील चढउतार
हलुच आपण करावा
आपल्या आशावादी जीवनाचा पुनर्विचार
अन् आता- (?)
आता सुखदुःख हे इतरांच्या करमणुकीचे
विषय
करिता-आपण अनुभवलेलं जीवन आठवत
जावं
कुणाला काही सांगूच नये, कारणं - (?)
'आपले' अनुभवी डोळे अन् 'त्यांची'
वास्तववादी दृष्टी

एकाच रेपेतून धावत असतील, कशावरून ?
म्हणून कोणाला काही सांगून
दुःखात भर पाडून घेण्यापेक्षा
पूर्वीच - आपण आपल्या दुःखाचे मूळ
जीवनरूपी भूमीतून उपटण्यास काय हरकत ?

श्रीकांत गोंधळेकर
कोल्हटकर बंगला, कोल्हटकर वाडी,
वाशीम, जि. अकोला ४४४ ५०५

अस्तित्वबिंब

गाण्यात एकटे रडते
टिंवात जागते झाड
अस्तित्वहीन मी जगतो
पाण्यात पेटते आग

मी चाखता फुलांचा
मकरंदही गळावा
पिवळ्यास जाग येता
हिरवा गळून जावा

हा भेटला कुणी मज
ताऱ्यांस बोलताना ?
अंधार का फुलांचा
आकाश फाटताना ?

रक्तातल्या दिव्यांना
ते हुंगतील सारे
राखेतल्या घरांना
ते पाडतील सारे

शतके मुकाट झाली
आयुष्य पेंगताना
माझ्या मुठीत स्त्रवतो
हा थंडगार वारा

आता पहाट होता
होईल शिल्प जागे
उधळित शाप झाले
अस्तित्वबिंब माझे

दीपक बोरगावे
अ. आ. कॉलेज, (इंग्रजी विभाग)
मंचर, जि. पुणे ४१० ५०३

एका झाडाचे दुःख

मग असेच होत गेले
वर्षानुवर्षापासूनचे एक झाड
एकाच जागी स्तब्ध
ऊन, वारा, पाऊस अन् वादळांचे घाव
सोसून सोसून झाड झाले केव्हाचेच
निष्पर्ण
जसा ऐन यौवनातच देह व्हावा जीर्ण
आता झाड हलत नाही डोलत नाही
निसर्गासोबत बोलत नाही
झाडांची दुःख फक्त झाडेच जाणतात
अंधारात पाखरांची दुःखे पांघरतात
अलिकडे दुसरी काही झाडे
त्या झाडाबद्दल खेदाने सांगतात
त्याला कित्येक वर्षापासून फुटल्या
नाहीत फांद्या
किंवा बहरून आला नाही बहर
यार, कोणत्या विध्वंसकाने घातले
असावे जहर ?

लक्ष्मीकांत घुमे
द्वारा स्क्रीन पॉईंट, विदर्भ हौसिंग बोर्ड कॉलनी,
गोधनी रोड, यवतमाळ ४४५००१

आनंदप्रभा

देवळाबाहेर मी निश्चिंत बसलेला
मला ती आवाज देऊन, काही खाणाखुणा
करून,

बोलावते आहे गाभाऱ्यात
कंटाळून मी उठलो जागचा
करवादून म्हणालो
  परवडणार नाही, माझं बीजारोपण तुला
होशील वेडी, तू ही माझ्यासारखीच
नी क्षमिष्ट अवस्थेतील पुत्र तरी कसा असेल ?
तिला पटलं नाही.
मी बीजारोपण केलं तेव्हा ती
विलक्षण आनंदली
आकाशभर निळेपण घेऊन
तिची आनंदप्रभा अजूनही विखरून आहे.

मधुकर धाकराव

मु. पो. भाटगाव, ४२३ १०१
ता. चांदवड, जि. नाशिक

तू म्हणतेस

तू म्हणतेस
कवी असतातच वेडे,
फक्त ट-ला-ट लावतात बाकी काय ?
पण तूच सांग
तूच थोडी थांबते, कविता वाचते, गाणी
ऐकतेस, गाणी गातेस
असं का बरे होते तुझेतरी ?
म्हणून म्हणतो,
मनाशी-मनाच्या तारा झंकारल्याशिवाय,
जन्मत नसते कविता,
त्याला भोगाव्या लागतात आयुष्याच्या
प्रसववेदना - एखाद्या मातेसारख्या !
तोच क्षण तुला वाटतोय वेड्यासारखा
पण तो माणसांना मारणारा वेडा नसतो,
मुखवटे घालून दंगली पेटवणारा वेडा नसतो.
बाळाचं दूध विषारी करून विकणारा वेडा
नसतो,
तो असतो -
सुख-दुःखाची पखरण करणारा वेडा
निखळ वाहणारा झरा, श्रावणाची रिमझिम,
तुकयाला अभंग,
-गीतेचा श्लोक, धम्माचा पिसारा !
तो असतो फुलांची गाणी गाणारा गायक,
हळव्या रेशिमगाठी बांधणारा देवदूत !

विष्णू सोळंके

गुदलीयार नगर, अमरावती-६

संध्याकाळ....

हळूहळू संध्याकाळ
दाटून येते....
अन् शहारून अंगभर
लपेटून जाते.....
गंधीत फुलांच्या वासानं
बेभान होत उमलून जात
वाऱ्याच्या झोताशी
विखरून जाते.

घट्ट होत जाणाऱ्या
काळोखात मी मात्र
स्वतःच्या अस्तित्वाचे
कवडसे शोधत राहते
रात्र पांगून जाते,
रात्र पांगून जाते.
    माझ्या भावनांशी
    खेळून जाते....
मी मात्र उरलेल्या
क्षणांसोबत,
ताटकळत,
संध्याकाळच्या प्रतिक्षेत
जगत राहते.

■ ■

हळद

मी तरी वेडी कशी
हळदीच्या ओल्या अंगान

गोरी व्हायला बघतेय.
त्या हळदीचे गोरेपण
नको इतके गर्द व्हायला
लागल नी....
काविळीचे डोहाळे
पदरी पडलेत माझ्या.
विल्लोरी काचांची किणकिण
ऐकण्याऐवजी
टिचलेल्या बांगड्याचे आवाज
माझ्या कानी पडले,
कपाळावरच्या लाल कुंकवाचा
रंग मला गवसलाच नाही...
पण हळदीची जागा
मात्र मी सोडली नाही....

शुभदा मुंजे, 'पारुल',
यवतमाळ

पंधरावी विद्या

कित्येक वर्षापासून
दरसाल पावसाळ्यात
गळताहेत प्राथमिकची कौलारु छपरं
आणि सुटी मिळाल्याच्या आनंदात
हुंदडतात भारताचे भावी आधारस्तंभ.
बारोमास निखळताहेत माध्यमिकच्या विटा
आणि
संस्थाप्रमुखांच्या नव्या बंगल्याचे एकेक वास्तू
साजरे होतात अशा वैभवात की
गरिबाची दहा-बारा लग्ने होतील त्यात सहज.

वहितीखाली असलेल्या
काळ्याभोर शेतजमिनीला
नॉन ॲग्रिकल्चर करवून
त्यातून उगवलेली महाविद्यालये
आभाळात कडाडणाऱ्या वीजरेषेसारखी
होताहेत फ्रँक
आणि
स्वतःचा तोल जात असलेल्या एका बेवड्याने
दुसऱ्या बेवड्याचा तोल सांभाळण्याचा प्रयत्न
करावा,
तसे उच्च शिक्षण सावरते आहे
मनुष्यबळविकास.

विचारवंत सल्ला देत आहेत सरकारला
नव्या शैक्षणिक धोरणात
यापेक्षा वेगळे खाजगीकरण
करण्याची आवश्यकता नाही.

श्रीकृष्ण राऊत
शंकर नगर, जठारपेठ, अकोला ४४४ ००५

चिदानंद

आनंदाच्या कल्पतरुता
चिदानंदाचे वेध
कल्पांताच्या अरण्यातून
पर्णझडीची रेघ

अचरतेच्या भावनेतून
गर्दीचाही नाद
अशात कुठे उसळून यावा
एकांताचा वाद

रानावनातून फिरूनफिरून
इथेच येतो समीर
गंध आणतो प्रकाशांचा
कुठेच नाही तिमीर

■ ■

क्षण, कण, थेंब-

आनंदाचे पांगुळगाडे
गालावरती पांगत थांबत
डोळ्यामधुनी दवबिंदूची
मैफल उठली बसली रांगत

अनुक्रमणिका

लोकांताच्या नादासाठी
एकांताचा ध्वनी मुका
काळाच्या त्या ओघामधला
ओलावाही किती सुका
ढीग श्रमाचे उपसावे अन्
नसे एकही त्यात ठसा
पुढे निघाल्या मागासाठी
गुच्छ करून जो द्यावासा
रेघ नसे वाळूवरूनी
पण वाळु तरी रेघेवरती
क्षणाक्षणाच्या कणाकणाची
डोक्यावर भरली रेती
साठ वर्षींच्या अवकाशातून
स्मृतीमधून जो तो रुतला
त्या रुतलेल्या हातांसाठी
मदतीला जो तो रुसला
मृगजळ प्यावे पाण्याने,
क्षण पाण्याचे.... अश्रु लुळे
क्षणवाफेने गगन भरावें
छपरातुन पागोळि गळे
क्षण वाळूचे कण वाळूचे
एक हरवला क्षण जेथे
सूर हरवल्या वातावरणाशी
वारा करतो इथे तिथे
मादि नसे वालुकाकणाला....
वाळवंट शोधतो कुणाला
क्षण वणवणतो पाणीच पाणी
नराच्याच कोरड्या घशाला
घनित ऋणे झोळीत साठली,
पडत स्मृती छिद्रामधुनी
तहान व्याकुळ वाळवंटि
मग कुठे लपे सामुद्रधुनी

बालम केतकर
४, वीणा अपार्टमेंट, ३/३, एरवंडणे, कर्वे रोड,
पुणे-४ (निर्मल को. सो. जवळ)

स्वप्नांच्या पावलांवर

ती नेहमीचं घराच्या अंग सुटलेल्या
भिंतींचे धुरकटलेले चेहेरे
पोतारून घेत असते अश्रूत पदर भिजवून
अन् घराला सारवतांना दडपून टाकते
त्याचे उसासे स्वतःचे हुंदके दावून.

घराचं घरपण पळविणाऱ्या
श्वापदांची विळं तिनं टाकली आहेत पुरून
पण वळचणीला वळवळणाऱ्या अंधारी
संकटांना ती हाकलू शकली नाही अजून.

विझत चाललेल्या विस्तवासारखं
राखाळत जाणाऱ्या स्वप्नांना
ती वारंवार फुंकर घालते
कोपऱ्यात वाळत चाललेलं तिच्या कोवळ्या
आठवणींचं ओझं तिची वाट पहाते.

ती रानातल्या फाटक्या आयुष्याला
तळहातांची ठिगळं देऊन
जिवंत ठेवू पाहात असते भविष्यकाळ.

पाखरांचे पंख फुलांनी रंगविताना
रक्ताळून काळवंडलेल्या हातांनी ती
आता स्वप्नांना कवेत घेते
अन् ढाळत राहाते अश्रू
मुळं फुटेपर्यंत स्वप्नांच्या पावलांवर.

प्रकाश विठ्ठल किनगांवकर
गुजराथी गल्ली, धरणगांव ४२५ १०५
ता. एरंडेल जि. जळगांव

हिरवेपण हरवलेले आयुष्य

क्षणभंगूर आयुष्यात
मुंगीच्या पावलांनी पुण्य साठवितांना
अलभ्य आकांक्षेची विरागी आंदोलने
उद्‌बोधनाच्या कक्षा ओलांडून
आयुष्याचा प्रस्तर विस्तारित करीत असतात.

पण प्रतारणेचे वारे जेव्हा
अशा शुचिर्भूत आयुष्यावर घोंगावतात
तेव्हा सम्यक स्पंदनाचे झरे विश्रब्ध होतात,
आणि अवघे आयुष्यच होऊन जाते
निश्चल, निःशब्द
हिरवेपण हरवलेल्या झाडासारखे.
अशा झाडावर
सर्व ऋतू मेहेरवान झाले तरी
पक्क्या मडक्याच्या काठासारख्या
पुन्हा न वळता येणाऱ्या आयुष्यात
अनुभवांचे रक्तलांच्छन दुवे जोडतांना
साशंक मनाचे अभोगी सूर
कदाचित्
धुन हरवल्या वादळाचे अंश होतील,
पण झाड हिरवे होईल का?

■ ■

डहुळल्या सायंप्रहरी

एखाद्या डहुळल्या सायंप्रहरी
गदगदून येतात जेव्हा आभासवेळा
तेव्हा दुःखाचा पिकलेला बहरही
ओथंबून येतो
क्षितिजाच्या विश्रांत किनाऱ्याच्या कंठाशी
आणि दाटलेला गळा
विव्हळतो एखादी विराणी.
अशा प्रहरवेळा
मृगतंद्रीच्या आवर्तात
आणखीच गुरफटतात
तेव्हा अतर्क्य दुःखाची स्पंदने
आपली तीव्रता नोंदवित
आकाशभर होतात आणि
तडाडल्या मनाची भेगाळली शकले
सर्वत्र विखुरतात.
केव्हातरी क्वचितच चांदण्याच्या लाटेतून
एखादी गंधगार रात्र झेपावत येते
पण बहुतेक वेळा अशा रात्रीही
भारी हिमशिला होऊन ठेवाळतात
तेव्हा गारठल्या रोमारोमातून
धुक्याचा उत्सव भिरभिरतो
आणि भोगलेले अवघे आयुष्य
त्या प्रहरवेळेच्या सोललेल्या प्रस्तरातून
झिणझिण्यायेईपर्यंत तरंगून जाते.

प्रा. अजय चिकाटे
३५९, कुकडे ले आऊट, नागपूर २७

पुण्यवतीचे हुंकार!

जोहणंच्या पहाटे हसणारा शुक्रतारा
आणि करवत्या थंडीत
उमलू पाहणाऱ्या लाजऱ्या कळ्या
दिठीदिठीला दाटीवाटीने वयात आलेल्या
रानजाई सजनीच्या पुष्पवती कळ्या
त्यांच्या मादक सौंदर्यावर
रोखल्या आहेत नजरा
बंदुकिच्या गोळ्यांसारख्या
आताशा रोजचा अंधार आणि
सूर्यप्रकाशही - नासतो!
उमलत्या कळ्यांचे हुंकार आक्रोश
रान कापत घुमते आभाळावर
मुक यातनांचे पडसाद
कापऱ्या लाटेसारखी
एकेक कळी थरथरते
तिच्या उष्ण अश्रुंनी
थरथरतात पाणलाटा क्षणभर!.
रानशिवारच्या वेलीवाला फुलावर आल्या
काही यौवनभराने वाकल्या
मोक्यामोक्यावर लदबदुन
फुलारल्या-फळावल्या
खोपटातली सानी-तानी-सोनी
पुष्पवती होऊन गोंदु लागल्या स्तनाग्रावर
प्रियाचे हिरवे गोंदण -!

त्यांच्यावर सावली पडली फुलत्या पळसाची
आणि त्यांच्या डोळ्यांचे काजळकाठ
डोहासारखे झाले गारगंभीर दाटीदाट !
गाभुळलेल्या बांबुकोंबासारखे दंडमांड्या
पिवळ्या मोहासारखे रसरसले यौवन
लदबदल्या आवळीसारखा जवानीचा भार
तलावातल्या कमळीसारखा सुकुमार बहाणा
हिरव्या वेलु बनासारखं लाजरं साजरं हसणं
कुठे आणि कसं लपवून ठेवावं ?
हे पिकल्या जांभळीचं बन ?
झरत्या झरण्याचं दुधी सौंदर्य
आणि मस्त लपंडावाच वागणं
कसं थांबवावं हे मुरडणं ?
आताशा - रोज उधळतात चहुदिशेनं घोडे
मातल्या हत्यांचे कळप
करतात हत्या अब्रुची कत्तल
रोजच रडते - माझी पुष्पवती झालेली
सोनी-तानी-सानी
कुठं लपवावं रं बावांनो ? हे पारदर्शी आरसे ?
आमच्या पुष्पवती कळ्यांचे सुकुमार बगीचे ?
इंदरवल्ली-ठाणे-मोरवाळ.... त्याहीपेक्षा
गडचिरोली-तटापल्ली-भामरागड-बिनागुडा
हिरव्या पानोपानी - लालरंग रक्ताचे उमटले
ठसे
इंद्रावती - पामलगौतमीचे पाणीही
लाले - लाल
बाबांनो - सांभाळा रे -
आमच्या सुना लेकी
रानांच्या वेली - ह्या कळ्यांचे हुंकार
ऐकून घ्या रे बावांनो - पुन्हा एकदा रानाचे
कान होवून
पुष्पवतीचे हुंकार !

कु. उषाकिरण आत्राम
जुन्या पाण्याच्या टाकीजवळ, वरोरा ४४२९०७
जि. वरोरा

धुंदी

माझ्या सभोताली
संगिनीचे तण
माझ्यातले रण
गोठलेले।
थकू आले मोर्चे
सर्दावल्या घोषणा
अस्मितेचा फणा
हले व्यर्थ।
पंढांचे हे बंड
झाले फलदायी
सरसावली ग्वाही
गप्पणार।
आंधळ्या आभाळी
चंद्रसूर्य बंदी
काजव्यांना धुंदी
शेपटाची।

■ ■

झाड

वयोवृद्ध खुरटे झाड. त्याचे मोठे लाड
त्याला कौतुकाचे पाणी घालतो केव्हाचा आड
त्या झाडाच्या ढोलीतले घुबड
राघूंचा हेवा करतात
उलट्या टांगल्या वटवाघुळीम्होरं
रानातला मेवा धरतात
रात्र गहन धुसफुसली की,
झाड पाखरांना कानमंत्र देते
क्षितिजाकडा लाल दिसताच
पक्षीमोर्चे आभाळभर होते
त्यांचेच ऋचामंत्र दिशादिशांत
निनादत राहतात
कडे कपारी, डोंगरदऱ्या
ताल तोच धरत राहतात

काही हिरवे कच्चे मिठ्ठू
स्वाऱ्या भराऱ्या समजावून घेतात
घासून पुसून उद्यासाठी
पंखात उड्डाण भरून घेतात
पंखत आभाळ
चोचीत बळ
परि, मुक्काम तळ
खुरटे झाड
असे हे झाड, त्याचे करावे लाड
त्याला जपावे इथूनतिथून जीवापाड, प्राणाआड.

प्रमोद्कुमार अणेराव
जिल्हा परिषद कॉलनी (ग), भंडारा ४४१ ९०४

घनशामल बरसे

घनशामल असे बरसले
मीही शामल झाले झाले
सावळाईत त्या मेघांच्या
अवघी न्हाऊन गेले गेले
घनशामल असे बरसले
अलगद उतरे खाली
देहावरूनी आठवणींची
कितीक फुले ओघळली
घनशामल बरसे जेव्हा
ऐकू येई मज पावा
अशा वेसावधपणातून
अश्रूंच्या सुटती लावा
घनशामल बरसे जेव्हा
हातात विजफुले यावी
आभाळाची नील निळाई
शामलतेने वेढून जावी

सुचित्रा कातरकर
वर्षा-अपार्टमेंट, ६/१, श्रद्धानंदपेठ,
नागपूर-४४० ०१०

वस्ती

दंगलीत इतिहासाच्या
रक्त पावसाचे होते
धीर द्यावयाला तेव्हा
सोवती जिवाचे होते
पंगतीत माझ्यापाशी
दोन आदिवासी आले
ताट एकट्याचे होते
चांदणे फुकाचे होते
ओसरीत अंधाराशी
बोलणार होतो मीही
मागणे जरासे होते
एकले पणाचे होते
या विराट आयुष्याने
सोसलीत दुःखे सारी
कुंचला उन्हाचा होता
चित्र वारियाचे होते
घाम गाळणारी वस्ती
झोपली उपाशी होती
चांदरात हसली होती
प्रेत माणसाचे होते

ताराचंद चव्हाण,
राष्ट्रीय सेवा योजना, गुरुनानक भवन, विद्यापीठ
परिसर, नागपूर-१०

कस्तुरी

देह विझता विझता
आग झाकाळून आली
हिरव्या पापण्यात
रात उभार पेटली

वात पेटली दिव्याची
रात नेसली गारवा
राघू मैनाच्या ओठी
धुंद केतकी मारवा

रात सुरांच्या रागात
रंग रंगाला झोंवला
चांदण्याच्या कैफात
चंद्र भन्नाट नाचला

रात विझली विझली
गर्द शालूत बिजली
निळ्या निळ्या आभाळात
नभा सूर्याची फाकली

चिवचिव पाखरांची
रात पंख फडफडे
ओला आंबाडा वांधूल
रात एकांतात रडे

प्रभाकर के. शेळके
अंत्रड

जातीच्या झाडावर

मी लटकलो जातीच्या झाडावर
बांधले छोटेसे घर
पान दूर जाऊन राहायची
मी झाडाच्या बुडात घरटे कोरण्यासाठी
चोच मारली
वणव्यात एकटे माझेच घर जळाले
मी फिरतो या फांदीवरून त्या फांदीवर
नजर भिडवितो सूर्याशी
लपाछपी खेळतो चंद्राशी
हात पुरवितो चांदण्यांना पकडण्यासाठी
मग एक दिवस ठरवितो
गावाबाहेर कुठेतरी अतिक्रमण करावे
छोटसं घर बांधावे
खूप झेपावलो-आदळलो
आता कुठे माझ्या घरावर नझुल अधिकारी
घरटॅक्स वसुल करण्यासाठी जप्ती आणतात
अन् मी एकेक सामान विकून
पुन्हा एकदा रस्त्यावरून - गावात
गावातून - देशात
अन् देश जातीच्या झाडावर पक्षांशी चर्चा
करीत.

संदेश ढोले
ऊमटरारा (जुना), यवतमाळ ४४५००१

शब्द सापडावेत....पुरेसे

'प्रतिमा' आणि 'प्रतिक'
यांचा प्रवास (किरकोळ) खूऽ ऽ प झालाय!
असं स्वतःलाच ठणकावून
मी माझ्यापासून होतो दूर
पण फसव्या शब्दांचे चकवे
भूल पाडतात
आणि
पावलांना कवितेच्या वाटेवर
देतात ढकलून

ओळीतले एक-दोन शब्द पुढे/मागे करून
मुक्तछंदातलं काव्य प्रसवणारा मी!

'आत्मशोधाच्या वाटेवर एकाकी प्रवासी'
असं म्हणत,
स्वतःची पाठ थोपटून घेतो.
पणं, थोपटणाऱ्या तळहातांना
पाठीवरल्या निवडुंगाचे काटे रुततातच नं!
मग?
तळहात लपवण्याच्या प्रयत्नाला काय म्हणू
मी?
की पाठीवर फुलांचं पांघरूण घालू?
त्यातूनही डोकावलंच निवडुंग, तर?
रेतीत मान खुपसून बसू?
- त्या कुठल्याशा पक्ष्यासारखं.
(करता येईल, असं इतकंच उरलंय.)
कारण.....
अवघ्या आसमंतभर पसरलेल्या
वाळवंटावर

पांघरूण घालायला
जड जातंय.
पण निलाजरे हात
फाटक्या चादरीत वाळवंट लपवीत आहेत.

तळहाताला चिकटलेल्या श्रापासारखी
बोटं माझी,
शब्दांची कोडी घालताहेत
- 'थांबू कां?'

■ ■

गळून पडावेत वस्त्र
देह निर्वस्त्र
देहाचा संग

गळून पडावेत शब्द
कविता निर्वस्त्र
कवितेचा संग

माझ्यात-तिच्यात,
शब्दांत-अव्यक्तात,
तुमच्यात नि ह्या कवितेत,

असा 'सम्भोग'

पुन्हा वस्त्र तिथेच.
शब्द सुद्धा पूर्ववत.
ठिबकणारं दुःख
उरलेला सलणारा एकटेपणा
दिसावा स्पष्ट
तिला,
मला,
तुम्हाला.... हे असं घडायला हवं.

■ ■

संवाद

निखळून पडलेला एक हात
असा, अलगद
झेलायलाच नको होता.
बाहेर कुंडीतल्या मातीत
पुरून टाकायला हवा होता तो.
..... उशाशी ठेवून दिला मी,
चुकलंच!
रात्री-अपरात्री,
माझ्या हाताशी खेळ सुरू होतात
त्याचे.
त्याला पानं, फुलं आलेली
भिऊन दिवा करतो बंद
पडतो.
थोपटायला लागतो तो....
'अग ऐ सटवे -
एकच हात मिरवतेस कां?
कि तुला पालीच्या शेपटीसारखे
उगवतात हात?'

अनिल देशमुख

वाङ्मयाच्या इतिहास लेखनाचे नवे प्रकल्प उदयाला येण्याची वेळ होते आहे. अशावेळी मराठी वाङ्मयाचा इतिहास कसा लिहावा ? याबद्दल तीन गतकालीन थोरांच्या या विचारांचे स्मरण मार्गदर्शक ठरेल!

१. कालखंड कसे असावे ?

पु. य. देशपांडे

मराठी भाषा बोलणारे सुमारें तीन् कोटी आहेत. आपल्या राष्ट्रीय घटना-कायद्यांत हिंदीला जरी अधिकृत राष्ट्रभाषेचा मान देण्यांत आला आहे तसाच त्यांत इतर तेरा भाषांना प्रादेशिक राज्यभाषांचा मान देण्याबाबतचा संकल्प नमूद करण्यांत आला आहे. या प्रादेशिक भाषांत अर्थात् मराठीलाहि मान्यता मिळाली आहे. हिंदीसहित ज्या १४ भाषांनी व या भाषांतील वाङ्मयांनी भारतीय संस्कृतीच्या सुंदर व भव्य महावस्त्राची वीण गुंफली आहे, तींत मराठी भाषेच्या रंगरसपूर्ण धाग्यादोऱ्यांनी महत्त्वाची भर टाकली आहे. अशा आपल्या या मराठी भाषेचा व वाङ्मयाचा साकल्यात्मक व सर्वमान्य इतिहास अद्याप लिहिला जाऊं नये, ही खेदाची गोष्ट आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेने जरा उशिरां का होईना, पण हा इतिहास लिहिण्याची योजना गंभीरपणें हातीं घेतली आहे, ही फार समाधानाची गोष्ट आहे. ही जबाबदारी अंगावर घेण्याचें धैर्य दाखविल्याबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषदेस सर्व मराठीप्रेमी जनता अंतःकरणपूर्वक धन्यवाद देईल.

ग त . का . ली न

मराठी भाषा व वाङ्मय यांचा इतिहास लिहिण्याचें काम सोपें नाही. अनेक भाषा व अनेक प्रकारचें वाङ्मय यांचा गाढ व्यासंग, वाङ्मयाच्या पार्श्वभूमीची भरपूर व अचूक ऐतिहासिक माहिती, शास्त्रीय व रसग्रहणात्मक दृष्टि आणि निर्दोष व परिणामकारक मांडणी, इत्यादि गुणांची कोणत्याही उत्तम वाङ्मयोतिहासाला आवश्यकता असते. महाराष्ट्र साहित्य परिषदेने, संकल्पिलेल्या योजनेंत, अनेक विद्वानांचे व साहित्यिकांचे सहकार्य घेण्याचें ठरविले आहे. अनेकांचे हे सहकार्य एका विशाल दृष्टिच्या एकसूत्रीपणांत गोवलें जाणे अत्यावश्यक आहे. या सर्व गोष्टींची यथायोग्य दखल मराठी वाङ्मयाचा इतिहास तयार करतांना महाराष्ट्र साहित्य परिषद घेईल, अशी आपण आशा करूं या.

मराठी वाङ्मयाचा इतिहास कसा लिहावा, या विषयाशीं संबद्ध असलेल्या एका महत्त्वाच्या अंगाबाबतच मी आज आपले विचार त्रोटकपणे सांगणार आहें. हे अंग म्हणजे या वाङ्मयेतिहासाचे कालखंड कसे असावेत ?

इतिहास म्हणजे कालक्रमनानुसार घटनांची मांडणी, अशी इतिहासाची स्थूल व्याख्या करण्यांत येते. पण ही व्याख्या वाङ्मयेतिहासाला जशीच्या तशी लावणें बरोबर होणार नाही. वाङ्मयाचा उगम व विकास यांचा वाचकांच्या मनावर उत्तम ठसा उमटविणे, हाच वाङ्मयेतिहासाचा मुख्य हेतु असतो, अथवा असला पाहिजे. आणि उगम व विकास हे शब्द उच्चारतांच कांही विशिष्ट गोष्टी त्यांत अपरिहार्य पणें अनुस्यूत होतात. विकास हा चैतन्यालाच असतो, जडाला नसतो. एका विशिष्ट प्रकारच्या बीजापासून कोमल पत्रांचे रोप उदयास येते व त्याचेंच पुढे पुष्प-लवान् वृक्षांत रूपांतर घडून येतें. सजीव बीजाचा हा विकास आहे. मनुष्यहि लहानाचा मोठा होतो; ज्ञान, इच्छा, व कृति ह्या त्याच्या अंगभूत गुणांचा कमी अधिक प्रमाणांत विकास घडून येतो; आणि कधी कधी या विकासाचाच एक परिपाक म्हणून त्याच्या हातून वाङ्मय लिहिलें जाते. वाङ्मय हें मूलतः व्यक्तित्वविकासनिष्ठच असतें, असे दिसून येईल.

प्रदीर्घ कालखंडाच्या अंतराळांत असंख्य व्यक्ति जन्मास येतात, लहानाच्या मोठ्या होता व नंतर कालवश

होतात. पण आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कर्तृत्वाच्या खुणा इतिहासावर कोरून ठेवणाऱ्या व्यक्ति नेहमीच अल्पसंख्य असतात. वाङ्मयाच्या क्षेत्रांत असें वैशिष्ट्यपूर्ण कर्तृत्व प्रकट करणाऱ्या व्यक्ति तर त्यांहून विरळा असतात. वाङ्मयेतिहास म्हणजे या अशा विरळा व्यक्तिंच्या प्रतिभाशाली कलाभिव्यक्तींचाच विकास होय.

वाङ्मयाचा इतिहास म्हणजे 'प्रतिभाशाली कलाभिव्यक्तींचा विकास' हें सूत्र नीट ध्यानांत ठेवून लिहिलेला इतिहास होय. जे जे लिहिले जातें तें तें वाङ्मय अथवा साहित्य नव्हे. वाङ्मय अथवा साहित्य या पदवीला पात्र होण्यासाठी व्यक्तिनिर्मित लेखनांत कांही विशेष गुण असावे लागतात. या गुणांना 'प्रातिभ' अथवा कलात्मक गुण अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. या दृष्टीने पाहूं जातां, वाङ्मयाचा इतिहास म्हणजे कलात्मक गुणांच्या विकासाचा इतिहास ठरतो. या विकासाला कांही विशिष्ट व सार्थ टप्पे असातत, असें चिकित्सकांना दिसून आले आहे. अशा एकेका टप्प्याचा उद्‌गम-विकास-ऱ्हासाचा जो काल तोच वाङ्मयेतिहासाचा एकेक असा स्वाभाविक कालखंड ठरूं शकतो.

या विवेचनावरून मराठी वाङ्मयेतिहासांचे कालखंड पाडण्यासाठी कोणतें सूत्र हाती घेणें आवश्यक आहे, हे दिसून येईल. राजकारण, अर्थकारण, समाजकारण, धर्मकारण, इत्यादि कारणांचा इतिहास लिहितांना त्या त्या कारणाच्या विकासाशी अविच्छिन्नपणें निगडित असलेल्या सूत्रानुसारच त्या त्या कारणाच्या इतिहासाचे कालखंड पाडावे लागतील. वाङ्मयेतहास लिहितांना राजकीय, आर्थिक, सामाजिक वा धार्मिक इतिहासांना अभिप्रेत

[गतकालीन वाङ्मय
व भाषेचे दर्शन :]

मराठी वाङ्मयाचा इतिहास कसा लिहावा ?

[सौजन्य : नागपूर नभोवाणी]

: पु. य. देशपांडे/ग. त्रं. माडखोलकर/श्री. नां. वनहट्टी

असलेल्या कालखंडांचे अनुकरण करणे, हे अर्थशून्य ठरेल, असे मला वाटते. याचा अर्थ असा नव्हे की व्यक्तिनिष्ठ अशा कलाभिव्यक्तिवर राजकारण, अर्थकारण, समाजकारण वा धर्मकारण यांचा कांहिच प्रभाव पडत नाही. मनुष्य समाजांत जन्मास येतो व समाजांतच लहानाचा मोठा होतो; आणि लहानाचा मोठा होत असतांना सामाजिक संस्कारांच्या अवगुंठनांतच त्याचें व्यक्तित्व आकारास येत असते. पण हे जरी खरे असले तरी व्यक्तित्वविकासनिष्ठ अशी जी कलात्मक वाङ्मयनिर्मिति तिचे क्षेत्र निराळे व वैशिष्ट्यपूर्ण असे आहे, याविषयी आता जाणकारांत तरी फारसा मतभेद राहिलेला नाहि असें मला वाटते. आणि म्हणून वाङ्मयेतिहासाचे कालखंड पाडतांना वाङ्मयाच्या विकासप्रक्रियेशी सजीवपणे संलग्न असलेल्या सूत्रानुसारच हे कालखंड पाडणें अपरिहार्य आहे.

वाङ्मयाचा विकास म्हणजे कलात्मक अभिव्यक्तिला चालना देणाऱ्या प्रेरणांचा, प्रवृत्तींचा व प्रकारांचा विकास होय. या विकासाचें क्रमशः साकल्यात्मक दिग्दर्शन म्हणजेच वाङ्मयेतिहास होय. या वाङ्मयेतिहासाचे कालखंड पाडतांना वाङ्मयाच्या प्रेरणा, प्रवृत्ति व प्रकार यांच्या विकासक्रमाचे सूत्र वाङ्मयेतिहासकारांना कदापिहि विसरतां येणार नाही. कारण वाङ्मयेतिहासाला अभिप्रेत असलेला कालक्रम म्हणजे वाङ्मयाचा विकासक्रमच होय. या दृष्टीने विचार करतां मराठी वाङ्मयेतिहासाचे कालखंड कसे पडतात, या प्रश्नाचा आता विचार करूं.

वाङ्मयेतिहासाचे कालखंड पाडतांना आणखी एका गोष्टीचा विचार करणें आवश्यक आहे. काल म्हणजे, याचा

जेव्हा मनुष्य विचार करूं लागतो तेव्हा त्याला काल हा भूत, वर्तमान व भविष्य अशा त्रिविध स्वरूपाचा भासतो. कलावंत हाहि मनुष्यच असल्यामुळे त्यालाहि काल हा असा त्रिविध रूपात्मकच भासतो. त्याची कलानिर्मितिदेखील याच कालकल्पनेवर आधारलेली असते. चक्रधर अथवा ज्ञानदेव यांनी जेव्हा आपले वाङ्मय निर्माण केलें तेव्हा त्यांच्यासमोर त्यांच्या पूर्वी होऊन गेलेला भूतकाल होता, ते ज्या कालांत वावरत होते तो वर्तकानकाल होता आणि त्यांच्या प्रतिमेला भाराणारा आगामी म्हणजे भविष्यकालहि होता. वाङ्मयाचा इतिहास लिहूं इच्छिणाऱ्यांच्या समोरदेखील हा त्रिविध काल उभा असतोच. मराठी वाङ्मयाचा आज इतिहास लिहावयाचा म्हणजे गेल्या सुमारे हजार वर्षांतील मराठी वाङ्मय जरों नजरेसमोर उभें करावे लागले तसेंच वर्तमानकालीन वाङ्मयहि नजरेसमोर आणावें लागेल: आणि भूतकालीन व वर्तमानकालीन वाङ्मयाच्या विकासक्रमाचे धागेदोरे जसे शोधावे लागतील तसेच या वाङ्मयाच्या भविष्यकालीन विकासाच्या दिशांचाहि वेध घ्यावा लागेल.

सारांश, वाङ्मयेतिहास म्हणजे केवळ भूतकालीन वाङ्मयाचा इतिहास नव्हे. मनुष्य ज्या दृष्टीने कालाकडे पाहतो त्या त्रिकालात्मक दृष्टीनेच वाङ्मयेतिहासकारालाहि वाङ्मयाकडे पाहावें लागेल व वाङ्मयेतिहास लिहावा लागेल. वाङ्मयेतिहासाला अभिप्रेत असलेले कालसंधान हे असें त्रिकालात्मक कालसंधान आहे, ही गोष्ट वाङ्मयेतिहासकाराला नजरेआड करतां येणार नाही. किंबहुना, हे त्रिकालात्मक कालसंधान दुर्लक्षून वाङ्मयेतिहास जे लिहूं पाहतील त्यांना वाङ्मयाच्या सजीव विकासक्रमाचा बोध होणेंच शक्य होणार नाही. आणि त्यांचा वाङ्मयेतिहास हा सजीव कालानुसंधानी न होतां तो यांत्रिक कालानुसंधानी होईल; म्हणजेच निर्जीव व अर्थशून्य होईल.

वाङ्मयेतिहासाचे कालखंड पाडतांना वाङ्मय म्हणजे राजकारण नव्हे, अर्थकारण नव्हे, धर्मकारण नव्हे व समाजकारणहि नव्हे, ही गोष्ट सर्वप्रथम ध्यानांत ठेवणें अगत्याचे आहे. वाङ्मयकारण हे स्वतंत्र कारण आहे, ही गोष्ट स्पष्टपणे नजरेसमोर ठेवली पाहिजे, ज्यांना वाङ्मय म्हणजे राजकारण, अर्थकारण, धर्मकारण व समाजकारण यांच्या केवळ प्रतिध्वनीसारखें वाटते, त्यांना वाङ्मय म्हणजे काय हेंच कळलेले नसल्यामुळे वाङ्मयेतिहास लिहिण्यास ते सर्वथैव अपात्रच समजले पाहिजेत.

वाङ्मय हा मानवी प्रतिभेचा एक स्वतंत्र विलास आहे, याचें स्पष्ट दर्शन ज्यांना झाले आहे त्यांनाच वाङ्मयेतिहास लिहिण्याचा अधिकार प्राप्त होऊं शकेल. इतरांनी, मग ते इतर बाबतींत कितीहि अधिकारी पुरुष असले, तरी त्यांनी वाङ्मयेतिहासाच्या वाटेला जाऊ नये हेंच बरे.

मानवी प्रतिभेचा एक स्वतंत्र विलास, या दृष्टीने वाङ्मयाच्या स्वरूपाचें यथार्थ दर्शन ज्यांना झालेलें आहे, त्यांना वाङ्मयेतिहास म्हणजे वाङ्मयनिर्मितीला कारणीभूत होणाऱ्या प्रेरणा व प्रवृत्ति आणि तज्जन्य प्रकार यांचाच इतिहास होय, याचें सहज आकलन होईल. आणि हे आकलन होतांच वाङ्मयेतिहासाचे कालखंड पाडतांना कोणतें सूत्र हाती घ्यावें हेंहि त्यांच्या सहज ध्यानांत येईल. हें सूत्र म्हणजे वाङ्मयाच्या प्रेरणा, प्रवृत्ति व प्रकार यांच्या विकासाचे सूत्र होय.

गेल्या सुमारे हजार वर्षांत निर्माण झालेल्या मराठी वाङ्मयाचें साकल्याने विहंगमावलोकन करतां असें दिसून येतें की, मराठी वाङ्मयाचा आरंभ धर्मभावनेने प्रेरित झालेला असून या वाङ्मयाची परिणति आता मानवी व्यक्तित्वाचीं विविध व गूढ रूपें आविष्कृत करण्यांत घडून आली आहे. निर्बंधमय धर्मावगुंठित अशा समूहभावनेकडून अधिकाधिक स्वतंत्र व विकसित व्यक्तित्वाकडे असें मराठी वाङ्मयाच्या विकासाचें सूत्र चिकित्सक व रसिक दृष्टीला स्पष्टपणें दिसून येते. आणि कालाकडे पाहण्याचें जे त्रिकालात्मक अनुसंधान आहे तदनुसार या विकासक्रमाची भविष्यकालीन दिशा म्हणजे अधिकाधिक स्वतंत्र व विकसित व्यक्तित्वाचे अधिकाधिक सूक्ष्म,

तरल व अर्थपूर्ण आविष्कार, हीच संभवू शकते.

मराठी वाङ्मयेतिहासाचे म्हणजे वाङ्मयीन प्रेरणा, प्रवृत्ति व प्रकार यांच्या विकासाचें हे सूत्र हातीं घेतल्यास या वाङ्मयेतिहासाचे कालखंड कसे पाडावेत याचा एक यथार्थ व निश्चित निकष आपल्यास उपलब्ध होतो. मराठी वाङ्मयाचा आजतागायतचा इतिहास हा सुमारें एक हजार वर्षांचा इतिहास आहे. या एक हजार वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीचे यांत्रिक, निर्जीव व अर्थशून्य खंड अनेक प्रकारें पाडता येतील. दहा खंडांत हा इतिहास संकलित करण्याचें ठरल्यास शंभर, शंभर वर्षांचा एक एक कालखंड असे गणिती हिशेबाने दहा कालखंड सहज पाडतां येतील. पण हे केवळ कालखंड होतील. ते मराठी वाङ्मयेतिहासाचे कालखंड होणार नाहीत. या इतिहासाचे अर्थपूर्ण कालखंड पाडावयाचे झाल्यास ते वाङ्मयविकासाचें सूत्र हाती घेऊनच पाडले पाहिजेत. आणि हा हजार वर्षांचा इतिहास, एका टोकाला निर्बंधमय धर्मावगुंठित समूहभावना व दुसऱ्या टोकाला अधिकाधिक स्वतंत्र व विकसित व्यक्तित्वाचा आविष्कार, अशा दोन टोकांत सामावलेला असल्यामुळे निर्बंधमय व धर्मावगुंठित अशा समूहभावनेच्या प्रभावाचा काल अथवा प्राचीन काल, हा पहिला कालखंड: या समूहभावनेच्या ऱ्हासाचा व कांही नव्या वाङ्मयीन प्रेरणा, प्रवृत्ति व प्रकार यांच्या उदयाचा काल, हा दुसरा कालखंड; आणि सुस्पष्ट अशा स्वतंत्र व अधिकाधिक विकसित व्यक्तित्वाच्या आविष्काराचा आधुनिक काल, हा तिसरा कालखंड, अशा तीन स्थूल कालखंडांत मराठी वाङ्मयाचा इतिहास अर्थपूर्ण रीतीने विभागतां येईल. या तीन स्थूल कालखंडात अधिक तपशीलवार विवेचनासाठी उपखंडहि पाडावे लागतील, हे उघड आहे.

■ ■

२. मराठी वाङ्मयाचा इतिहास कसा लिहावा ?

श्री. ग. त्र्यं. माडखोलकर

प्रस्तुत विषय फार गंभीर आहे. क्लिष्ट म्हटलें तरी सुद्धा चालेल. कारण तो विषय सर्वथैव शास्त्रीय आहे. विषयाचें नांव 'मराठी वाङ्मयाचा इतिहास कसा लिहावा ?' हें आहे; व या प्रश्नाचे उत्तर मला व्यक्ति, प्रवृत्ति आणि वाङ्मयप्रकार यांचे इतिहासांतील सापेक्ष महत्त्व विशद करून द्यावयाचें आहे. हा विषय खरोखरीच अतिशय गुंतागुंतीचा आणि विकट आहे. त्यांत मतभेदहि अगदी तीव्र व्हावेत असे अनेक विवाद्य मुद्दे निघण्यासारखे आहेत. म्हणून, माझी अशी विनंती आहे की मी जें ह्या विषयाचें ओझरतें विवेचन करणार आहे, ते आपण गोड करून घ्यावें.

प्रथम मला वाङ्मय आणि त्याचा इतिहास यांच्या संबंधीची माझी स्वतःची कल्पना स्पष्ट करणें अवश्य वाटतें. वाङ्मय म्हणजे खरोखरी अशेष शब्दजात; म्हणजे असें की, मनुष्य जें जें बोलतो किंवा लिहितो तें तें सर्व वाङ्मय. मला वाटते "पुरुषस्य वाग्रसः" असे जें विधान उपनिषदांत केलेलें आहे, ते अनेक दृष्टींनी अत्यंत मार्मिक आहे. वाणी हा पुरुषांचा रस आहे. या विधानाचा अर्थ काय असावा ? सृष्टींतील सर्व जीवांपेक्षा मनुष्याची श्रेष्ठता दर्शविणारे अनन्य असें जर कोणतें एकमेव लक्षण असेल, तर तें वाणी हेंच होय. सृष्टींतील इतर जीव कमीअधिक प्रमाणांत बुद्धिमान किंवा शक्तिशाली असतील, पण त्यांच्या ठिकाणी वाणी नसल्यामुळे ते आपल्या कर्तृत्वाचा ठसा कालावर उमटवूं शकले नाहीत व जीवनाचें अखंड सातत्य युगायुगांतून दर्शविणारी संस्कृति निर्माण करूं शकले नाहीत. उलट, मनुष्याच्या ठिकाणी वाणींचे सामर्थ्य असल्यामुळे भूत, वर्तमान आणि भविष्य या काळाच्या तिन्ही

रूपांना आकळणारे असें आपलें सांस्कृतिक जीवन तो उत्पन्न करूं शकला.

अर्थात् वाङ्मय म्हणजे मानवी मनांचा आरसा, मानवी मनोविकासाचें मूर्तिमंत प्रतिबिंब होय. मनुष्य जें जें बोलतो आणि लिहितो तें तें सर्व वाङ्मय होय, ही गोष्ट जर लक्षांत घेतली, तर त्यांतून सहजच असे प्रमेय निघतें की, मनुष्याच्या मुखांतून म्हणा वा लेखणींतून म्हणा जो जो म्हणून टिकण्यासारखा प्रभावी उद्गार निघाला, तो तो वाङ्मयांत चिरंतन होऊन राहिला. आणि हा उद्गार म्हणजे त्याच्या त्या त्या वेळच्या मानसिक किंवा बौद्धिक प्रक्रियेचा आविष्कार होय. आपण ज्यांना लोकगीतें किंवा लोककथा म्हणतों तें पिढ्यान् पिढ्या लोकांच्या तोंडी खेळत आलेलें वाङ्मय घ्या किंवा आधुनिक तंत्रपद्धतीने लिहिलेलें एखादें नाटक किंवा कादंबरी घ्या, या दोहोंतहि आपल्याला मानवी मनाच्या प्रक्रियेचा आणि विकाराचा कांही ना कांही चिरंतन अवशेष दृष्टीस पडेल.

अर्थात् वाङ्मय म्हणजे मानवी मनाच्या आंदोलनाचा आलेख; मानवी बुद्धीच्या विकासाचें प्रतिबिंब. म्हणून, वाङ्मयाचा इतिहास लिहितांना जे कालखंड पाडावयाचे ते त्यांतील प्रवृत्तींचें परिवर्तन लक्ष्यांत घेऊनच पाडावे लागतील. तें परिवर्तन पुरोगामी असेल किंवा प्रतिगामीही असेल; त्यांत प्रगतीचा अखंड ओघ दिसेलच असेंहि नाही. तरीसुद्धा तीं परिवर्तनें ही अखेर विकासालाच कारण होतात, हें ध्यानात घेऊन दृष्टीने वाङ्मयाच्या इतिहासाचें खंड कल्पावे लागतील, असें मला वाटते.

आणखीहि एक महत्त्वाची गोष्ट लक्ष्यांत घ्यावयाला हवी. ती ही की, वाङ्मयाचा इतिहास लिहितांना व्यक्ति आणि समाज यांची परस्पर सापेक्षता सतत डोळ्यांपुढे ठेवली पाहिजे. कारण वाङ्मय निर्माता हा एकाच वेळी अंतर्मुख आणि लोकाभिमुखहि असतो. आपल्या वैयक्तिक भावनांचे आणि अनुभूतींचें साधारणीकरण आणि समाजीकरण करण्यांत त्याची सर्व कला सामावलेली असते; व म्हणून वाङ्मयांत व्यक्तिइतकेच महत्व समाजाच्याहि प्रवृत्तींना द्यावें लागतें. किंबहुना,वाङ्मय हे जितकें व्यक्तिनिष्ठ तितकेंच समाजनिष्ठ, हे जर ध्यानांत घेतलें नाही, तर वाङ्मयाच्या इतिहासांत व्यक्तिंच्या वैशिष्ट्यांचे स्तोम माजविले जाईल; व त्या वैशिष्ट्याला कारण होणाऱ्या आणि वळण लावणाऱ्या सामाजिक प्रवृत्तींना गौण स्थान मिळेल.

आपण पुष्कळदा असें पाहतों की, वाङ्मयाच्या इतिहासांतील कालखंड हे राजांच्या नांवानें पाडलेले असतात. इंग्रजी वाङ्मयांतील कालखंड हे तर एलिझाबेथ आणि व्हिक्टोरिया यांच्यासारख्या राण्यांच्या नांवाने पाडलेले आढळतात. मला वाटतें, यासारखा दुसरा उपलाप नाही. शेक्सपीअर आणि टेनिसन यांच्यासारखे कवि त्या राण्यांच्या कारकीर्दीत होऊन गेले एवढ्याच एका कारणामुळे खरोखरी त्या राण्यांची कारकीर्द वाङ्मयांत युगप्रवर्तक ठरली. युगनिर्माते कवि शेक्सपीअर आणि टेनिसन, पण युग नामांकित झालें ते मात्र त्या राण्यांच्या नांवाने! सुदैवाने भारतीय वाङ्मयांत मात्र असा कोणत्याच प्रकारचा अपलाप दृष्टीस पडत नाही. वाङ्मय स्वतः उत्पन्न करणारे आणि त्याला आश्रय देणारे असे अनेक राजे या भरतखंडांतहि होऊन गेले; आख्यायिकांनी गौरविलेल्या विक्रमादित्यापासून तों आधुनिक इतिहासांत अविस्मरणीय ठरलेल्या श्री. सयाजीराव महाराज गायकवाडांपर्यंत अनेक सम्राटांनी आणि राजांनी भारतीय वाङ्मय आपल्या रसिक औदार्याने समृद्ध केले; पण त्यांची नांवें जरी कौतुकाने उच्चारली जात असलीं, तरी ती युगनिदर्शक ठरली नाहीत.

याचें कारण काय? कारण हें की भारतीय साहित्यशास्त्रज्ञांनी वाङ्मय हे संपूर्णतया स्व-तंत्र असे मानवी प्रतिभेचे ऐश्वर्य मानले आहे. 'नियतिकृत-नियमरहित' आणि 'अनन्य परतंत्र' असें जें त्याचें वर्णन मम्मटाने केलेले आहे, तें याच अर्थाने. म्हणून भारतीय साहित्यांत साहित्य निर्माण करणारी व्यक्ति आणि तिच्या प्रतिभेवर संस्कार

करणाऱ्या तत्कालीन सामाजिक प्रवृत्ति या दोनच फक्त महत्वाच्या मानल्या जातात.

वाङ्मयाचा निर्माता हा एकाच वेळी अंतर्मुख आणि लोकाभिमुखहि असतो, हे तत्व लक्ष्यांत घेतलें असतां निर्मात्याचें व्यक्तित्व आणि समाजाच्या प्रवृत्तीची त्याच्यावर घडणारी प्रतिक्रिया या दोहोंच्या अनुषंगाने वाङ्मयाचा विचार केला पाहिजे, हे ओघालाच येतें.

आपण जुन्या मराठी वाङ्मयाचा विचार या दृष्टीनें करून पांहू या. जुन्या मराठी वाङ्मयांतील ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम आणि रामदास हे युगप्रवर्तक असे अत्यंत प्रभावशाली कवि समजले जातात. यांपैकी तुकाराम आणि रामदास सोडल्यास बाकीच्या तिघा कवींनी तत्वाज्ञानात्मक अशी गंभीर प्रबंधरचना आणि कांही आख्यान-रचनाहि केलेली आहे; व हीं त्यांची तात्विक भाष्ये आणि पौराणिक आख्यानें ह्यांच्या मनाची लोकाभिमुख वृत्ति स्पष्ट दर्शवितात. पण त्याबरोबरच या कवींनी जी अत्यंत आत्मपर अशी त्रुटित स्फुट कविता लिहिली आहे, जे हजारों अभंग आणि जी पदें लिहिली आहेत, त्यांत त्यांची विलक्षण अंतर्मुखता प्रगट झालेली दृष्टीस पडते. तुकाराम हा या अंतर्मुख कवींचा खरोखरी मुकुटमणि; पण त्याच्या अंतर्मुखतेतहि कमालीची लोकाभिमुखता, व्यक्तिनिष्ठेतहि कमालीची समाजनिष्ठा प्रत्ययाला येते. याचाच अर्थ असा की, या कवींचें व्यक्तित्व हें तत्कालीन समाजाच्या प्रवृत्तींशी समरस झालेले होतें. त्यांनी कविता जितकी आत्मसाधनेसाठी लिहिली तितकीच लोकसाधनेसाठींहि लिहिली. आपण ज्ञानेश्वरांपासून तों रामदासापर्यंत सर्व मराठा वाङ्मय हे आध्यात्मिक आणि धार्मिक आहे असे समजतो. पण तें तितकेच वैयक्तिक आणि सामाजिकहि होतें हे लक्ष्यांत घेतलें पाहिजे. व्यक्तिंची प्रतिभा आणि समाजाच्या प्रवृत्ति यांच्या संमीलनांतून आणि समन्वयांतून तें निर्माण झालेलें होते.

या वाङ्मयाला असलेली महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाची पार्श्वभूमि जर आपण लक्ष्यांत घेतली तर हें विधान अधिक स्पष्ट होईल. यादव साम्राज्याच्या अत्यंत उत्कर्षाच्या काळांत भक्तिज्ञानयुक्त वैराग्याचा महिमा प्रतिपादन करणारा ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ श्री. ज्ञानेश्वरांनी लिहिला. यादव साम्राज्याच्या विनाशाची जणु ती पूर्वसूचनाच होती ! त्यानंतरचे मोठे कवि श्री एकनाथ यांनी भागवत आणि रामायण ह्या दोन संस्कृत ग्रंथांवर सुबोध रसाळ मराठी आख्यानें लिहून तत्कालीन समाजाची धर्मभावना सर्व दृष्टींनी जागृत ठेविली; व अनेक सामाजिक रूपकें लिहून समाजांतील वैगुण्येंहि चवाठ्यावर आणली. त्यानंतरचे दोन बव्हंशी समकालीन कवि तुकाराम आणि रामदास. या दोघांपैकी श्री तुकारामने लिहिलेलें वाङ्मय एका परीने सर्वथैव आत्मपर असें आहे - पण त्यानेंहि तत्कालीन समाजचें दैन्य दंभ वगैरे गोष्टी चित्रित केलेल्या आहेत. रामदासांचा दासबोध जरी बाजूला ठेवला तरी त्यांची सारी स्फुट कविता म्हणजे त्यांच्या स्वतःच्या आणि तत्कालिन समाजाच्याहि निरनिराळ्या मनोवृत्तींचे आविष्कार आणि आविर्भावच होत.

पण यानंतर स्वराज्याच्या दीडशें वर्षांच्या कालांत जी कविता निर्माण झाली, तिचा वेष जरी पूर्ण धार्मिकच होता, तरी वामनपंडितापासून तों अमृतरायापर्यंत या कालांतील कवींनी जें वाङ्मय लिहिले, ते बव्हंशी आख्यानरूप म्हणजेच समाजचें रंजन करण्यासाठीच लिहिलेलें होतें. आज आपल्याला लघुकथा आणि कादंबऱ्या यांच्याविषयी जी रुचि वाटते, तीच रुचि तत्कालीन समाजाला वामन, श्रीधर, महीपती, मोरोपंत इत्यादि कवींच्या लहानमोठ्या आख्यान-काव्याविषयीं वाटत असावी, हे उघड आहे. याचाच अर्थ असा, की स्वराज्यातील सुखावलेल्या समाजाच्या रंजनार्थ या कवींनी अध्यात्म बाजूला ठेवलें आणि आख्यानें हाती घेतली. ' ग्यानबा तुकारामांच्या ' संस्कारांत मुरलेली त्यांची प्रतिभा ही धर्मप्रवण होती यांत शंकाच नाही. पण ती तिची धर्मप्रवणता आध्यात्मिक भाष्यांच्या किंवा आत्मपर

कवितांच्या रूपापेक्षाहि विविध आख्यानांच्या रूपाने प्रकर्षाने प्रगट झाली याचाच अर्थ असा की, कविमन हे समाजमनाचे सहप्रवासी झालें; समाजमनाचें प्रतिबिंब आणि प्रातिनिधिक झालें. लावण्या आणि पोवाडे हें लोकवाङ्मय याच काळांत उत्पन्न झालें. हें वाङ्मय एका टोकाला राजदरबार आणि गावचव्हाठा यांचे रंजन करीत होते, तर आख्यानकार कवि हा राजदरबार आणि गावचव्हाठा यांच्या मध्यावर मध्यमवर्गाच्या माजघरांत उभा होता. शाहिराने आपल्या डफतुणतुण्यावरील कवनाने राजेमहाराजे आणि जमावझुंड यांना डोलविलें; तर कवीने आपल्या टाळ-मृदंगावरील आख्यानांनी माजघरांत आणि मंदिरांत बसलेल्या सभाजनांना रिझविले. कवीचे व्यक्तित्व आणि समाजाच्या प्रवृत्ति यांचा असा समरस मेळ पडलेला आपल्याला जुन्या मराठी वाङ्मयांत सर्वत्र दिसतो.

याहिपेक्षा समाजाच्या प्रवृत्तीची छाप कवीच्या व्यक्तित्वावर किती जबरदस्त पडते याचें एक अगदी अनन्य असें उदाहरण मराठी वाङ्मयांत आपल्याला पहावयाला मिळतें. राम-कृष्ण हे अखिल भारताने वंदनीय मानलेले अवतारी पुरुष. ह्यामुळे रामलीला आणि कृष्णलीला हे अखिल भारतांतील कवींचे आणि बहुजनसमाजाचे आवडते कीर्तन-भजनाचे विषय. पण महाराष्ट्रांत केवळ रामलीला आणि कृष्णलीला गाऊनच कवि संतुष्ट झाले नाहीत आणि लोकहि तृप्त झाले नाहीत, तर त्या लीलांच्या वर्णनाबरोबरच श्री ज्ञानेश्वरांपासून तों मोरोपंतापर्यंत सर्व प्रमुख मराठी कवींनी भगवद्गीतेवर भाष्यें लिहिण्यांत आपल्या वाणीचें परम सार्थक मानलें. भगवद्गीतेवर जितकी छंदोमय भाष्यें मराठी भाषेंत आहेत तितकी बहुधा दुसऱ्या कोणत्याहि भारतीय लोकभाषेंत आढळणार नाहीत. याचे कारण काय ? याचें कारण माझ्या समजुतीनें महाराष्ट्राची जीवनाकडे पाहण्याची बुद्धिप्रधान चिकित्सक दृष्टी. या त्याच्या चिकित्सक दृष्टीने स्वराज्यांतील अत्यंत वैभवाच्या काळांतहि त्याचें अध्यात्मचिंतन थांबले नाही. कविमन आणि समाजमन, व्यक्ति आणि समाजप्रवृत्ति, यांचा अनुबंध येथे आपल्याला स्पष्ट पहावयाला मिळतो.

पाश्चात्य वाङ्मयाचे दोन अग्रगण्य इतिहासकार टेन आणि ब्रँडीस यांनी कविमन हे समाजमनाचे सहप्रवासी असते व दोन्ही मने परस्परांवर परिणाम करीत जनतेची वैचारिक प्रगति घडवून आणतात हें प्रमेय पायाभूत धरून पाश्चात्य वाङ्मयाचा इतिहास लिहिला आहे. वाङ्मयांतील निरनिराळे प्रवाह आणि प्रकार हे त्यांनी तत्कालीन समाज-जीवनाचे प्रसव आणि प्रतिनिधी मानलेले आहेत. पण वाङ्मयाचा निर्माता हा जसा भूतकालाचा वारस आणि वर्तमान कालाचा प्रतिनिधी असते तसाच तो केव्हा केव्हा भविष्यकालाचा द्रष्टाहि असतो. किंबहुना भूत, वर्तमान आणि भविष्य या कालाच्या तिन्ही अवस्थांचा अनुबंध जो पहातो आणि त्यांचें दर्शन आपल्या वाङ्मयांत जो घडवितो, तोच खरा महाकवि. त्याचे मन हें समाजमनाशी समरस झालेले तर असतेच, पण त्या मनाला न आकळणाऱ्या भावी घटनांची स्वप्नेंहि तें पाहूं शकते. अशा लेखकालाच आपल्या साहित्यशास्त्रज्ञांनी क्रांतदर्शी म्हटले आहे.

सारांश, वाङ्मयाच्या इतिहासांत व्यक्ति आणि प्रवृत्ति याचें महत्व हें माझ्या मताने सारखेंच आहे. त्यांच्या समन्वयानेच त्या त्या काळांतील वाङ्मयप्रकार हे उत्पन्न होत असतात.

■ ■

३. अखिल भारतीय पार्श्वभूमि आणि भारतीय भाषांशी संबंध

श्री. ना. बनहट्टी

पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेने मराठी वाङ्मयाचा इतिहास मोठ्या प्रमाणावर लिहून प्रसिद्ध करण्याची

योजना जाहीर केल्यापासून गेल्या वर्षादोनवर्षांत या विषयासंबंधाने पुष्कळ चर्चा आणि वाद झाला आहे. साहित्याच्या क्षेत्रांत विचार करणारी जेवढी मंडळी आहेत त्यांच्यापैकी बऱ्याच जणांनी या वादांत भाग घेऊन उलटसुलट विचार प्रदर्शित केले आहेत. वादाचा धुरोळा एकदा उठला म्हणजे कित्येक महत्त्वाच्या गोष्टींसुद्धा दिसेनाशा होतात. या इतिहासाचे खंड किती असावेत आणि ते कुठे कुठे पाडण्यांत यावेत या प्रश्नावरच वादाचें रण माजले. इतर कित्येक महत्वाचे मुद्दे या संबंधांत उपस्थित होतात त्यांच्याकडे जावें तसें लक्ष्य गेलेलें दिसत नाही.

इतिहास म्हणजे सनावळी नव्हे किंवा घटनांची जंत्री देखील नव्हे. कल्हणाने आपल्या राजतरंगिणींत म्हटले आहे त्याप्रमाणे 'इतिहास' ही कविप्रजापतीची एक रम्य कलाकृति असायला पाहिजे; इतिहासांत मागे होऊन गेलेल्या काळाचें जणू काय जिवंत व सचेतन असें दर्शन आपणांस घडले पाहिजें. मनुष्याच्या आणि समाजाच्या हालचाली व घडामोडी, त्यांच्या वृत्ती आणि प्रवृत्ती, त्यांच्या परस्पर सहकार आणि संघर्ष यांचें वेधक चित्र इतिहासाने आपल्या डोळ्यासमोर उभें केले पाहिजें.

मनुष्य हा एकटा एकलकोंडा प्राणी नाही. तो समाज करून राहणारा आहे. एकाच्या वागण्याचा इतर अनेकांवर परिणाम होत असतो आणि अनेकांच्या वृत्तिप्रवृत्तींचा एका व्यक्तीवर उलट परिणाम होत असतो. ही क्रियाप्रतिक्रिया एकसारखी चालू असते. एका व्यक्तींच्या जीवनावर भोवतालच्या अनेक व्यक्तींचा आणि समाजाचा जो परिणाम होत असतो त्यानेच त्या व्यक्तींचें चरित्र बनत असते. हे जसें व्यक्तीला लागू आहे तसेंच ते समाजांतील प्रवृत्ति, घडामोडी आणि खळवळी यांचा परिणाम भोवतालच्या इतर समाजांच्यावर झाल्याखेरीज कधीही राहात नाही. या परिणामांचें स्वरूप वर्णन करणे, त्यांचे धागेदोरे तपासणें आणि त्यांची कारणमीमांसा करणें हे इतिहासकाराचें काम आहे. गेल्या शंभर वर्षात महाराष्ट्रांत ज्या चळवळी-खळवळी झाल्या त्यापैकीं कित्येकांचे धागेदोरे बंगालशी निगडित झालेले आढळतील. कर्नाटकांतील घटनांचा व प्रवृत्तींचा निकट संबंध महाराष्ट्रांतील घटनांशी जुळत असलेला आढळेल. महाराष्ट्राच्या इतिहासकाराचे हे काम आहे की, त्याने केवळ मराठी जनतेच्या हालचालींची माहिती देऊनच न थांबता त्या हालचाली अथवा खळवळी कोणत्या प्रेरणांनी उद्भवल्या होत्या, त्या प्रेरणांच्यामध्ये हिंदुस्थानांतील इतर प्रांतांचा कितपत भाग होता याचें साधार विवरण करायला हवें. असें होईल तरच त्या इतिहासाला जिवंतपणा व भरदारपणा येईल.

प्रत्येक व्यक्तीच्या ज्याप्रमाणे इतर व्यक्तींशी संबंध असतो त्याप्रमाणे प्रत्येक व्यक्ती एका मोठ्या समुदायाचा अंश असते हे लक्षांत ठेवणेदेखील महत्वाचें आहे. कुटुंबातील एकेक व्यक्ति इतर व्यक्तींशीं कांही नात्याने जोडलेली असते. तसेंच प्रत्येक व्यक्ति हा कुटुंबाचा एक अंश म्हणून देखील वागत असते. त्या कुटुंबाची जात, सांपत्तिक स्थिती, सामाजिक दर्जा वगैरेंचा परिणाम त्या व्यक्तिवर होत असतो. 'जें पिंडी ते ब्रह्मांडी!' एका व्यक्तीला जें लागू ते समाजालाहि तसेंच लागू पडतें. आपण हिंदुस्थानांतील सर्व समाज एकमेकांचे भाऊ-भाऊ आहोत, तसेंच त्याबरोबर त्या विशाल भारत देशाचे घटक आहोंत, अंश आहोत, महाराष्ट्राचा इतिहास एकंदर हिंदुस्थानांत मुसलमानांची सत्ता कशी पसरली, त्यांनी राजकीय व धार्मिक आक्रमण केव्हा केव्हा कुठे कुठे केले, या सर्व गोष्टींची नीट कल्पना करून दिल्याशिवाय मराठ्यांचे स्वराज्य कोणत्या परिस्थितीत कसें निर्माण झालें याचा नीट खुलासा करणें कधी तरी शक्य होईल काय?

तेव्हा-संपूर्णाचा अंश आणि समकक्षीयांचा साथीदार या दोन्ही नात्यांनी व्यक्तींचे व समाजाचे विवेचन केल्याशिवाय त्या व्यक्तीचा वा समाजाचा इतिहास लिहिला गेल्यास तो खराखुरा सोपपत्तिक इतिहास होणें शक्य

नाही. हा सिद्धांत निर्विवाद होय.

हा सिद्धांत सर्वसाधारण राजकीय इतिहासाला जितका लागूं आहे तितकाच तो वाङ्मयाच्या इतिहासालाहि लागूं पडतो. वाङ्मय ही मनुष्याच्या अनेक कृतींच्या पैकीच एक कृति आहे. इतरांच्याशी असलेल्या संबंधांचा परिणाम मनुष्याच्या सर्वच जीवनावर, त्याच्या सर्वच कृतीवर होतो. अर्थात् तो वाङ्मय-कृतीवर देखील होणारच. महाराष्ट्रांतली व्यक्तींच्या मनावर इतर प्रांतांतील हालचाली खळबळी, चळवळी यांचा परिणाम झालेला असणारच; मराठी लेखकांच्या मनावर इतर भाषांतील वाङ्मयाचे बरेवाईट ठळक अथवा अंधुक ठसे उमटलेलेच असणारच. त्यामुळें मराठी लेखकांच्या वृत्ति, भावना आणि प्रेरणा यांच्यांत कांही तरी पालट झाला असणे अपरिहार्य आहे. तेव्हा मराठी वाङ्मयाचा इतिहास या सर्व परिणामांचा विचार करून तदनुसार वाङ्मयप्रवाहांचे आणि वाङ्मयातील प्रवृत्तींचे स्वरूप निर्धारण करणारा असा झाला पाहिजे. अमक्या काळांत अमुक अमुक ग्रंथकार झाले, त्यांनी अमुक अमुक ग्रंथ लिहिले आणि त्या ग्रंथात अमुक अमुक विषय होते असे कालक्रमानुसार सांगितले की झाला वाङ्मयाचा इतिहास तयार असें मानून मुळीच चालणार नाही. किंबहुना वाङ्मयांतील प्रेरणांची आणि प्रवाहांची नुसती महाराष्ट्रांतील परिस्थितीच्या अनुरोधाने मीमांसा करूनहि भागणार नाही. यापेक्षा आपली दृष्टि अधिक व्यापक अधिक दूरदर्शी बनविली पाहिजे.

मराठी वाङ्मयाचा विचार करतांना आपण अगदींच बाहेर नजर फेकीत नाही असे. आपण बाहेर पाहतो, पण बहुधा एकाच खिडकींतून एकाच दिशेकडे पाहतो. त्यामुळे आपलें विवेचन एकांगी होते. इंग्रजी अंमल आपल्या देशांत सुमारे दीडशे वर्षापूर्वी सुरू झाला. इंग्रजांचे वाङ्मय, इंग्रजांचा इतिहास इंग्रजांच्या सामाजिक चालीरीती यांचा पगडा ते राज्यकर्ते म्हणून साहजिकच आमच्याकडील सुशिक्षितांच्या मनावर बसला. लेखकांनी वाङ्मय-निर्मितीस सुरूवात केली ती इंग्रजी वाङ्मय, इंग्रजांचा इतिहास व समाजस्थिती यांपासून प्रेरणा घेऊनच केली. निबंध, कादंबरी, नाटक, कविता इत्यादि वाङ्मयाचे अभिनव प्रकार सुरू झाले ते इंग्रजी वाङ्मयांतील नमुन्यावरच सुरू झाले. साहजिकच वाङ्मयाचे ऐतिहासिक दृष्टीने समालोचन करण्याचा जेव्हा जेव्हा प्रसंग येतो तेव्हा तेव्हा मराठी लेखकांनी इंग्रजीतून घेतलेल्या प्रेरणा व संस्कार यांचा शोध घेतला जातो आणि इंग्रजी वाङ्मयांतील नमुन्यांच्या तुलनेने मराठी वाङ्मयाचें मूल्यमापन केले जातें.

पण हे सर्व स्वाभाविक असले तरी सर्वांशी योग्य आहे असें मात्र नाही. झापड घातल्याप्रमाणे आपण केवळ एकाच दिशेकडे म्हणजे पश्चिमेकडे पाहात आलो. त्यामुळे संकुचितपणा व एकांगीपणा यांचे मात्र आपण धनी झालो. इंग्रजी वाङ्मय, इंग्रजी इतिहास यांचे आपणावर झालेले परिणाम फार खोल व बलवत्तर होते हे खरे; पण सगळे कांही तेवढेच असें मानून चालणें चुकीचें होतें. हजारों कोसांतील राज्यकर्त्यांची उपासना करण्याच्या भरांत आपण शेजारच्या भाईबंदांना विसरलो. आपल्या भारतांतील परिस्थितीच्या बैठकिवरून सर्व घटनांचे अवलोकन केले म्हणजें त्या कांही निराळ्याच प्रकाशाने चमकूं लागतात, हें आपल्या ध्यानांत आले नाही. अद्यापहि आपलें जितकें जावयास पाहिजे तितकें लक्ष गेलेले दिसत नाही.

आधुनिक मराठी गद्याचे निर्माते विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या कामगिरींचे मूल्यमापन करतांना अॅडिसन, जॉन्सन, मेकॉले या इंग्रज लेखकांचे त्यांच्यावर जे संस्कार झाले त्यांचे परीक्षण आपण करतो. हे तर करायला पाहिजेच. त्याच्या योगाने चिपळूणकरांच्या वाङ्मयकार्यांचे यथार्थ ज्ञान आपणांस होईल. पण त्याच काळांत भारतांतील इतर भाषांमध्ये कोणकोण लेखक पुढे आले होते, त्यांच्या द्वारा कसकशी वाङ्मयनिर्मिति होऊं लागलेली होती याचें जर आपण तुलनेसाठी अवलोकन केले तर महाराष्ट्रांतील त्यावेळच्या वाङ्मयीन हालचालींवर कांही एक

निराळाच प्रकाश पडेल. उदाहरणच द्यायचे झालें तर हिंदी भाषेकडे आपणांस वळता येईल. लल्लूलाल आणि सादल मित्र यांनी आधुनिक हिंदी वाङ्मयाचा पाया घातला ती परिस्थिती आणि त्यानंतर साधारणपणे चिपळूणकरांच्याच काळांत भारतेंदु हरिश्चंद्र यांनी आपल्या निबंधांनी हिंदी गद्याची परंपरा सुरू केली तो प्रकार आपण जर तुलनेसाठी न्याहाळला तर चिपळूणकरांच्या वाङ्मयीन कार्यावर फार मोठा प्रकाश पडेल यांत कांही शंका नाही.


आपले महामान्य कादंबरीकार हरिभाऊ आपटे यांची प्रेरणा व स्फूर्ति आपण तपासून पाहतों तेव्हा थॅकरे, डिकन्स, स्कॉट, झोला इत्यादि पाश्चात्य कादंबरीकारांच्या त्यांच्यावर पडलेल्या प्रभावाची आपणांस जाणीव होते; कोणाकोणाचे संस्कार हरिभाऊंनी कसकसे घेतले त्याची छाननी आपण करतो. हे करूं नये असें माझें म्हणणे नाही. पण या छाननीचें जें महत्व आहे त्याला तिळमात्र उणेपणा न आणतांहि मी असें म्हणेन की त्या वेळच्या भारतीय भाषांतील वाङ्मयाची दखल घेणे या बाबतींत उपयुक्त ठरल्याखेरीज राहणार नाही. बंगाली कादंबरीचे जनक बंकिमचंद्र चतर्जी यांचा लेखन-संसार हरिभाऊंनी लेखनाला प्रारंभ करण्याच्यापूर्वी बहुतेक आटपला होता. त्यांनी हरिभाऊंप्रमाणेच सामाजिक व ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांच्या लिखाणाचा हरिभाऊंच्या लिखाणावर कसा आणि कितपत परिणाम झाला असावा याचे संशोधन करावयास नको काय ? हरिभाऊ आपट्यांचा स्फूर्तीचा उगम हजारों कोस दूर होऊन गेलेल्या वॉल्टर स्कॉटमध्ये शोधण्यापेक्षा तो बंकिमचंद्राच्या भावनापूर्ण देशभक्तिप्रधान कादंबऱ्यांमध्ये शोधल्यास फार महत्वाचे धागेदोरे आपल्या हाती लागण्याचा संभव आहे. बंकिमचंद्राच्या दुर्गेशनंदिनी नामक कादंबरीचा प्रारंभ आणि हरिभाऊंच्या उषःकाल कादंबरीचा प्रारंभ यांत कसें विलक्षण साम्य आहे हें मी स्वतःच पूर्वी एकदा दाखवून दिले होतें.

भारतांतील निरनिराळ्या भाषा आणि आपली मराठी यांच्यामध्ये ही जी अशी देवाणघेवाण चालली आहे तिचे संशोधन करून संस्कार, प्रेरणा आणि अनुकरण यांचे उगम कोठेकोठे कसकसे दिसतात याचा नीट छडा लागल्याखेरीज मराठी वाङ्मयाचा अभ्यास पूर्ण झाला असे कदापि म्हणतां येणार नाही. हा अभ्यास अशा रीतीने करून अखिल भारताच्या वाङ्मयीन परिस्थितीचे सारग्राही अवलोकन केले म्हणजेच मराठी वाङ्मयांतील प्रकारांचा, प्रवाहांचा व घटनांचा अन्वयार्थ नीट रीतीने लावण्याची भूमिका सिद्ध होईल. मराठी वाङ्मयाचा इतिहासकार होण्याची महत्वाकांक्षा जो बाळगीत असेल त्याने आपली ही सर्व पूर्वतयारी झालेली आहे की नाही याची मनांतल्यामनांत तरी तपासणी करून पहावी. इ. स. १८९० ते १९१० पर्यंत मराठींत जे देशभक्तिप्रचुर भावनाप्रधान वाङ्मय निर्माण झाले त्याचें मूल्यमापन त्याच काळांतील बंगाली वाङ्मयांचे तपशीलवार अवलोकन केल्याखेरीज करतां येणे शक्य नाही. कारण बंगाल्यांतही त्या काळांत तसलेंच भावनांनी सळसळणारे लिखाण बाहेर पडत होतें. नंतर रवींद्रनाथांच्या गीतांजलीने गूढवादाचा गंभीर ध्वनी जो उमटविला त्याचे पडसाद महाराष्ट्रांत घनदाट रीतीने उमटल्याखेरीज राहिले नाहीत. मराठी वाङ्मयांतल्या या गूढवादाच्या लाटेचें समालोचन तत्कालीन बंगीय वाङ्मयाच्या अभ्यासाखेरीज परिपूर्ण होऊं शकेल, असें म्हणण्याचे धाष्टर्य कोण करील ?

आणि हे केवळ आधुनिक वाङ्मयासंबंधानेच खरे आहे असे समजण्याचे कारण नाही. जुनें भक्तिप्रधान संतवाङ्मय पाहिलें तरी भाषेभाषेमधील जिव्हाळ्याचे धागेदोरे ठायीठायीं दिसून आल्याखेरीज राहात नाहीत. श्रीतुकारामांच्या गुरूपरंपरेचा धागा बंगाल्यांतील श्रीकृष्ण चैतन्यापर्यंत जाऊन पोचत असावा असे वाटण्यास आधार आहेत. महाराष्ट्रांतील नामदेव, गुजरातेंतील नरसी मेहता इत्यादि अनेक संतांच्या कवनांचा प्रसार त्या त्या भाषेची कुंपणे ओलांडून फार दूरवर झाला होता, हे सत्य आहे. किंबहुना त्या काळांत सर्व भारतभर भागवत धर्मांचे एकच

पाणी खेळत होते. या अखिल भारतभर वाहत असलेल्या पावन जीवनप्रवाहाची परिपूर्ण जाणीव करून घेतल्याशिवाय मराठीसारख्या कोणत्याहि एका भाषेचा इतिहास लिहिण्याची भूमिका कशी सिद्ध होऊं शकेल ?

तेव्हा भारतांतील भिन्नभिन्न भाषांचे वाङ्मय आणि एकंदर भारतांतील वाङ्मयीन वातावरण यांचा चांगला व्यासंग करून आणि परस्पर संस्कारांचे धागेदोरे समजून घेऊन मगच मराठी वाङ्मयाचा सांगोपांग आणि सोपपत्तिक इतिहास लिहिण्याचें कार्य हाती घ्यावे, तरच तें समाधानकारक होईल, हा सिद्धान्त अगदी पक्का. महाराष्ट्र साहित्य परिषदेने इतिहासलेखनाचा जो महान् प्रयत्न करण्याचे योजिले आहे तो करतांना या संबंधात योग्य ती खबरदारी तिजकडून घेतली जाईल अशी आपण आशा करूं या. ■ ■



टिपण

जे. एल. कार : दी हारपोल रिपोर्ट

विद्यागौरी खरे

हारपोल रिपोर्ट हे पुस्तक म्हणजे जॉर्ज हारपोल नावाच्या टेम्परी हेडमास्तरच्या तीन महिन्याच्या कारीकीर्दीचा आढावा आहे. टॅम्पलिंग सेंट निकोलस ही प्रायमरी शाळा चर्च ऑफ इंग्लंडच्या मदतीवर चालणारी आहे. पहिली ते चौथी चार वर्ग आणि त्याचे चार शिक्षक, एक बॅकवर्ड मुलांचा वर्ग आणि त्याची एक शिक्षिका, आणि एक चौकीदार एवढ्या सहकारी मंडळींबरोबर हारपोलला तीन महिने निभवायचे आहेत. ते तो कसे निभवतो आणि शिक्षक, विद्यार्थी, पालक, शिक्षणाधिकारी या सर्वांना कसं तोंड देतो याची ही कहाणी आहे. शाळा कशा चालवल्या जातात ह्याचं बरचसं विनोदी पण तरीही सत्य चित्रण हारपोल रिपोर्टमध्ये पाहायला मिळतं. शिवाय हारपोलच्या वागण्याबद्दल व महत्त्वाच्या निर्णयांबद्दल एका अनुभवी शिक्षकाचे टीकात्मक विवेचनही हारपोल रिपोर्टमध्ये समाविष्ट केलेले आहे.

शिक्षणाची उलाढाल जिथे चालते अशा संस्थेबद्दल आणि जे ती उलाढाल करतात त्या शिक्षक-विद्यार्थ्यांबद्दल हे पुस्तक असलं तरी शिक्षक म्हणजे काय याची तात्त्विक चर्चा यात नाही. हारपोल स्वतः त्या विषयाचा सखोल विचार करणारा तत्त्वज्ञ वगैरेही नाही, प्रस्थापित शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल करण्याची त्याला आवश्यकताही नाही. तो एक साधा चारचौघांसारखं आपलं काम प्रामाणिकपणे करणारा आणि माणसाच्या स्वभावातील उमदेपणावर आणि चांगुलपणावर भोळेपणाने विश्वास ठेवणारा माणूस आहे. या विश्वासापोटीच शाळेत अनेक वर्षे अस्तित्वात असलेल्या दोन वाईट प्रथा तो बंद करतो. शाळेमध्ये गरीब विद्यार्थ्यांना फुकट जेवण देण्याची पद्धत होती, पण ते घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांना आपली ही दैन्यावस्था घोषित करावी लागे. Free dinner, Sir असं म्हटल्यावरच शिक्षक त्याची फुकट जेवणाऱ्यांच्या रजिस्टरमध्ये नोंदणी करत आणि मग त्याला जेवण मिळे. ह्या पद्धतीमागचा अमानुषपणा जाणवून हारपोल सर्व शिक्षकांना वर्गाच्या हजेरीबुकातूनच अशा विद्यार्थ्यांची हजेरी गाजावाजा न करता लावण्याची विनंती करतो. त्याच्या ह्या विनंतीमागचा सहृदयपणा लक्षात न घेऊन उर्मटपणे त्याला धुडकावून लावणाऱ्या पिंटलसारख्या शिक्षकाला दमदाटी करून तो आपलं म्हणणं मान्य करायला भाग पाडतो.

मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी एक वेगळा वर्ग आणि इतर विद्यार्थ्यांसाठी वेगळे वर्ग अशी फारकत हारपोलच्या शाळेत अनेक वर्षापासून चालू होती. नोकरीला सुरुवात केल्यापासून मिस् टॉलमॅकी ही शिक्षिका त्या वर्गाला शिकवत असे. ह्या प्रथेमागचा निर्दयपणा, लहान वयापासून आपण इतरांपेक्षा मागासलेले, निर्बुद्ध आहोत हे त्यांना बजावून सांगणारी ही प्रथा किती भयानक आहे हे एका चमत्कारीक प्रसंगामुळे हारपोलच्या लक्षात आलं. सुकलेल्या फुलांची एक माळ त्या वर्गात टांगलेली होती. ती माळ व्यवस्थित जतन केली जावी म्हणून एका वेगळ्या सेक्रेटरीची सोय होती. आडून चौकशी करून सुद्धा जेव्हा त्या माळेचे रहस्य उलगडेना तेव्हा हारपोलने मिस् टॉलकॅकीला उघडच त्या माळेबद्दल विचारले. कडवटपणे ती म्हणाली, "ती माळ माझ्या मृतआकांक्षाचं प्रतीक आहे. इथे आल्यापासून मी मागसवर्गीय विद्यार्थ्यांना शिकवत आहे. सुरवातीला अज्ञानापोटी मला माझ्याच नशीबाची कीव यायची - पण आता मला ह्या विद्यार्थ्यांची दया येते. विद्यार्थ्यांमध्ये विभागणी करणाऱ्या ह्या अमानुष प्रथेचा मला तिरस्कार वाटतो." स्वतःचीच शरम वाटून, दुसऱ्या दिवशी एक सर्क्युलर काढून हारपोलने मागासलेल्या विद्यार्थ्यांचा वर्ग नष्ट केला आणि त्या मुलांना इतर वर्गांमध्ये समाविष्ट केलं.

माणसाच्या प्रतिष्ठेवर असलेल्या विश्वासामुळे हारपोलने जरी ह्या प्रथा बंद केल्या तरी ह्याच भावड्या विश्वासापोटी नको त्या क्षेत्रात नको त्या चौकशा करण्याचा खुळेपणाही त्याच्या हातून घडला. शाळेतल्या चौथीच्या वर्गातल्या मुलींचा निकाल सातत्याने वाईट लागत आहे हे लक्षात आल्यावर हारपोल डायरेक्टर ऑफ एज्युकेशनकडे त्यांच्या मार्किंग सिस्टिमबद्दल चौकशी करतो. ही माहिती गोपनीय असते असं सांगून डायरेक्टर ऑफ एज्युकेशन त्याला कटवतो. आपल्याला टाळून हा पोरसवदा हेडमास्तर सरळ डायरेक्टरकडे गेला म्हणून एज्युकेशन ऑफिसर त्याला आपल्या अधिकाराचा बडगा दाखवतो. आणि चुकीचे प्रोसिजर वापरल्याबद्दल त्याचा कार्पोरेटरही रुसून त्याला मदत करायचं नाकारतो.

ह्या घटना आपल्याला नवीन नाहीत. दरवर्षी रिझल्ट लागला की अमुक एका शाळेने आपल्या संस्थेतील मुलांना फक्त गणितातच नापास केले किंवा आपल्या सर्व विद्यार्थ्यांना भाषेत सरसकट ५२ च गुण दिले अशा तक्रारी बोर्डाकडे केल्याच्या बातम्या आपल्याला वर्तमानपत्रात वाचायला मिळतात. २८ मार्कांचाच पेपर सोडवून अमक्याला त्या विषयात ४० मार्क्स मिळाले, किंवा मॅथेमॅटिक्स, केमिस्ट्री, बायॉलजीत ९३% असून फिजिक्समध्ये फक्त ३५% च मार्क्स तमक्याला मिळाले अशा बातम्या भांबावलेल्या आवाजात आणि काळजीच्या सुरात आपली मुलं आपल्याला येऊन सांगतात तेव्हा आपण काय करतो ? शिक्षणाच्या या जगड्व्याळ यंत्रात भरडून निघण्याची वाट पाहात असलेल्या अनेक दळणांच्या डब्यांपैकी एका डब्यातला ज्वारीचा दाणा कसला विरोध करणार ? म्हणूनच हारपोलच्या भावड्या धडपडीचं कौतुक करावं का त्याच्या वेडगळपणाला हसावं हे आपल्याला समजत नाही. शिवाय असा गोंधळ इंग्लंडसारख्या पुढारलेल्या देशातसुद्धा अस्तित्वात आहे हे पाहून मन थक्क होतं. नोकरशाहीच्या हिसक्याने हताश झालेल्या हारपोलचा सहकारी वर्गही प्रतिनिधिक आहे. कुठली तरी पौराणिक आणि कालबाह्य शिक्षणपद्धती वापरणाऱ्या पिंटलपासून सगळ्यांना धक्कादायक वाटणारी आणि न पचणारी आधुनिक पद्धती वापरणाऱ्या मिस् एमा फॉक्सबेरोपर्यंत सगळेजण हारपोलच्या रोजच्या कामात समस्या निर्माण करत असतात.

सहकारी शिक्षकांबरोबरच बऱ्यापैकी जागरूक अशा पालकवर्गाला तोंड देण्याचं कामही त्यालाच करावं लागतं. मुलांना शिक्षा केल्याबद्दल रागावणारे पालक तर सगळीकडेच असतात. पण आई-वडिलांचा अधिकार डावलून टाकण्याचं शिक्षण तुम्ही मुलांना देता अशा नैतिक पातळीवर भांडणारे पालकपण हारपोलला भेटतात. बिलिट नावाच्या एका मगरूर दारुड्याची मुलं हारपोलच्या शाळेत असतात. आपल्या मुलांची आपल्या परवानगीशिवाय ह्या हेडमास्तराने डॉक्टरांकडून तपासणी करवून घेतली ह्यामुळे संतापून बिलिट शाळेत येतो आणि हारपोलला मारायचा प्रयत्न करतो. नेहमीचा सदाचारी, सद्वर्तनी, सुस्वभावी आणि अहिंसावादी हारपोल चिडतो, आणि जवळच्या क्रिकेटच्या बॅटनं बिलिटच्या पार्श्वभागावर मिड्विकेटला एक जोरदार शॉट मारतो. ह्या सगळ्या प्रकरणानंतर बिलिटची बायको मुलीबरोबर निरोप पाठवते, "परत वेळ आली तर असंच फोडून काढा. संसार सुखी करण्याचा एवढाच उपदेश त्याला समजू शकतो."

एक सामान्य दरिद्री वस्तीमधली, चर्चच्या मदतीने चालवलेली शाळा आणि तिचा टेम्परारी हेडमास्तर यांच्याबद्दलच्या कहाणीत एवढं सांगण्यासारखं काय असू शकतं ? कथेला विनोदाची झालर आहे हे तर खरंच - शिवाय शिक्षणाचा विचार विनोदबुद्धी असल्याखेरीज करणं आजकाल शक्यही नाही - पण हारपोलबद्दल आपल्याला जिव्हाळा वाटतो ह्या मागचं प्रमुख कारण तो निर्ढावलेला नाही हेच आहे. त्याला सत्यासाठी झगडावसं वाटतं. चांगल्याचा पाठपुरावा करावासा वाटतो, मुलांना कुणी दुष्टाव्याने वागवलेलं त्याला आवडत नाही - They are your reason for existence, between 9 and 4 — अशी त्याची धारणा आहे. त्याचे वडील एमा फॉक्सबेरोशी बोलताना म्हणतात, "तशी स्वतंत्र विचार करायची वृत्ती त्याच्यात (हारपोलमध्ये) अजूनही आहे फक्त ती सुप्तावस्थेत आहे. ती बाहेर काढली पाहिजे. शाळा कॉलेजातल्या शिक्षणाने ती गाडली गेली आहे. त्या आधी त्याला स्वतःची मतं होती आणि ती बोलून दाखवायचं धाडसही होतं. ह्या शिक्षणाने त्याला जे काही समोर येईल ते

मुकाट्याने गिळायला शिकवलं" थोडेसे मजेने आणि थोडेसे गंभीरपणे केलेले हे विधान शिक्षणाबद्दलचं एक विदारक सत्य आपल्याला विशद करून सांगतं.

शिक्षणाचा हेतू काय? उपयोग काय? ह्या आणि अशासारख्या काही प्रश्नांची चर्चा दोन तीन वर्षापूर्वी माग्रसमध्येच 'प्रियबाई' ह्या पुस्तकाच्या परीक्षणाच्या निमित्ताने आपण केली होती. त्या सर्व चर्चेची पुनरुक्ति करण्याची माझी इच्छा नाही - पण शिक्षणाच्या संदर्भातल्या कुठल्याही पुस्तकाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना ह्या प्रश्नांचा उल्लेखही न करणं कठीण आहे. परंपरा, प्रोसिजर्स, प्रशासन, गव्हर्मेंट रेग्युलेशन्स ह्यांच्या गुंतावळ्यात शिक्षणसंस्था शिक्षण ह्या गोष्टींचा केव्हां विचार करतात? एखाद्या संस्थेत तिथे भरपूर अभ्यास करून घेतला जातो म्हणून मुलांना घातल्यानंतर निश्चिंत झालेले आपण पालक तरी शिक्षणाचा विचार केव्हां करतो? जॉन होल्ट नावाच्या प्रसिद्ध शिक्षण तज्ज्ञाच्या मते शिक्षण ही एक जीवघेणी स्पर्धा झाल्यामुळे त्यात भाग घेणाऱ्या स्पर्धकांचे दोनच वर्ग संभवतात — विजयी आणि पराभूत. आणि इतर स्पर्धांप्रमाणेच ह्याही स्पर्धमध्ये पराभूत स्पर्धकांच प्रमाण नेहमीच जास्त असतं. एकदा पराभूत म्हणून ठप्पा लागल्यावर जग त्याला तशीच वागणूक देतं आणि त्या जगापासून स्वतःला लपवण्यात त्याची बरीचशी शक्ति खर्ची पडते.

हारपोलच्या कार्यावर टीकात्मक विवेचन करणारा तो अनुभवी शिक्षक म्हणतो, "शाळा हा काही कारखाना नाही. मुलांना नवीन अनुभव घेण्याची संधी देण्यासाठीच शाळेचं अस्तित्व असायला हवं."

ह्याउलट मुलांना स्वतंत्र विचारांपासून परावृत्त करण्याचे काम आपल्या शाळांकडून हिरीरीने चालेलेले असते. किंबहुना कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य त्यांना मिळत नाही ना ह्याची खात्री करून घेण्यासाठीच शाळा असतात असं मुलांना वाटल असल्यात आश्चर्य नाही. निबंध पाठ करा, प्रश्नोत्तरे पाठ करा, 'मोठा' ह्या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्द जर 'छोटा' असा शिक्षकांनी सांगितला असेल तर 'लहान' लिहू नका - ते चूक होईल. व्यक्तिमत्वाचा चौफेर विकास जिथे व्हायला हवा तिथे एकाच साच्यातून निघालेली निर्जीव यंत्रं बनतात असं कां? मुलांना विचारस्वातंत्र्यसुद्धा का दिलं जात नाही? स्वातंत्र्य आणि अधिकार याबद्दलच्या आपल्या कल्पनाच अस्पष्ट आणि संदिग्ध आहेत. स्वातंत्र्य ह्याचा अर्थ खूपदा आणि स्वैराचार, अनिर्बंध बेजबाबदार वागणूक असा घेतो. स्वातंत्र्य म्हणजे कुठल्याही बंधनाला विरोध असं आपल्याला वाटतं. ह्या भीतीपोटीच ते नाकारलं जातं आणि शिस्त, आज्ञाधारकपणा ह्या नावाखाली मुलांमधलं चैतन्य आपण मारून टाकतो. हारपोल रिपोर्टच्या सुरवातीला दोन अवतरणे दिली आहेत. टोकुटोमी रोका नावाच्या लेखकाचं विधान आहे -

"It is the death of the spirit we must fear. To believe only what one is taught and brought up to believe, to repeat what one has been told to say, to do only what one is expected to do, to live like a factory - made doll, to lose confidence in one's independence and the hope of better things - that is the death of the spirit."

सगळ्या दोषांचं खापर शाळेवर फोडणं फारसं बरोबर होणार नाही. ह्या काळात तरी शिक्षण ही गोष्ट फक्त शाळेत मिळते असं म्हणणं चुकीचे ठरेल. टी. व्ही., रेडिओ, सिनेमा, वर्तमानपत्र अशा कितीतरी माध्यमातून समाज आपल्यावर एवढा प्रभाव पाडत असतो की शिक्षणाची किंवा संस्काराची जबाबदारी केवळ शाळेची आहे असे मानणं नासमजपणाचं होईल. पण मग ह्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात शिक्षण प्रभावी होण्याचा मार्गच नाही का? सक्तीचं कुठलंही शिक्षण कधी प्रभावी होईल असं मला वाटत नाही. का ह्या प्रणालीतच काही दोष आहे ज्यामुळे विचारपूर्वक ठरवलेली कोणतीही चांगली योजना तावडतोब अयशस्वी ठरते जशी १० + २ + ३ ठरली? बालकमंदिरात काम म्हणजेच खेळ, खेळ म्हणजेच अभ्यास अशी एकत्र सुरूवात केलेलं मूल मोठ्या शाळेत गेल्याबरोबर प्रथम शिकतं ते हे की ह्या तीनही गोष्टी वेगळ्या आहेत. ह्या सगळ्या वस्तू आहेत - त्या भोगल्या जातात. त्यांच्या बदल्यात मार्क, स्तुती, कौतुक, यश ह्या गोष्टी मिळतात. त्याचं कुतूहलच नष्ट होतं. मग शाळेचे तुरूंग होतात. न्यूयॉर्क टाईम्समध्ये

एक बातमी होती. साऊथ कॅरोलिना राज्यातील काही मुलांना जाजने सांगितले - 'तुम्ही शाळेत जा नाहीतर तुम्हांला तुरुंगात जावे लागेल.' त्या मुलांनी विचारही न करता तुरूंगाचा मार्ग पत्करला. आपल्याकडे असं होण्याची भीती नाही. दोन पैकी एका गोष्टीची निवड करायला आवश्यक असलेली स्वतंत्र बुद्धी आपण पहिल्यापासून दडपून टाकली आहे. देहदंडाची शिक्षा शाळा देऊ शकत नाहीत - शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावरही खूपशी मुलं चिकाटीने आपल्यातलं चैतन्य जिवंत ठेऊ शकलेली आपल्याला दिसतात. पण खूपशी मुलं शारीरिक आणि मानसिक भीतिने कायमची करपूनही जाऊ शकतात हे सामर्थ्य जी शिक्षणप्रणाली राबवल्याचा आपण दावा करतो तिच्यामुळेच आपल्याला मिळालं आहे याची जाणीव ठेऊन शाळा कार्य करत राहिल्या तरी खूप झालं - कारण स्वतःच्या स्वरूपात बदल करण्याचे अधिकार इच्छा असली तरी त्यांना नाहीत, स्वतःचे धोरण ठरवायचे अधिकार नाहीत, स्वतःचा शिक्षकवर्ग निवडायचे अधिकार नाहीत. कुठलंही स्वातंत्र्य नसलेल्या ह्या संस्थांकडून स्वतंत्र व्यक्तिमत्वाची मुलं निर्माण होतील ही आशा करणारे आपण हारपोलसारखेच भोळसट आहोत. ■ ■

विद्यागौरी खरे

१९३, सिमेंट रोड, शिवाजीनगर, नागपूर

[सौजन्य : अक्ष त्रैमासिक]



घरदाज संगीतज्ञ

सौ. सुलभा पंडित

संगीतक्षेत्रातले एक नामवंत दिवंगत मर्मज्ञ श्री. वामनराव देशपांडे हे या क्षेत्रातले रसिक समीक्षक; जुन्या पिढीतला एक मानदंड मानावा एवढी त्यांची योग्यता. कै. गोविंदराव टेंबे यांच्याविषयी असे बोलले जाते की, ते बैठकीत आल्यावर, कलाकारापासून, श्रोत्यांपर्यंत सर्वांना एकप्रकारचा वचक वाटे, त्याचप्रमाणे मैफिलीत एकदम रंगही भरे, असा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा लौकिक होता. गोविंदरावांच्या नंतर "वामनराव" ही एक अशी जाणकार व्यक्ति होती की जिच्या आगमनामुळे मैफिल एकदम जागरुक होत असे. हा अधिकार त्यांना त्यांच्या या क्षेत्रातील विद्वत्तेमुळे मिळाला होता.

एवढ्या मोठ्या थोर व्यक्तीशी आपला कधी परिचय होईल, पत्रव्यवहार होईल असे कधी स्वप्नातही वाटले नव्हते. तो केवळ योगायोग असावा किंवा ऋणानुबंध असावा. त्यांच्या "घरंदाज गायकी" या बहुचर्चित पुस्तकाचे वाङ्मयीन परिक्षण "युगवाणी"-मधून माझ्यासारख्या एका लहान व्यक्तीकडून घडले काय आणि त्यानिमित्ताने आमचा पत्रव्यवहार होतो काय सर्वच अगदी अनपेक्षितपणे घडले. माझा अभ्यासविषय जाणून घेऊन त्यांनी मुद्दाम मला भेटीसाठी वेळ दिली. आणि आमच्या चर्चेतून त्यांचे या विषयातले मौलिक विचार माझ्यासंग्रही जमा झाले ही आमच्या भेटीची अमूल्य फलश्रुति आहे असे मला मनापासून वाटते.

"छंदोवती" या त्यांच्या पुणे येथील निवासस्थानी गेल्यावर अगदी आपुलकीने त्यांनी आमचे स्वागत केले. छंदोवती नावाप्रमाणेच ही वास्तु त्यांच्या छंदाने पुलकित झालेली आहे. त्यांच्या नेहमीच्या रियाझाने आणि अध्यापनाने मंतरलेल्या त्या बंगलीत, त्यांच्याकडून अभ्यासपूर्ण विवेचन ऐकणे हा एक आगळावेगळा अनुभव ठरला. त्यांच्या तो सुस्पष्ट, खणखणीत आवाज, ताठ शरीरयष्टी, आणि ऐंशीच्या घरांत वयमान असूनही चालण्याबोलण्यामधला आत्मविश्वास या गोष्टी मनात कायमच्या ठसून गेल्या आहेत. पूर्वीच्या काळच्या, काटक आणि कणखर व्यक्तित्त्वाचा एक नमुना त्यांच्या रूपाने पहायला मिळाला. भेटीची वेळ ठरवून देणे, वक्तशीरपणे पाळणे, हे उतारवयातही त्यांना जमले होते. हा नियमितपणा, ही त्यांच्या आयुष्यामधल्या यशाची गुरुकिल्ली असावी असे सहज मनात आले.

आजच्या सर्व थोर गायक, गायिकांच्या गायकीविषयी त्यांनी लेखन केले आहे. त्यामुळे ही सर्व मंडळी त्यांना खूप मानत असत. पुण्या मुंबईकडे, त्यांच्या जाणकारीविषयी त्यांच्या मैफिलीतील आगमनाविषयी नेहमीच सादर उत्सुकता असे. दुर्दैवाने ते इकडे फारसे आले नाहीत परंतु त्या भागात होणाऱ्या मैफिलीत त्यांचे अस्तित्व नेहमीच मार्गदर्शक ठरले आहे. अशा अधिकारी व्यक्ति नकळत त्या क्षेत्रात फार मोठे कार्य करत असतात.

त्यांच्या "घरंदाज गायकी" या पुस्तकाच्या दोन आवृत्त्या निघाल्या. मराठी वाङ्मयामधल्या आधुनिक संगीत समीक्षेचा तो एक दीपस्तंभ ठरला आहे. "आलापिनी" हे पुस्तकही आपल्या परीने खूप गाजले. त्यातून त्यांच्या लेखणीचा एक वेगळा आणि मनोज्ञ आविष्कार वाचकांना अनुभवता आला. त्यांचे आता इंग्रजी भाषांतरही उपलब्ध झाले आहे. त्यांचे आत्मचरित्रही अलिकडे प्रकाशित झाले असून संगीत क्षेत्रातल्या आणि हिशेब तपासनीसाच्या (सी.ए.) क्षेत्रातल्या अनुभवांचे ते एक अनोखे मिश्रण आहे. "महाराष्ट्राचे संगीतातील कार्य" या ग्रंथाची मौलिकताही वादातीत आहे. व्यावसायिक कार्य बाहुल्यामुळे मैफिली गायक म्हणून ते ख्यात नाहीत तरीपण संगीत क्षेत्रातील मौलिक चिंतन आणि तात्त्विक संशोधनाबद्दल ते जिज्ञासूंना नेहमीच गुरुस्थानी वाटत आले आहेत.

बाटलीबॉय यांच्या कंपनीमध्ये अकौंटन्सीची जबाबदारी त्यांनी सेवानिवृत्त होईपर्यंत पार पाडली.

त्यामुळेच "दि फादर ऑफ इंडियन अकौंटिंग" असा त्यांना लौकिक प्राप्त झाला. एक निस्पृह आणि कर्तव्यतत्पर ऑडिटर म्हणून ते विख्यात होते. या भिन्न क्षेत्रांमध्येही सारखाच अधिकार त्यांनी मिळविला होता, हे विशेष उल्लेखनीय आहे. तरीसुद्धा संगीत हेच त्यांच्या आयुष्याचे ध्येय होते. तसे पाहिले तर त्यांच्या घरातच संगीतकला मुरलेली होती. त्यांचे बंधु इतर अनेक क्षेत्रांमध्ये जसे चमकले तसे संगीतातही. हा त्या बंधूंमधला एक समान घटक होता. त्यामुळे सांगितिक चर्चा ही ओघानेच होत असे.

घरी, पणजोबांपासून सांगितिक आठवणी त्यांच्या संग्रही होत्या. प्रथम वडिलांकडून धृपद गायन त्यांनी आत्मसात केले. कै. रामभाऊ लिमये यांनी त्यांना त्यानंतर प्रोत्साहन आणि मार्गदर्शन दिले. ग्वाल्हेर गायकीचे शिक्षण कै. यादवराव जोशी, कै. शंकरराव कुळकर्णी यांनी दिल्याचे त्यांनी स्वतः नमूद केले आहे. त्यानंतर कै. सुरेशबाबू माने यांच्याकडून किराणा घराण्याचे पद्धतशीर शिक्षण त्यांनी एक तपपर्यंत घेतले. कै. गोविंदराव टेंबे यांच्या सहवासात आल्यानंतर आपल्या या संगीत प्रवासाला निराळे विस्तृत वळण लागल्याची कबुलीही त्यांनी देऊन ठेवली आहे. म. नत्थनखाँसाहेब व श्रीमती मोगूबाई कुर्डीकर यांच्या जयपूर गायकीच्या तालमीचा लाभही त्यांना मिळाला. यामुळे संगीताची चौफेर सौंदर्यदृष्टी त्यांना लाभली असल्यास नवल नाही.

प्रा. बी. आर. देवधर आणि प्रा. अरविंद मंगरुळकर या दोन समानधर्मी स्नेहीमंडळींशी त्यांच्या नेहमीच चर्चा होत. या खेरीज प्रा. फडके आणि बा. सी. मर्ढेकर या साहित्यिकांचे साहित्यही आपण जाणीवपूर्वक वाचले आहे असे वामनरावांनी नमूद केले आहे. या सर्वांतून त्यांची वैचारिक पार्श्वभूमी समृद्ध झाली नसती तरच नवल.

श्री. पु. भागवत, पु. ल. देशपांडे या मंडळींनी सुद्धा कळतनकळत त्यांना विविध क्षेत्रात कार्यप्रवृत्त केले आहे. बी. आर. देवधरांच्या आग्रहास्तव "संगीत कला विहार" मासिकाचे संपादकीय कामही त्यांनी अनेक वर्ष सांभाळले. मुंबई विद्यापीठात संगीतविभाग सुरू करण्यामागेही त्यांचे परिश्रम होतेच. याखेरीज अनेक नवोदितांना मार्गदर्शन करणे. समीक्षकांना प्रोत्साहन देणे या अतिशय मोलाच्या गोष्टी अधिकारवाणीने त्यांनी पार पाडल्या. "साहित्यसंस्कृती मंडळा"च्या कलासमिती-मध्येही त्यांच्या कार्याचा ठसा उमटलेला आहे. संशोधनात्मक कार्याला त्यांचे नेहमीच मार्गदर्शन असे.

हिंदुस्थानी संगीताबरोबरच पाश्चात्य संगीताचाही त्यांनी रीतसर अभ्यास केला होता. "प्रा. अन्टशर लोबो यांच्या मार्गदर्शनाखाली माझी नजर अधिक विस्तृत झाली" असा कृतज्ञतापूर्वक उल्लेख त्यांनी केला आहे. आश्चर्य म्हणजे हेच वामनराव सुंदराबाई जाधव यांच्याकडे लावणी संगीत शिकण्यासही जात असत. ही विविधांगी गान लालसा त्यांच्यातील समीक्षकाला निरंतर जागरुक ठेवण्यास उपयोगी पडली असणार.

या खेरीज अनेक थोरामोठ्यांचा सहवास त्यांना लाभला. त्यामध्ये केवळ संगीत क्षेत्रातीलच मंडळी होती असे नाही. तर बॅ. जयकर, महात्मा गांधी, न. वि. गाडगीळ, अनंत काणेकर, जस्टिस चंद्रचूड, आचार्य अत्रे वा. ना. देशपांडे - अशा अनेक राजकारणी व साहित्यिक मंडळींबरोबर त्यांच्या गप्पा चालत. त्यामुळे त्यांच्याशी संवाद करताना चौफेर गप्पांचा आनंद असे. त्यांच्याशी ज्या थोड्याफार भेटी घडल्या त्यातून त्यांच्या चाणाक्ष बुद्धिमत्तेची तीव्र, स्मरणशक्तीची आणि रसिक वृत्तीची ओळख पटली. एवढ्या वयातही प्रा. मंगरुळकर आणि गोविंदराव टेंबे यांचे जे जे संदर्भ हवे होते ते त्यांनी अगदी तत्परतेने काढून दिले. त्यांच्या आठवणींमध्ये नागपूरच्या कै. बाबूराव देशमुखांच्या तसेच कै. गुरुजी (मधू गोळवलकर) यांच्या आठवणी हृद्य आहेत. वामनराव स्वतः मैफिलीत नंतर गात नसत परंतु अध्यापनाचे कार्य त्यांनी अखेरपर्यंत केले. श्रीमती मंजिरी कर्वे (आलेगावकर) या त्यांच्या शिष्यांपैकी एक. उद्याच्या नवीन गायिकांमध्ये त्यांचा समावेश करायला हवा. त्यांचे शिष्यांना शिकविणेही पुण्यांच्या भेटीत ऐकण्याचा योग आला होता. प्रत्यक्ष गायनाबरोबरच सांगीतिक विचारांची पखरणही मधूनमधून चाले.

गांधर्व महाविद्यालयाने वामनरावांना डॉक्टरेट दिली होती. त्यांच्या संशोधनवृत्तीचा तो सार्थ गौरव

होता. वामनरावांनी उभ्या हयातील उदंड गाणे ऐकले. ज्यांच्या स्मृति आपण आज जपून आहोत त्या भास्करबुवा बखले, बालगंधर्व, टेंबे, अल्लादियाखॉं या मंडळींना त्यांनी मनसोक्त ऐकले. आणि आपल्या साक्षेपी आणि चिकित्सक लेखणीने त्यांना आणि त्यांच्या गायकीला शब्दांकित करून ठेवले आहे हे त्यांचे कार्य वाङ्मयीन दृष्ट्या आणि सांगीतिक दृष्ट्याही मोलाचे आहे. संगीत हाच त्यांचा जिव्हाळ्याचा विषय होता. अखेरपर्यंत ते या संगीताच्या दुनियेतच राहिले. समीक्षा, संशोधन, रसास्वाद, आणि लेखन अशा चतुरंग आविष्कारांनी त्यांनी संगीताची सेवा केली. आणि या चारही क्षेत्रातील आदर्श वृत्तीचा वस्तुपाठ त्यांनी निर्माण करून ठेवला आहे. पुढच्या पिढीला या क्षेत्रात वावरतांना वामनरावांच्या या कलादृष्टीचा आधार घेऊनच वावरावे लागेल. त्यांच्या स्वतःच्या शब्दात सांगायचे म्हणजे "संगीत हा एक न संपणारा शोध आहे. अलीकडेपर्यंत संगीताखेरीज अन्य कोणतेही मूल्य मी मानले नाही. वामनरावांनी अखेरपर्यंत हा न संपणारा शोध घेण्याचा ध्यास धरला. नवी पिढी म्हणूनच या कार्याबद्दल त्यांची ऋणी राहील.

■ ■

सौ. सुलभा पंडित
क्वा. नं.९, व्ही. आर. सी. ई. नागपूर



चिंतनातला परस

अनिकेत

शिष्टाचारातील अपरिहार्यता

दिवसभरातली कामं आटपून शिणलेल्या अवस्थेत मी जेव्हा घरात पाऊल ठेवलं तेव्हा माझ्या बैठकीतल्या गादीवर मुश्रीप्प माझा मित्र, ताणलेल्या चेहेऱ्याने पसरलेला दिसला! क्षणभर सर्वांगातून त्याच्या उपस्थितीने संतापाची लहर उमटून गेली पण दुसऱ्याच क्षणी आज शनिवार असल्याचीही आठवण झाली. तेव्हा आता कुठल्याही कारणाने मुश्रीप्पला टाळणे केवळ अशक्य होते. तो फक्त शनिवारीच 'गप्पा' मारायला येत असे. माझा तो मित्र होता. किंबहुना त्याला मी एकुलता एक मित्र असावा!

त्याची फारशी दखल न घेता मी सरळ स्वयंपाकघरात गेलो. तिथे अधिकच मजेशीर प्रकार बघायला मिळाला. आमचं अर्धांग, अनु चारी ठाव स्वयंपाकात निमग्न दिसली. बरेच दिवसात मी तिला निरखलं नसल्याने, तिथेच रेंगाळत मी तिच्या आतिथ्यसुलभ अशा हालचाली टिपू लागलो. माझ्या उपस्थितीची तिला चटकन जाणीव झालेली दिसली. माझ्या जवळ येत घाईने ती दबकत म्हणाली - "मुश्रीप्प आज मूडमध्ये दिसत नाहीय. सात पासून तुमची वाट बघतोय. झटपट कपडे बदला आणि बसा जरा त्याच्याजवळ!" मी तिच्या या अशा बोलण्याने थक्कच झालो पण माझी नजर तिच्या चेहऱ्यावरून हटत नव्हती. 'अहो, बघताय काय असे! आज वेतानच घ्या, मला वाटतं मुश्रीप्पला तुमची गरज आहे. मी लगेच, येवढं चिकन शिजल्यावर, येतेच!' माझ्या चेहऱ्यावर हसू फुटलं तसा तिचा चेहरा जवळजवळ वेडावाकडा झाला!

'होमवर्क' करणारी मुलं बघत मी कपडे बदलले. दुसऱ्या दिवशीचा संबंध रविवार उंडारायला, दूरदर्शनचे अप्रिय कार्यक्रम बघायच्या कल्पनेने, त्या दोघांची तंद्री माझ्या तिथल्या वावराने जराही भंगली नाही! मी दोघांचंही प्रेमभरानं चुंबन घेतलं पण त्या दोघांच्या प्रतिक्रिया टोकाच्या आणि विचित्रच होत्या! शिशुनं माझ्याकडून दुसऱ्या दिवशी 'इलेक्ट्रॉनिक गेम्स' आणून द्यायचं अभिवचन घेतलं! तर पियानं मला 'घाणेरडे' म्हणत झटकलं! यावेळी मी अहेतूकपणे हसलो आणि शिशुच्या जोडीने उद्या तिला कसे सरप्राइझ देता येईल याचा विचार करीत बैठकीत आलो.

मघापेक्षा मुश्रीप्प बराचसा चेहऱ्यावरून सावरलेला दिसत होता! दीर्घ उसासा टाकीत त्याच्या शेजारी मी ऐसपैस बसत नाही इतक्यात त्याने आधाशासारखी सुरवात केली - "तुझी तब्येत बरी आहे न?" त्याच्या या अगांतूक, निरस प्रश्नाचा विचार करून तो परतवून लावण्यापूर्वीच तो बोलला - "देवा, एक दिवस मी पटकन मरावं!" मला त्याचं वागणं अपरिचित वाटलं. तेवढ्यात घरातला नोकर गोविंद आला. मुश्रीप्पला त्याने सिगरेटची पाकिटं/पानं इत्यादी सस्मित दिलं. गोविंदाच्या हातात काही नोटा आणि चिल्लर मला दिसत होती. तो आत गेल्यावर माझी खात्रीच झाली. मुश्रीप्प अस्वस्थ असल्याने अनुनेच गोविंदला सिगरेटी/पानं आणायला धाडलं असणार! अशा परिस्थितीत अनुच्या आतिथ्यशीलतेला नुसता मोहोर फुटतो. मी सिगरेट ओढत नाही पण मुश्रीप्पच्या बरोबरीने एक काढली आणि त्याच्या सिगरेटीवरून पेटवली. मुश्रीप्पला बोलायला ती अगदी योग्य संधी होती. "म्हणजे तू खरच अस्वस्थ आहेस तर!" मुश्रीप्प मला म्हणाला. मला दुर्लक्ष करताना बघून तो चटकन म्हणाला - धूम्रपानाच्या सवयीने अडचणी मरत नसतात." मुश्रीप्पचं निश्चितच काही बिनसलं होतं. त्याच्या धूम्रपानाकडे जरा बोचकपणे मी बघत राहिलो. संपत आलेली सिगरेट विझवत, हुडहुडी भरल्यासारखं तो पुढे म्हणाला - "माझ्या मुलानं, धनुनं आज मला ताकीद दिलीय. त्याला इतःपर मी सिगरेट पिण्याविषयी काही म्हणालो किंवा 'अक्कल' शिकवायचा प्रयत्न केला तर तो आत्महत्या करून घेईन म्हणाला!" मला ठसकाच

लागला. तशातही त्याचं बोलणं सुरूच होतं. तो म्हणत होता - धनुला त्याच्या आईचीही साथ आहे! मुलांना मी रागवतो म्हणून ती माझा तिरस्कार करते." बराच काळ शांततेत गेला.

पुनः गोविंद ग्लासेस, मद्य घेऊन बैठकीत आला. मद्याची बाटली कडवटपणे हाताळत मुश्रीप्प म्हणाला - "तुझ्याकडे चांगली रम नाही कां?" "अभी लाया साब!" गोविंद चोंबड्यासारखं उत्तरला. मग त्याच्याकडे स्मित करत निर्वात आवाजात मला म्हणावं लागले - "आज तुला चौदा वर्ष जुनी 'रम' पाजतो. दहा वर्ष ती ब्रुवरीजच्या तावडीत आणि चार वर्ष माझ्या घरी!" मी काही बाही बोललो. "याचा अर्थ तू खरंच अस्वस्थ आहेस! घरात तुझं पाऊल पडताच मी ओळखलं ते बरोबरच आहे तर!" क्षणभर मला वाटलं मीच मुश्रीप्पचा पाहुणा आहे! "नाही रे, कुठे काय?" मी त्याची शब्दांची कुरघोडी झटकायला क्षीण प्रयास केला.

तेवढ्यात अनु डाफावली - 'अरे, तुम्ही अजून सुरवात नाही केलीत. कमाल आहे. दिनू, बघ जरा मुश्रीप्पकडे!' मी तिच्याही बोलण्याकडे दुर्लक्ष केलं आणि मुश्रीप्पला म्हणालो - 'तू धूम्रपानाविषयी आणि आत्महत्येविषयी बोलत होतास'

'करेक्ट' एव्हाना त्याने रमचा ग्लास तोंडाला लावला होता. गुंतूनच पडला होता तो त्यात. घरात वटवाघुळाचं पिलू भयभीतपणे भिरभिरत होतं. त्याच्याकडे बघत मनात भयंकर विचार उसळून आला, तसा मी मुश्रीप्पला म्हणालो - 'स्मॅक' घेण्यापूर्वीची तर तयारी तुला यातून सुचवायची नाहीय नं' माझी धडधडती छाती सहजपणे बघत तो म्हणाला - 'करेक्ट, मुलानं माझ्या 'स्मॅक'चा वाटा पळवायला सुरवात केलीय. संडासात जाऊन पितो. तुला सांगतो दिनू, ही आजकालची मुलं, साधा शिष्टाचाराचा गंध नाही त्यांना! जाऊ दे, विसर! जरा शांती मिळावी म्हणून मी तुझ्याकडे येतो. राहून राहिली आत्महत्या. त्याबद्दल तुझ्याशी मी नंतर बोलेन. अनुवहिनी उगाच कंटाळतील!' आणि त्यानं ग्लास एका श्वासात शांतपणे रिता केला.

मला भडभडून आलं. हातातली सिगरेट विझवली. दुसरी पेटवली! वाटलं अनूनं तात्काळ येऊन आम्हा दोघांना गरमगरम वाढावं.

धुलीवंदना

या जगात धुळीचं अस्तित्व नेमकं कधीपासून जाणवायला लागलं, हे शोधणं म्हणजे संशोधनाचा विषय होऊ शकेल! अलिकडे या धुळीला किती अनन्यसाधारण महत्त्व आलंय हे आपल्या लक्षात आलं कां? माणसाच्या आयुष्यात धूळ किती मोठी जागा अडवून बसते आणि आपल्याला याचा पत्ताच नसतो!

त्या दिवशी, ड्रायव्हर सुट्टीवर असल्याने मी माझ्या मुलीला घ्यायला तिच्या शाळेत निघालो होतो आणि सिग्नलवर थांबलो असताना अलग दुनियेची अभिजात पर्वा नसलेले, उघडेबोडके चार सहा वांड पोरं शुभ्रपणे खिदळत समोर आली. गाडीवर कपडा मारायची त्यांच्यात चढाओढ सुरू झाली. मी त्यांच्या तावडीतून निसटून जाऊ नये म्हणून ती मधून मधून माझ्यावर लक्ष ठेवत होती. त्यांचं म्हणणं एवढंच - गाडीवर धूळ आहे आणि ती त्यांच्यापैकी एकाला मी साफ करू द्यावी आणि वर हातावर एखादा कलदारही ठेवावा!


मन धुळीभोवती सावधपणे भिरभिरू लागलं. साचणे हा तर धुळीचा गुणधर्मच आहे. कशी अगदी तुमच्या नकळत धूळ थराथरानं साचत जाते, घरादारात, कानामनात, वागण्याबोलण्यात! सगळीकडे अगदी सत्ताधारी सरकारसारखी! सर्वत्र निर्भय संचार असतो धुळीचा. पण मग जनामनांत सांदीकोपऱ्यात धुळीचं अस्तित्व खुपायला लागतं. ही जाणीवही भोवताली व्हायरस सारखी पसरते. धूळ स्वच्छ करण्याची एकजुटीनं बीजं पडतात. मनमोकळ्या वातावरणात ही मोहिम राबविल्या जाते! ओळखी होतात, गप्पाष्टक झडतात. विषयांची तर मुळीच वानवा नसते. लोकसभेच्या निवडणूकांपासून तर गृहमंत्र्याच्या लपविलेल्या मुलीपर्यंत सगळे हजेरी लाऊन जातात. गंमत येते. शिणवटा पळून जातो. शिवाय तात्पुरता का होइना, भोवतालच्या स्वच्छतेमुळे, लखलखाट असतोच!

मनात उगाच येतं, मुलगी वाट बघत ताटकळत असणार. एरवी मुलांच्या वाट्याला, माझ्यापेक्षा जास्त, स्वतःचे छंदोपछंदी सारे व्याप सांभाळून आमचं गृहमंत्रालय येतं. आज तिनेच (बहुधा चुकून!) मला विचारलं आणि मी वेडा नम्र नवऱ्यासारखा तयार होऊन चटकन निघालोही. 'मी पण बरोबर चलू कां?' हे विचारणंही तिला सुचलं नाही याचा अर्थच ती अजून अचंब्यात असावी! आणि मी - घटकेत समोरचा तांबडा सिग्नल तर कधी ती वांड पोर बघत थांबलेलो!

या मुलांना त्यांचे हक्काचे आईबाप असतील का? असलेत तर ते वा ही मुलं एकमेकांविषयी नेमका काय विचार करीत असतील? माझ्यासारख्याची मुलगी आमचा नेमका काय विचार करीत असेल? तिच्या संवेदनशक्तीवर विशेषतः माझ्यासारख्या कमीत कमी लक्ष देऊ शकणाऱ्या बापाच्या निष्काळजीपणा विषयीची धूळ तर नसेल साचली? रिकामटेकड्या वेळेत मनात डोकावलेले विचार पण त्यांच्या अनपेक्षित थैमानानं मी पार उलटापालटा झालो. घाईघाईनेच खिशातून सापडेल ती नोट काढली आणि एका मुलाच्या हातात जवळजवळ कोंबली. त्यांचा कोलाहल एकाएकी थांबला! नजरेत अनोळखी भाव तरळून गेले. मला त्या अपरिचित नजरेचं विलक्षण अप्रूप वाटलं. तेवढ्यात वाहतूक सांभाळणाऱ्या संबंधित माणसानं मोटारीच्या टपलीत मागेत सांगितलं - "सिग्नल कनेक्शन, लगता है, हेल्ड अप हुवे है, मूव्ह अहेड!" आश्चर्याने, भानावर येत मी गाडी हाकली.

खोलवर वळण घेत मी मोटार मुलीच्या शाळेसमोर थांबवली. वर पायऱ्यांवर एक लहानशी आकृती दिसली. माझी गाडी थांबताच ती उठली. गाडीच्या दिशेने संथपणे येऊ लागली. माझी मुलगीच होती ती. गाडीचं दार उघडत आमची नजरानजर झाली त्यात सिग्नलपाशी भेटलेल्या वांड मुलांच्या हातात नोट कोंबताच जे भाव तरळले तसे काहीसे उमटून गेले - "आर यू क्रेझी, पपा?" म्हणत तिने गाडीचा दरवाजा एखाद्या मोठ्या जबाबदार माणसासारखा संथपणे लावून घेतला. माझ्या जागी बहुधा तिला तिची आई अपेक्षित होती. मी आधी तिला प्रेमभरानं कुरवाळलं तशी ती अवघडून गेली, दरवाज्यांच्या काचा तिने उतरवून ठेवल्या. आपलं बेअरिंग अजिबात न सोडता, स्वरात नेहमीचा उत्साह कायम ठेवीत मला म्हणाली - 'मग व्हॅक्यूम क्लोअर आणायला जातोय नं आता' माझ्या डोक्यात प्रकाश पडला. घरातला गालिचा कधीचा मळला होता, त्यासाठी व्हॅक्यूम क्लोअर आणायला बायकोला घेऊन मी संध्याकाळी जाणार होतो. मनाशी - हंसात मी विचारांचा सांधा जुळवून घेतला आणि मुलीकडे न बघता म्हणालो - 'आज दोन क्लोअर घ्यायचे आहेत. एक गालिच्यासाठी आणि दुसरा एकमेकांना समजाऊन घेताना अडसर होणाऱ्या मनांवरच्या धुळीसाठी!' गाडीचा वेग आपोआप वाढला होता. न राहवून मुलगी किंचाळत उद्गारली - 'शुअर, यू आर क्रेझी, पपा!' आणि माझ्या गळ्याभोवती आपले सडसडीत हात टाकीत ती बेहद्द खूप झाली.

मला पूर्ण खात्री आहे, आम्हाला एकमेकांच्या अडचणींचं मूळ आणि ते नष्ट करण्याचा मार्ग सापडला होता! तोच कैफ आमच्या मनामनातून नुसता ओसंडत होता. काय गंमत असते, नाही! ■ ■



मार्क्सवादी दृष्टिकोनातून 'रणांगण'

डॉ. जयश्री तोटे

दुसरे महायुद्ध सुरू होण्यापूर्वीचा काही दिवसांचा काळ! या काळाच्या पार्श्वभूमीवर आकाराला आलेली ही कादंबरी! या कादंबरीला आस्वादनिष्ठ, कलावादी भूमिकेतून विचार करणाऱ्या समीक्षकांनी अलिकडच्या काळात खूप उचलून धरले. इतकेच नव्हे तर 'रणांगण'ने मळलेल्या वाटेने इतर मराठी कादंबरीने जावे असेही त्यांना वाटते. परंतु गंमत म्हणजे या कादंबरीची अप्रतिमता तिचे अद्वितीय सौंदर्य जाणवायला त्यांना बराच अवधी लागला. रणांगणची पहिली आवृत्ती १९३९ साली निघाली. या कादंबरीची 'वाङ्मयशोभा', 'यशवंत', 'सह्याद्री', 'नयन' यासारख्या नियत-कालिकातून परिचयवजा परीक्षणे येऊन गेलेली आहेत. परंतु १९६२ पर्यंत कुणालाही तिचे सौंदर्य फारसे जाणवले नसावे. ६२ मध्ये गंगाधर गाडगीळांनी प्रथम तिचे विस्तृत विवेचन केले. आणि ६९-७०-७१ मध्ये इतर समीक्षकांनी तिचे दीर्घ विवेचन केले. या सर्वांनी हॅर्टाच्या आत्महत्येला अधिक महत्व दिले आहे. तसेच "युद्ध कालीन परिस्थितीत फुललेले अनोखे प्रीतीचे फुल" म्हणूनही खूप कौतुक केले. या कादंबरीचा परिणाम प्रेमकथा, शोकांत प्रेमकथा असा मोठमोठ्या समीक्षकांवर व्हावा हे त्या कादंबरीचे सामर्थ्य आहे का? माझ्या मते ही कादंबरीतील अत्यंत दुबळी बाजू आहे. कादंबरीच्या शेवटी हॅर्टाने चक्रधराला जी तीन पत्रे लिहिली, त्यातून युद्धकाळात मानवतावादी विचारांची आणि मानवी मूल्यांची कशी गळचेपी होते याची तात्त्विक मीमांसा तिने केली आहे. जर्मन्यांकडून ज्यू लोकांचा नानाविध स्तरावर छळ होतो. या कादंबरीची नायिकासुद्धा 'ज्यू'च आहे. जर्मन्यांच्या द्वेषभावनेतून तिचेही वैयक्तिक जीवन उध्वस्त झाले आहे.

या उध्वस्ततेचा विषाद जागोजागी तिच्या भावुक मनावर काळ्या ढगांसारखा पसरलेला आहे. तिचे संपूर्ण जीवन उध्वस्त करणारा विषाद, तिचे औदासीन्य या कादंबरीचे बलस्थान ठरले असते. वास्तवता ठरली असती. इतकेच नव्हे तर लेखकाने हॅर्टाने प्रेमवियोगाने आत्महत्या केली असे तरी का वाटायला लावावे? आपली ही ढोबळ चूक लेखकाला '५० वर्षानंतर लक्षात आली असावी का? पन्नास वर्षानंतर चार वाक्ये संपादकांनी चुकीनी गाळली असे विधान करून हॅर्टाच्या मृत्यूला लतीफ जबाबदार (अधिक) असल्याची शक्यता निर्माण करून ठेवली आहे.

हा अब्दुल लतीफ भांडवलशाही मनोवृत्तीचे मूर्तीमंत प्रतिक आहे. शोषण, कृत्रिम स्पर्धा, आर्थिक सत्ता, भयाची सर्वसामान्याच्या डोक्यावर सतत टांगती तलवार ठेवणे, ही सर्व भांडवलशाही मनोवृत्ती या बोटीवर लतीफच्या रूपाने अस्तित्वात आहेत. स्त्रियांची अब्रू आणि शांती यांचा लिलाव करणारा हा अब्दुल लतीफ सर्व देशांना युद्धशस्त्रसामुग्री विकणारा दलाल आहे. तो म्हणतो 'आता लढाई होणार निश्चित. एक लढाई झाली तर झागफपेक्षाही मी श्रीमंत होऊन दाखवीन.... I am very happy.... लढाईची सुरुवात अशा दलालांच्या खेपांनीच होत असते. इतकेच नव्हे तर तो चक्रधराशी बोलताना जेव्हा चक्रधर त्याला म्हणतो, 'I hate this business of war तेव्हा चक्रधराला लतीफ म्हणतो, 'Oh! It is lovely business. तोफांचे आवाज ऐकू येत नाहीत म्हणून सगळं व्यवस्थित चाललं आहे असं तुम्ही समजता का? My dear fellow all is war undermask." हेही तो निर्लज्जपणे सांगतो आणि जीवनाची भयप्रदता वरील विकट शब्दात व्यक्त करतो. पण या भांडवलदारी मनोवृत्तीचे हलाहल, अनैतिकता, वास्तवता वाचकांना न जाणवणे हे या कादंबरीचे दुबळेपण आहे की बलस्थान?

इतकेच नव्हे तर चक्रधराची विलासी व भोगवादी प्रवृत्ती वाचकांना चटकन जाणवते परंतु लतीफच्या व्यक्तित्वातील आणि अशा लोकांच्या मनोवृत्तीतून प्रतीत होणारी विकटता अमानवी मूल्ये, त्यामुळे

सर्वसामान्यांच्या जीवनात ओतले जाणारे हलाहल, भय याची वाचकांना जाणीव होत नाही ही या 'रणांगण' नावाच्या कादंबरीची कलात्मकता मानावी का? जीवनाचे वास्तवदर्शन घडविले असते तर यातील भावगर्भता नष्ट झाली असती असे वाटणेही चूक आहे कारण या कादंबरीच्या शेवटी चिकटलेली मोरपिसासारखी वाटणारी तीन पत्रे तात्त्विक व वैचारिक गोष्टींचे विवेचन करते. ही पत्रेही तितकीच भावगर्भ आहेत हे नाकारून कसे चालेल? कमीत कमी शब्दात पाहिजे ती वातावरण निर्मिती करण्याची भावगर्भ क्षमता वेडेकरांजवळ आहे. त्यामुळे उपरोक्त भीतीही निराधार आहे. विचार, तत्त्व आणि भावशीलता यांच्यात जर कलावंत कसलेला असेल तर आपोआपच गोळीबंदपणा निर्माण होतो.

तसेच हॅर्टाची चक्रधरावरील तिला जीव द्यायला लावेल इतकी अतोनात प्रीतीही मला अतार्किकच वाटते. प्रेमभंगाचे दुःख घेऊन, उध्वस्त मनःस्थितीत हॅर्टा जर्मनी सोडून निघालेली आहे. तिची नौकरी, तिचा प्रियकर, घरदार इतकेच नव्हे तर तिचा देशही जर्मनांनी ती ज्यू आहे म्हणून तिच्याजवळून हिसकावून घेतला आहे इतकेच नव्हे तर तिच्या प्रियकराने तिला पाठविलेले शेवटचे पत्रही गेस्टापोच्या गुप्त पोलिसांच्या हाती सापडले आहे त्यामुळे ज्याच्यावर पहिले वहिले प्रेम मनःपूर्वक केले त्या कार्लच्या जीवाचीही तिला शाश्वती नाही. हॅर्टा बुद्धिमान आहे. ती कोणत्याही प्रश्नाच्या मूळांचा शोध घेऊ शकते हे तिच्या पत्रांवरून सूचित होते. अशी ही हॅर्टा आपल्या ७२ वर्षे वयाच्या म्हाताऱ्या आईला घेऊन रांधायला संपूर्ण उध्वस्त मनोवस्थेत निघाली आहे. त्यातच अद्याप तिच्या मालकीचे सामानही तिच्या ताब्यात आलेले नाही. अशी अनंत दुःखजाणीवांनी विद्ध झालेली हॅर्टा, 'आता महायुद्ध नक्की होणार' अशी सर्वत्र दृढ भावना असताना रंगेल चक्रधरासोबत आपण केवळ ११ दिवस आहोत याची पूर्ण जाणीव असतांना प्रेमात पडते. आपल्या प्रीतीला तिने वेगळी प्रेमाची तात्त्विक बैठक देऊन जे भाष्य केले ते सर्व अतार्किकच वाटते. ती म्हणते, "स्त्रीची प्रीती एकदाच उपजते. एकदाच मरते. तिची निष्ठा एकांतिक अढळ असते अशीच तिची श्रद्धा होती." (पृ.क्र. ८०) पुढे कादंबरीच्या शेवटी ते म्हणते "सुस्थित सुरक्षित जीवनातल्या माझ्या भगिनी मला क्षमा करोत. बिचाऱ्या भाग्यवान आहेत त्यांच्या प्रीतीचा ध्रुव अढळ राहतो. भक्तीचे दैवत भ्रष्ट होत नाही. मी स्त्रीच ना? मी का वरे केले असे?.... पुष्कळदा मला वाटते आम्ही बायका पुरुषांवर प्रेम करीत नाही. स्वतःच्या मनोधर्मावर करतो. आमच्या अपेक्षा असतात, आशा असतात त्या पुऱ्या होतील असे दिसते त्या स्थळावर आमचे लक्ष जडते. हरपले तर दुसरे त्याच जातीचे दिसेपर्यंत मन निपचित पडून राहते. दिसल्यावरोबर डोळे उघडून बघते. जागे होते. आम्ही बायका थिल्लर मनाच्या असतो पण स्वार्थाला जागरूक असतो आणि प्रीतीचे दान तर दुसऱ्याच्या तनमनधनाची तुला घेऊनच करतो." हॅर्टाच्या तोंडी हे प्रेमविषयक तत्त्वज्ञान घालून हॅर्टाला स्वदेशीचा परंतु थोडा वेगळा आयाम देण्याचा लेखकाचा प्रयत्न अतार्किक वाटतो. या प्रेमतत्त्वज्ञानातून स्त्रीची निष्ठा, प्रेम एककेंद्री नसते तर ते बहुकेंद्री असते हे प्रेम तत्वज्ञान मान्य केले तरी एखादे हरपले तरी दुसरे त्याच जातीचे शोधणारी ही हॅर्टा दोन दिवसापूर्वीच प्रेमभंगाचे, संपूर्ण उध्वस्ततेचे, उद्याच्या अनिश्चिततेचे दुःख घेऊन प्रवासाला निघाली आहे. तिच्या अबोध मनात प्रियकराच्या मृत्यूचे दुःखही जागे आहेच अशा मनोवस्थेतील हॅर्टाने प्रीती करणे आणि फडके-खांडेकरांच्या नायिकेसारखे प्रेमाचे तत्वज्ञान ऐकविणे हे सर्वच अतार्किक वाटते. त्यात प्रेमवियोगामुळे हॅर्टाला जीव द्यावासा वाटला असे वाटणे तर अधिकच अतार्किक आहे. जीवनाची अशाश्वतता, त्यात तिला आपल्या प्रियकराच्या काही छटा चक्रधरात जाणवल्या असतील म्हणून आणि काळ्या लोकांनी या टेबलवर बसू नये असे सांगताच खवळणारा चक्रधर तिला आवडला असावा, आपल्यावरही याच जातीचा अन्याय होतो आहे पण आपण हतबल आहोत परंतु चक्रधर प्रतिकार करतो म्हणूनही तिला तो आवडला असावा आणि आवडणाऱ्या तरुणाला ती आपले सर्वस्व देते व जीवनाच्या क्षणभंगूरतेवर मात करण्याचा प्रयत्न करते असे आपण का म्हणू नये? ही ढोवळ चूक आता स्वतः लेखकालाही


जाणवली असावी म्हणूनच सुटलेली वाक्ये आता जोडण्याचा त्यांचा खटाटोप चालू असावा. हॅर्टने आत्महत्या करणे हा तर तिच्या जीवनाचा अपरिहार्य शेवट आहे. यापूर्वीही तिने दोनदा आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. आपण तरुण निर्वासित ज्यू स्त्री आहो. आपली कोणीही आणि केव्हाही विटंबना या जहाजावरही करु शकतो हे सत्य तिने जाणले नसावे असे नाही. मग अशा मनोवस्थेतील तरुणीने प्रेमवियोगाच्या दुःखाने जीव दिला असेही वाटणे या कादंबरीचे बलस्थान आहे असे वाटत नाही.

दुसरी गोष्ट म्हणजे समुद्र सर्वांचाच असला तरी या कादंबरीतील वातावरण आपले वाटत नाही. एक दुरस्थ भाव ही कादंबरी वाचताना आपल्याला सतत जाणवतो. त्यामुळे हॅर्टबद्दल करुणा वाटते परंतु शरत्चंद्रांच्या नाटिकेसारखी ती आपली वाटत नाही. त्यातील पाश्चात्य प्रतिमा वाचकांना संदर्भ ठाऊक नसले तर प्रसरण पावत नाहीत. ज्यांनी ही कादंबरी वाचल्यानंतर समीक्षणे वाचली नसतील अशा वाचकांच्या या कादंबरी विषयीच्या प्रामाणिक प्रतिक्रिया जर विचारल्या तर ते या कादंबरीला अप्रतिम वा मराठी कादबरीने तिच्या वाटेवरून जावे असे त्यांना वाटते का याचे उत्तर नकारार्थीच देतील.

तर मग ही कादंबरी का आवडते? या कादंबरीतील वर्णन शैली पसरट नाही. ती एक एका शब्दातून अनेक अर्थ-अन्वयार्थ सूचित करते. शैलीचे वेगळेपण, तांत्रिक वेगळेपण लक्ष वेधून घेते. यातील प्रतिमा-प्रतीके चपखल आहेत. शिवाय तथाकथित हॅर्टच्या प्रेमकथेला महायुद्धातून निर्माण होणाऱ्या दुःख जाणिवांची शोकात्म झालर आहे. मानवी मूल्यांची गळचेपी झाली म्हणजे माणसाची वैयक्तिक विश्वेही कशी उध्वस्त होतात याची दुःखद जाणीव कादंबरीला शोभायमान करते.

डॉ. नाथ पै भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून बोलताना म्हणाले होते की आजच्या सामाजिक-राजकीय जीवनाचे वास्तव दर्शन आपला साहित्यिक घडवीत नाही. त्यातल्या प्रश्नांनी, समस्यांनी तो व्यथित होत नाही. ही सामाजिक दुःखे त्यांना हेलावून सोडीत नाहीत. महायुद्धे, त्याचा मानवी जीवनावरील भीषण परिणाम, भारत-पाक फाळणी, गोवामुक्ती, भारत-चीन युद्ध इ. कितीतरी घडामोडींनी मराठी लेखक फारसा विचलीत झालेला दिसत नाही. आमचे साहित्य जीवनसंदर्भच नाकारते आहे. या कादंबरीच्या पार्श्वभूमीला महायुद्धजन्य परिस्थिती घेतली असल्यामुळे व लेखकाच्या आकर्षक शैलीमुळे तिचे वेगळेपण आकर्षक वाटते. पण वेडेकरांनी वेगळ्या शैलीत, महायुद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवरची ना. सी. फडक्यांची एखादी प्रेमकथा तर ('रणांगण' या नावाखाली) सांगण्याचा प्रयत्न केला नाही ना असे कादंबरी व त्यावरील समीक्षणे वाचताना वाटते. या प्रेमकथेपुढे स्त्रियांची व शस्त्र सामुग्रींची पैसा मिळविण्याकरिता दलाली करणारा लतीफ व युद्ध घडवून आणणाऱ्या व्यक्तींची मनोवृत्ती व कारणे दुर्लक्षित झालेली आहेत. वास्तव भीषणतेचे चित्र रंगविण्याऐवजी या स्फोटक वातावरणातील स्त्री-पुरुषाच्या एकत्र येण्याला प्रेमाचा आयाम लेखकांना द्यावासा वाटला हे कादंबरीतील सामर्थ्य की दुर्बलता? याचाही शोध घेतला पाहिजे.

■ ■



शांता शेळके : एक मुलाखत

डॉ. अक्षयकुमार काळे / वीणा देव

६३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये (पुणे) सादर झालेल्या कार्यक्रमांमध्ये सुविख्यात कवयित्री व गीतकार शांता शेळके यांची एक प्रकट मुलाखत. डॉ. अक्षयकुमार काळे व वीणा देव यांनी घेतली होती.

मनोज जोशी यांनी शब्दांकित करून ठेवलेल्या या मनमोकळ्या गप्पांमधून शांता शेळके यांच्या कवितेचे काही पदर उलगडतात. त्याकरताच प्रकाशित करीत आहोत.

- आपल्या कविता व गीत यांच्या प्रवासाची सुरुवात केव्हा व कशी झाली ?

- माझ्या गीतप्रवासाची सुरुवात माझ्या बाळपणात शोधावी लागेल. माझ्या लहानपणचे संस्कार यादृष्टीने महत्त्वाचे म्हणता येतील. माझा जन्म विणकर समाजातला. खेड - मंचर या भागात बालपण गेलं. लहानपणी कळत-नकळत जात्यावर, लग्न समारंभात, भिकाऱ्यांकडून व नागपंचमीच्या वेळी फेर धरताना अशा अनेक प्रसंगी इतकी गाणी ऐकली की कविता वगैरे कळण्याच्या आधीच 'गाणे' कळू लागले. या श्रवणातूनच गाण्यातला गोडवा, लय, सौंदर्य यांचे संस्कार झाले. शिवाय त्यामुळेच लिहिण्यात सुबोधता आली.

या वयात केलेलं वाचनही महत्त्वाचं ठरलं. मी पुस्तकांच्या सहवासात वाढले. आणि 'हे वाच', किंवा 'ते वाचू नको' असंही कुणी म्हटलं नाही. त्यामुळे 'ब्रह्मचर्य हेच जीवन'," बहकलेली तरुणी' अशीही पुस्तकं मी वाचली. हो, पण त्याचा काही वाईट परिणाम मात्र झाला नाही.

- पुढे वय वाढल्यावर या प्रक्रियेत बदल किंवा सुधारणा कशी होत गेली ?

- माझं संस्कारक्षम वय पुण्यात गेलं. याच वयात मला कवितेबद्दल विशिष्ट जाणीव होऊ लागली. शब्दांबद्दल मला लहानपणापासूनच विलक्षण आकर्षण होतं. अजूनही एखादा वेगळ्या प्रकारचा शब्द सापडला की मला आनंद होतो. शब्द आणि त्याचा नाद, लय यांच्या स्वभावगत ओढीमुळेच मी कवितेकडे सहजरित्या वळले.

आमच्या काळात फडके, खांडेकर, माडखोलकर हे लोकप्रिय लेखक होते. आणि कवितांच्या बाबतीत, आमच्या समकालीन पिढीच्या मनात काव्याबद्दल प्रेम निर्माण करणाऱ्या रविकिरण मंडळाची माझ्यावर जबरदस्त छाप होती. याच सुमारास कधीतरी 'अभिरुची' मासिकात बा. सी. मर्ढेकरांची कविता मी वाचली. आणि मग अभिरुचीत पु. शि. रेगे, मुक्तिबोध, अनिल, इंदिरा, ना. ध. देशपांडे यांच्याही कविता वाचल्या. 'वाचनीय' वयात त्या वाचल्यामुळे त्यांची छाप टिकली.

- कवितेच्या निर्मिती प्रक्रियेबाबत सर्वसाधारण वाचकांना कुतुहल असते. तुमच्याक कविता कशा काय घडत गेल्या ?

- खरं खरं सांगायचं तर माझ्याबाबतीत पूर्वी 'कविता पाडणे' हा प्रकार घडत होता. जास्त लिहिणं म्हणजे अधिक चांगलं अशाप्रकारची कल्पना डोक्यात होती. पुढे अर्थातच् यात बदल होऊन माझ्या निर्मितीमागील जाणिवा बदलत

गेल्या. याबाबतीत 'सत्यकथा'च्या संपादकांनी दिलेल्या सल्ल्याचा मला फायदा झाला. तेव्हाही मी कविता वाचतच होते. जुन्या कवींप्रमाणे बदलत्या प्रवाहानुसार माधव ज्यूलियन, मर्ढेकर, करंदीकर आणि सुर्वे यांच्याही कविता मी आवडीने वाचल्या. हो, पण ग्रेस मात्र मला प्रामाणिकपणे दुर्बोध आहे.

या सुमारास जशी माझ्यातली कवयित्री उमलत होती त्याचप्रमाणे माझ्यातली लेखिकाही जडतघडत होती. एम. ए. झाल्यानंतर मी 'नवयुग' मध्ये काम करू लागले, आणि तिथे आचार्य अत्रे अन् मामा वरेरकर यांचा सहवास मला लाभला. अत्रे म्हणायचे की आपल्या भाषेत रुळलेले वाक्प्रचार नि क्लिष्ट रचना वापरू नये. आपली भाषा कशी साधी, स्वच्छ, सरळ आणि सर्वांना कळेल अशी पाहिजे. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच माझ्या भाषेतील संस्कृतप्रचुरपणा जाऊन ती सुगम, सुबोध झाली.

- तुमच्या प्रेमविषयक कवितांमध्ये धीट शारीरिक शृंगारोल्लेख आढळतो. या बाबतीत संकोचाचं बंधन तुम्हाला आड आलं नाही का?

- स्वतः प्रेम केलं नसतानाही त्या विशिष्ट वयाला अनुसरून प्रेमाचे प्रयोग मी केले. परंतु प्रेमाविषयी लिहायला गुलाबी कागदच वापरावेत वगैरे संकेत मला कधी मान्य झाले नाहीत आणि इतर स्त्रियांप्रमाणे ठाशीव चाकोरीबद्ध आयुष्यही मी फारसे जगले नाही. याशिवाय आवडीपोटी संस्कृत साहित्य मी विपुल वाचले. त्यातील उन्मुक्त प्रतिभाविलासापोटी खुलत जाणारा मोकळा शृंगार माझ्या काव्यात उतरला असावा.

- या धीटपणासारख्या गुणांसाठी तुम्हाला पुरुषी दृष्टिकोन बाणावा लागला का?

- हो ना. मी आधीच सांगितल्याप्रमाणे माझं आयुष्य मी चाकोरीबद्ध जगलं नाही. मुलगी म्हणून आईवडिलांचं दडपण, बंधन माझ्याबाबतीत नसल्यामुळे मी नाही म्हटलं तरी पुरुषवृत्तीची बनत गेले. आणि मला वाटतं, ती वृत्ती माझ्या साहित्यलेखनातही उतरली. उदाहरणच द्यायचं तर कवितेपेक्षा गीतात कल्पनाविस्ताराला अधिक वाव असल्यामुळे माझा कल गीतांकडे झुकला.

लावणी मी लिहिली ती ह्याच प्रवृत्तीतून. शब्दांच्या गंमती करण्याची सवय होतीच. त्यातून आवडलेलं ते सहज निर्माण करण्यासाठी प्रयोग करीत राहिले. पुढे चित्रपटासाठी रचना करण्याची गरज उद्‌भवू लागली आणि सिनेगीतांचा जन्म झाला.

- तुमच्या गीतलेखनाबद्दल जरा सविस्तर सांगा ना! त्यातही; आधी कविता, मग गीतं असं वळण्याला कारण?

- हे पहा, कविता व गीत यांच्यातील मुख्य फरक हा की त्यांच्या गरजा भिन्न आहेत. कविता लिहिताना आत्माविष्कार होतो; तर गीत लिहिताना दुसऱ्याच्या भूमिकेत प्रवेश करावा लागतो, पण तुमचे अनुभव, भावना यांचा प्रभाव त्यावर पडतो. मी गीतलेखन व्यावसायिक गरजेमुळे केलं. पण नंतर या काव्यप्रकाराशी जवळीक निर्माण होऊन मी त्याच्या प्रेमात पडले.

आपण लिहित असताना कागदावरचं गाणं चैतन्यपूर्ण होत जातं हा मला हवाहवासा अनुभव आहे. आणि संगीतकाराच्या गरजेमुळे गीतात बदल करावा लागला तर त्यावेळी स्वतःच्या लेखनाबद्दल 'टची' राहू नये असं माझं मत आहे.

- बरेचवेळा चित्रपटासाठी तयार चालीवर गाणं रचावं लागतं. ही नुसती कारागिरी नव्हे का?

- संगीतकारांच्या चालीवर बांधलेलं गीत लिहायचं म्हणजे बंधन पडतं हे खरंय. पण त्यातही लय आणि नादाची गमतीदार वळणं घेता येतात. ते संगीत शास्त्रीय असलं की आणखी निराळी खुमारी. अर्थात् मला स्वतःला शास्त्रीय

संगीत अथवा राग यांची माहिती नाही, पण समजावं अशी इच्छा आहे.

काही व्यावसायिक गाण्यांतूनही माझ्या मनावरील बाळबोध संस्कार पुढे आलेले दिसतात. 'जिवलगा राहिले रे दूर घर माझे' या गीतातील -

गाव मागचा मागे पडला
पायतळी पथ तिमिरी बुडला
ही घटकेची सुटे सराई
मिटले दरवाजे......

- या ओळींतून गाव मागे पडत जाण्याची अनुभूती आपल्या मनाला स्पर्शत जाते की नाही?

- तुमच्याशी जुळणारा, तुमचा आवडता संगीतकार कोण?

- खऱ्या अर्थाने सूर जुळलेला सोबती संगीतकार म्हणजे हृदयनाथ. दुसरं नाव आठवतं ते वसंत पवारांचं. शिवाय सुधीर फडके, विश्वनाथ मोरे, राम कदम इ. हृदयनाथांचं तंत्र जरा वेगळं आहे. काही वेळेला त्यांच्या अप्रचलित अशा नव्या ढंगांच्या चालींमुळे गाणं पडतंही. 'ही वाट दूर जाते' या गाण्याला त्यांनी आधी दिलेली चाल मला नव्हती आवडली. पण ते गाणं लोकप्रिय झालं.

- गझलांसाठी उर्दू काव्याचं वाचन तुम्ही केलं का?

- नाही. थोडंफार हिंदी सिनेगीतांचं ज्ञान मला आहे, तेवढंच.

- तुमच्या संस्कृत ज्ञानाचा प्रभाव लिहिण्यावर पडला का?

- हो, कळत-नकळत बराच. 'तोच चंद्रमा नभात' ह्या भावपूर्ण गीताचं उदाहरण घ्या. त्याची जन्मकथा अशी की सुधीर फडक्यांना तातडीने एक गीत हवे होते. तेव्हा बी. ए. ला वाचलेल्या 'काव्यप्रकाशातील' एका संस्कृत श्लोकाचं भाषांतर करून गीत रुपांतर केलं. मूळ श्लोकात बाईची पुरुषाबद्दल तक्रारी भूमिका व्यक्त केली आहे. मी श्लोकाचा भावार्थ कायम ठेवून (गीताच्या गरजेमुळे) पुरुषाच्या दृष्टिकोनातून लिहिलं.

- कथा-कादंबरीकडे कशा वळलात?

- मी तिकडे वळले हे खरं असलं तरी ते मला जमलं नाही असं माझं मत. परंतु जे जमत नाही तेही तुम्हाला काही शिकवून जातं. नाही का?

- लिहिण्याकरिता 'प्रेरणा' होणं हा अतिशय महत्त्वाचा मुद्दा. तुमच्या बाबतीत या संदर्भात काय सांगू शकाल? - अंतःप्रेरणा की बाह्यप्रेरणा?

- माझ्या मते, जे जमतं ती प्रेरणा! अंतःप्रेरणा ही निर्विवाद महत्त्वाची आहे. पण म्हणून बाह्यप्रेरणा खरी नराते का? बाह्यप्रेरणा व्यावसायिक वृत्तीपोटी जन्म घेते. तरीही दोहोत खूप फरक आहे असं मी मानीत नाही. तुम्ही ज्याला 'कारागिरी' म्हणता त्यातही सृजनशील निर्मितीला भरपूर वाव असतो. आणि हे बघा, बाह्यप्रेरणा म्हणजे काही देहविक्रयासारखा प्रकार आहे असं समजण्याचं कारण नाही.

- तुमच्या ललितलेखनाकडे वळूया का जरा?

- अवश्य. आपण दुसऱ्याला जे सांगावं असं वाटतं ते प्रकट करण्यासाठी ललितलेखन अजोड आहे. अशाप्रकारे

लिहिण्यासाठी एक विशिष्ट वृत्ती असावी लागते. आता माझं स्वतःबद्दलचं मत सांगायचं तर मी व्यावसायिक लेखिका आहे. वृत्तपत्रलेखनाच्या मांडवाखालून गेल्यामुळे मला फायदाच झाला. स्वतःविषयीच्या अवास्तव कल्पना गळून पडल्या. मला वाटतं, सृजनशील लेखकाने इथला अनुभव घ्यायलाच हवा.

- तुमच्या ललितात स्मरणरंजन फार असतं असा एक आरोप आहे. त्यावर तुमचं मत काय?

- हा आरोप असेल तर मला तो मान्य आहे. याचं स्पष्टीकरण इतकंच की वाढत्या वयात बालपणातले अनुभव जागे होतात. अनेकदा बालपणाच्या झऱ्यावर जाऊन पाणी पिऊन यावं अशी इच्छा मनाच्या कुठल्यातरी कोपऱ्यातून झरतेच की नाही?

- तुमच्या भावविश्वाचा आधार काय?

- याचं उत्तर म्हणून मी माझं मनोगत सांगते. बरेच आधार हे आपण कल्पनेनं मानलेले असतात. आपल्याला खूप गोष्टींची साथ आहे असं आपण गृहीत धरलेलं असतं. मीही निसर्ग, देव आदींना आपला साथीदार, आधार समजत होते. आता हे सारं अर्थशून्य वाटतं. चांगले मित्र किंवा इतर नाती मिळणं हा नशीबाचा भाग झाला. पण आपण एकाकी आहोत हे मला अनुभवातून कळलेलं आहे. स्वतःत गुंतणं हा त्यावर उपाय आहे. कारण ओळखीची माणसे पुन्हा भेटतात ती थोडीफार बदललेली भासतात.

माणूस हा जीवनात मूलतः अगदी एकटा असतो, हेच प्रखर वास्तव आहे.

शब्दांकन : मनोज जोशी
६३, रेशीमबाग, नागपूर



॥ परिचय ॥

आंध्रमधील थोर समाज सुधारक संत

वीर ब्रह्मेन्द्रस्वामी

या देशातील विविध कालखंडातील समाजस्थितीचे अवलोकन करताना असे आढळते की परिवर्तनवादी विचारांना येथे पद्धतशीरपणे अवरुद्ध केल्या गेले आहे. सोज्वळ संस्कृतीच्या नावाखाली प्रतिगामी वा रूढीवादी तत्त्वांनी धुमाकूळ घालून असहाय्य लोकांना जेरीस आणले, रूढी आणि परंपरेच्या नावाने येथे अखंड व अनिर्वंध शोषण होत होते. उच्चनीचता, अस्पृश्यता, कर्मकांड, व्रतवैकल्ये, अंधश्रद्धा, देववाद, अज्ञान यांची घट्ट मगरमिठी समाजावर लादण्यात आली, आणि कायमचे मानसिक गुलाम केल्या गेले. तरी या अशा वृत्तींच्या विरुद्ध छोटे मोठे उद्रेक प्रत्येकच कालखंडात दिसुन येतात. अमानुष रूढींना विरोध करून मानवतेची जपणूक व शिकवण देणारे संत मध्य युगात सर्वच प्रांतात दिसतात. आंध्र प्रदेशात पांचाळ समाजात असेच एक थोर संत होऊन गेले. ज्यांनी सोंगाढोंगापेक्षा माणुसकीला, ज्ञानाला, ऐतखाऊ पुरोहितशाहीपेक्षा श्रमप्रतिष्ठेला महत्त्व दिले. ते महान संत म्हणजे वीर ब्रह्मेन्द्रस्वामी.

ब्रह्मेन्द्रस्वामीची शिकवण, त्याच्या आठवणी, चमत्कार, आंध्रप्रदेशातील घराघरातील विशेषतः बहुजन समाजात, शुद्र अतिशुद्र वर्गात मोठ्या आस्थेने, श्रद्धेने व भक्तिभावाने सांगितल्या जातात. या संताने काही अंशी चौकटी बाहेर जाऊन शिकवण दिल्यामुळे ब्रह्मवृदांनी, विद्वानांनी त्याच्याकडे पाठ फिरविली असावी. पण सामान्य जनामध्ये वीर ब्रह्मेन्द्रस्वामीबद्दल तिकडे प्रचंड भक्तीभाव आढळून येतो. या संतावर आंध्रचे माजी मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांनी जो चित्रपट काढला तो अतिशय लोकप्रिय ठरला. ब्रह्मेन्द्रस्वामी बद्दल जी माहिती उपलब्ध आहे ती प्रचंड चमत्कारांनी भरलेली आहे पण चमत्कार वगळूनही ब्रह्मेन्द्रस्वामीच्या शिकवणूकीची थोरवी जाणवतेच. अशा संताचा परिचय करून देण्याचा हा अल्पसा प्रयत्न.

इ. स. पूर्व सहाव्या शतकात बुद्धाने मोठी वैचारिक क्रांती केली आणिं आपल्या नव्या विचाराने वैदिक तत्त्वज्ञानाला मागे सारले, तर इसवी सनाच्या आठव्या शतकात शंकराचार्यांनी बुद्धाच्या शिकवणूकीमुळे निष्प्रभ झालेले वैदिक तत्त्वज्ञान नव्या स्वरूपात मांडून आणि भारतभर प्रचार करून आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला. तरीही बुद्धाच्या तत्त्वांचा परिणाम त्यांच्या विचारसरणीवर झालाच. म्हणूनच बुद्धतत्त्वांच्या प्रभावामुळे त्यांना "प्रच्छन्न बुद्ध" म्हटल्या गेले.

शंकराचार्यांच्या काळात शिवअद्वैत सिद्धांतही अस्तित्वात होता, परंतु प्रभावी नेतृत्वाचे अभावी किंवा शंकराचार्यांच्या अद्वैत सिद्धातांच्या प्रभावाने या तत्त्वाचा व्हावा तसा प्रचार होऊ शकला नाही. बाराव्या शतकात बसवेश्वरांनी शिवअद्वैत सिद्धांत उचलून धरला व "वीरशैव" संप्रदायाचा पाया घातला आणि या सिद्धांतावर आधारित शोषणरहित समाजाची संकल्पना मांडली. त्यांनी शैवांना वीरशैव म्हणून संबोधिले. कर्नाटकात बाराव्या शतकात वीरशैव संप्रदायाने वैष्णव संप्रदायावर कुरघोडी केली तर तेराव्या शतकात महाराष्ट्रात ज्ञानेश्वराने परंपरागत वैदिक तत्त्वज्ञान शंकराचार्यांच्या अद्वैत सिद्धांताच्या आधारे जनमानसात लोकप्रिय केला. त्यामुळे शैव संप्रदाय हे तूल्यबळ ठरत गेलेले दिसून येतात. या दोन संप्रदायातील वैर विकोपाला गेल्याची उदाहरणे इतिहासात दिसतात. नंतर मात्र शिव आणि विष्णू एकच आहे असे सांगणारे समन्वयवादी संत निर्माण झालेत. विठ्ठलाचे तोंडही न पाहणारा कट्टर शिवोपासक संत नरहरी पुढे बदलला व त्याला विठ्ठलाचे ठायी शिव दिसू लागला. तुकारामाने तर हे

द्वैत संपवूनच टाकले. त्याला जग विष्णुमय भासू लागले विष्णूभक्ती वाढायला जसे वारकरी संत कारणीभूत होते तसेच महाराष्ट्र आणि कर्नाटकात पसरलेले यादवांचे राज्यही तितकेच कारणीभूत ठरले. म्हणून काही वीरशैवाचा प्रभाव कमी झाला नाही. तो कर्नाटकात सोळाव्या-सतराव्या शतकातसुद्धा बराच मोठा होता आणि त्याच बरोबर मूळ शैव संप्रदायही दक्षिणेत आपले स्थान टिकवून होता.

दक्षिणेतील या सर्व संप्रदायांच्या तत्त्वांना घेऊन एका नव्या संताचा-वीरब्रह्मेन्द्र स्वामी अर्थात् ब्रह्मंगारू यांचा उदय झाला. ब्रह्मेन्द्रस्वामीच्या वीर शब्दावरून जसा त्यांचेवर वीरशैवाच्या विचारांचा अंश जाणवतो तसा त्यांच्या चरित्रावरून त्यांच्यात शैव-वैष्णवाचा मेळ ही जाणवतो.

ब्रह्मेन्द्र यांचा जन्म कर्नाटाकत झाला असला तरी त्यांचे कार्यक्षेत्र मात्र आंध्र प्रदेशात होते. ब्रह्मेन्द्रस्वामी हे विश्वकर्म्याचे वंशात जन्मास आले. विश्वकर्मा ही देवता अती प्राचीन, ऋग्वेदपूर्व काळची, असून शिल्पी आणि कारागीर लोकांचे दैवत समजल्या जाते. विश्वकर्म्याच्या वंशजांना आंध्र आणि कर्नाटकात विश्वब्राह्मण पांचाळ असे म्हणतात. असे एक विश्वब्राह्मण दाम्पत्य काशी प्रयाग इ. तीर्थयात्रा करीत भटकत होते. गृहिणी गर्भवती होती. फिरत फिरत सरस्वती नदी किनारी अत्रीमुनींचे आश्रमात आले असता तिने एका अपत्याला जन्म दिला. दुर्दैवाने मुलाच्या जन्माबरोबरच जनकाचे निधन झाले. हा आघात असह्य होऊन मुलाला अत्रीमुनीचे स्वाधीन करून मुलाच्या आईने जलसमाधी घेतली.

आंध्र शंकराचार्यांनी भारतभर हिन्दू धर्मपीठांची स्थापना केली होती. असे अनेक धर्मपीठ कर्नाटकात होते. त्यातील कांही ब्राह्मणाचे अधिपत्याखाली धर्मप्रसाराचे कार्य करीत होते. १७ व्या शतकाचे सुरुवातीस चिकबल्लापूर प्रांतातील नंदीकोंडा गावातील पापाग्नी धर्मपीठाचे अधिपती विश्वब्राह्मण आचार्य वीर भोजयाचार्य धर्म प्रचाराचे कार्य करीत. वीर भोजयाचार्य व त्यांची पत्नी वीर नारायणम्मा यांना संतती नव्हती तेव्हा ते तीर्थयात्रा करीत करीत अत्रीमुनींचे आश्रमात पोहोचले. संतती नसल्याने दुःख घेऊन आलेल्या दाम्पत्यास अत्रीमुनीने दिलासा दिला. स्वतः पालन पोपण करून वाढविलेल्या मुलाला त्यांनी भोजयाचार्यांचे स्वाधीन केले. बालकाला घेऊन हे दाम्पत्य मोठ्या आनंदाने पापाग्नी मठात परतले व त्या मुलाचे नाव "वीर नारायण" ठेवले. हाच बालक पुढे महान ज्ञानी तपस्वी व संत वीर ब्रह्मेन्द्रस्वामी या नावाने लौकिकास आला. अल्पावधीतच वीर भोजचार्य मरण पावले. आणि बारा वर्षाच्या वयातच वीर नारायण तपश्चर्येचा विचार करू लागले पती वियोगाचे पाठोपाठ पुत्रवियोग होणार म्हणून आई वीर नारायणम्मा अतिशय दुःखी झाली. तीची आपली भाबडी इच्छा होती की नारायणाने मोठा झाल्यावर पापाग्नी पीठाचे अधिपती व्हावे व आपल्या शिष्य परिवारासह आदरातिथ्य स्विकारीत राजाचे जीवन व्यतीत करावे. मठाधिपती होण्यात सत्ता, संपत्ती, मानमरातब यांची रेलचेल होती परंतु नारायणाने स्पष्ट नकार दिला. आणि म्हणाला "आई ! मानव कल्याणासाठी मला बाहेर पडलं पाहिजे. कर्तव्यच्युत होऊन बसलेले मठाधिपती प्राचीन् धर्मास विकृत रूप देऊन अधर्माने वागत आहेत. म्हणून लोकनिंदेस पात्र झाले आहेत. अशा वेळेस मठाधिपतींना ताळ्यावर आणायचे सोडून एका मठालाच सर्वस्व मानून त्यातच गुंतणे कितपत योग्य आहे ? या पापाग्नी पीठावर आणखी कोणाची निवड करावी आणि पुत्रमोह सोडून मला जाऊ द्यावे."

वीर नारायण घरातून बाहेर पडले आणि देशाटनाला निघाले. दक्षिणेत रामेश्वर, धनुष्कोटी, श्रीशैलम, महानंदी, यांगटी, चिदंबरम तर उत्तरेत काशी, प्रयाग वगैरे तीर्थक्षेत्री फिरून लोकजीवनाचा अभ्यास केला. अनेक अनुभव गाठीसी बांधले. ज्ञान, भक्ती, योग आणि कर्म यातील रहस्य समजावून घेतले. त्यांनी योगशास्त्राचा सखोल अभ्यास केला आणि फिरत फिरत आंध्रमधील बनगानपल्ली येथे पाहोचले.

बनगानपल्ली येथेच पुढचा चरितार्थ करावा या उद्देशाने त्यांनी अच्चम्मा या कायस्थ साध्वी स्त्रीच्या गाई राखण्याचे काम स्वीकारले. हे काम करीत असतानाच जंगलातील एका गुहेत बसुन त्यांचे मनन चिंतन चाले. अशा त्यांच्या प्रदीर्घ चिंतनातून "कालान" नावाचा ग्रंथ बाहेर पडला. काळाचं अचूक ज्ञान देणारा हा ग्रंथ त्यांच्या

समाजनिरीक्षणाची साक्ष देतो आणि भ्रष्ट आचरणातून मोक्षाचा मार्ग सांगणाऱ्या परंपरागत विचार-आचारावर घणाघाती प्रहार करतो. वीर नारायणानी आपल्या तत्त्वज्ञानाच्या प्रचार आणि प्रसारासाठी केलेला उपदेश ऐकून सारी जनता भारावून जाई आणि त्यांच्या ब्रह्मज्ञानापुढे नतमस्तक होत असे. आता त्यांना लोक ब्रह्मेन्द्रस्वामी म्हणू लागले होते. बुद्ध आणि शंकराचार्य तत्वज्ञानाच्या प्रचारामुळे सन्यासाश्रमाचे महत्व वाढले होते. मोक्षासाठी सन्यास मार्ग स्वीकारणे उचित अशी परंपरा सांगत होती परंतु दक्षिणेत ही विचारसरणी पालटली होती. वारकरी संतांनीही गृहस्थाश्रम स्वीकारून लोकशिक्षणाचे कार्य चालू ठेवले होते. व मोक्षाचे अधिकारीही बनले होते. ब्रह्मेन्द्रस्वामींनीही पेदकोमल ग्राम निवासी शिवकोटय्या यांच्या गोविंदम्मा या मुलीशी विवाह केला. आणि ते गृहस्थाश्रमी बनले. त्याकाळी खरे म्हणजे बालविवाह करण्याची प्रथा होती परंतु ब्रह्मेन्द्रस्वामीनी बालविवाहाला विरोध केला होता व योग्य वयातच विवाहाचा विचार केला होता. या दांपत्यांना गोविंदय्या, सिद्धलिंगय्या, शिवकारय्या, ओंकारय्या आणि पोतुलुरय्या असे पांच पुत्र व वीरनारायणम्मा ही कन्या झाली.

महान शिल्पशास्त्री

ब्रह्मेन्द्रस्वामीनी चरितार्थ चालविण्यासाठी वेद विद्येचा वापर केला असता तर ते मोठ्या सुखाने पोट भरू शकले असते, परंतु वेदविद्या त्यांनी पोट भरण्याचे साधन म्हणून वापरली नाही तर त्यासाठी त्यांनी शिल्पकला निवडली. ब्रह्मेन्द्रस्वामी उत्तम धातुशिल्पी, पाषाण शिल्पी व काष्ठशिल्पी होते. विश्वकर्म्याचा श्रमाचा आदर्श त्यांनी मनी बाणला होता. शरिरश्रमाविना पोट भरणे त्यांना मान्य नव्हते. स्वतःच्या अलौकिक बुद्धिमत्तेने आणि कौशल्याने त्यांनी अनेक शिल्पे, मंदिरे, वास्तू निर्माण केल्या. ज्ञान आणि कर्म यांची सांगड जमल्याविना सफल जीवन जगता येणार नाही ही त्यांची धारणा होती. म्हणून त्यांनी आपल्या आयुष्यात योग साधनेबरोबरच ज्ञान साधना आणि कर्मसाधना चालविली. त्यांनी श्रमाची प्रतिष्ठा वाढविली आणि माणसाला कार्यप्रवण रहायला शिकवलं..कला ही जीवनाच्या उत्कर्षाला आवश्यक आहे तरेच त्यातून मिळणारे अर्थोत्पादन हे ही चार पुरुषार्थपैकी एक आहे ही त्यांची धारणा होती.

आगळा लोकशिक्षक

वनगानपल्लीत वास्तव्यास असतानाच ब्रह्मेन्द्रस्वामीचे लोकशिक्षणाचे आणि लोकजागृतीचे कार्य चालू होते. समाजात दिसणारी असमानता, स्त्रीशूद्रांना विद्या मिळू नये म्हणून अस्तित्वात असलेले धर्माचे नियम त्यांना मुळीच मान्य नव्हते. त्यामुळे त्यांनी दुष्ट चालीरिती विरुद्ध लोकजागृतीचे कार्य सुरू केले. ग्रामदेवतेस (माता) शेकडो बकरे कापून देवीस प्रसन्न करण्याचे दुष्ट कारस्थान त्यांनी जेव्हा बंद पाडले तेव्हा प्रस्थापित उच्चपदस्थ ब्राह्मणांनी त्यांना नाना प्रकारे विरोध केला व त्यांची पर्णकुटी जाळून त्यांना गृहहीन केले. त्यामुळे नाईलाजाने ब्रह्मेन्द्रस्वामीनी वनगानपल्ली सोडुन कंदीमलय्यापल्ली येथे आश्रय घेतला व मठ करून तेथे राहू लागले.

ब्रह्मेन्द्रस्वामींनी सत्पुरुषाचे जीवन आरंभिले होते. त्यांच्या अलौकिक ज्ञानाने लोक त्यांचेकडे आकर्षित होत होते. त्यांचा शिष्य परिवार वाढत होता. मुडुमाला गावातील सय्यद नावाच्या एका मुसलमान मुलाने ब्रह्मेन्द्रस्वामीचे अलौकिक व्यक्तिमत्त्व पाहिले तेव्हापासून तो त्यांचा शिष्य बनून तिथेच राहू लागला. वास्तविक सय्यद गृहस्थजीवन जगणारा होता, त्याचे लग्न ठरले होते. परंतु लग्नाला वस्तूखरेदीसाठी तो बाजाराज गेला असता त्याला कांही भिकारी अत्यंत दीन, भुकेले, गांजलेले व महारोगी दिसले. त्यांना पाहुन माणसाच्या अशाश्वत जीवनाचे भयाण चित्र त्याच्या डोळ्यापुढे तरळले आणि त्यातून बेचैन झालेले सय्यदचे मन ब्रह्मेन्द्रस्वामीच्या भेटीनंतरच शमले. स्वामीनी मोठया आनंदाने एका मुसलमानास आपला शिष्य करून घेतले. पुढे जाऊन तो महान सिद्धपुरुष झाला सारे लोक त्याला सिद्धप्पा म्हणूनच ओळखू लागले. समाजाचे दृष्टीने हिन्दु गुरूचा मुसलमान शिष्य ही घटनाच विचित्र होती. ब्राह्मणवर्गाने सिद्धप्पाच्या शिष्यत्वाला विरोध केला आणि मुसलमानास शिष्य केल्याबद्दल हेटाळणी केली. ब्रह्मेन्द्रस्वामीच्या पुत्रांनाही सिद्धप्पाचे शिष्य होणे आवडले नाही. त्यांनी सिद्धप्पाला पिटाळून लावण्याचा प्रयत्न केला.

सिद्धप्पाच्या मुसलमानी नातेवाईकांनी स्वामीची ढोंगी, पाखंडी म्हणून निर्भत्संना केली. ब्रह्मेन्द्रस्वामींनी लोकांना फसवून आपल्या नादी लावतात अशी सर्वत्र टिका होवू लागली. इस्लामधर्माची शिकवण सोडून मुसलमानांना हिन्दूधर्मतत्व शिकवितो आणि इस्लामचे राज्याविरुद्ध द्रोह करतो अशी तक्रार सय्यदच्या नातलगानी कडप्पा राज्याच्या सिद्धवरमु नवाबाकडे केली. त्यासरशी नवाबाने गुरुशिष्यास तत्काळ हजर होण्याचे फर्मान सोडले. राजाज्ञेप्रमाणे ब्रह्मेन्द्रस्वामी आणि सिद्ध आणि सिद्धप्पा दरबारात हजर झाले.

प्रथमतः नवाब बरेच संतापले होते. त्यांनी सिद्धप्पास धर्मपरिवर्तनाचे कारण विचारले असता "मानवाचा संदेह समूळ नाश करणारा आणि शांती प्रस्थापित करणारा धर्म कोणताही असो तो स्वीकारण्यायोग्य असतो" हे सिद्धप्पाचे बोल ऐकून नवाब संतोष पावला. स्वामींच्या मानवतावादी विशाल दृष्टीकोण, भूतदया आणि समतेचे विचार ऐकून नवाब नतमस्तक झाला. आणि गुरू शिष्याचा योग्य सत्कार करून त्यांना निरोप दिला.

पुष्पगिरी धर्मपीठाची सुधारणा

शंकराचार्यांनी यासाठी धर्मपीठाची स्थापना केली होती की धर्मपीठातून धर्मज्ञानाचे प्रबोधन आणि मार्गदर्शन व्हावे. परंतु प्रत्यक्षात पीठाधिपती संस्कारहीन होऊन आपल्या तुटपुंज्या ज्ञानाच्या तोऱ्यात सामान्य जनांना तुच्छ समजत असत. प्राचीन धर्मपीठ गायत्री, सरस्वती या व्यक्तिरिक्त श्रीशंकराभागवत्पाद यांचे वेळेपासुनच प्रचारात असलेले श्रृंगेरी, पुष्पगिरी इत्यादी पीठ अधिक प्रचारात होते. गायत्री वगैरे धर्मपीठ विश्वब्राह्मणांच्या अधिकारांत होते तर इतर काही पीठ वैदिक ब्राह्मणांच्या अधिकारात होती. पुष्पगिरी धर्मपीठ ब्रह्मेन्द्रस्वामींच्या मठापासून जवळच्याच गावी होते. या पीठाच्या अग्रहाराचे लोक वेद-विद्येने गर्विष्ठ होऊन स्वतःचे कर्तव्य व निहितकर्म विसरून जीवन जगत होते. एकदा ब्रह्मेन्द्रस्वामी आपल्या शिष्यपरिवारासह कडप्पास जात होते. सिद्धप्पाचे इशावास्योपनिषदाचे पठण चालू होते. जेव्हा ते पुष्पगिरी पीठा जवळून जाऊ लागले तेव्हा काही ब्राह्मणांनी त्यांना अडवून जातीपातीवरून वाद उकरून काढला. सिद्धप्पाने बिनतोड उत्तर देताच पंडितवर्ग रागाने आणखी लाल झाला व त्यांनी ब्रह्मेन्द्रस्वामींची निंदा केली. काहींनी तर दगडफेक केली. गुरुपत्नी गोविंदवांम्माना दगड लागल्याने सिद्धप्पा संतप्त झाला होता. परंतु स्वामींनी क्रोध आवरण्यास सांगितले आणि मूढ ब्राह्मणांची चांगलीच कानउघाडणी केली. त्यांच्यातील संस्कारहीनता आणि घमेंडीवृत्ती यावर कोरडे ओढले. स्वामींचे मानवतेने ओथंबलेले वर्तन पाहुन आणि खऱ्या धर्मज्ञानाचा उपदेश एकुन ब्राह्मण वरमले व शरण आले.

जातीपातीच्या उच्चनीच भेदभावामुळे समाजातील शूद्र आणि अस्पृश्य वर्गात असंतोष होता. ज्ञानाची कवाडे त्यांच्या साठी बंद होती. आत्मोद्धारासाठी हिन्दू धर्मातील योग्य शास्त्राचा आणि धर्मग्रंथाचा उपयोग सर्वांना व्हावा असे स्वामींना वाटे. समत्वाची भावना दर्शवितांना स्वामी म्हणत "आकाश काय ठराविक लोकांनाच पांघरते ? अग्नी काय शुद्राच्या घरी पेटत नाही म्हणतो ? पंचमहाभूतात आपपर भेद नाहीत तर मग माणसांनीच का म्हणून भेद पाळावा ?" कक्कया सारख्या चांभाराचे मनात आपण हीन असल्याचे शल्य बोचत होते. समाज आपल्या श्रमाचा पुरेपुर फायदा उचलतो परंतु प्रतिष्ठा मात्र ऐतखाऊंना मिळते ही कक्कयाच्या मनाची व्यथा स्वामींनी पुरेपुर जाणली होती. व त्यालाही इतरांसारखी प्रतिष्ठा असल्याची ग्वाही दिली होती. ब्रह्मेन्द्रस्वामींच्या प्रभावी व्यक्तीमत्वामुळे कक्कया त्यांचा शिष्य झाला.

ब्रह्मेन्द्रस्वामींनी आपल्या सर्व शिष्यासह भारत भ्रमण केले. हिमालयापासून धनुष्कोटी पर्यंत आपल्या तत्वज्ञानाचा व हिन्दुमुस्लीम ऐक्याचा प्रचार व प्रसार केला. आणि आपले जीवनकार्य पुरे झाले असे जेव्हा वाटले तेव्हा वैशाखशुद्ध दशमीला त्यांनी जिवंत समाधी घेतली. त्यांनी नेमकी कोणत्या वर्षी समाधी घेतली याचा उल्लेख सापडत नाही.

सिद्धप्पा हे ब्रह्मेन्द्रस्वामींचे परमप्रिय शिष्य होते परंतु स्वामींचे कनिष्ठपुत्र पोतुलुरय्या सिद्धप्पाचा नेहमी मत्सर

करीत. ब्रह्मेन्द्रस्वामी समाधी घेतेवेळेस पोतुलुरय्याने सिद्धप्पास फुले आणण्यासाठी मुद्दाम बनगानपल्लीस पाठविले. समाधीचे वेळेपर्यंत बनगानपल्लीस जाऊन येणे अशक्य होते परंतु गुरुभक्तीने प्रेरीत सिद्धप्पा फुले आणण्यास गेले व समाधीची वेळ होताच स्वामींनी समाधी घेतली. अशा रितीने द्वेषाने प्रेरीत पोतुलुरय्यानी सिद्धप्पास गुरूचे अंत्यदर्शन होऊ दिले नाही.

स्वामीचे समाधीनंतर गोविंदबम्मा मंगळसूत्र आणि जोडवे हे सौभाग्यलंकार परिधान करीत असे कारण स्वामीचा तसा आदेश होता. वर्षसमारंभासाठी जेव्हा पोतुलुरय्या आणि स्वामीचे काही शिष्य वर्गणी गोळा करायला फिरले तेव्हा सर्वांनी वर्गणी दिली परंतु काही विश्वब्राह्मणांनी गोविंदबम्मानी मंगळसूत्राचा त्याग न केल्यामुळे प्रचलित परंपरा मोडल्याचे सांगुन वर्गणी देण्यास नकार दिला. पोतुलुरय्या लोकाचारास प्राधान्य देणारा होता परंतु ब्रह्मेन्द्रस्वामीची धारणा आणि विचार प्रगतीशील आणि सुधारणावादी होते. स्वामी मेले नसुन समाधिस्थ आहेत असे गोविंदबम्मानी सांगताच पातुलुरय्यानी समाधीवरचा दगड काढून स्वामीची दाढी ओढून त्यांना जागे करण्याचा प्रयत्न केला होता.

ब्रह्मेन्द्रस्वामींचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने कडप्पा जिल्हा आणि आसपासचा प्रदेश होता. त्यावेळेस आंध्रप्रदेशात मुस्लीम राजवट प्रस्थापित झाली होती. महाराष्ट्रात शिवाजीने स्वराज्याचे स्वप्न पूर्ण केले होते. संतांनीही आपले ईश्वराचे ठायी सर्व मानव समान असल्याचे तत्व प्रतिपादन करणे व लोकांत धार्मिक ऐक्य निर्माण करणे चालू केले होते. त्याचा समाजावर चांगला परिणाम होत होता. हे कार्य ते इस्लामचे राज्यातही निर्विघ्न पार पाडीत कारण मुसलमानांना सुद्धा लोकांनी धार्मिक कर्मकांड करीत स्वस्थ बसावे, बंडाळी माजवू नये असेच वाटत असे. ब्रह्मेन्द्रस्वामींनी मात्र केवळ कर्मकांडावर भर दिला नाही तर नवा विचार दिला. लोकांना आळस सोडायला लावला व स्वतः शिल्पकाम करून लोकांना श्रमाची महत्ता पटविली. उद्योगप्रवणता वाढावी म्हणून प्रयत्न केले. समाजकार्य करीत असतांना माणसामाणसातील कृत्रिम भेदांना मूठमाती दिली. आपल्या एकाच समाजासाठी कार्य केले नाही, तर सिद्धप्पा सारख्या मुसलमानास प्रमुख शिष्यत्वाचा मान दिला व हिन्दुमुस्लिमातील उपासना मार्गातील भेद नष्ट केला. स्वजातीय लोकांकडूनच त्यांना जास्त अवहेलना सहन करावी लागली होती. परंतु त्यांनी आपपर भेद न मानता जिथे चुकले तिथे सर्वावर सारखी टीका केली. ब्राह्मण शास्त्रे पुराणे शिकुन सामान्याना तुच्छ समजुन स्वतः ऐदी जीवन जगत. मठाधिपती आपल्या मोठेपणाच्या तंद्रीत वावरत. खोट्या अहंकाराचा बुरखा काढून आणि योग्यवेळी खडसावून सर्वांना लोकसेवेस जुंपण्याचे काम ब्रह्मेन्द्रस्वामींनी केले.

ग्रंथरचना


ब्रह्मेन्द्रस्वामींनी "कालज्ञान" आणि "गोविंदवाक्य" ह्या रचना केल्याचे सांगितल्या जाते परंतु त्यांनी लिहिलेली कालज्ञान रचना शुद्ध स्वरूपात आज उपलब्ध नाही. काळाचं पर्यायानं समाजाचं निरीक्षण करून अचूक निदान त्यांनी आपल्या ग्रंथात मांडले आहेत. समाजातील जातीभेद उच्चनीच वगैरे असमानता आणि स्त्रीशुद्राच्या ज्ञानक्षेत्रात धर्मान आणलेली अडसर काळाच्या ओघात टिकणार नसुन बदलत्या नीति मुल्यानुसार उद्याचे कायदे आणि विचार बदललेले असणार हे लक्षात घेऊन त्यांनी समाजजीवनाची समीक्षा केली. कालज्ञान ग्रंथात त्यांनी म्हटले आहे की "माललकु मंचालु बापलकु पीटलु मालवाडे राज्य मेलेनया" अर्थात शुद्राना मंचक आणि ब्राह्मणांना बसायला पाट मिळेल आणि राज्यसुद्धा शूद्रच करतील.

ब्रह्मेन्द्रस्वामीचे वाङ्मय तेलगु भाषेत असल्याने इतर भाषिकांना त्याचे ज्ञान होऊ शकले नाही. तसेच त्यांच्या मूळ लिखीत रचना ही आज उपलब्ध नाहीत. कंदीमल्लयापल्लीच्या मठात जे काही ग्रंथ उपलब्ध आहे त्याच्या शुद्धतेबद्दल शंका असल्याचे विद्वानांचे मत आहे. त्यांचे वाङ्मय नष्ट होण्याचे आणखी एक कारण म्हणजे ब्रह्मेन्द्रस्वामींना जसा ब्राह्मणांचा कडवा विरोध होता तसा स्वजातीय विश्वब्राह्मणांचाही तेवढाच विरोध होता.

मुसलमानास शिष्य करणे, जातीपाती न मानणे, ब्राह्मणांचे मोठेपण न मानणे व परंपरागत काही प्रथांना झुगारणे इत्यादी त्यांच्या वर्तनामुळे त्यांचे विरोधकही बरेच निर्माण झाले असणार. शिवाय त्यांच्या समाधीनंतर त्यांच्या तोडीचा प्रज्ञाशील शिष्य नसल्याने त्यांच्या तत्वज्ञानास पाहिजे तसा लोकाश्रय मिळाला नसावा. या आणि अशा अनेक कारणाने त्यांचे बहुतांश वाङ्मय लुप्त झाले. परंतु अजुनही कडप्पा जिल्ह्यात ब्रह्मेन्द्रस्वामी आणि त्यांचे परमशिष्य सिद्धप्पा यांच्याबद्दल अनेक गोष्टी ऐकायला मिळतात. त्यांच्या भक्तांनी काही रचना ग्रथित केल्या आहेत. ब्रह्मेन्द्रस्वामीच्या पत्नी गोविंदम्मा आणि त्यांच्या काही पुत्रांनी सुद्धा काही रचना केल्या होत्या. ब्रह्मेन्द्रस्वामीच्या जेष्ठपुत्राच्या कन्या ईश्वरम्मा याचेही गद्य, पद्य, गेय स्वरूपात साहित्य आढळते. ईश्वरम्मानी सुद्धा ब्रह्मेन्द्रस्वामीचा उच्च आदर्श स्वतःत निर्माण केला होता. आजही ब्रह्मेन्द्रस्वामीच्या लोकप्रियतेचे व कार्याचे प्रतीक म्हणुन त्यांचा मठ "ब्रह्मंगारू मठम्" म्हणून प्रसिद्ध आहे. व सर्वजातीचे लोकांना मानवतेची व समतेची प्रेरणा देण्याचे कार्य करीत आहे.

च. ना. चोप्पावार

रविन्द्रनगर, बल्लारपूर.



वाङ्मय संशोधकांचा सोबती

डॉ. वसंत स. जोशी

डॉ. शिवाजीराव चव्हाण

भवसागराच्या वाळवंटावर उमटलेली आपली पावलं मागं वळून पाहण्याचा मोह प्रत्येकालाच केव्हा ना केव्हा तरी होत असतो. मात्र ती पावलं न्याहाळत बसण्यास एखाद्याला उसंतच मिळत नसेल तर हे काम इतरांनी करायला हवं. ते इतरांना मार्गदर्शक ठरते. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात तर आज ही गोष्ट अत्यंत आवश्यक होऊन बसली आहे. संशोधक बुद्धीची जोपासना करून तिची वाढ करणे हे उच्च शिक्षणाचे प्रयोजनच आता लुप्त होत चालले आहे. नोकरीचा हेतू संशोधनाचा राक्षसच याही क्षेत्रात प्रभावी ठरला आहे. अशावेळी या क्षेत्रातील उद्दिष्टावरहुकूम वाटचाल करणारी जी फार थोडी माणसे आढळतात, त्यांमध्ये डॉ. वसंत सखाराम जोशी, वाई यांचा समावेश होतो. त्यांच्या वयाला पासष्ट वर्षे होत असून, त्यांनी मराठी साहित्य व संशोधनाच्या क्षेत्रात उमटविलेल्या पाऊल खुणा, उच्च शैक्षणिक स्तरावर काम करणाऱ्या मराठीच्या प्राध्यापक-शिक्षकांना नक्कीच पथदर्शक ठरतील असा विश्वास वाटतो.

लेखकाची मूल्य सूत्रे

वाई येथील 'किसन वीर महाविद्यालया'त गेली दोन तपे डॉ. वसंत जोशी हे मराठी विभागाच्या प्रमुखपदाची धुरा समर्थपणे सांभाळत आहेत. त्यांचे सगळे भाषा, वाङ्मय आणि संशोधन क्षेत्रातील व्यक्तित्व येथेच फुलले आणि बहरले. त्यांच्या ह्या लेखक म्हणून बहरलेल्या कर्तृत्वाचा आलेख मांडताना, "लेखकाचं आंतरिक व्यक्तित्व, लौकिक व्यक्तित्व व वाङ्मयीन व्यक्तित्व या तीन अपूर्णांकांच्या गुणाकारातून निष्पन्न होईल, ती त्याची कमाई. आणि....." लेखकाच्या सामर्थ्याला व मर्यादांना त्याच्या प्रतिभेची ठेवण, त्याचा कालखंड आणि तत्कालीन वाचक वर्ग हा पुष्कळ अंशी कारणं ठरतो." या वि. स. खांडेकरांच्या दोन्ही सूत्रांची आठवण होते. त्यांच्या आधारेच डॉ. वसंत जोशींच्या लेखक म्हणून उभारून आलेल्या वाङ्मयीन कमाईचे मोल ठरवायचे तर, प्रथम त्यांच्या लौकिक व्यक्तिमत्वाचा आलेख मांडावा लागतो. त्यातून त्यांच्या आंतरिक व्यक्तिमत्वाचा / अंतरंगाचा प्रत्यय येऊ शकेल. त्यांची वाङ्मयीन कामगिरी निरखताना ज्या मर्यादा जाणवतील त्याची कारणेही स्पष्ट होतील.

डॉ. वसंत जोशींचे लौकिक व्यक्तित्व

निपाणी (बेळगाव) जवळील एका लहानशा खेड्यात ९ ऑक्टोबर, १९३० साली, आजोळी डॉ. जोशी यांचा जन्म झाला. दोन्ही घराण्याकडे पारंपारिक जोशकीची वृत्ती चालत आलेली. मुळचे अकोळचे सखाराम जोशी निपाणीत स्थाईक होऊन पारंपारिक वृत्ती सांभाळून होते. भिक्षूकी वृत्तीतून जन्माला आलेल्या कठीण आर्थिक परिस्थितीत जन्मलेल्या या वसंताला पालवी फुटायच्या वयातच-वयाच्या दुसऱ्या वर्षाच्या अखेरीलाच मातेच्या वात्सल्याला मुकावे लागले! दोन वडीलबंधू, बहिणी आणि आजी एवढी खाणारी माणसं आणि कमविणारे एकटे भिक्षुक वडील!! परिणामी सगळ्यांच्याच शिक्षणाकडे वडील लक्ष देऊ शकले नाहीत. स्वतः वसंतरावांचे शिक्षणही उशिराच सुरू झाले. निपाणीमधील इतर मुलांप्रमाणे वसंतरावही 'व्हा. फा.' पर्यंत शिकले. पुढे शिकवायचा वडिलांचा

मानस नाही. हे लक्षात आलेल्या वसंतरावांनी ज्येष्ठ बंधूकडे इंग्रजी शाळेत जायची इच्छा बोलून दाखविली. ज्येष्ठ बंधूंनी छोट्या वसंताची ज्ञानलालसेची आर्त विनवणी मान्य केली. स्वतः काटकसर करून छोट्या भावाला त्यांनी मॅट्रिक केले! या काळात वसंतरावांनी धार्मिक, सामाजिक, वैचारिक आणि ललित साहित्याचे विपुल वाचन केले. त्याला चिंतनाची जोड दिली. जुन्या पोथ्याचा व कागदपत्रांचा संग्रह व अभ्यास करीत बसू लागले!

मॅट्रिक पास झाल्यावर पुढील शिक्षणाचा यक्ष प्रश्न उभा राहिला. पुन्हा वडील बंधूंना "पुढील शिक्षणासाठी पुण्याला जायचे" ही इच्छा बोलून दाखविली. पुण्यातील साहित्यिक वातावरणाचा उपयोग करून घ्यायची इच्छा;' सायन्सचे शिक्षण घेणार असशील तर पुण्यास पाठवितो', या ज्येष्ठ बंधूंच्या अटीमुळे अपुरी राहिली. शेवटी कोल्हापुरात राहून कला शाखेचे शिक्षण घ्यायचा वसंतरावांनी निर्णय केला. हे शिक्षण शक्य तो स्वावलंबनाने पूर्ण करायचे ठरवून, ते कोल्हापूरच्या 'राजाराम कॉलेज'मध्ये दाखल झाले. काही दिवसातच त्यांना कादंबरीकार प्रा. ना. सी. फडके यांच्याकडे लेखनिकाचे कामही मिळाले. महाविद्यालयीन नियतकालिक, वाङ्मय मंडळ या साहित्यिक चळवळीत काम करीत असताना, वसंतराव कथा लेखनाकडे वळले. परिणामी कोल्हापूरच्या दैनिक 'सत्यवादी' च्या रविवार आवृत्तीचे संपादन करण्याचे काम मिळाले. युवक कॉंग्रेसमध्ये सहभागी होऊन राष्ट्र, समाजसेवेत आस्था दाखवू लागले. एक हुशार, उत्साही तरुण म्हणून कोल्हापुरात लौकिक मिळवतच, सन १९५४ साली वसंतराव व ऑनर्ससह बी. ए. झाले! मराठी ह्या विषयात ही पदवी त्यांनी घेतली.

साहित्याची आवड आणि अभिरुची वाढतच राहिली. त्यातून मराठीचे पदव्युत्तर शिक्षण घ्यायचा त्यांनी निर्णय केला. कर्नाटकातील संकेश्वर, धारवाड येथील माध्यमिक शिक्षक म्हणून नोकरी करीत करीतच ते सन् १९५६ साली मराठी या विषयातच एम्. ए. झाले. उत्तम आणि विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून नावलौकिक लाभलेल्या वसंतरावांनी, याच व्यवसायात राहून वाङ्मयीन क्षेत्रात काम करण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे 'कर्नाटक कॉलेज' धारवाड (१९६०-६१), जनता कॉलेज, अर्जुन नगर (१९६१-१९६५) अशी प्राध्यापकी करीत, ते सन १९६५ मध्ये वाईच्या महाविद्यालयात दाखल झाले. येथूनच ते निवृत्त झाले आहेत.

या सुमारे तीन तपांच्या त्यांच्या शिक्षकी जीवनातच त्यांनी सन १९६८ साली 'श्री एकनाथकृत भावार्थ रामायणाचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर संशोधनपर प्रबंध लेखन करून पीएच. डी. पदवी तर मिळविलीच शिवाय शिवाजी विद्यापिठाकडून पदव्युत्तर शिक्षक व संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यताही मिळविली. त्यांच्या हाताखाली चार प्राध्यापकांनी संशोधनपर लेखन करून पीएच्. डी. पदव्याही प्राप्त केलेल्या आहेत. वसंतराव जोशींच्या या शिक्षकी पेशातील वाटचालीबरोबरच त्यांना धारवाडचे शं. बा. जोशी, द. रा. बेंद्रे, संकेश्वरी धोंडोपंत नाईक, निपाणीत शं. आ. परांडेकर, करवीरात, पां. ना. कुलकर्णी, दु. का. संत, प्रा. ना. सी. फडके, सत्यवादीकार बाळासाहेब पाटील आणि वाईमध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, द. वा. पोतदार, ग. ह. खरे, प्राचार्य अ. के. भागवत ही साहित्य आणि संशोधन क्षेत्रातील दिग्गज मंडळी भेटली! या मंडळीच्या सहवासात, मित्रांच्या चर्चात आणि विचारवंतांच्या मार्गदर्शनात आपली वाट धुंडाळत असतानाच वसंतराव जोशींना त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. साधनाताई, मुलगा, तिन्ही मुली, सुनबाई, नातवंडे यांच्या भरल्या संसाराची आनंदी साथही मिळाली!!

आंतरिक व्यक्तित्वाचे पैलू

या लौकिक जीवनात त्यांच्या आंतरिक व्यक्तित्वाचे काही सुप्तपैलू सापडतात. आईच्या अकाली मृत्यूत त्यांच्या अबोल आणि शांत मनोवृत्तीचे मूळ सापडते. वडील आणि मामांच्या धार्मिक पारंपारिक वृत्तीत त्यांच्या शांत आणि सहनशीलवृत्तीची बीजे सापडतात. तर स्वावलंबनाने व परिश्रमाने शिक्षण पूर्ण करण्याच्या मागे घरच्या हलाखीच्या परिस्थितीचे सूत्र सापडते. घरातील धार्मिक संस्कार आणि परिसरातील वातावरणात त्यांच्या सौजन्यशीलतेला अंकुर फुटलेले दिसतात. महाविद्यालयातील वाङ्मयीन अभिरुचीचा पाया त्यांनी केलेल्या वैविध्यपूर्ण वाचनात आहे.

फडक्यांचे लेखनिक व सत्यवादीतील नोकरीत-संपादकीय अनुभवांत-त्यांच्यातील कुशल संपादकाचे गुण पहावयास मिळतात. उत्तम शिक्षक म्हणून जो नावलौकिक मिळाला, त्यात त्यांची संशोधक बुद्धी लपलेली होती. तशीच साहित्याच्या आवडी निवडीत त्यांची चोखंदळ सौंदर्यदृष्टी सापडते. याचीच परिणती म्हणजे मराठीचा यशस्वी, संशोधक वृत्तीचा प्राध्यापक, मार्गदर्शक होण्याच्या धारणेत दिसून येते आहे. घरच्या धार्मिक वातावरणात त्यांच्या संत वाङ्मयावरील प्रेमाचे मूळ आहे. जीवनाच्या एकाकी वाटचालीत त्यांच्या ठिकाणी आढळणाऱ्या सहजीवन व सहिष्णुतेचे धागे असल्याचे ठामपणे सांगता येते. त्यांना सुदैवाने त्यांच्या ह्या आंतरिक व्यक्तिमत्वाला साद घालून पल्लवित करणारी मित्रमंडळी, मार्गदर्शक, आशीर्वाद देण्याचा अधिकार असलेली गुणी माणसे भेटली.

वाङ्मयीन व्यक्तित्व

डॉ. वसंतराव जोशी याच्या वाङ्मयीन व्यक्तित्वाल पहिला वहिला अंकुर फुटला तो ललित वाङ्मयाचा. महाविद्यालयीन शिक्षण घेतानाच त्याचा प्रत्यय आला. 'महाराष्ट्र टाईम्स'मध्ये प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या कथा तत्कालीन मध्यमवर्गीय समाजमानसाचा उत्कट आविष्कार घडविणाऱ्या होत्या. पण त्यांच्या प्रतिभेची बैठकच चिकित्सक संशोधकाची असल्याने, त्याचवेळी ती प्रबल झाली. त्यातच महाविद्यालयीन अध्यापकाची भूमिका पत्करल्याने त्याचा नैतिक आणि आवश्यक विशेष म्हणून, ते मराठी वाङ्मयातील अज्ञात सौंदर्य स्थळे शोधण्यात रमू लागले. मिळतील तेथून जुन्या ग्रंथांची हस्तलिखिते मिळवू लागले. त्यातच एकदा 'मुक्तेश्वरकृत भावार्थ रामायण : उत्तर कांड'चे एक हस्तलिखित हाती पडले! त्याची पाठचिकित्सा करून त्यातील सौंदर्यस्थळे विवरून सांगणारे म्हणून पहिले संशोधनपर पुस्तक, सन १९६२ सालीच त्यांनी प्रसिद्ध केले आहे! 'महानुभाव संत' हा त्यांचा सन १९७२ मधील ग्रंथ त्यांच्या प्राचीन मराठी वाङ्मयावरील निखळ प्रेमाची साक्ष देतो.

या दरम्यान वाईतील प्राज्ञपाठ शाळा मंडळ, विश्वकोश कार्यालय या संशोधनपर कार्य करणाऱ्या संस्थात काम करण्याची संधी त्यांना मिळत गेली. सन १९७० सालातील महाबळेश्वर येथील विभागीय मराठी साहित्य संमेलनाची धुरा समर्थपणे सांभाळल्यामुळे, त्यांच्या कार्यकुशलतेचा मराठीतील नामवंत साहित्यिक, संशोधक, विचारवंतांना प्रत्यय आला. त्याची फलश्रुती म्हणजे 'महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे' या संस्थेच्या कार्यकारी मंडळावर त्यांची चार वेळा (सन १९७३ ते १९८८) निवड झाली! त्यानिमित्ताने 'संशोधन समितीचे प्रमुख' व 'महाराष्ट्र साहित्यपत्रिकेचे संपादक (१९८५ ते १९८८), कार्यवाह (१९८२ ते ८५) आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वाई शाखेचे संस्थापक, कार्याध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी त्यांना मिळाली. 'नवभारत' मासिक आणि 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'च्या त्यांच्या नेटक्या व चोखंदळ संपादनांनी त्यांनी स्वतःचा असा एक स्वतंत्र ठसा उमटविला आहे. तसाच विद्यापीठ पातळीवरील नियतकालिकांच्या संपादनात त्यांनी संपादित, केलेल्या येथील महाविद्यालयाच्या 'कृष्णाई' या नियतकालिकाच्या संपादनाने शिवाजी विद्यापीठाच्या क्षेत्रात एक औत्सुक्यपूर्ण दहशतच निर्माण केली आहे! ही परंपरा आजवर चालू आहे.

डॉ. वसंतराव जोशी शिवाजी विद्यापीठातील मराठी विषयातील पहिले डॉक्टरेट असून, त्यांच्या संशोधनात्मक दृष्टिकोनाच्या फायदा आजवर अनेकांना झाला आहे. त्यांच्याकडे पीएच्. डी. साठी काम न करणारेही त्यांच्याकडे मार्गदर्शनासाठी येत असतात. यात त्यांची उदारता दिसतेच, पण त्याहीपेक्षा त्यांच्या संशोधकबुद्धीची झेप किती उंच आणि सर्वसमावेशक आहे, हे त्यांनी संपादिलेल्या 'भाषा व साहित्य संशोधन' या म. सा. प. च्या त्रिखंडात्मक ग्रंथावरून येते. या ग्रंथांसाठी अनेकांकडून विद्वत्प्रचूर लेख लिहून घेऊन, मराठी भाषा व साहित्यातील अनेक दुर्लक्षित विषय, उपविषय नवोदित अभ्यासकांसमोर मांडलेले आहेत. त्यामागील त्यांची तळमळ आणि निकोप भूमिका त्यांनी या ग्रंथाना लिहिलेल्या विवेचक प्रस्तावनांवरून येते. उच्च स्तरावरील मराठी विषयाच्या अध्यापकांवर त्यांनी करून ठेवलेल हे उपकारच होत.

भारत इतिहास संशोधक मंडळाचे ते सदस्य असून, या संस्थेच्या 'त्रैमासिक'चे संपादक मंडळ, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाची मुखपत्रे 'साहित्य-सहकार' व 'वाचनालय' यांच्या संपादक मंडळावरही त्यांनी काम केले आहे. महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाच्या व पुणे विभाग ग्रंथालय संघाच्या नियामक मंडळावर व कार्यकारी मंडळावरही त्यांनी काम केले आहे. वाईतील लो. टिळक ग्रंथसंग्रहालयाचे कार्याध्यक्ष असताना त्यांनी या ग्रंथालयातील एकोणिसाव्या शतकातील दुर्मिळ ग्रंथांचा ठेवा सुरक्षित करून ठेवला आहे! यामागेही त्यांची संशोधन मार्गदर्शकाचीच दृष्टी दिसून येते. त्यांनी वेळोवेळी लिहिलेल्या शोध निबंधांचा व लेखाचा प्राज्ञपाठशाळा मंडळाने प्रकाशित केलेला, सन १९७६ मधील 'संशोधन साधना' हा ग्रंथ आणि ज्ञानेश्वर जन्मशताब्दी निमित्त 'नवभारत' मासिकाचा त्यांनी संपादित केलेले 'ज्ञानदेव-चिंतन' (१९७६) हे संपादन; डॉ. जोशी यांच्या संत वाङ्मयाकडे पाहण्याच्या त्यांच्या व्यापक भूमिकेची साक्ष देतात! कर्नाटक आणि महाराष्ट्र यांचे सांस्कृतिक अनुबंध लोकांपुढे मांडण्यासाठी त्यांचे व शं. बा. जोशी यांचे प्रयत्न, 'मऱ्हाटी संस्कृती : काही समस्या' या ग्रंथात पहावयास मिळतात! त्यांच्या 'मराठी गौळण' या ग्रंथाने सन १९८९ मधील सर्वोत्कृष्ट कलाकृतीचा नागपूरच्या 'मासरा' संस्थेचा पुरस्कार प्राप्त केला आहे: यातच त्यांच्या स्वतंत्र शोधबुद्धीचे यश सामावलेले आहे! 'एकनाथकालीन मराठी साहित्य' हा त्यांचा नुकताच प्रसिद्ध झालेला ग्रंथ (१९-१०-९०) त्यांच्या कुशाग्र संशोधनाची साक्ष ठरतो.

शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे व पदव्युत्तर अध्यापन व संशोधन मंडळाचे सदस्य या नात्याने त्यांच्या ह्या संशोधकवृत्तीचा ठसा त्यांनी उमटविला आहेच, त्याचबरोबर त्यांनी 'कर्नाटक विद्यापीठा'च्या मराठी अभ्यास मंडळालाही आपल्या कर्तृत्वाने उच्च दर्जा प्राप्त करून दिला आहे. मुंबई, पुणे, नागपूर या विद्यापिठांतर्गत विविध चर्चासत्रे, परिसंवादात सहभागी होऊन तेथेही संशोधनविषयक भूमिका मांडलेली आहे. तंजावर व हैद्राबाद येथील मराठी भाषा व वाङ्मयविषयक कार्याची पाहणी करून त्याचा मराठी माणसांना परिचयही वेळोवेळी करून दिलेला आहे. येथील महाविद्यालयात त्यांनी घडविलेली 'मराठी कादंबरी', 'मराठी कथेची वाटचाल', 'मराठी भाषा व साहित्य संशोधन' या विषयांवरील परिसंवाद, चर्चा मराठीच्या प्राध्यापकांना उपयुक्त ठरल्यात.

अशारीतीने आपल्या वाङ्मयीन कर्तृत्वाने मराठी सारस्वताच्या मंदिरात आपली मोहर लावलेल्या डॉ. वसंतराव जोशींचा उत्साह कायम आहे. सध्या ते सतराव्या शतकातील कवी जगन्नाथ याच्या 'शशिसेना' या संपूर्ण व स्वतंत्र अशा अप्रकाशित ग्रंथाच्या संपादनात व्यग्र असून यापुढे दक्षिण महाराष्ट्रातील उपेक्षित वाङ्मयसेवक व त्यांच्या कलाकृतीवर लेखन करण्याची उमेद ते बाळगून आहेत. यासाठी त्यांनी कोल्हापूर या दक्षिण महाराष्ट्रातील कलापूराची कायमच्या वास्तव्यासाठी निवड केली आहे. याच उत्साहाने त्यांनी निवृत्तीपूर्व हक्काची रजा न घेता शेवटपर्यंत अध्यापन केले आहे.

मर्यादा आणि महत्त्व

डॉ. वसंतराव जोशी यांची ही कमाई एक मराठीचे प्राध्यापक म्हणून सफल संपूर्ण जाहली आहे, असे ते स्वतःही मानणार नाहीत. त्यांच्या या लेखनाचा स्वतंत्रपणे अभ्यास केला असता त्यांच्या या कमाईलाही काही मर्यादा आहेत हे कधी कधी तेही मान्य करतात. त्यांच्या प्रतिभेची ठेवणच मुळी 'भाष्याकाराते वाट पुसत' जाण्याची आहे, असे त्यांच्याविषयी डॉ. सुरेश जोशी यांनी म्हटले आहे. त्यांच्या घरी परंपरेनेच भाष्यकारांना प्रमाण मानण्याची प्रवृत्ती होती. सुदैवाने ते जेथे जेथे गेले तेथेही त्यांना याच परंपराभिमानी मंडळींचा सहवास लाभला. त्यांच्या संस्कारक्षम जीवनाच्या कालखंडाचाही तो परिणाम असावा. प्राचीन मराठी भाषा आणि मराठी साहित्याचा उदय यांच्याविषयी, त्यांच्या घरातून त्यांना जे समजले, त्यांच्या बालपणी सभोवतालच्या वाचकांची जी समजूत होती त्याच्यातून बाहेर पडून त्यांनी मराठी भाषा, मराठी वाङ्मय, वाङ्मयीन प्रवृत्ती यांचा विचार केलेला नाही. ते त्यांना मानवणारेही नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांच्या, 'मराठी गौळण' या ग्रंथातील त्यांची विचारपद्धती. 'गौळण' या प्रकारातील पद्य

रचना मराठी लोकगीतांची परंपरा यांचा काही अनुबंध आहे काय याचा विचारच त्यांनी केलेला नाही. संत एकनाथांनी लोकसाहित्याच्या परंपरेतील 'भारूडा'सारखा रचनाप्रकार हाताळला आहे, तसाच गौळण या प्रकाराचा स्वीकार ज्ञानदेवांपासून मराठी संतांनी स्वीकारला आहे ही वस्तुस्थिती आहे. तीच गोष्ट मराठी ओवी, अभंग व श्लोक या काव्यप्रकारांची आहे. 'गाथा' या लोकगीत परंपरेतून विकसित झालेले हे छंद आहेत. त्याच्यावर महाराष्ट्री अपभ्रंश भाषेतून बंगाली चर्यागीतांच्या पयर छंदाचा प्रभाव आहे हेही त्यांनी लक्षात घेतलेले नाही. घरच्या सनातनी पांढरपेशा संस्कृतीत वाढलेल्या त्यांच्या पिंड प्रकृतीला पोषक अशाच सभोवतालच्या वातावरणात ते रमले. त्यातच त्यांची शोधक दृष्टी खोलवर पोहोचली. या परंपरेने निर्माण केलेल्या वाङ्मयीन प्रवृत्ती की जेथपर्यंत मराठी संशोधकांची शोधबुद्धी जाऊ शकली नव्हती, तेथपर्यंत त्यांनी मराठी भाषेच्या अभ्यासकांना, संशोधकांना, आणि प्राध्यापकांना जाता येईल अशा वाटा मोकळ्या करून दिल्या आहेत. संशोधनात रस न घेता, नवीन काही एक न वाचता वर्गात पाट्या टाकण्यात धन्यता मानणाऱ्या, उच्च शिक्षणातील मूल्यांकडे पाठ फिरविणाऱ्या प्राध्यापकांच्या जमान्यात डॉ. जोशी यांचे हे संशोधन व समीक्षा वाङ्मय म्हणजे 'नव्या प्राध्यापकां'ना खचितच मार्गदर्शक ठरावे.

मराठी भाषा, साहित्य आणि संशोधनाच्या क्षेत्रात त्यांनी जसे एक विशिष्ठ भूमिका घेऊन सातत्याने काम केले आहे, त्याप्रमाणे मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांनी, प्राध्यापकांनी आपापल्या पिंड प्रकृतीला पोषक अशी क्षेत्रे निवडून त्यांच्यावर शोधकदृष्टीने प्रकाश टाकावा, असे मात्र त्यांना मनापासून वाटते. त्यांनी संत साहित्याप्रमाणेच 'महानुभाव पंचकृष्ण : परंपरा व वाङ्मय', 'मराठी आध्यात्मिक शाहिरी : परंपरा व वाङ्मय', 'मराठी ग्रामीण साहित्य' आणि 'मराठी दलित साहित्य' आदि विषयांवर लेखन करण्यास अनेकांना प्रवृत्त केले आहे. मार्गदर्शन केले आहे. याबाबतीतले माझेच उदाहरण बोलके आहे. या संदर्भात ते अप्रस्तुतही ठरणार नाही. 'मराठी आध्यात्मिक शाहिरी : परंपरा व वाङ्मय' या विषयावर मी पीएच. डी. साठी त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करायचे ठरविले. तेव्हा त्याची तयारी करण्यासाठी मी पुण्यातील शाहिरीच्या काही अभ्यासकांना भेटलो. तेव्हा 'शाहिरीत अध्यात्म कसले व कोठे आले आहे', 'ह्या विषयावर कसली पीएच्. डी. करणार?' असे ऐकविले. मीही थोडा नाराज होऊन परतलो. पुण्यातील शाहिरी व प्राचीन वाङ्मयाच्या अभ्यासकांची मते त्यांना सांगून पीएच्. डी. साठी मला वेगळा विषय सुचवा असे सांगितले. तेव्हा मला धीर देऊन काम करत राहा असे म्हटले. एके दिवशी त्यांनी मला दत्तो वामन पोतदार यांच्याशी चर्चा करण्यासाठी नेले. माझी ओळख करून देऊन माझी द्विधा मनःस्थितीही पोतदारांना सांगितली. तेव्हा "माझ्या धीत कुडी हाय तवर मी तुला अंतर देणार न्हाय!" असे म्हणणाऱ्याला अध्यात्म कळत नाही असे जर कोणी म्हणत असेल तर त्याच्या आध्यात्मिक ज्ञानाची कीव केलेली बरी!' अशी पोतदारांकडून मला शाहिरीतील अध्यात्माची पावती देववून डॉक्टर साहेबांनी प्रोत्साहित केले होते. शाहिरी वाङ्मयाच्या संशोधनाची त्यांनी मला जी एक वेगळी दृष्टी दिली त्याची फलश्रुती म्हणजे माझा डॉ. वसंत जोशी संपादित 'मराठी भाषा व साहित्य : संशोधन!, खंड तीन मधील लेख अवश्य वाचावा. तर अशा रीतीने मराठी वाङ्मय व साहित्यातील विविध प्रवृत्तींविषयींची सजगता त्यांनी दाखवून मराठी साहित्यातील संशोधकांचा मार्गदर्शक, प्राध्यापकाच्या संशोधन कार्यातील सोबती ही त्यांची आजवरच्या वाटचालीतील कमाई आहे! ती सर्वमान्य होईल यात दुमत न व्हावे!! ■ ■

डॉ. शिवाजीराव चव्हाण
प्रमुख, मराठी विभाग, किसन वीर महाविद्यालय, वाई (सातारा)

नाट्यवस्तूंचे प्रचंड संग्राहक

श्री. एस. के. पंडीत

नाना ढाकुलकर

एखाद्या छांदिष्टाने जोपासलेला छंद भविष्यकाळात कोणते वळण घेईल हे फक्त भविष्यकाळच सांगू शकतो. एडिसनच्या 'पोरकट' छंदामुळे भविष्यकाळच उजाळून टाकला. तर कोपर्निकसच्या झपाटलेपणातून स्थीर असलेल्या पृथ्वीला कायमचे फिरणे आले.

श्री. श्रीराम कृष्ण पंडीत हे असेच एक नाट्यछंदी. एका 'अव्यापारेपु' छंदाने पुरते झपाटून गेले आहेत. अव्यापारेपु एवढ्याच करिता म्हणायचे की या छंदाचा ऐहिक लाभ त्यांना काय मिळेल यांचे त्यांनी गणितच मांडले नाही. एखाद्याने सहज म्हणून आंब्याची कोय लावावी, त्याची निगराणी करावी आणि फळे मात्र नातवंडांनी खावी ! असाच श्री. पंडीतांचा छंद आहे. एनकेनप्रकारेन जगातील वस्तू गोळा करून हैदराबादचे नवाब सालारजंग यांनी आपले प्रचंड वस्तू संग्रहालय उभारले. आज ते संग्रहालय भारताची मानबिंदू ठरले आहे. श्री. पंडीतांच्याही छंदाला भविष्यकाळ प्रचंड प्रतिसाद देईल.

मुळात महाराष्ट्रीयन असलेल्या श्री. श्रीराम कृष्ण पंडीतांचा जन्म कोचीन येथे झाला. शिक्षणही तेथेच झाले. मुंबईच्या टाटा इंस्टीट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च या संस्थेत इलेक्ट्रॉनिक्सचे इंजिनियर या पदावर रुजू झाल्यापासून त्यांचे मराठीपण अंकुरत गेले. आता ते संपूर्ण महाराष्ट्रीयन झाले असूनही स्वतःला केरळी मानतात. मुळात त्यांचे घराणेच संगीत नाटकाचे रसिक. काही तबकड्या, पुस्तके गोळा करण्याची सहज आवड ! पण यातूनच श्रीराम पंडीतांना नाट्यवस्तू गोळा करण्याचा छंद जडला. नाट्यविषयावरील सर्व प्रकारचे साहित्य-मुद्रित, हस्तलिखित नाटिका नाटके, समिक्षणे, नाट्यपदे, तबकड्या, पडदे, पत्रव्यवहार, दिग्दर्शकाच्या टिपण्या, चित्रे, इतर नाट्यतंत्र-विषयक ग्रंथ इत्यादी मिळेल त्या वस्तू स्वखर्चाने मिळवून सालारजंगी म्युझियम उभारण्याचे व्रत अंगिकारले आहे. सुरुवातीस मराठी पुरताच छंद होता परंतु आता सर्व भाषेतील वस्तू, साहित्य मिळविल्या आहेत. कुलाबा- मुंबईतील त्यांचे घर म्हणजे नाट्यवस्तूंचे अजायब घर झाले आहे. प्रत्येक खोल्या, गॅलरी, पलंगाखाली, स्लॅब, रॅक, भिंती वगैरे जागा नाट्य बोलतात, आलापतात. भूतकाळातील पूर्वसुरींशी सुसंवाद साधतात, वर्तमान काळातील कलावंताचे कौतुक टिका टिपणी करतात, धडे देतात आणि गर्भातील नाट्यसम्राटांना मार्गदर्शन करतात. घरातील जागा अपुरी पडल्यामुळे त्यांनी नाट्यरसिक मित्रांची घरेसुद्धा वेठीस धरली आहेत. या त्यांच्या एकपात्री प्रयोगास प्रचंड प्रतिसाद मिळाल्यानंतर १९८१ मध्ये 'रामनाथ पंडीत भारतीय रंगभूमी मूलभूत संशोधन केंद्र, पनवेल' असे नामकरण त्यांनी केले.

केंद्राचा खजिना

खालील आकड्यावरून त्यांच्या आजच्या संग्रहाची कल्पना येऊ शकेल.

मराठी नाटके ५४००, हिंदी ८००, संस्कृत १५०, गुजराथी ८००, इंग्रजी ६००, अन्यभाषी ५००, मराठी संदर्भ ग्रंथ ३५००, इंग्रजी ४०००, जुन्या मराठी मासिकांचे अंक १०००, ध्वनीमुद्रित नाटके ५००, ध्वनीमुद्रित नाट्य पदे १५००, ध्वनीमुद्रित मुलाखती १५००, जुन्या ग्रामोफोन तबकड्या १५००, छायाचित्रे २०००, हस्तलिखिते ३००, वृत्तपत्रातील कात्रणे ५०००, १९ व्या शतकातील हजारो ग्रंथ, १७८० मधील हस्तलिखित भगवद्‌गीतेची प्रत, नामवंत साहित्यिकांनी, कलांवतांनी, संस्थांनी भेट म्हणून दिलेले दुर्मिळ ग्रंथ. त्यात प्रामुख्याने कै. कृ. बा. मराठे, भा. वि. वरेरकर, अ. सी. केळूस्कर, गोविंदराव टेंभे, स. अ. शुक्ल, गणेश शास्त्री फाटक, बापूराव माने, राजकवी यशवंत, केशवराव दाते, मो. ग. रांगणेकर इत्यादींचे ग्रंथ आहेत.

अनुक्रमणिका

सहयोग प्रतिसाद

नुकतेच भेट मिळालेल्या साहित्यात उल्लेखनीय म्हणजे श्री. म. ज. देसाईकडून ग्रामोफोन व जुन्या गाण्याच्या तवकड्या जनार्दन महादेव लिमये, कर्वे रत्नागिरीकडून १९ व्या शतकातील दुर्मिळ नाटके, ग्रंथ, प्रभात फिल्मचे विनायकराव घोरपडे, कोल्हापूर कडून चित्रपट विषयीचा सर्व पत्रव्यवहार, पुस्तिका, जाहिराती मिळाल्या. नाशिक-मधून तर एक गुप्त खजिनाच मिळाला. अडगळीत ठेवलेली १८९७ मधील दुर्मिळ नाटके, कागदपत्रे, हस्तलिखिते ग्रंथ मासिके जी आज क्वचितच पाहायला मिळतील. पुण्यावरून ५० हस्तलिखित नाटके मिळाली. प्रस्तुत लेखकाने प्रकाशित केलेल्या एका पत्रावरून विदर्भातील लेखक कलावंतांनी प्रतिसाद दिल्याचे पंडीत कळवितात.

श्रीमती ज्योत्स्ना भोळे, श्री. र. गो. देसाई, श्री. एस. पी. राव वेळगाव, श्री. राम पटवर्धन, श्रीमती आइशाबाई अल्ली मोहमद यांचे व्यक्तिगत ग्रंथदान मिळाले. तसेच धुतपापेश्वर ग्रंथालय, विष्णूप्रसाद ग्रंथालय, सारस्वत ब्राह्मण समाज ग्रंथालय, गोवा हिंदू असोसिएशन ग्रंथालय, मौज प्रकाशन गृह यांचेकडून साहित्यविषयक बहुमोल मदत केंद्रास झालेली आहे. प्रत्यक्ष आर्थिक मदत एच. आय. सी. ओ. अभ्यंकर ट्रस्ट आणि स्टेट बोर्ड फॉर लिटरेचर अँड कल्चर्स यांचेकडून झाली आहे परंतु शासकीय अनुदान किंवा कोण्या लक्षाधिशाकडून आजतरी आर्थिक मदत झालेली नाही. पुढे कदाचित होईलही. पत्रव्यवहार, प्रवास, खरेदी, झेरॉक्स वगैरे खर्च स्वतः पंडीतच करीत असतात. आणखी प्रतिसाद मिळाल्यास केंद्रासाठी ठेव योजना सुरू करणार आहे. ठेवीच्या व्याजातून इतर खर्च, नवीन प्रकाशने करण्याचा विचार आहे.

वृत्तपत्रांनीही पंडीतांच्या कार्याची दखल घेतली आहे. विशेषतः लोकसत्ता (१३.११.८८) फ्री प्रेस जर्नल ३०.१.८९ महाराष्ट्र टाईम्स (२९.६.८९) एकॉनॉमिक टाईम्स, सकाळ, लोकमत औरंगाबाद, नागपूर इत्यादी बऱ्याच वृत्तपत्रांनी केंद्राला सहाय्य व्हावे म्हणून ओळख करून दिलेली आहे.

केंद्राने सल्लागार मंडळ स्थापन केले असून डॉ. श. वि. गोखले, श्री. सी. एन. हुन्नरगीकर, श्री. ज. स. सुखठणकर, श्री. वी. बी. त्रिवेदी यांच्या सल्ल्याने केंद्राने कार्य चालत आहे. केंद्राचे ट्रस्टी श्री. सी. एन. हुन्नरगीकर, सौ. कुमुद ए. हुन्नरगीकर आणि श्री. माधव गडकरी आहेत.

केंद्राची उद्दिष्टे

केंद्राने फार मोठमोठी उद्दिष्टे मनाशी जोपासली आहेत. प्रामुख्याने (१) मराठी (तसेच इतर भाषी) नाटकांची वर्णनात्मक सुची तयार करणे (२) लेखक नट, नट्या, दिग्दर्शक, तंत्रज्ञ, नाट्यसंस्था यांचे चरित्रकोष तयार करणे (३) नव्या जुन्या संगीत नाटकातील गायक नटनटींनी गायिलेल्या सर्व पदांचे ध्वनीमुद्रण करणे (४) विविध नियतकालिकातून प्रकाशित झालेली नाट्य नट विषयक माहिती परिक्षणे गोळा करून विषयवार सुची तयार करणे (५) विविध विद्यापिठातील विद्यार्थ्यांना संशोधनास प्रोत्साहन देणे, ग्रंथ सहाय्य करणे (६) मराठी रंगभूमीचा इतिहास नव्याने मांडणे (७) ठिकठिकाणची अप्रकाशित हस्तलिखित गोळा करून सोईस्करपणे प्रकाशित करणे वगैरे २५ उद्दिष्टे जोपासली आहेत. महत्त्वाचे म्हणजे अप्रकाशित नाटकांची 'स्क्रिप्ट बँक' उभारणे. यातून उत्तम स्क्रिप्ट्सची माहिती हौशी व्यावसायिक नाट्यसंस्थांना पुरविणे आणि अस्पर्शित चांगल्या नाटकांचे प्रयोग घडवून आणणे. आतापर्यंत केंद्राकडे अंदाजे ३०० हस्तलिखिते गोळा झाली आहेत. काहींचे प्रयोगही करवून घेतले आहेत.

नियोजित वाटचाल

केंद्राने नियोजित थोड्याच काळात पूर्ण होऊ घातलेली महत्त्वाची कामे खालीलप्रमाणे आहेत. (१) बालगंधर्व चरित्र उत्तरभाग (२) बालगंधर्वांच्या गाण्याच्या ध्वनीमुद्रिकांचा तपशिलवार कोष (३) गुजराथी गायक-नट जयशंकर सुंदरी यांचे मराठी चरित्र प्रकाशित करणे.

केंद्राचा प्रकाशन विभाग असून लवकरच संशोधनपर नियतकालिक चालविण्याचा विचार झाला आहे. यातून नाट्यविषयक माहिती, संशोधन तसेच अप्रकाशित चांगल्या नाटिका नाटके क्रमाने प्रकाशित करण्याचे ठरले आहे.

काळाच्या ओघात विस्मृतीत पडलेली बरीच नाटके आहेत त्यापैकी (१) 'सैरंध्री', बाजाबा बाळाजी नेने, १८७२ (२) 'हंसपालिका', रावजी मनोहर ताकमाते, १८७२ (३) 'तारा', वि. मो. महाजनी, १८८१ (४) 'अर्तीपीड चरित्र', शंकर मोरो रानडे, १८८१ इत्यादी नाटके उत्कृष्ठ असूनही अस्पर्शितच आहेत. अण्णासाहेब किर्लोस्कर, देवल, खाडिलकर यांच्या काही नाट्यकृतींनी उच्चांक गाठला पण बऱ्याच नाट्यकृती अस्पर्शितच राहिल्या. केंद्राने त्या सर्व संहिता मिळवून त्यांचे प्रकाशन योजले आहे. बायबलचे पहिले मराठी भाषांतर (१८४७), गुजराथी आणि प्राकृत भाषेतील शांकुतलम् (१८६७) कन्नडमधील शाकुंतल (१८७०) इत्यादी हस्तलिखितांचे झेरॉक्स काढून झाले आहे.

मदतीचे प्रयत्न

निर्माल्यातून नटेश्वराच्या कैलासावर नंदनवन उभारणाऱ्या श्री. पंडीतांच्या प्रकल्पास जागा, पैसा, सहयोगदान इत्यादी गरज आहे. त्याप्रमाणे त्यांनी प्रयत्न केले. गतवर्षी महाराष्ट्र शासनाची दारे केंद्राने ठोठावून पाहिली. अजून प्रतिसाद नाही. बॅरीस्टर अंतुले, मा. सुशिलकुमार शिंदे, मा. विठ्ठलराव गाडगीळ, शिवसेना प्रमुख बाळ ठाकरे इत्यादी राजकारणी पुढाऱ्यांनी अर्ज विनंत्या केल्या. उद्योगपती श्री. धिरूभाई अंबानी, श्रीं. आपटे तसेच शबाना आझमी अशा कलावंतांना हाक मारून पाहिली पण अजूनी कोणी ओ दिली नाही. एकॉनॉमिक टाईम्स मुंबई म्हणते की जर्मनी, ब्रिटेन, अमेरिका, रशिया अशा देशात जर पंडीतासारखे संग्राहक असते तर तेथील शासन किंवा उद्योगपती स्वतः होऊन पंडीताकडे मदतीसाठी धावत गेले असते. जागतिक मराठी परिषदेने पंडीतांना पाचारण करून त्यांच्या कार्याची दखल घेतली. मात्र केंद्राचा पसारा एवढा वाढला आहे की त्यांना स्वतंत्र इमारतीची गरज आहे. पुण्यात एखादा भूखंड मिळावा या प्रयत्नासाठी शासनाकडे खेटे घालणे सुरू आहे.

विदर्भाकडून अपेक्षा

आमचा विदर्भ तसा 'ठेविले अनंते तैसेचि राहाणारा'. असले 'उपद्व्याप' (?) आम्हाला मानवत नाही. पण दाद देण्यात मात्र धन्यता मानणारा आहे. विदर्भाचा प्रतिसाद स्व. बालगंधर्वही आळवीत असत.

विदर्भात कितीतरी दमदार नाट्यसंस्था, दिग्दर्शक, कलावंत, तंत्रज्ञ निर्माण झाले, होत आहेत. काही नैराश्यग्रस्तही होतात. आणि अंधारात विस्मृतीच्या अडगळीत पडतात. परंतु भविष्यकाळात लिहिल्या जाणाऱ्या इतिहासात आपल्याही नावाची कार्याची नोंद व्हावी, या दृष्टीने थोडेसे कष्ट स्वतःच घेतले तर पंडीतांचे, नव्हे, आपलेच हे केंद्र अधिकाधिक समृद्ध होऊ शकते. याकरिता प्रत्येकाने स्वतःची, स्वतःच्या संस्थेची संपूर्ण माहिती, फोटो, वृत्तपत्रातील समिक्षणाची, जाहिरातीची कात्रणे, हँडबिले, स्मरणिका इत्यादी जमेल ते साहित्य केंद्राकडे पाठवावी. प्रकाशित, अप्रकाशित नाटिका-नाटकाची एकेक प्रत प्रत्येक नाटककाराने पाठवावी. आपल्या ठेवणीत जुन्या नाट्यसाहित्याची, (छापिल अथवा हस्तलिखिते) इतरही वाङ्मयाची बाडे, तबकड्या वगैरे असल्यास केंद्रास कळवावी. योग्य मोबदला देऊन विकत घ्यायला केंद्र तयार आहे. साहित्य वस्तू बोजड असल्यास स्वतः येऊन घेऊन जायलाही केंद्र तयार आहे.

प्रकाशकांनी आपली नवनवीन प्रकाशन सुची केंद्राकडे पाठवावी. गरज पडल्यास केंद्र पुस्तके विकत घेईल. सवलत मात्र द्यावी.

केंद्राची सध्याची मागणी

आतापर्यंत प्रकाशित झालेल्या सर्व मराठी चित्रपटातील गीतांची समग्र माहिती छापील स्वरुपात पुस्तक रूपाने उपलब्ध करून देण्याचा एक उपक्रम केंद्राने हाती घेतला आहे. या संग्रहात प्रथमच प्रत्येक मराठी चित्रपटातील सर्व

गीतांची सुची गायक व गीतकाराची माहिती, रेकॉर्डनंबर्स इत्यादी माहिती एकत्रित स्वरूपात देण्याचा प्रयत्न केला जात आहे. १९३२ पासून आतापर्यंत साधारण ८५० मराठी चित्रपट आले आहेत व त्यापैकी सुमारे ७७५ चित्रपटांची माहिती थोडीफार उपलब्ध झाली आहे. खालील चित्रपटांची माहिती अद्याप उपलब्ध नाही.

संत तुकाराम उर्फ जय विठ्ठल (१९३२), नंद के लाल उर्फ राधामोहन (१९३४) प्रेमसंगम (३४) नीला (३५) जादुगारीण (३७) बलीदान (४८) भाग्यरेखा (४८) मोठी माणसं (४९) केतकीच्या वनात (५०) श्रीकृष्ण दर्शन (५०) ही माझी लक्ष्मी (५१) नंदकिशोर (५१) पारीजातक उर्फ श्रीकृष्ण सत्यभामा (५१) एक होता राजा (५२) जीवाची मुंबई (५२) औक्षवंत हो बाळ (५३) माझी जमिन (५३) संत भानुदास (५३) खेळ चालला नशिबाचा (५४) पुरुषाची जात (५४) संसार करायचाय मला (५४) भल्यांची दुनिया (५५) वरात (५५) मुलगा (५६) पायदळी पडलेली फुले (५६) रानपाखरं (५६) दोन घडीचा डाव (५८) जान्हवी (५९) साख्या सावरा मला (६०) वनकेसरी (६०) कलंक शोभा (६१) माझी आई (६१) चिमण्यांची शाळा (६२) सत्यमेव जयते (६२) मोहित्यांची मंजुळा (६३) ऊठ मराठ्या ऊठ (६४) सुंदरा मनामधे भरली (६४) स्वप्न तेच लोचनी (६४) हिऱ्याचे फुलपाखरु (७०) ईच्छापूरण (७१) कलावंत विकणे आहे (७१) पाठराखीण (७२) आचार्य अत्रे, एक झुंजार पुरुष (७३) विळखा (७७) आमचे कोकरू (८०) गंगा भवानी (८०) गड जेजूरी (१९८५)

वरील सूचीतील कुठल्याही चित्रपटासंबंधी प्रचार पुस्तिका, रेकॉर्डस, इतर कुठल्याही स्वरूपाची माहिती जर कोणाकडे उपलब्ध असेल तर केंद्राशी संपर्क साधावा.

विदर्भातील काही नाटिका

घोडं पेंड खातं, रानफुले (प्रभाकर पुराणिक) मुंबईचे मामा कोकणचे काका (मो. दा. देशमुख), मार शिक्का व्हय मोकळा (लामकाणे), लाटणेकाकू (गोडबोले) दि. वि. जोशी लिखित झाकली मूठ, नकटीचे लग्न, आत्याबाईला मिशा आल्या, जुलमाचा रामराम, अशीच एकाची गोष्ट, दिनकर देशपांडे लिखित अष्टग्रही येता घरा, आजी गेली देवाघरी, आम्ही कसे वाढलो, कंदील आला अंधार गेला, गुप्त हेराची करामत, गुड्डू दिवाळं काढतो, चला मंगळावर, चारचक्रम छोटी छोटी नाटुकली, जादूचा ताईत, नापासाची मुलाखत, बाहुल्यांचा डॉक्टर, बाळचाळ शांतता परिषद, भातुकली आणि ॲटमबॉंब, मनी माऊची मुलाखत, मी झाशीची राणी होणार, विझलेला दीप, शिळी शिदोरी, शुभमंगल सावधान, शुरांचा बाजार, सिंहासन कुणाचे, होळी आले रे आली. पुरुषोत्तम दारव्हेकर लिखित काळी माती खारे पाणी, चार कथा एक व्यथा, मेरू मंदार धाकुटे, वेदनेचा वेद झाला. जिकडे तिकडे हिरवेगार (मालती निमखेडकर) धुक्याचा पडदा (विनायक नेमाडे) मेहेरदिप्ती, शिला (इंदूमती देशमुख) नाटक झालेच पाहिजे (गोडबोले) प्रेयसी की माता (शं. वा. कुळकर्णी)

प्रस्तुत लेखकाने या वरील पुस्तकांचा शोध घेतला पण सापडली नाहीत. ज्या कोणाकडे, लेखकाकडे, रसिकाकडे प्रत असल्यास प्रस्तुत लेखकास अथवा केंद्रास कळवावे किंवा पाठवावे.

अशा या नाट्यसांस्कृतिक संग्राहक कार्यास प्रत्येकाने वरील आवाहनानुसार मदत करावी. अभ्यासकास, संशोधकास काही माहिती, संदर्भ हवे असल्यास केंद्रास लिहावे. विनामुल्य माहिती मिळेल. पुरेसे पोस्टेज मात्र पाठवावे ही किमान अपेक्षा. -

प्रमुख केंद्र संचालक	स्थानिक केंद्र सहाय्यक
श्री. एस. के. पंडीत	नाना ढाकुलकर
बबल चेंबर ग्रुप	१७४, तारांगण
टी आय एफ आर	विवेकानंद नगर
होमीभाभा मार्ग, मुंबई ४००००५	नागपूर ४४००१५

ग्रंथाली : अभिनव वाचक चळवळ

नीता भिसे

वाचनाची आवड आणि पुस्तकाच्या वाढत्या किंमती यामुळं अस्वस्थ झालेल्या माणसांपैकी तीसचाळीस माणसं एकत्र आली आणि डिसेंबर १९७५ च्या दरम्यान ग्रंथाली स्थापन झालीसुद्धा! वाचकांनी, वाचकांसाठी चालवलेली वाचकांची चळवळ! संस्था सुरू होताना हजारभर रुपयांनी सुरू झाली आणि आज तिचे व्यवहार लाखाच्या घरात पोचलेत.

ग्रंथालीच्या स्थापनेमागची बैठक अशी. पुस्तक वितरक संस्थांना सवलती देतात मग वैयक्तिक ग्राहकांना ती कां मिळू नये ? ग्रंथालीनं व्यक्तिगत ग्राहकांना जास्तीजास्त सवलती देऊन त्याला ग्रंथाकडे आकृष्ट केलं. केवळ २५ रुपयात ४ पुस्तके ही सुरुवातीला योजना वाचकाला निश्चितच मोहवणारी होती आणि पुस्तकांची निवडही चोखंदळ होती. पहिलंच पुस्तक प्रकाशित झालं ते दुर्गाबाई भागवतांच 'डूब'. आता ग्रंथालीने वाचक सभासदत्वाचे प्रवेशमूल्य थोडं वाढविलं आहे. त्यातही तीन पुस्तकं बसतातच. म्हणजे योजना अशी की कमी मूल्य देऊन ज्या पुस्तकांचे दर्शनीमूल्य अधिक होईल अशी पुस्तके निवडता येतात. व त्यामुळे आपोआपच वाचक सभासदत्व मिळते. या सभासदत्वामुळे ग्रंथालीची सर्व पुस्तके व पुढील प्रकाशने सवलतीत मिळण्याची हमी मिळते.

ग्रंथालीचे वैशिष्ट्य फक्त सवलतीतली पुस्तकविक्री हे नव्हतं, तर नानाविध सांस्कृतिक उपक्रमाचं सातत्य हे होतं. नवनवीन कल्पना राबवून ग्रामीण भागात विखुरलेल्या उत्साही, तळमळीच्या नवसाक्षर, नवसुशिक्षित आणि चोखंदळ जिज्ञासू वाचकाप्रत जाण्याचा धडाका ग्रंथाली कार्यकर्त्यांनी लावला. त्यात मग सुरुवातीला ग्रंथप्रसार यात्रा नंतर विजय तेंडुलकरांची संवादयात्रा, जागोजागची ग्रंथाली केंद्राची स्थापना आणि अलीकडचा भरीव उपक्रम म्हणजे एकाचवेळी ५० ठिकाणच्या ग्रंथप्रदर्शनांचे आणि छोट्या साहित्यसंमेलनांचे 'ग्रंथमोहोळ' आणि अलीकडील काही वर्षात मुंबईत आलेले 'बालझुंबड' नामक उपक्रम असा हा प्रवास आहे.

याखेरीज 'विज्ञानग्रंथाली' ही उपशाखा. त्यांची पुस्तकं, त्यांची बक्षिसं, लेखकांना लेखनवृत्ती, ग्रंथमाला हा वेचक साहित्याचा खंडाचा प्रयत्न, रुची हे निमगंभीर मासिक, ग्रंथाली अभ्यास मंडळ, ग्रंथाली मासिक गप्पा, वर्षभर चालणारी पुस्तकप्रदर्शने, पेंडसे पुरस्कार, वरखेडकर ग्रंथपाल पुरस्कार ह्या ग्रंथाली साह्य देत असलेल्या योजना आणि मुंबईच्या सुसंस्कृत रसिकांचं आकर्षण ठरलेला वाचकदिन हे यशस्वी उपक्रम आहेतच.

ग्रंथालीला पुस्तकांचे कमी खप आणि वाढत्या किंमती हे दुष्टचक्र भेदायचं होतं. चळवळीने अनेकानेक संग्राह्य पुस्तकं प्रकाशित केली आणि सदस्यांना खऱ्या अर्थानं वाजवी म्हणता येईल अशा किंमतीत वितरीत केली. कऱ्हाडच्या साहित्य संमेलनापासून आजवर ७० च्या वर प्रकाशनं झाली. त्यावेळची २०० सभासदसंख्या आज १५००० च्या वर गेली. १४ वर्षात एकूण ६२ पुस्तके प्रकाशित झाली. पैकी बलुतं, उपरा च्या तीनापेक्षा जास्त आवृत्त्या निघाल्या. शिवाय अनेक आगळीवेगळी प्रकाशनं प्रसिद्धीच्या मार्गावर आहेत.

ग्रंथालीचे दुसरेच प्रकाशन म्हणजे 'रोवो' (दीनानाथ मनोहर) ही कादंबरी राज्य पुरस्कार पटकावून बसली आणि मग ही 'दाद' सुरूच राहली. क्लोराफार्म (अरुण लिमये) बॉम्बे बुक क्लब वाचकप्रिय पुरस्कार. बलुतं (दया पवार) लेखकाला फोर्ड फौंडेशन शिष्यवृत्ती, प्रवासवृत्ती, उपरा (लक्ष्मण माने) साहित्य अकादमी पुरस्कार फोर्ड फौंडेशन प्रवासवृत्ती. संकल्प (संपादक : संजीव खांडेकर) महाराष्ट्र साहित्य परिषद पारितोषिक. सनद (नारायण सुर्वे) कऱ्हाड पुरस्कार ज्वालामुखीच्या तोंडावर (कुमार केतकर) राज्य पुरस्कार. वैद्यक सत्ता (डॉ. आनंद नाडकर्णी) महाराष्ट्र

साहित्य परिषदेचा पुरस्कार. अखेरचे आत्मचरित्र (राजेंद्र बनहट्टी) राज्य पुरस्कार. मोहीम इंद्रावतीची (जगदीश गोडबोले) काणेकर पारितोषिक. स्त्री-पुरुष (छाया दातार) शाश्वती पारितोषिक. गुरुदत्त तीन अंकी शोकांतिका (अरुण खोपकर) चित्रपटविषयक उत्कृष्ट पुस्तकाचे राष्ट्रीय पारितोषिक; चक्रव्यूह (रंगनाथ पठारे) प्रियदर्शनी पुरस्कार १९८९.

वेगवेगळे विषय वेधक पद्धतीने मांडले तर रसिक त्याचे स्वागत करतात. पुस्तकाच्या खपाची मर्यादा लहान रहात नाही. वेगवेगळ्या अनुभवविश्वाला जिथं लेखणीचा स्पर्श झाला असेल तिथं अधिक जाणीव पूर्वक संस्करण करून प्रकाशकांनी वाचकांना नवनवी दालनं उघडून द्यायला हवीत हे ग्रंथालीच प्रथमपासूनचं ध्येय आहे. चळवळीच्या प्रारंभाआधी या विषयावर चर्चा झडत आणि पाण्यात उतरून पहावे म्हणून ग्रंथाली सुरू झाली आणि या कार्यकर्त्यांनी त्यांना अभिप्रेत असलेली वेगळी प्रकाशनं पुण्यामुंबईसह बृहन्महाराष्ट्रातील पुस्तकप्रेमींना सादर करून त्यांची भरघोस पाठिंबा मिळवला.

ग्रंथाली कार्यकर्ते विनावेतन झटतात म्हणून पुस्तके स्वस्तात देणे परवडते अशी मीमांसा काहीजण करतात. पण ग्रंथालीचे संस्कृती प्रसारण ग्रंथालीच्या अर्थसाह्यातून उभे असलेले रुची व स्वतःच्या निम्म्या खर्चाने बाहेरगावी पाठवली जाणारी पुस्तके हे व अन्य घटक पाहिले तर ग्रंथालीच्या यशाची मीमांसा समर्पकपणे करता येईल.

जसा पुस्तकविक्रीची कोंडी फोडायचा प्रयत्न ग्रंथालीनं केला तसा हल्ली भेडसावत असलेल्या सामाजिक व सांस्कृतिक असमतोल भेदण्याकरता ग्रंथ हेच प्रभावी शस्त्र आहे हे ग्रंथालीने लक्ष्यात आणून दिले व त्यालाच संस्कृतीकारण हे नांव दिले. पुस्तके हा या संस्कृती कारणाचे माध्यम अशी व्याख्या ग्रंथालीतर्फे आता केली जाते. वाचनाची आवड निर्माण करण्याचे मूळ उद्दिष्ट सार्वकालीक आहे त्यामुळे त्यांत वेरजा-वजावाक्या होणार नाहीत. मात्र ग्रंथानुकूल वातावरण तयार करण्याची सुरुवात ग्रंथालीने केली त्यानंतर अनेक प्रकाशकांनी असे उपक्रम सुरू केले या उत्साहाला प्रेरणा किंवा चालना देण्यात ग्रंथालीचा मोठा वाटा आहे असे प्रकाशक संमेलनातून वगैरे श्री. वा. वि. भंट, श्री. पु. भागवत यांनी वेळोवेळी सांगितले आहे.

वाचनाला पर्याय नाही ही एक आशादायी गोष्ट ग्रंथव्यवहारातील साऱ्यांच्याच मनापुढे आहे. विकसित देशात अनेक प्रगत माध्यमे असतानाही पुस्तके लाखोंच्या संख्येत खपतात, आपल्याकडे मात्र दोन हजाराची आवृत्ती कुणी काढू धजत नाही. मग पुन्हा कमी वाचक, कमी आवृत्ती व भरमसाठ किमती हे दुष्टचक्र भेदण्याचा एक उपक्रम ग्रंथाली करत आहे. ही चळवळ अशीच भूमितीश्रेणीने वाढत राहिली तरच हे उद्दिष्ट सफल होईल.

ग्रंथालीचा प्रथमपासूनच प्रयत्न वाचकाला म्हणजे समाजाला भिडण्याचा राहीला. ह्यामुळे ग्रंथाली कार्यकर्त्यांची स्वतःची दृष्टी विकसित होत गेली. वाचकापुढील खऱ्या प्रश्नांचे अस्फुट का होईना आकलन होऊ लागले. ग्रंथलेखनाचे आणि प्रसाराचे व्यापक परिमाण ध्यानी येऊ लागले ही गोष्ट साक्षात वाचकाला भिडून झाली हे महत्त्वाचे. त्यातूनच ग्रंथालीने संस्कृतीकारणाचा मुद्दा मांडला. ग्रंथ.हे संवाद माध्यम बनले. हा संवाद कशासाठी ? तर समाजातील नवजागृत नवशिक्षित घटकांमधील समरसता, समभाव वाढावा सांस्कृतिकता जोपासावी आणि एका कसदार समाजाची निर्मिती होण्याचा मार्ग सुकर व्हावा यासाठी!

ग्रंथालीच्या कुटुंबात वाचनवेडे, पुस्तकवेडे समाजाची विविध स्पदंने ओळखून धडपडणारे असंख्य 'चळवळे' आहेत. गावोगावी पसरलेली ग्रंथाली उपकुटुंबे आहेत. मुंबईतील ग्रंथाली स्थापनेपासूनची आजवरची कार्यकारिणी दिनकर गांगल (चिटणीस), अरुण साधू, कुमार केतकर, शेखर साठे, डॉ. र. गो. लागू, श्रीकांत लागू, उषा मेहता, त्र. शं. आपटे, अशोक दातार, वासंती मुझुमदार, के. डी. नाईक, अशोक जैन, सुदेश हिंगलासपूरकर अशी मंडळी आहेत प्रख्यात साहित्यिक विजय तेंडुलकर सुरुवातीपासूनचे अध्यक्ष आहेत.

नीता भिसे
(ग्रंथालीकरिता)

ग्रांथिकी

आस्वादक मूल्यमापनाचा यशस्वी प्रयत्न

कुसुमाग्रज / शिरवाडकर एक शोध

डॉ. रवीन्द्र के. शोभणे

१९८८ सालचा भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार मराठीतील नामवंत कवी आणि नाटककार कुसुमाग्रज उपाख्य वि. वा. शिरवाडकर यांना मिळाला. हाच पुरस्कार मराठीत यापूर्वी वि. स. खांडेकर यांना मिळाला होता. खांडेकर किंवा शिरवाडकर हे मराठी वाचकांना नेहमीच श्रद्धेय राहिलेले आहेत. शिरवाडकरांचा वाङ्मयीन पिंड शोधायला झाल्यास खांडेकरांच्या प्रकृतीशी बरेच साम्य असलेले जाणवते. तथापि कुसुमाग्रजांच्या साहित्यविषयक विचारांचा आढावा घेताना एवढ्यावरच भागत नाही.

विशेषतः कुसुमाग्रज / शिरवाडकर कवी आणि नाटककार म्हणून सुपरिचित आहेत. 'विशाखा' हा कवितासंग्रह आणि 'नटसम्राट' हे नाटक या दोन वाङ्मयाकृतींना त्यांच्या काव्य आणि नाट्यवाङ्मयावर कळस चढविला आहे. कुसुमाग्रजांच्या अष्टपैलू वाङ्मयीन व्यक्तिमत्वाचा शोध डॉ. दत्तात्रय पुंडे यांनी 'कुसुमाग्रज / शिरवाडकर एक शोध' या समीक्षा ग्रंथात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

साधारणतः कुसुमाग्रज / शिरवाडकरांच्या साहित्याचे परिशीलन करताना मराठी समीक्षा ही बहुतांश त्यांच्या काव्यापाशी आणि नाटकापाशीच थांबली आहे हे लेखकाचे विधान या समीक्षाग्रंथाच्या संदर्भात पुरेसे बोलके आहे. लेखक प्रस्तुत ग्रंथात नेमके कुसुमाग्रजांच्या कवितेचा आणि नाटकाचा विचार न करता त्यांच्या कथा, कादंबरी, एकांकिका, ललितलेख आणि बालसाहित्य यासंदर्भातच विचार करतात आणि हा विचार करताना त्यानुषंगाने कुसुमाग्रज / शिरवाडकरांची भाषाविषयक, साहित्यविषयक आणि काव्यविषयक भूमिका प्राधान्येकरून मांडतात.

एखादा प्रतिभावंत आपली भाषाविषयक, साहित्यविषयक भूमिका अर्थातच आपल्या साहित्याच्या, निर्मितीच्या अनुषंगाने मांडत असते, पण त्याची ही भूमिका एवढेच त्याचे लेखनवर्तुळ रसिक / वाचकांनी गृहित धरले तर कदाचित तो प्रतिभावंत पूर्णपणे समजायला कठीण जाते. अशा संदर्भात एखाद्या प्रतिभावंताने वेळोवेळी कुठल्या निमित्ताने आपल्या निर्मितीसंबंधी बोलणे, लिहीणे हा भाग त्याच्या लेखनप्रवासातील काही खुणा दाखविण्यापुरताच मर्यादित ठरतो. म्हणूनच अशी भूमिका ही कधीकधी केवळ प्रासंगिकही ठरू शकते. त्याच्या समीक्षकाला या खुणा धुंडाळीत पुढचा संपूर्ण प्रदेश दृष्टीपटात आणावा लागतो. आणि नेमका हा प्रयत्न डॉ. पुंडे यांनी अतिशय समंजसपणे केला आहे. (१९८० च्या 'सत्यकथा' दिवाळी अंकात 'शिरवाडकरांच्या साहित्यातील तीन मूलबंध' हा डॉ. सुधीर रसाळ यांचा लेख प्रकर्षाने आठवल्यावाचून राहत नाही.)

या समीक्षा ग्रंथाच्या संदर्भात डॉ. पुंडे यांचे महत्त्वाचे श्रेय म्हणजे शिरवाडकरांचे जे लेखन विशेषतः समीक्षकांनी विचारात घेतले नव्हते, त्या लेखनाचा केलेला विचार. प्रत्येक सर्जनशील प्रतिभावंताच्या शक्ती जरी एका विशिष्ट वाङ्मय प्रकारातच प्रामुख्याने केंद्रित झाल्या असतील तरीही त्या वाङ्मयप्रकारांव्यतिरिक्त इतर लेखनातून त्याच्या

शक्तीची ही उगमस्थाने, त्याचे यशापयश शोधता येते. शिरवाडकरांनी प्रामुख्याने नाटके आणि कविता लिहिल्या, पण याशिवाय त्यांनी कथालेखनही केले. शिरवाडकरांच्या नाटकांचा परामर्श घेताना त्यांच्याकाही कथा त्या नाटकाच्या मूलस्रोताकरिता कशा निमित्त ठरल्या किंवा नाटकानंतर काही कथा कशा आकाराला आल्यात हे कथाकार शिरवाडकर मध्ये डॉ. पुंडे समर्थपणे पटवून देतात.

शिरवाडकरांचा पिंड मुळात गांधीवादी विचारांकडे झुकलेला. या प्रेरणेतून जशी 'गर्जा जयजयकार क्रांतीचा 'ही कविता जन्माला आली, तशाच इतर अनेक कलाकृतींना या प्रेरणांनी वाट दिली. अर्थात ही वाट निश्चित अशी होती. यातून शिरवाडकराच्या काही कथा जन्माला आल्यात. 'वैष्णव' सारखी कांदबरीही या प्रेरणेतूनच जन्म घेते हा लेखकाचा मुद्दा पटतो. डॉ. पुंडे शिरवाडकरांच्या कादंवरीवाङ्मयाचा विचार करताना 'वैष्णव', 'जान्हवी' आणि 'कल्पनेच्या तीरावर' या तीनही कादंबऱ्यांध्ये विकसित होणारा आशयप्रदेश एकच सूत्र घेऊन क्रमाने विकसित होत गेलेला आहे' हा विचाराही पुरेसा उद्‌बोधक आहे. गांधीवादी आणि मार्क्सवादी अशी द्विविध स्वरूपाची प्रेरणा या आशयप्रदेशाच्या मुळाशी आहे हे नाकारता येत नाही.

वामन मल्हार आणि श्री. व्यं. केतकर या दोन कादंवरीकारांनी मराठी कादंवरीला भावनांपेक्षा विचारप्रवणतेकडे अधिक सन्मुख करण्याचा प्रयत्न केला. शिरवाडकर यांच्या तीनही कादंबऱ्याच्या विचार करताना या कादंबऱ्यांना निश्चित अशी भारतीय समाजविचारांची वैठक आहे हा महत्त्वाचा पैलू डॉ. पुंडे स्पष्ट करतात. तथापि अशाप्रकारच्या वैचारिक कादंबऱ्यामध्ये आशयाबरोबरच अनुभवाची जी सूत्रता आणि समृद्धता (वैचारिक भूमिकेला संक्रात करणारी) हवी असते ती नसल्यामुळे वामन मल्हारांच्या आणि केतकऱ्यांच्या कादंबऱ्यांना जे वाङ्मयीन संचित प्राप्त झाले ते शिरवाडकरांच्या कादंबऱ्यांना प्राप्त होऊ शकले नाही.

मराठीतील रूढ झालेले बरेचसे नववाङ्मयप्रकार हे पाश्चात्य साहित्यधारेतून आलेले आहेत. तथापि पाश्चात्य वाङ्मयात रूढ झालेला युटोपिया हा प्रकार मराठीत रूढ झालेला नाही. युटोपिया म्हणजे स्वप्नदर्शी वास्तव. सर थॉमस मूर (१४७८ ते १५३५) यांनी स्वप्नदर्शी समाजाचे चित्र रेखाटणारी 'युटोपिया' हा वाङ्मय प्रकार अस्तित्वात आला. " The utopian writer looks at his own society first and tries to see what its significant element are. The utopia itself shows what society would be like, if those elements were fully developed" हे युटोपियासंबंधीचे विवेचक लेखन शिरवाडकरांच्या 'कल्पनेच्या तीरावर' या कादंबरीला लावून दाखवतात आणि या कादंबरीच्या संदर्भातील एक वेगळा आयाम मांडताना दिसतात.

शिरवाडकरांची प्रतिभा ही बहुमुखी स्वरूपाची आहे आणि शिरवाडकरांनी जे विविध वाङ्मयप्रकार हाताळले त्याची सुरुवात मात्र एका समान कालखंडातच झालेली आहे. कथा, कादंबरी, नाटक, ललितलेख, बालसाहित्य हे तमाम वाङ्मयप्रकार शिरवाडकरांनी काव्यलेखनाला समांतरपणेच हाताळले आहेत. आणि या समग्र वाङ्मयाची साक्षेपी समीक्षा डॉ. पुंडे यांनी केली आहे. शिरवाडकरांच्या काव्याच्या आणि नाट्याचा विचार केल्याशिवाय त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्वाचा विचारच पूर्ण होऊ शकत नाही.

मेहता पब्लिशिंग हाऊस ही आजची एक नामवंत प्रकाशन संस्था. मराठी साहित्यात मोलाची भर घालणारी पुस्तके या संस्थेनं वाचकांना दिलीत. हे सुद्धा सर्वांगसुंदर असे पुस्तक मेहतांनी प्रकाशित केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन!

■ ■

कुसुमाग्रज / शिरवाडकर : एक शोध
प्रका. मेहता पब्लिशिंग हाऊस
१२१६, सदाशिव पेठ, पुणे - ३०
पृ. १९६ मूल्य - ६० रुपये

ठसठस '७२ मैल' पायपीटीची

वसंत वाहोकार

'७२ मैल' ही श्री अशोक व्हटकर या लेखकाची कादंबरी म्हणजे अगदी लहान वयात सातारा ते कोल्हापूर ह्या ७२ मैलांच्या पायी प्रवासातली नोंद आहे. त्या अनुषंगाने लेखकाचे आत्मकथन म्हणजे एक प्रकारचा सूड आणि हतबलता ह्याचे मार्मिक चित्रण आहे. आणि ते कोणत्याही आवेश, अभिनिवेशाशिवाय लिहिल्याने अधिक खरे, परिणामकारी आणि अंतर्मुख व्हावे एवढे जिवंत उतरले आहे.

बालपण व त्यातही मोकळ्या हवेत उंडारण्याची सवय जडलेला अशोक वसतिगृहाकडे पाठ फिरवतो आणि वाटेल तो आटापिटा करून शेवटी असहाय स्थितीत, पायीच स्वतःच्या गावी परत निघतो. ह्या कष्टप्रद, जीवनाला वळण देणाऱ्या प्रवासात त्याला कुणी राधाक्का भेटते. सोबत तिची लेकरं असतात. भुकेली, दरिद्री थकून गेलेली. एकमेकांच्या सहवासात अंतर कापतांना जे विदारक अनुभव या सगळ्यांच्या नशिबी येतात... त्याचे उत्तर नाही. एकामागोमाग राधाक्काच्या तीन लेकरांचा मृत्यू... तो अगतिकपणे साहण्यातले दुःख, ज्याच्यावर पुढच्या सगळ्या आशा केंद्रित आहेत त्या राणू नावाच्या कणखर, धीट, धडपड्या मुलाचे नागिणीच्या विळख्यात सापडून संपणे आणि कहर म्हणजे एका अपराधी राधाक्कासारख्या परिस्थितीशरण बाईला आपले शील देखील मर्जीने गमवावे लागते, ती आसुक्याच्या मनानं घेतलेली जीवघेणी नोंद... 'चवथा मुडदा तिथे गंजीत सांडला... राधाक्काच्या चारित्र्याचा मुडदा!' हे सगळे अंगावर काटा उभा करणारे, भयावह आहे. 'त्या थोर स्त्रीने माझे प्राण वाचवलेच, पण माझ्या हृदयात ती खोलवर रुतून बसली आहे... ती... राणू वगैरे...' असे लेखकाने आधीच सांगून ठेवले आहे. त्याची प्रचीती आपण पुढे पुढे जातांना अनुभवतोच.

'घरात सर्वांनी झिडकारून, लाथाडून टाकलेल्या मांजरीच्या पिलाला पोत्यात नाहीतर पिशवीत घालून दूरवर गावाबाहेर, माळावर नाहीतर डोंगरात सोडून देतात, त्याप्रमाणे माझ्या बापाने मला वडगावातून हालवले... आणि एके दिवशी...' ही खोलवर घाव करून केलेली जखम पुढे आयुष्यभरही मिटत नाही. बापाविषयीचा तिरस्कार, कडवटपणा विसरता येत नाही... आईविषयीही ओढ उरलेली नाही... तरीही घरादाराची ओढ सुटत नाही अशा मनःस्थितीत हा लेखक बालवयात सापडतो... खिशात पैसा नाही, कंडक्टरनं गचांडी मारून बाहेर घालवलेलं... मन अगदी विद्ध, जखमी झालेलं. आणि त्यावेळी ही राधाक्का तिच्या पिलांवळीसह आसुक्याला आपलेसे करते, तिच्या वाट्याचे भोग त्याला उघडेपणी पाहायला मिळतात... मन मोडून निघते... आयुष्याविषयीचा कडूपणा मनात रुजतो... आयुष्यभर बाढीस लागतो. त्यावेळी ती जीवघेणी ठसठस... तो धक्का... ती अपेष्टा... सावलीसारख्या पाठीशीच असतात जणू.

'मी तिकडे मुंबईत, ही मंडळी कोल्हापूरला... मला किती व्याप असतात' नाट्यकलावंत लेखक श्री नामदेव व्हटकर हे लेखकाचे पिताजी. त्यांचे त्या क्षेत्रात बऱ्यापैकी नाव असलेले... त्यामुळेच आलेले व्याप... शिवाय कुण्यातरी दुसऱ्या बाईनं जखडलेला पाश... ह्या कारणांसाठी त्यांना बाल अशोकचे ताप अधिक जाचक वाटतात. त्याला कुठंतरी घरा-गावाबाहेर लांब उत्तम बोर्डिंगात ठेवावे हा त्यांचा सहज हेतू... त्याविषयी लेखक लिहितो, 'चांगल्या, उत्तम बोर्डिंगात ठेवण्याचा माझ्या बापाचा उद्देश मात्र उत्तम व चांगला नव्हता' इथेच पुढल्या संघर्षाची ठिणगी झडली आहे.

लपतछपत निघावे... गाडी ट्रक चुकवावा, पुढे धावावे... यात पुढे काही अंतरावर राधाक्का भेटते. कडेवरचे अशक्त मूल केव्हा गळून पडेल नेम नाही. आणि शेवटी एकदाची ती वेळही येते. अंगावर मुलाचा श्वास थांबतो.

निर्विकार अवस्थेत राधाक्का सुरक्षित जागा शोधते... हो सुरक्षित... ते ढाराळलेले मूल स्वतः मातीत लोटते. तेव्हाही समोर उभा असतो तो आसूक्याच. त्याला हात लावायचे त्याचे धाडस होत नाही. तो नुसता उभा असतो... त्यालाच म्हणते राधाक्का, 'सार बाबा माती आरसुक्या... भनीभावंडांचा न्हायी... तर तुजा तर हात लागू दे हेज्या मातीला' असे काम लेखक आयुष्यात पहिल्यांदाच करीत होता. त्याचे मन होत नव्हते. 'हात उचलं. उगं कोन तर यील, अन हुईल सत्तीनास' त्या अवस्थेतही राधाक्का त्याला सावध करते. त्याची हिंमत जागवते, 'मग मी भराभरा माती दोन्ही हातांनी उचलून बांध पूर्ववत केला. सुंदर (मृत मुलगा) त्या मातीखाली, बांधात गाडला गेला.'

राणू... वायजी... भिमी... विठ्ठल... चंदर या भावंडांबरोबर चालत जातांना, मनानं एकरूप होतांना त्यांच्यासोबतच कधोतरी भीक मागायची वेळ येते तेव्हा हा लहानगा धारतावतो. कुणी ओळखीचे भेटले, ओळखले आणि बापाकडे जाऊन तक्रार केली तर ? त्यापेक्षाही भीक देणाऱ्याची ती उपेक्षेची नजर, हेटाळणी 'घे... खा... तुझा तर आत्मा थंड हूंदे. मान्सं हायसा का जनावरं... जनावरवी एकांदा व्हलपांडा दिल्यावर म्होरं चालू पडतं... तुम्ही ?'

राधाक्काने एकवार माझ्याकडे पाहिले. तिच्या पोराबरोबर आयुष्यातील मला पहिली भीक मागावी लागली आहे, हे त्या सूज्ञ बाईच्या ध्यानात आले, माझा चेहरा अपमानित आणि कडू झाला असावा.

वाटेतले सर्व अनुभव क्रूर आणि बर्फगार. पण सगळ्यात दारुण आहे तो त्या धाडसी राणूचा नागिणीनं घेतलेला बळो. लेखकाची सूक्ष्म निरीक्षणशक्ती... भावनांनाच हात घालण्याची ताकद इथे अनुभवास येते.

आणि त्याचक्षणी राणूची मर्मभेदक किंकाळी घुमली.

'आगायायाया !'

'राणू पळत वगळत ओलांडण्यासाठी पाण्यातल्या फरशीसारख्या दगडावरून धावू लागला... तेव्हा त्या शेवाळी खडकावर दाणदिशी आपटला.

आणि विजेच्या वेगाने ती आली. आणि मग ती आपल्या शेपटीच्या फासक्याने त्याचा दंड आवळून त्याच्या अंगावर बेभान होऊन फणा आपटू लागली.' शोकांतिका किती आणि कशी ती पाहा... नंतर लेखक पुढे जातो - 'पोटचा पोराचा देह लावूंन पडून पाहावा लागणे, त्याचे मर्तिक करता न येणे, त्याचे डोके मांडीवर घेऊन विलाप न करता येणे' इत्यादि. राणूचा देह त्या दांडात रानंजाळीत पाण्यात जणू सडवण्यासाठी ठेवून त्यावर नागिणीचा पहारा व तिची पिलावळ सोडनू... हताश असहाय परत निघावे लागणे. अशावेळी एका आईनं मनातला लावारस कसा थोपवावा ?

'मी आत शिरता शिरता राधाक्का तांब्या उचलून खोपटामागे निघालेली मी पाहिली, आणि तो मात्रागमनी हरामखोर भडवा तिच्या मागून गेला.

ती शेव नव्हती, ती होती भाड. कसेबसे दोन घासच मी खाऊ शकलो. मी बायजीकडे पाहिले. ती नजरेला नजर देत नव्हती.'

शेव. मूठभर अन्नासाठी राधाक्काला आपले सर्वस्व व्यभिचाराला स्वाधीन करावे लागले. ते एवढ्याशा 'आसुक्या'ला पाहावे लागले. अशी सगळी त्या प्रवासाची ठसठस त्याचे हृदय पार पिळवटून गेली. आयुष्यभरासाठी नशिबावर जणू चाबकाचे फटकारे तडकावीत गेली.

आज सुस्थितीत जगणाऱ्या, संस्कृत विषयाच्या प्राध्यापकाचे, एका दलित, 'ढोर' समाजातल्या प्रतिभावंत लेखकाचे हे जेमतेम तीनेक दिवसांचे आत्मकथन. तो पीळ उलगडायला जावे... सुन्न व्हावे... सुन्न व्हावे. ■ ■

---

७२ मैल
अशोक व्हटकर
पॉप्युलर प्रकाशन

वसन्त वाहोकार
द्वारा/ गिरीजा एन ५९
स्नेहनगर, वर्धा रोड, नागपूर ४४० ०१५

आरसा

शीला कोलटकर

'**माझी** कविता माझ्यापुरती,
फार फार तर तुझ्यातील माझ्यापुरती'

कवितेसंबंधी अशी आत्मनिष्ठा असतानाही आसावरी काकडे यांचा पहिला काव्यसंग्रह 'आरसा' रसिकांपुढे येतो. तो वाचल्यानंतर त्यातील अपरिहार्यता रसिक मनाला जाणवते.

'सखि, अशीच होते कविता' अशी जाणीव कवयित्री आपल्या पहिल्याच कवितेत व्यक्त करते. ही भावना उफाळून येण्याची प्रक्रियाही स्वाभाविक आहे, ती कुठे कृत्रिम नाही. कवयित्रीच्या जीवनात कवितेचे एक वेगळेच स्थान आहे. 'वेदनेस' या कवितेतून ते व्यक्त होते. कविता कवयित्रीच्या मनाला आयुष्यात जो विरंगुळा देते त्याचेही उत्तम चित्रण या कवितेत होते. 'पाऊस पाडता येणार नाही' यातून व्यक्त होणारी कविता प्रकटीकरणाची सहजता, अकृत्रिमता अनेक कवितांतून आपल्याला जाणवते. शब्दांचे सामर्थ्य, त्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभूती यांचा परस्परसंबंध या संग्रहात वेळोवेळी प्रकट होतो.

'टोलेजंग शब्दांना
आपल्या खुजा दुःखासाठी
ठेंगणं करू नकोस'

या काव्यपंक्तीतून कविता व शब्द यांच्याकडे पाहण्याची कवयित्रीची एक वेगळी दृष्टी आपल्याला दिसून येते. त्यातूनच ह्या प्रक्रियेमागील कवयित्रीची एक तात्त्विक भूमिकाही आपल्याला प्रकट होताना दिसते. 'कविता', 'वीज', 'वेदनेस', 'झरताना', 'दुःख', 'माझी कविता' या व अशा कितीतरी कवितांमधून कवयित्रीच्या कवितेसंबंधीच्या भावभावनांचे प्रतिबिंब पडते.

आसावरी काकडे यांनी 'आरसा' ह्या काव्यसंग्रहातील कवितांमधून स्वतःच्याच व्यक्तिमत्वाचा घेतलेला शोधही रसिकमनाला भावतो. 'मी हरवले आहे' या कवितेत केवळ कवयित्रीच्याच मनाचे प्रतिबिंब उमटत नसून आजच्या स्त्रीचेच जीवन प्रतिबिंबित होते. जीवनाच्या 'गणिता'चे उत्तर सापडत नसले तरी जीवनात समर्थपणे उभी राहण्याची कवयित्रीची ऊर्मी प्रत्येक वेळी दिसून येते. 'साथ दे' या कवितेत -

'हात दे, मला उभ राहायचं!
साथ दे, मला बरोबर चालायचं' किंवा
'धावताना गवसेल अर्थ जगण्याचा सारा
आणि कळेल कशाला उगा वाहतो हा वारा'

ह्या ओळींमधून आयुष्याकडे पाहण्याची कवयित्रीची वृत्ती दिसून येते. 'प्रिय सखी'स उद्देशून व्यक्त झालेली मनाची तडफड 'मी केलेल्या उंची उडीचा सराव। बहुधा मला इथे रमू देणार नाही। अशी ग्वाही देते.

कवयित्रीच्या मनातील द्वंद्व 'पर्याय' या कवितेत अतिशय समर्थपणे आकारास येते. 'प्रकाशाची प्रखरता पचवायची नीडर होऊन!!' असा ह्या कवितेचा शेवट कवयित्रीच्या भावस्थितीचे उत्तम चित्रण करतो. 'प्रतिष्ठा(!)', ह्या कवितेमधूनही संबंध स्त्रीजातीचेच दुःख व्यक्त होते, 'त्रिशंकू' कवितेतून कवयित्रीचा स्वतःकडे बघण्याचा एक वेगळाचा दृष्टिकोण व्यक्त होतो.

कवयित्रीच्या मनाला निसर्गही खुणावत असल्याचे जाणवते. 'गंधवार्ता', 'मृद्‌गंध', 'आभाळ', 'एका सायंकाळी', 'पाणी' अशा अतिशय मोजक्याच पण समर्थ अशा निसर्गकविता जाणवतात. 'पक्षी' ही प्रतिमा वेगवेगळ्या रूपात व्यक्त होताना दिसते.

निसर्गाप्रमाणेच समाज परिस्थितीचेही भान 'प्रतिष्ठा(!)', 'दृष्टी', 'मंदिर', अशासारख्या कवितांतून उपरोधातून चित्रीत होते. तिच्या कर्तृत्ववान आकाशाला प्रतिष्ठा (!) नाही. जी दवलेल्या घरांना आहे!' किंवा 'प्रिय सखी' या कवितेत व्यक्त झालेली स्त्रीची कुचंबणा, परिस्थितीचे असाह्यपण स्त्री-जीवनाचा समर्थपणे वेध घेते.

या संग्रहातील कवितांमधून येणारे ऐतिहासिक व्यक्तिरेखांचे उल्लेख, उदा. अगस्ती, त्रिशंकू, नरसिंह, भीष्म, द्रोण, कर्ण, गांधारी, सीता इ. योग्य तो परिणाम साधतात. 'गात्रांतील हलवून प्राण', 'निरंजन सावल्या', 'विवस्त्र विचार', 'सरोवराचे समंजस अस्तित्व' 'डोळीयाचे डोह' 'वाहत्या पाण्यावर रांगोळी काढायला जाणे' यातून कवयित्रीच्या शब्दसामर्थ्याची प्रचिती येते. अचूक व मोजके शब्द यातून भावाभिव्यक्ती समर्थपणे करण्याचे कवयित्रीचे वैशिष्ट्य कवितासंग्रहाच्या सुरुवातीच्याच ओळी दाखवितात.

'आरसा' ह्या काव्यसंग्रहाच्या आधी 'आरशात डोकावण्यापूर्वी' ही शिवाजी सावंत यांनी लिहिलेली प्रस्तावना काव्यसौंदर्याची अचूक स्थळे टिपते व कवितेच्या आस्वादनाची पार्श्वभूमी तयार करते. ह्या 'आरशात' डोकावताना 'संवेदनाच्या बदलत्या छटा' 'शब्दात प्रकटणारी कविता', 'नुसत्या डोळ्यांनी वाचणारांना' समजणार नाही ही कवयित्रीची जाणीव सार्थ ठरते त्यासाठी रसिक मनानेच ह्या कवितांना सामोरे जावे लागेल. ■ ■

शीला कोलटकर
११८५, शुक्रवार पेठ, सुभाष नगर, रस्ता क्र. ३, पुणे ४११ ००२

अरण्यपथ

प्रा. कृष्णा चौधरी

विदर्भातील एक प्रसिद्ध कवयित्री श्रद्धा पराते यांच्या 'अरण्यपथ' हा दुसरा काव्यसंग्रह. 'सांध्यमित्रा' या काव्यसंग्रहाच्या रूपाने त्या मराठी रसिकांच्या समोर आल्या. पुढे त्यांचे 'एहसासिक वादिया' हा हिंदी उर्दू गझल काव्यसंग्रह व 'अग्निगर्भा' ही अनुवादित कादंबरी प्रकाशित झाली.

मराठीत दीर्घकाव्यरचनेचा प्रयत्न अनेकांनी केला. अनिलांची भग्नमूर्ती, मुक्तिबोधांची त्रिशंकू, ग्रेस यांची राजपुत्र व डार्लिंग तसेच सुधाकर गायधनी यांची देवदूत या महत्त्वपूर्ण साहित्यकृती. 'अरण्यपथ' हा असाच यशस्वी प्रयत्न आहे. काव्यसंग्रहाच्या आरंभी कवयित्रीने स्वतःच 'संवेदन' या सदरात स्वतःचा काव्यनिर्मितीची प्रक्रिया विशद केली आहे. 'अरण्यपथ' चा लेखनकाळ १९७८ तर 'मुसाफिर' चा १९८६ चा कवियित्रीच्या दृष्टीने सांगावयाचे तर या दोन दीर्घ कवितात वैयक्तिक वेदनेचे आविष्करण नाही, तर वैयक्तिक वेदना आणि दैवी एकान्तिकतेने प्राप्त झालेल्या समवेदनेचा संमिश्र आविष्कार इथे झालेला आहे. या कवितेतील संकेत, प्रतीके व रूपकांचा जन्म जाणीवयुक्त मनाच्या पातळीपेक्षा नेणिवेच्या गहन अरण्यात झाला. कधी ही वेदना कवयित्रीला स्वतःच्या वेदनेत दिसली तर कधी बाह्यवस्तू जाताच्या. विश्वातील सत्य व सौंदर्य याची उपासना कलावंत आपल्या कलामाध्यमातून करीत असतो.

निर्जन अशा घनदाट एकाकी गहन अरण्यातून एक व्यक्तिमत्व प्रवास करीत आहे. पाय ठेचाळतात व रक्ताळतात तरी जीवनाची ही वाट चालणं अटळच असते. काहीतरी अनाकलनीय सतत प्राणातून फुलत असते.

संवेदना तीक्ष्ण होतात. कळू नये ते कळते व दिसू नये ते दिसते, पण त्यात संगती मात्र लागत नाही. स्वप्नांचे कवडसे सारखे रंग बदलतात. गर्भरेशमी अंधारात प्रकाशाची अनंत वलये निर्माण होतात. जीवनविषयक चिंतन करणारी व्यक्तिमात्र जगाच्या दृष्टीने वेडीपीर ठरत असतात. जगतांना कधी आपले पंखच गहाण ठेवावे लागतात तर कधी ते जन्मापूर्वीच छाटून टाकल्या जातात. प्रत्येक जिवंत कलाकृतींत समकालीन जीवनजाणिवांचे अपरिहार्य प्रतिबिंब पडलेले दिसून येते.

कवयित्री संपूर्ण जीवनाच्या शोधात नव्या नव्या भावपातळीवर विहरत राहते. या भावपातळीवरून कलात्मक वृत्तीने विविधरंगी भावसत्ये शोधण्याची क्रिया चालूच आहे सांध्यामित्रातील कवितेत विरहार्त व व्याकुळ अशा हळव्या भाववृत्तीचे दर्शन इथे घडत नाही. इथे व्यक्त होते ते जीवनविषयक गहिरे व परिपक्व असे भावात्मक चिंतन, कवयित्रीला प्रश्न पडतो तो हा की लौकिक जीवन सत्य की अलौकिक ? शारीर मानसिक विनाशानंतर अंतिम सत्य कोणते ? अमरत्व की विनाश ?

सृष्टीत सृजन व संहाराचे चक्र अनादि काळापासून सुरू आहे. एक संन्यासी मोसमाच्या परतीच्या प्रवासाचे क्षण मोजतो पण व्यावहारिक जगातील शब्दांचे माप इथे थिटे पडते.

शब्द फसवे असतात
क्षणोक्षणी
दर प्रसंगानुरूप
वस्त्रे बदलावीत
तशी अर्थ बदलीत असतात

जीवनाचे हे सृजनशील तर कधी प्रलंयकारी रूप कवयित्रीच्या चिंतनाचे विषय होते. इथे प्रत्येक क्षणाची नियती ठरलेली आहे. व हजारो वर्षाचे भवितव्य काळाच्या गतिमान आवर्तात कोरल्या गेलेले आहे. असे असनूही लालसेचे मोहोळ कमी होत नाही.

वनवासी पाखरांचे थवे
छपरावर विसाव्याला थांवतील
अन् खिडकीवर अनोळखी टिकटिक
चोचीने करून निघून जातील
त्याक्षणी
आसवांचा समुद्र ओंजळीत सांडेल
त्यात रक्तरंग मिसळून
लिहित सुटशील तू विश्वसत्य सांगणाऱ्या अट्टाहासाने
शब्दांच्या मार्मिक गाथा !

अरण्यपथात वेदनांचे व आनंदाचे स्वर मानवी जीवनास अनादिकाळापासून छेडल्या जात आहे असे दिसते. सृजन व संहार ही एकाच विश्वचलाची चिरंतन पाती आहेत ही आत्मशोधाची प्रक्रिया 'अरण्यपथ' च्या निर्मितीकेंद्राशी बीजभूत झालेली दिसते.

'मुसाफिर' या दीर्घ चिंतनात्मक काव्यात कवयित्रीचे मन अधिक वास्तवाभिमुख, अटळ नियतीचा व दाहक वास्तवाचा स्वीकार करतांना दिसते. इथे नशिवी आलेल्या जीवनाचा व प्राक्तनाचा स्वीकार अटळ दिसतो.

आपल्या अंधारयात्रांची
मीमांसा करणे ही चूकच

ओंजळीत आले ते प्राशुन घ्यावेच लागेल
हलाहल असो वा, जलवंतीचे स्वच्छ नितळ पाणी.

अशा या जीवनात कवयित्रीला प्रत्येक जण आपल्या स्वार्थाचे व आत्मकेंद्रित वृत्तीचे तुणतुणे वाजवतांना दिसतो. शतकातून एखादाच महात्मा, ख्रिस्त, बुद्ध व पैगंबराच्या रूपाने मानवी करूणेचे व प्रेमाचे गीत गातांना दिसतो. एरव्ही स्वतःतील प्रलंयकारी आग जगातील सुखदुःखाने प्रलयंकारी व थरथरते. स्पदंन पाहूच देत नाही. पाय प्रवासी व मन संन्यासी होऊन प्रवास सुरू असतो. इथे माणूस माणसाला समजून घेत नाही. हिंस्त्रश्वापदासारखी ती एकमेकावर सतत गुरगुरतात. इथे माणसाने माणसाला समजून घेतले असते तर या सृष्टीचे कधीचेच स्वर्गीय नंदनवन झाले असते. कवयित्रीची जीवनावरील दुर्दम्य श्रद्धा अशावेळी जगण्याला नवा अर्थ देते.

'ज्यांचे पाय प्रवासी व मन संन्यासी' अशी अरण्यपथाची अर्पणपत्रिकाही खूप काही सांगून जाते. चित्रकार सुभाष शर्मा यांनी आपल्या कलात्मक, रेखीव, धारधार व जिवंत रंगरेषांनी 'अरण्यपथ'ची वेदना अधिकच जिवंत व बोलकी, लावण्यमयी केली आहे. ■ ■

अरण्यपथ व मुसाफिर
अंबिका प्रकाशन, रा. मा. घोराडकर,
आग्याराम देवी परिसर, गणेशपेठ नागपूर
मूल्य ५० रुपये

प्रा. कृष्णा चौधरी,
रामटेक

तीन काव्यसंग्रह

कृष्णा चौधरी

अकोला येथील कवि श्रीकृष्ण राऊत यांचा 'गुलाल' हा पहिलाच काव्यसंग्रह. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर या प्रकाशनाने महाराष्ट्र साहित्य-संस्कृती मंडळाच्या अनुदान साहाय्य योजनेतून प्रकाशित झालेला आहे. मुखपृष्ठ संजय पवार यांचे असून यात पन्नास गझलांचा समावेश आहे. जीवनाशी झुंज देत जगणाऱ्या जगातल्या तमाम अपंगांच्या जिद्दीला हा काव्यसंग्रह अर्पण केलेला आहे. मूळात 'गझल' ही अरबीतली. हळूहळू ती अरबीतून फारसीत व फारसीतून उर्दूत व उर्दूतून मराठीत आली. गझल रचनेचा यशस्वी प्रयत्न मराठीत माधव ज्यूलियन यांनी केला. पुढे अनिल, विंदा करंदीकर, सुरेश भट, मंगेश पाडगावकर, का.गे संजीव, हिमांशु कुळकर्णी, आरती प्रभू, गंगाधर महांबरे, वा. भ. बोरकर, कुसुमाग्रज, वसंत बापट, व नारायण सुर्वे इ. कवींनी गझल रचना केली. याच मालिकेत श्रीकृष्ण राऊत यांचे नाव घ्यावे लागेल. 'गुलाल' हा संग्रह 'गझल' रचनेत गुणात्मक दृष्टीने तोलामोलाचा आहे.

उर्दू व फारसीतील गझल शृंगार व वेदनांनी सुशोभित झालेली आहे. गुलालामध्ये याच भावानुभूतीचे दर्शन घडते. उदा.

सांगू कशी फुलांच्या देहास भार झाला
हा बहर यौवनांचा देहास फार झाला
आला असा फुलोरा गेली झुकून फांदी
पदरातही लपेना इतका उभार झाला
अंगांग गौर कांति नाजूक मी चमेली
शृंगारल्या उन्हाने मजला विकार झाला

चुकवू किती सरींचा वर्षाव हा सुगंधी
आषाढ यौवनाचा जर जाणकार झाला.

तुझ्या गुलाबी ओठावरती, गोऱ्या तुझ्या रूपाने व लाजली पौर्णिमा इ. कवितात प्रेम व शृंगाराच्या छटा रोमॅंटिक पद्धतीने व्यक्त झाल्या आहेत. तर दुःख देखणे, तुझे व तसा न चंद्र राहिला या गझलमध्ये एक चिरंतन विरही व्यथा व्यक्त झाली आहे.

तसा न चंद्र राहिला तशी न रात राहिली
अजूनही तशीच तू तनामनात राहिली.
अजून आठवे मला सुरेख तीळ सावळा
अमीर खूण ती ती तुझी सखे उरात राहिली

शृंगार व विरह भावनांचा 'गुलाल' जसा गुलालामध्ये आढळतो तसेच आजच्या दाहक सामाजिक जाणिवेचे दर्शनही गुलालामध्ये घडते. परंपरेच्या रसायनेतून व नव्या आविष्काराविषय तंत्राच्या जाणिवेतून नवी कविता जन्माला येते. कवीला ऐतिहासिक, सांस्कृतिक व सामाजिक जाणिवेचा वसा नसेल तर त्याची कविता रेशमाच्या कोषातील किड्याप्रमाणे स्वतःभोवती वाङ्मयीन कृत्रीम कोष निर्माण करील व त्यातच गुरफटून जाईल. 'गुलाल' मधील गझल परंपरेच्या रसायनातून आशय व अभिव्यक्तिचे नवे रचनातंत्र शोधत राहते. कठोर सामाजिक वास्तवाचे कलंदर वृत्तीतून व्यंगात्म दर्शन ती घडवीत राहते. लोकशाहीत स्वातंत्र्य आले पण - सामान्य माणसापुढे त्याच्या ताटात काय वाढून आले ?

कुंपणांनी दिला वावरांना दगा
सांड मोकाट लाखो चरू लागले
काय ताटात ह्या वाढले रे असे ?
जेवणारे पहा घाबरू लागले

ज्योतिराव फुले यांनी शेतकऱ्याच्या आसूड ग्रंथात शेतकऱ्याची जी अवस्था रेखाटली ती अजूनही तशीच आहे. तिच्यात फार फरक पडला नाही.

गर्भार दूर हेले - गोठ्यात वांझ गाई
चालेल दूध गेले - शाबूत ताक ठेवा
कर्जात शेत गेले - व्याजात बैल गेले
चालेल चाक गेले - शाबूत आख ठेवा
पोटात माणसांनी - काटे कसे भरावे
चालेल चूल गेली - शाबूत राख ठेवा

आजच्या विज्ञानाने विश्वाचा विस्तार झाला पण माणसापासून माणूस मात्र दूर गेला. स्वतःच्या अति-आत्मकेंद्रित वृत्तीने तो स्वार्थातच गुरफटून गेला. कुणीच कुणाचे दुःख ओळखीनासे झाले.

- सांज वेळी संगतीला एक नाही पाखरू.
लेखीच्या पंगतीला खूप आली माणसे

स्वातंत्र्यासह समृद्धी आली पण स्वातंत्र्य व समृद्धी मात्र झारीतील शुक्राचार्याप्रमाणे भांडवलदारापर्यंतच अडून पडली. पीडित, शोषित, सर्वहारा जनतेपर्यंत स्वातंत्र्य पोचलेच नाही.

आहे तसाच आणा काळा चहा गडे हो -
ती भंगली अपेक्षा देतील दूध हेले

वाफ्यातले जुने हे बदलू जरा वियाणे
तेव्हा कुठे इथेही उगवेल पेरलेले

गझलकार हा उत्कृष्ट कवी असावा लागतो. आपल्या गझलेतून मानवी जीवनातील चिंतनपर भाष्यच त्याच्या काव्याद्वारे व्यक्त होते. नव्या जाणिवेतून नवे अविष्कार यंत्र उदयाला येत असते. या दृष्टीने प्रत्येक महान कलावंताने अंधश्रद्धा व निर्दय रूढीवर केशवसुतापासून कोरडे ओढले आहे.

कवीला आपल्या आत्मभानातून जीवनविषयक संघर्षाची तीव्र जाणीव झाली आहे म्हणूनच येथील संघर्ष प्रचारक व वटवटीत न होता तो मूल्यात्मक झाला आहे. इथली गझल केवळ उर्दू व फारशीच्या अनुभव अनुकरणातून आलेली नाही. तर मराठी भाषा व प्रतीतीलचे स्वयंभू मराठी कैलव तिला प्राप्त झालेले आहे. गझल रचनेची काफीया, दरीफ, अलामत व जर्मीन ही सर्व तंत्रे तिच्यात स्वयंभू अवतरली आहे. गझल हे वृत्तरचना कौशल्ये, नसून ती एक कलंदर जीवनाकडे चिंतनशील वृत्तीने पाहणारी वृत्ती आहे. हे गुलालमध्ये दिसून येते. कवीच्या शब्दात सांगायचे झाले तर गुलाल मानवी जीवनातील चिरंतन वेदनेचा ऐने महाल आहे.

माझी भकास शिल्पे शोधीत काळ होता
तो देखण्या व्यथेचा ऐने महाल होता
सौभाग्य रेखणारे कुंकुच भासले जे
कोण्यातरी मढ्याचा तोही गुलाल होता

❑ ❑ ❑

'रिझ फायरं' हा अंजनगाव सूर्जी येथील कवि राम देशमुख 'कॅरकेड' यांचा ५८ पृष्ठांचा तिसरा काव्यसंग्रह. मुंबई येथील सुप्रिया प्रकाशनाने महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या अनुदानाने प्रकाशित केला आहे. कवीच्या १९७२ ते ८२ या निर्मिती काळातील काव्यांचे हे संकलन आहे. राम देशमुखाच्या वाट्याला आलेल्या नियतीच्या फटकाऱ्याने एकाकी व शून्य मनोवस्थेचे दर्शन या कवितेत घडते.

कवीची दुःखाची गाणी जगाची आनंदाची वाणी ठरते हा शेलेचा अनुभव आहेच. कवी म्हणतात -

उडू-उडू जाताहेत सारे....
मानवछवीच्या भंगूर दीप्तीसारखे फसवे रंग!
आणि चळवळ्या पतंगाच्या मांजेदार सूत्राने
करत आहेत एकेक करून सारे पतंग
काळोखासाठीच निखळ व्हायचेच रिते-रिते सावकाश
जिंकले-जोपासलेले, गजबजलेले आकाश!

'रिझफायर'मध्ये अनेकविध भाववृत्तींचे दर्शनं घडते. निसर्ग, प्रीती, सामाजिक जाणीव व कधी विश्वाशी नाते जोडणारी व ते जोडता-जोडता दुभंगून जाणारी जाणीव या कवितेत दिसून येते.

'रूढी' या कवितेत नव्या परिस्थितीची व नव्या संदर्भाची अपरिहार्यता मानवी जीवन वृद्धिंगत होण्यासाठी आहे हे सांगताना कवी म्हणतात.

मुर्दाडांनो -
आत्महत्या करून तुम्ही केव्हाच मुक्त झालात
या देशाच्या पिढीला -
तुम्ही कुठला वारसा दिला आहे?'

कवीच्या या संग्रहात अनेक सुंदर मुक्तकांचा समावेश आहे. या मुक्तकात मानवी जीवनविषयक चिंतन गंभीर होत

जाते. कवीची अंतर्मुखता वाढून आशय भिन्नक्तिंचे तंत्र अधिकाधिक प्रगत होत जावो व त्यानून त्यांच्या कवितेला प्रचीतीचे स्वयंभू वैभव प्राप्त होवो हीच 'रिझफायर' मधून अपेक्षा आहे.

❑ ❑ ❑

राम शेवाळकर यांचा 'असोशी' व 'रेघा' नंतरचा 'अंगारा' हा तिसरा काव्यसंग्रह नागपूरच्या साहित्य प्रसार केंद्राने प्रकाशित केला असून २९ कवितांचे संकलन आहे. मुखपृष्ठ संजय धोतरकर यांचे व पृष्ठसंख्या ४८ आहे. काव्यसंग्रहाच्या आरंभी कविने आपली कैफियत स्वतःच सांगितली असून आपल्या काव्यनिर्मिती प्रक्रियेची जडणघडण विशद केली आहे. अनिल, मर्ढेकर व मुक्तिबोध यांचा राजरस्ता गजबजलेला असूनही शेवाळकरांना, बापट, पाडगावकरांच्या दिंडीत सामिल व्हावेसे वाटते. तांबे, कुसुमाग्रज व बोरकर यांच्या काव्याचे पूर्ण संस्कार घेऊन शेवाळकरांची कविता उमलत गेली व रेघात तिला स्वतःचा स्वर सापडला, 'अंगारा'त हा स्वर सापडता-सापडता तिला स्वतःचे आत्मभानही लाभले. अंगारात ते म्हणतात.

"आकाशपाळण्यातून उतरावेसे वाटते. पण पाय जमिनीला टेकण्याच्या सुमारासच झोका पुन्हा वर जातो. जमीन आपली वाटते पण ते सारखे दूरदूर पळत जाते. या गिरक्यामध्ये एक कैफ असतो. तो स्वतःला स्वतःपासून दूर नेतो एखाद्या ध्यानात हरवू जाणे सुखाचे असते. पण स्वतःला मुकणे कष्टाचे असते ही केविलवाणी ओढाताण 'अंगारा'मध्ये व्यक्त झाली आहे.." गेल्या ३५ वर्षापासून 'शेवाळकर' काव्यलेखन करीत आहेत. पण त्यांच्या काव्यावर नवकाव्याच्या तिर्यक प्रतिमांचे संस्कार नाही. आपल्या संवेदनकेंद्राची सौंदर्यवीण व तिचे तंतू तिने हळूवारपणे जपले आहे. तिचे स्वरूप नवथर व चंचलेचे नसून प्रौढ शालिन पुरंध्रीचे आहे. उदा. 'डोळे' ही कविता विलक्षण कल्पनारम्यतेने नटलेली आहे.

डोळे बदामी
छद्मीपणे
गुलामीची सनद देणारे
डोळे निळे
अथांग तळे
बूडून मरण्याची ओढ लावणारे

कवीने निसर्ग व मानवजीवनातील हळूवार भाववृत्तींचे दर्शन इथे घडविले आहे. 'क्रौंच' या कवितेत उत्कट भावानुभूतीची सहज अभिव्यक्ती प्रतिमा संघातून व्यक्त होते. तिच्यातील आत्मनिष्ठा हृदयाला भिडते.

यावेळी वाटते तुझ्यावर
सारे विसरून सारे - विसरून
पुन्हा नव्याने प्रेम करावे
प्रेम करावें पहिल्यापासून!

महारोग्यांच्या जीवनात आशेचे व आत्मविश्वासाचे नंदनवन निर्माण करणाऱ्या कवितेत कवि म्हणतो.

शतकांचे साहून शाप
जी मनें रापती होती
आलास थेंब होऊनी
तू अशा अभाग्यासाठी
थरकाप तमाचा करण्या
कोळसे सुद्धा धगधगले
ज्वालांच्या रक्तफुलांनी

तुज़ पहिले वंदन केले!
तू निसर्गाने मानवावर लादलेला तहनामा
कृतीगर्भ करुणा आणि जयिष्णु मानवता देहाच्या विभिन्न,
वेरुळातून कर्तृत्वाचे कैलासलेणे उभारणारा
कलावंत ईश्वरी हातोळी, प्रकाराच्या
प्रसारावर शिल्पित केलेले माणूसकीचे महाकाव्य!'
आंधळ्याने पांगळ्याला पाय द्यावे
पांगळ्याने आंधळ्याला नेत्र द्यावे
आंधळ्या पायातळी रस्ता फुटावा
अन् अपंगाला दिशांनी बोलवावे!

पाऊसाच्या कवितेतही असाच एक सेंद्रिय अनुभव आपल्या नैसर्गिक रंगरूपाने साकार झाला आहे. मंगेश पाडगावकरप्रमाणे शेवाळकरांनी काही वात्राटिका लिहिल्या आहेत. सामाजिक दंभविस्फोटाचे व्यंगात्मक कलात्म चित्रण 'काजवे' या कवितेत आले आहे.

(१). नेतेपण देगा देवा
मुर्गी-बकरीचा रवा
ऐरावत थोर रत्न
इंद्रपदाचे भूपण
महापूर येती जाती
हेच नेमकें वाचती
जया अंगी मोठेपण
तया यातना कठीण!

(२) हेचि दान देगा देवा
तुझा विसर पडावा
गुण गाईन आवडी
जर लाभेल पोतडी
न लगे फक्त धनसंपदा
रंगढंग देई सदा
नको म्हणे गर्भवास
फुका जन्मायाचा त्रास
आहे जोवर जगणे-
सुखे मिळो खाणे-पिणे
नेई इंद्रियांच्या गावा
हेचि दान देगा देवा

असा हा राम शेवाळकरांचा 'अंगारा!' चिमटीत चिमूटभर पण - पसरलेला आकाशभर! ■ ■

आकाशवाणी, नागपूरच्या सौजन्याने | प्रा. कृष्णा चौधरी

इप्सित

ज्योति कोटमकर यांच्या रुबायांचा संग्रह 'बहुजन संघर्ष' प्रकाशनाने प्रकाशित केला असून कलात्मक मुखपृष्ठ चेतना चौधरी यांचे आहे.

या काव्यसंग्रहाची प्रेरणा स्पष्ट करताना कवि म्हणतात "सभोवताली जे काही मी पाहिले अनुभवले ते आपोआपच शब्दावाटे बाहेर पडले आणि आपणापर्यंत पोचवावेसे वाटले म्हणून हा प्रपंच! सहसा कडवट लिहित गेलो. कधी गुदगुल्या करत गेलो. वडिलधाऱ्या व तरुणतरुणींना परंपरेच्या कोषातून जागवत गेलो. सत्यशोधक चळवळीचा पाईक होत गेलो. जिवापलिकडे प्रेम करणाऱ्या मित्रमैत्रिणींच्या व आप्तगोत्रांच्या आग्रहावरून शेवटी रुबायाचा संग्रह काढायला घेतला. आपली पावती मिळाली की मी भोगलेल्या शब्दप्रसवेच्या वेदना भरून पावलो."

'बहुजनसंघर्ष' या साप्ताहिकाचे संपादक नागेश चौधरी यांची छोटीसी पण विचारप्रवर्तक प्रस्तावना संग्रहाला लाभलेली आहे. "इप्सित म्हणजे सत्यशोधक चळवळीतील एका पट्टीच्या कार्यकर्त्याचे अंतरीचे बोलच! हे सत्यशोधक विचार सांगणारा कवी कधीच थांबत नसतो. तो झपाटलेला असतो. सत्यशोधक बाणा कधी बनवाबनवीवाल्यांचा साथीदार होऊ शकत नाही." प्रस्तावनकाराच्या या विचारातून कवीच्या काव्यबंधनाच्या मूल प्रेरणेचे दर्शन घडविण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न आहे.

'ज्योति' ही नावाप्रमाणेच ज्योति आहे. सत्यशोधक चळवळींच्या इतिहासातील भाई माधवराव बागल यांच्या चवळवळीतील ज्योतिचे वडील अमृतराव कोटमकर हे तळमळीचे कार्यकर्ते होते. वडिलांच्या विचारमंथनाचा परिणाम ज्योतीवर होऊन कवीच्या सत्यशोधक पिंडाची जडणघडण होत गेली.

उर्दू कवितेत गझल, कशिदा, रूबाई व शेर हे काव्याचे प्रकार मान्यता पावलेले आहेत. गझल म्हणजे प्रणय करणे, स्त्रीस उद्देशून बालणे. इथे मात्र रुबाया या काव्यप्रकारातून कवीने आपले मनोगत व्यक्त केले आहे. उमरखय्यामच्या रूबाया प्रसिद्ध असून 'द्राक्षकन्या' या नावाने माधव ज्यूलियन यांनी त्या रुबायांचे मराठीत रूपांतर केले आहे. रूबायांचा समावेश व्यापक अर्थाने गझलमध्ये होऊ शकतो. रुबाई म्हणजे चौपाई. रुबाईची अभिव्यक्ति ही गेय वृत्तात व सताल नसते. अर्थाला तिच्यात प्राधान्य असल्यामुळे अर्थातच ती गद्यानुवर्ती स्वरूपाची असते. रूबाईत स्फुट व तरल विचार मनोरंजनात्मक रीतीने संक्षेपात व्यक्त केले जातात. भावकाव्यात कवि आपली भावानुभूती काव्यसंघातात साकार करतो. रूबायात मात्र भावानुभूतींच्या संक्रमणापेक्षा कुतुहलजनक रचना मांडणीच्या चातुर्याने कवि रसिकांची करमणुक करत असतो. रूबायांच्या रचनाबंधातील कवीचे हे कौशल्य बहुधा श्लेष, अनुप्रास, व्युत्पत्याभास व विरोधाभास इत्यादि शब्दालंकारातून सारखे व्यक्त होत असते. रूबाईत एक प्रकारचा जीवंत भावनेचा विलास, एक तर्काभास असतो. तिच्या उत्तरार्धात व दुसऱ्या पंक्तीत एखादा अनुमानाचा निष्कर्ष किंवा कारण यापैकी निश्चितच काहीतरी सांगितलेले असते. 'इप्सित' मधील रूबायात 'शृंगारिक' या प्रकारात 'वसंता' या कणिकेत भावानुभूती अशी शब्दरूप होते -

होतो कधी कुणाच्या मीठीत बंद आम्ही
विरूनी स्वप्न जाता पेट्यात धुंद आम्ही
वेडावूनी कशाला खुणावतो वसंता
जातो निघून मेणा, कफनात बंद आम्ही

तसेच -

लावण्य षोडशे ते, स्पर्शून वात आला
नेत्रातूनी मदिरा, 'प्राशून गात आला

रेंगाळूनी जरासा, मस्तीत बोलला तो,
न्हाऊन थेंबणाऱ्या, केसात न्हात आला.
('स्नातगंधा')

उमरखैयामच्या रुबायात जीवनातील दुःखाच्या जहराचा तीव्र तेजाब व्यक्त झालेला दिसतो एक प्रकारची जीवनासंबंधी निराशावादी छटा त्याच्या रूबायात दिसून येते. इथे मात्र रूबाईच्या ओळीओळीतून सळसळत असतो जीवनातील चैतन्यरूप सृजनशील आनंद!

पहिल्याच पावसाने, मातीस गंध आला
भिजवून केस गाली, उधळीत रंग आला
उमलून रोमरामी, डोळ्यात लाजलेल्या
लावण्य मोहराला, जरतारी ढंग आला
('मृद्गंध')

ज्योति कोटमकरांची कविता ही मनोरंजनासाठी निर्माण झालेली नाही. सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून ती निर्माण झालेली आहे. इथल्या धर्मांध संस्कृतीने धर्म व संस्कृतीच्या नावावर माणसाचे अमानुष शोषण केले. या शोषणाचे पडसाद ईप्सितमध्ये ठिकठिकाणी उमटलेले दिसतात स्वातंत्र्याच्या काळातहि तळागाळातील माणूस उपेक्षित राहिला. सत्ता व संपत्तीच्या स्पर्धेत माणसाने माणसाचेच शोषणं केले. त्यामुळे मानवी स्वातंत्र्याच्या कल्पनेला आजच्या लोकशाहीतील कसलाहि अर्थ उरला नाही.

केव्हा कळेल आम्हाला ? साऱ्यासवे भलाई
खाऊ नये कुणाच्या, टाळूवरी मलाई
माणूस माणसाला शोषून धनदुरुस्त
स्वतंत्रते 'तुझी ती ना राहिली शिलाई
('स्वतंत्रते')

वर्णव्यवस्था व जातीव्यवस्थेने इथले माणसाचे माणूसपणच हिरावून घेतले. वर्णव्यवस्थेचे व जातीयतेचे सापळे रचणारे हे बुद्धीमान मानवी समतेच्या विरोधी होते. म्हणूनच वर्णविषमतेची समाजरचना त्यांनी निर्माण केली.

माणुस माणसाचा वैरी बनून येथे
गाडावयास सज्ज, खड्डा खणून येथे
जात्यंध सापळे हे, योजून योजकांनी
केले गुलाम मनुजा, स्वार्थी जनून येथे
('स्वार्थ')

सत्तेपुढे बूट चाटून विलासी जीवन जगत असलेले नेहमीच फितुर व राष्ट्रदोही होत गेले. त्याचा इतिहास हा फंदफितुरीचा इतिहास आहे. वर्णांध भामटे व धर्मांध राष्ट्रवाद्यांचे वर्णन कवी करतात -

सत्तेपुढे नमूनी, आले करीत मौजा
फितूर जाहल्या त्या, त्यांच्या अखेर फौजा
चाटून बुट तगले, वर्णांध भामटे ते
धर्मांध राष्ट्रवादी चालू अजून गमजा.
('फितूर')

अशी ही इप्सितमधील कविता समाजातील दांभिक मुखवट्यांचा पडदाफाश करीत जाते. म. फुलांच्या सार्वजनिक

धर्माची शिकवणुक तिच्या अंगाअंगात भिनली असल्यामुळे फुल्यांना
र्पल्ल ती नव्या जाणीवेचा स्वीकार करताना दिसते.

तेव्हा बळी जनांचा, दानात मागणारे
वानवू नये कुणीहि, सरदार हे असे
आम्हीच आमुचे रे वैरी परंपरेने
बळीस गाडणारे आम्ही आम्हासवे

पेटून ज्योत येथे, ना जागलो अजुनी
यज्ञात जाळण्याला, त्याची धुपून धूनी
('धूनी')

अशी ही मानवी समतेची व बंधुतेची अन्याय, रूढी व परंपरेशी संघर्षशील वृत्तीने लढणारी, मराठीतील जीवनवादी व आशयघन कविता आहे. ■ ■

प्रा. कृष्णा चौधरी
रामाळेश्वरवॉर्ड, मु. पो. रामटेक, जिल्हा -नागपूर





अनुक्रमणिका

'युगवाणी' साहित्य सूची पुरवणी
जानेवारी १९९२ ते डिसेंबर १९९३

केशव जोशी

लेख / संशोधन / प्रबंध

टिपणे

इंदुरकर प्रा. विनोद	नाट्यभाषाचे स्वरूप/१८/जाने.-फेब्रुवारी १९९२; बर्टोल्ड ब्रेख्त यांची नाट्यसृष्टी (संकलन)/४२/जाने.-फेब्रुवारी १९९२
कविमंडन डॉ. सरोज	ज्ञानदेवांनी केलेला 'शब्द'शक्तीचा विचार/४४/मे-जून १९९२
कानडे विश्वास	टी. एस. एलिअट आणि वेस्टलँड -वेस्ट लँड व इतर पाच कवितांचा अनुवाद/३२/मार्च-एप्रिल १९९३
गिरिधारी डॉ. भास्कर	वाङ्मयाची अक्षरता/२०/जुलै-ऑगस्ट १९९२
जोग डॉ. वि. स.	लघुसंकलन-१/कविता- श्रीपाद भालचंद्र जोशी/भाष्य/५९/मार्च-एप्रिल १९९२
ठाकूर रवींद्र	साहित्यकलेचे समाजशास्त्रीय स्पष्टीकरण/१६/नोव्हें.-डिसेंबर १९९२, स्वातंत्र्योत्तर ग्रामीण कादंबरी/५०/ऑक्टो. नोव्हे. डिसेंबर १९९३
डहाके वसंत आबाजी	जी. ए. कुळकर्णी : कथानिवेदन आणि कथार्थ/४६/मार्च-एप्रिल १९९२
डोंगरे सुधा	अनुवाद आणि निर्मितीक्षमता/२०/मार्च-एप्रिल १९९३
थोरात हरिश्चंद्र/म. ना. लोही	कै. ना. रा. शेंडे : एक नोंद/मलपृष्ठ ३/मे-जून १९९२
देशमुख उषा मा.	केचे तू असे जायला नको होते/६/ मार्च-एप्रिल १९९३
देशपांडे प्रा. अ. ल.	विनाशाच्या संकल्पनेने भारावलेले पाश्चात्य विज्ञानकथाजगत/२८/मे-जून १९९२
देशपांडे चिंतामण ज.	दोन भुरळिनी : सहजस्मरण/अनिल, गुणवंत हनुमंत देशपांडे, ना. घ. देशपांडे/३५/जाने.-फेब्रुवारी १९८३
पाठक प्र. वि.	चर्चासत्रांमध्ये संशोधनपर लेखांचे वाचन कसे करावे (आणि कसे करू नये)/३८/नोव्हें.-डिसेंबर १९९२
पातुरकर डॉ. शुभांगी	मुक्त छंदाचा संक्षिप्त इतिहास/२१/मे-जून १९९३
बोरकर द. सा.	आदिवासी साहित्य - एक विचार/२६/मे-जून १९९२
भानुशाली प्रा. पी. जे.	ज्ञानेश्वरीतील पुराणकथा संदर्भाचा अन्वयार्थ/२५/जाने.-फेब्रुवारी १९९३
मांजरखेडे अशोक	मराठी भाषेचे अस्तित्व राहील की संपेल/४२/नोव्हें.-डिसेंबर १९९२
रुईकर डॉ. मनीषा	एन रँड/निशिगंध देशपांडे यांच्या लेखावरील दीर्घ प्रतिक्रिया/३१/मे-जून १९९३
लिमये बापू	नेपथ्य : एक टिपण/२२/जाने.-फेब्रुवारी १९९२
वडेर प्रल्हाद	दोन आत्मचरित्रे नाच ग घुमा माधवी देसाई; नाथ हा माझा/कांचन घाणेकर/३६/नोव्हें.-डिसें. १९९२
सोनार प्रा. अनिल	नाटक असेही शिकवता येते/२०/जाने. फेब्रुवारी १९९२

कथा

कुरूलकर पंकज	ऋणानुबंध/३५/मे-जून १९९२
	लग्न/५०/मार्च-एप्रिल १९९२
	त्रिशंकू/३०/नोव्हें.-डिसेंबर १९९२
जोशी सुधाकर	लंवक वाधा/२२/मार्च-एप्रिल १९९३
पेटकर श्याम	वेडा/४६/ऑक्टो.-नोव्हे.-डिसेंबर १९९३

कविता

सराडकर बबन	जळत आहे दिवा तोवर/५/जुलै-ऑगस्ट १९९२
हर्दवानी प्रा. लछमन	दोन सिंधी कविता/हरिकांत हर्दवानी/अनुवाद/२६/मे-जून १९९३
हेर्लेकर सुलभा	काळोखाचे घरकुल/५/सप्टे.-ऑक्टोबर १९९२
	पालवी/वृत्ती/घडी/वर्तुळात मी/उनाड फांदी/३५/नोव्हें.-डिसेंबर १९९२

ग्रांथिकी (ग्रंथ परीक्षण/परिचय/समीक्षा)

उतकर नागोराव	उन्हातलं झाड/काव्यसंग्रह/भगवान भोईर/४४/नोव्हें-डिसेंबर १९९२
कुळकर्णी डॉ. अरुण	संवादशास्त्र/ श्रीपाद भालचंद्र जोशी/८६/जाने.-फेब्रुवारी १९९२
कुळकर्णी मदन	महाद्वारच्या पायराशी/संपादक : हेमंत इनामदार - ल. रा. नासिराबादकर/७२/मे-जून १९९२
कुळकर्णी डॉ. वसंत विष्णु	'युगवाणी' साहित्य सूची/केशव जोशी/८९/ मार्च-एप्रिल १९९२
कुळकर्णी श्यामकांत	पाणीपुरी/ललित लेख/शरद कोलारकर/७४/मे-जून १९९३
कोलारकर शरद	साडेतीन शहाण्यातील नागपूरकर : देवाजीपंत चोरघडे/गो. मा. पुरंदरे/४६/जाने.-फेब्रुवारी १९९३
जामकर मधू	आहे मनोहर तरी/सुनीता देशपांडे/आस्वाद/७७/जाने.-फेब्रुवारी १९९२
जोग डॉ. वि. स.	वर्तमान/रवीन्द्र शोभणे/कथासंग्रह/४६/मे-जून १९९३
दक्षिणदास सुधाकर रामचंद्र	कालपात्र/वाळकृष्ण वन्नोरे/काव्यसंग्रह/९३/मार्च-एप्रिल १९९२
देशमुख उषा मा.	ना. सी. फडके : एक चिकित्सक अभ्यास/प्रल्हाद वडेर
भिडे आशा	अग्निकमल/या. मु. पाठक/काव्यसंग्रह/४९/मे-जून १९९३
लहाने डॉ. इंदूमती	अकसिदीचे दाने/प्रतिमा इंगोले/कथासंग्रह/७०/मे-जून १९९२
वेलणकर डॉ. अ. द.	ज्ञाताच्या कुंपणावरून/नंदा खरे/ग्रंथभाष्य/५७/जुलै-ऑगस्ट १९९२
वाहोकार वसंत	कालपात्र/वाळकृष्ण वन्नोरे; मी धात्री मी धरित्री/ लक्ष्मीकांत तांबोळी; दस्तऐवज / देवेन्द्र खंडारे; शिवांगी/नागनाथ हेगे; हा घोडा हे मैदान/नीळकंठ महाजन/सर्व कविता संग्रह/७६, ७७, ७८/मार्च-एप्रिल १९९३

मुलाखत

सावदेकर आशा	गंगाधर गाडगीळ-एक व्यक्तिवेध/७१/मार्च-एप्रिल १९९२

व्यक्ती

डोळके डॉ. सुरेश म.	साहित्यिक वसंतराव (वऱ्हाडपांडे)/६९/मार्च-एप्रिल १९९३

चर्चा

उबगडे सौ. शोभा	मानवी जीवनव्यवहार आणि साहित्य/६६/ऑक्टो. नोव्हे. डिसेंबर १९९३

एकांकिका

घोंगे पराग	स्टेशन/१३/जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर १९९३
जीवने संजय	समर/५७/जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर १९९३
जोग धनंजय	बंधमुक्ता/४५/जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर १९९३
जोशी श्रीपाद भालचंद्र	चिमण्या, टरफले आणि सैगल/५/जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर १९९३

साहित्यिक/सांस्कृतिक

वाचकीय (वाचकांचा पत्रव्यवहार)

भृगुवार प्रा. सुरेश	मार्च-एप्रिल १९९२ अंकामधील शुद्धलेखनाच्या चुका/४८/नोव्हे. डिसेंबर १९९२
जोशी श्रीपाद भालचंद्र	त्यास उत्तर/५०/नोव्हे. डिसेंबर १९९२
कवडी नरेश	जुलै-ऑगस्ट १९९२ डॉ. डोळके (राजेंद्र) फडक्यांनी ही कोणाच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिल्याचे माझ्या पाहाण्यात नाही असे आपल्या लेखात लिहितात हे बरोबर नाही. आनंदीबाई विजापुरे यांच्या 'अजुनी चालतोची वाट' ला ना. सी. फडके यांची प्रस्तावना आहे. एकूण लेख वाचनीय व विचारप्रवर्तक वाटला.
कमलेश	अंक देखणा, नीटस, रेखीव वाटला.
तांबेकर प्रभाकर डी.	युगवाणीचा अंक म्हणजे समाज व साहित्यिक यांना सांधणारा दुवा आहे.
अणेराव प्रमोदकुमार	युगवाणी अंतर्बाह्य देखणे होत चालले आहे. आपल्या कुशल संपादनाचे यश आहे.
दीपक कुळकर्णी	सप्टे. ऑक्टो. ९२ हेर्लेकरांची कविता, गढीकरांचा लेख, आडे यांचे गझलचे छंदशास्त्र आवडले. पृ. ५७ ते ५८/ मे-जून १९९३
लेले वा. के.	सप्टे. ऑक्टो ९२ - संपादकीय बरेच काही सांगून-सुचवून जाणारे आहे.
चौधरी कृष्णा	संपादकीय आवडले
कोंडविलकर माधव	एन-रँड-वैश्यवृत्तीचा वेदान्त/निशिगंध देशपांडे यांचा लेख आवडला
कुळकर्णी डॉ. वि. म.	सप्टे-ऑक्टो ९२ बालकवींच्या काव्यातील नैराश्य/गढीकरांचा लेख लक्षणीय वाटला. सप्टे. ऑक्टो ९३-साहित्य, संशोधन, समीक्षा या बाबतीत युगवाणी अग्रेसर आहे. 'रत्नाकर' मासिकाची मला या प्रसंगी आठवण येते.
मुळ्ये शकुंतला	मुंबईकडे युगवाणीसारखी मासिके अभावानेच मिळतात. डॉ. काळे/रवीन्द्र ठाकूर/यांची टिपणे सु. बा. कुळकर्णी यांचा लेख आवडला.
वैद्य दासू	आपल्या संपादकीयात नुसत्या तक्रारीच नसतात, तर काही विचार आणि उपायही असतात.
भडभडे शुभांगी	संपादकीय लेख अतिशय उत्कृष्ट, खरमरीत टीका करणारा आणि मार्गदर्शक आहे. तसा तो वस्तुस्थितीदर्शकही आहे.
जामकर मधू	नोव्हे. डिसेंबर १९९२ - अंकाचे अंतरंग कमालीचे अस्वस्थ करणारे आहे. युगवाणीची अशी दुर्दशा का? आपण वस्तूपेक्षा वास्तूकडे जास्त लक्ष देत आहात ही तक्रार! विस्कटलेली घडी नीट बसवा ही सूचना.
जोशी श्रीपाद भालचंद्र	संपादकांचे उत्तर- आर्थिक साहाय्याची गंगोत्री संस्कृती मंडळाकडून अथवा विदर्भ रसिक वर्गाकडून आम्हाला प्राप्त झालेली नाही. वास्तूपेक्षा वस्तूला महत्त्व देत असल्यामुळे 'युगवाणी' आजही टिकून आहे. पृ. क्र. ५७ ते ६१ / मे-जून १९९३
पुरोहित के. ज., कांबळे अरुण	जुलै ऑगस्ट सप्टेंबर ९३/एकांकिका विशेषांक/चिमण्या, टरफले आणि सैगल या श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या 'एकांकिकेवरील प्रतिक्रिया/६५/ऑक्टो-नोव्हेंबर-डिसेंबर १९९३
देशपांडे गौरी	West Land - T. S. Eliyat / विश्वास कानडे यांचा लेख व अनुवादित कविता मार्च-एप्रिल ९३ प्रतिक्रिया अतिशय तीव्र आहे. भाषांतरातील चुका व त्रुटी/भाषांतराचे मूलभूत प्रश्न विचारावे असे मनात आले. कसल्याही टिप्पणी, स्पष्टीकरणाशिवाय नुसते मराठीत भाषांतर करण्यात काय हंशील आहे?/ ६८/ऑक्टो. नोव्हे. डिसेंबर १९९३

■ ■

‘युगवाणी’ साहित्य सूची पुरवणी
जानेवारी १९९४ ते डिसेंबर १९९४

केशव जोशी

ग्रांथिकी (ग्रंथ परीक्षण / परिचय)

चर्चा

बुचे शरच्चंद्र — डॉ. सुरेश डोळके - रसचर्चा / वि. सा. संघाचे ४६ व्या संमेलनाचे अध्यक्षीय भाषणाच्या निमित्ताने / २३ / जानेवारी-जुलै १९९४

एकांकिका

कुळकर्णी डॉ. सौ. अलका — वियॉंड वायॉलॉजी / ५० / ऑगस्ट-डिसेंबर १९९४

वैद्य दासू — आणून देणाऱ्यास वक्षीस दिले जाईल / ५४ / जानेवारी-जुलै १९९४

पत्रे

मधुरे सुरेश — चिमण्या, टरफले आणि सैगल / एकांकिका / श्रीपाद भालचंद्र जोशी / एवढ्या चांगल्या लेखनाचे लेखकाने बोनसाय का करावे ? / ९२ / जानेवारी-जुलै १९९४

निशिगंध साठे — चिमण्या, टरफले आणि सैगल / श्रीपाद भालचंद्र जोशी यांचा लेखनप्रयोग - त्याला 'नांव ठेवण्याच्या' पलिकडचा प्रयोग म्हणून त्याची गांभीर्याने नोंद घेऊन चिकित्सा करण्याच्या महत्त्वाची वाव असणारा असा आहे. / ९२ / जानेवारी-जुलै १९९४

आसाराम राऊत — मे-जून १९९३ अंकातील श्री. वा. के. लेले यांचा लेख / ना. सी. फडके - एक चिकित्सक अभ्यास - प्रल्हाद वडेर यांच्या प्रवंधावरील उषा मा. देशमुख यांचा लेख आवडला / ९१ / जानेवारी-जुलै १९९४

मोहन हरिभाऊ धनकर — मार्च-एप्रिल १९९३ अंकातील संपादकीय आत्मचिंतन करण्यास प्रवृत्त करणारे आहे / ८९ / जानेवारी-जुलै १९९४

प्रभाकर डी. तांडेकर — 'युगवाणी' म्हणजे जीवनगाणी होय. रवींद्र शोभणे यांचा 'वर्तमान' कथासंग्रह - समीक्षण - डॉ. वि. स. जोग, समीक्षण सरस आहे. लेखकाने मांडलेल्या पत्रकारितेची वास्तविकता समाजापुढे प्रदर्शित करून विचारशीलतेला प्रवाहित केले आहे.

हरिश्चंद्र बोरकर — जानेवारी-फेब्रुवारी १९९३ व मार्च-एप्रिल १९९३ - सु. वा. कुळकर्णी, डॉ. सुरेश डोळके यांचे लेख आवडले. वसंतराव वऱ्हाडपांडे यांचे अप्रकाशित साहित्य संकलित करून वि. सा. संघाने प्रकाशित करावे. / ९० / जानेवारी-जुलै १९९४

श्रीकांत गोंधळेकर — चिमण्या, टरफले आणि सैगल / एकांकिका / श्रीपाद भालचंद्र जोशी - प्रतिक्रिया श्रोता म्हणून वघणाऱ्या प्रेक्षकाला, सामान्य रसिकाला त्याची पटकथा झरझर सरकत जावी याकरिता त्यावर अधिक संस्कार करून पुनर्लेखनाची आवश्यकता आहेच/ ९५ / ऑगस्ट-डिसेंबर १९९४

पराग घोंगे — वरील एकांकिकेतील थिम सापडण्याकरिता फार नितळ आणि पारदृष्टी लागते. मनाचे सारे पूर्वग्रह वाजूला सारून कलाकृतीला सामारे जावे लागते. / ५९ / ऑगस्ट-डिसेंबर १९९४

नितीन वेळेकर — श्रीपाल सवनीसांच्या विस्तृत चिकित्सा करणाऱ्या लेखामुळे श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या (मुळातल्या कवितेच्या) ओळीओळीतून झिरणाऱ्या रचनाप्रवाहातील स्त्री-पुरुष संवंधाच्या नव्या जाणिवा, अपेक्षा, दृष्टी व स्त्री-पुरुष संवंधांची त्यांच्या पिढीला जाणवणारी एक सृष्टी किती प्रगल्भतेने व त्यातील जीवन काव्य जपून उभी करतात हे जाणवते. ही जाणीवच वेगळी व दुर्मिळ आहे./९५/ऑगस्ट-डिसेंबर १९९४ ■

संपादकीय — श्रीपाद भालचंद्र जोशी

अनुक्रमणिका

१४. जीवन सौंदर्य, कला, साहित्य यांचे परस्परसंबंध.
पृष्ठ २ ते ४/ मार्च, एप्रिल/१९९३

१५. जीवनसौंदर्य, वाङ्मयकलेचा व्यवहार. (आदर्शवादी, यथार्थवादी)
पृष्ठ २ ते ४/मे, जून/१९९३

१६. रंगभूमी, संहिताप्रधान नाटक आणि वैदर्भीय रंगभूमी.
पृष्ठ २ ते ४/जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर/१९९३

१७. 'युगवाणी' नियतकालिकाच्या प्रकाशनातील अनियमितता आणि वाङ्मयीन दर्जा.
पृष्ठ २ ते ४/ऑक्टो., नोव्हें., डिसें./१९९३

१८. अभिरुचीचे जोपासन, संवर्धन करणाऱ्या संस्था-नियतकालिकांना धोका का व कसा?
पृष्ठ २ ते ४/जाने.-जुलै/१९९४

१९. वाङ्मयाचा पाया 'सृजनात्मक संबंध'
पृष्ठ २ ते ४/ऑगस्ट-डिसेंबर/१९९४

२०. संपादकीय निरोपाचे / कार्यकाळातील कार्याचा आढावा / आभार इ.
पृष्ठ २ ते १०/जाने.-मार्च/१९९५

■ ■

अनुक्रमणिका

विदर्भ
साहित्य
संघ,
नागपूर.

केंद्रीय कार्यवृत्त
जाने. ९५ ते मार्च ९५.

दि. ६ जाने. १९९५

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय व ग्रंथ पेढी उद्‌घाटन समारंभ. (केळापुरे)

दि. ७, ८, ९ जाने. ९५

७, ८, ९ जाने. १९९५ रोजी अंभोरा येथे होणाऱ्या ४७ व्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध कथाकार व कादंबरीकार श्री. मनोहर तल्हार यांची निवड झाल्यावर विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष सुरेश द्वादशीवार, सरचिटणीस मनोहर म्हैसाळकर, वामन तेलंग, युगवाणीचे संपादक श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी श्री. मनोहर तल्हार यांच्या निवासस्थानी जाऊन हार व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. या प्रसंगी आंभोरा येथे स्वागत समितीचे कार्याध्यक्ष प्रा. अविनाश तितरमारे, श्री. योगेश वऱ्हाणपुरे व प्रा. रवीन्द्र शोभणे हेही श्री. तल्हार यांचे अभिनंदन करण्यास उपस्थित होते.

दि. १४ जाने. ९५

१४ जानेवारी १९९५ ला विदर्भ साहित्य संघाचा ७२ वा वर्धापनदिन पुसद येथे प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध नाटककार प्रा. महेश एलकुंचवार यांच्या हस्ते संपन्न झाला. पुसद शाखेच्या वतीने प्रा. उत्तम रुद्रावार यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. याप्रसंगी वि. सा. संघातर्फे नागपूर विद्यापीठ व अमरावती विद्यापीठातील आचार्य पदवी प्राप्त अभ्यासकांचा मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. त्यांची नावे अशी सौ. शैला मुजुमदार, कु. रत्नप्रभा अंजनगावकर, श्रीमती नलिनी सोनटक्के, श्रीमती माधुरी राजवैद्य, श्रीमती सरिता जांभुळे, श्रीमती छाया नाईक, कु. अलका सोरदे, श्रीमती अरुणा देशमुख, श्रीमती मालती निमदेव. शासकीय पुरस्कारप्राप्त साहित्यिकांचाही सत्कार या प्रसंगी करण्यात आला. याप्रसंगी विदर्भ साहित्य संघाचा साहित्यपुरस्कारही प्रदान करण्यात येतो. नामदेव कांवळे यांच्या 'राघववेळ' या कादंबरीने यावर्षी हा पुरस्कार प्राप्त केला.

कै. ल. दे. जोशी लेखनस्पर्धा - १९९४ ला घेण्यात आलेल्या कै. लक्ष्मण देवीदास जोशी लेखन स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांनाही वर्धापन दिनी पारितोषिके देण्यात आली.

प्रथम क्रमांक - कु. प्रीती गेडाम व धनंजय मराठे रु. २००/- (विभागून)
द्वितीय क्रमांक - सीमा दुबे रु. १५०/- ग्रंथरूपाने
तृतीय क्रमांक - धर्मानंद रमेश मनवर रु. १००/-

जानेवारी १९९४ सत्रातील विविध परीक्षांमध्ये सर्वप्रथम आलेल्या परीक्षार्थ्यांचा पारितोषिके देऊन सन्मान करण्यात आला.

भा. स्नातक पदवी परीक्षा -श्री. नरेश देवरावजी आंबिलकर, समर्थ महाविद्यालय, लाखनी.
(कै. जानकीबाई सुभेदार पारितोषिक रु. २५१ + वि. सा. संघ रु. १०१ रोख पारितोषिक)

सा. स्नातक पदवी परीक्षा -कु. वैशाली वसंतराव जिंतेकर, कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर.
(कै. जानकीबाई सुभेदार पारितोषिक रु. २५१ + वि. सा. संघ रु. १०१ रोख पारितोषिक)

सर्वाधिक परीक्षार्थी पुरस्कार विद्यालयीन	**महाविद्यालयीन**
प्रथम - विद्यामंदिर हायस्कूल, कोराडी रु. ३०१ /-	**प्रथम** - कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर रु. ३०१/-
द्वितीय - विकास हायस्कूल, कन्हान रु. २०१ /-	**द्वितीय** -महिला महाविद्यालय, नागपूर रु. २०१/-
तृतीय - बनारसीदास रुईया हायस्कूल, काटोल रु. १०१/-	**तृतीय क्रमांक** - श्रीमती वत्सलाबाई नाईक महाविद्यालय, पुसद रु. १०१/-

विदर्भ साहित्य संघाच्या परीक्षा समितीतर्फे मराठीच्या परीक्षा दि. २१/२२ जानेवारी रोजी विदर्भातील एकूण १५० केंद्रावर घेण्यात आल्या. विदर्भ साहित्य संघ नागपूर शाखेत ३०० विद्यार्थी समाविष्ट झालेत. या परीक्षांचा निकाल दि. २० मार्चला जाहीर करण्यात आला.

हस्तलिखित स्पर्धा :- विद्यालयीन

प्रथम क्रमांक - न्यू इंग्लिश हायस्कूल, महाल, नागपूर रु. २०१/-

द्वितीय क्रमांक - गणेशनगर कन्या विद्यालय, नागपूर रु. १०१/-

तृतीय क्रमांक - महाराष्ट्र विद्यालय, सिल्लेवाडा रु. ५१/-

दि. १९ जाने. १९९५

कै. ना. के. बेहेरे स्मृतिदिनाप्रीत्यर्थ त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून आदरांजली वाहण्यात आली.

दि. २१ जाने. १९९५

२१ जाने. ९५ ते २२.२.९५ या कालावधीत पांडव कॉलेज ऑफ लायब्ररी या महाविद्यालयातील काही विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात कोप-सूची शास्त्राचा अभ्यास केला. त्यांचे मार्गदर्शक डॉ. व. वि. कुळकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली 'समृद्ध मराठी नाटके' या विभागाचे संशोधन करण्यात आले. १९५० ते ९० या कालावधीतील मराठी नाटकांची सूची त्यांनी तयार केली. संदर्भ ग्रंथालयातील संचालक तथा ग्रंथपाल यांचे त्यांनी सहकार्य दिले.

दि. २३ जाने. १९९५

कै. लोकनायक बापूजी अणे स्मृतिदिनाप्रीत्यर्थ त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

दि. ३० जाने. १९९५

महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीप्रित्यर्थ त्यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

दि. १० फेब्रु. १९९५

कै. नरहर कुरुंदकर स्मृतिदिनाप्रीत्यर्थ त्यांच्या छायाचित्रास माल्यार्पण करण्यात आले.

दि. २३ फेब्रु. १९९५

कै. कविभूषण अण्णासाहेब खापर्डे स्मृतिदिनाप्रीत्यर्थ त्यांच्या छायाचित्रास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

दि. २६ फेब्रु. १९९५

कै. स्वा. वि. दा. सावरकर स्मृतिदिनाप्रीत्यर्थ त्यांच्या छायाचित्रास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

दि. ३ मार्च १९९५

डॉ. वा. वि. मिराशी स्मृतिदिन :- कै. महामहोपाध्याय वा. वि. मिराशी यांच्या स्मृतिग्रंथाच्या हस्तलिखितावरील डॉ. सुरेश डोळके, प्रज्ञाभारती डॉ. वर्णेकर, प्रा. राम शेवाळकर यांच्या अभिप्रायावर व हस्तलिखितावर डॉ. म. रा. जोशींशी चर्चा करण्यात आली. प्रा. महेश एलकुंचवार लिखित 'वाडा चिरेबंदी' 'भग्न तळ्याकाठी' व 'युगान्त' या त्रिनाट्यधारेचे आयोजन वि. सा. संघातर्फे वसंतराव देशपांडे सभागृहात करण्यात आले होते. या नाटकाला रसिकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

दि. ६ मार्च १९९५

६ मार्च १९९५ ला विदर्भ साहित्य संघाची साकोली शाखा व स्नेहपुष्प साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने साकोली येथील कृपामंदिर येथे 'झाडीबोली' साहित्य संमेलन झाले. संमेलनाचे उद्घाटन वि. सा. संघाच्या उपाध्यक्षा डॉ. सौ. आशा सावदेकर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून युगवाणीचे संपादक श्रीपाद भालचंद्र जोशी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन विदर्भ साहित्य संघ, शाखा - साकोलीचे सचिव शिवशंकर बानवकुळे व सहकाऱ्यांनी केले. सूत्र संचालन - राजेन्द्र बोकाडे यांनी केले, तर प्रा. भा. शि. भोयर यांनी आभार प्रदर्शन केले.

दि. ९ मार्च १९९५

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा. नारायण सुर्वे यांनी विदर्भ साहित्य संघाच्या संदर्भ ग्रंथालयास भेट देवून ग्रंथालयीन व्यवस्थेविषयी समाधान व्यक्त केले.

दि. १० मार्च १९९५

६८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कविवर्य नारायण सुर्वे यांचा वि. सा. संघातर्फे सत्कार करण्यात आला.

दि. २० मार्च १९९५

कै. बा. सी. मर्ढेकर स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या छायाचित्रास हार अपर्ण करण्यात आला.

दि. २५ मार्च १९९५

दि. २५ मार्च १९९५ रोजी ख्यातनाम वैदर्भीय कवी कै. राजा बढे यांच्या स्मरणार्थ त्यांचे कुटुंबीय श्री. चंद्रकांत बढे यांनी वि. सा. संघास एक लक्ष रुपयांची देणगी दिली. या देणगीतून दरवर्षी वि. सा. संघ संमेलनात निमंत्रितांचे एक कवी संमेलन व अन्य वेळी एक काव्यविषयक चर्चासत्र घेण्याचे योजिले आहे. त्यापैकी आंभोरा येथील वि. सा. संघातर्फे कवी संमेलन संपन्न झाले.

अनुक्रमणिका

देणगीप्रदान समारंभ प्रसंगी सुप्रसिद्ध कथाकार श्री. के. ज. पुरोहित (शांताराम) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर याप्रसंगी श्री. चंद्रकांत ब्रढे व डॉ. सौ. आशा सावदेकर यांची समयोचित भाषणे झालीत. कै. राजा बढे यांच्या निवडक गीतांच्या ध्वनिफिती उपस्थितांना ऐकवण्यात आल्या.

वि. सा. संघाची त्रैवार्षिक निवडणूक

दि. १९९५ ते १९९८ या तीन वर्षाच्या कार्यकालातील विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष व पदाधिकारी यांची निवडणूक झाली. अध्यक्षपदासाठी प्रा. सुरेश द्वादशीवार यांची विनविरोध निवड झाली. कार्यकारिणीच्या सदस्यांसाठीच्या वीस उमेदवारांचीही अविरोध निवड झाली.


सर्वश्री मनोहर म्हैसाळकर, वामन तेलंग, श्रीपाद भालचंद्र जोशी, केशव जोशी, डॉ. भा. ल. भोळे, डॉ. वि. स. जोग, सौ. प्रतिमा इंगोले (दर्यापूर), प्रा. सुभाष गढीकर (कारंजा लाड), प्रा. उ. गो. रुद्रावार (पुसद), ह. गो. पिंपळगावकर (अमरावती), हिरामण लांजे (भंडारा), कमलाकर धारप, डॉ. रवींद्र शोभणे, प्रकाश एदलाबादकर, वसंत वाहोकार, योगेश बऱ्हाणपुरे, डॉ. सौ. आशा सावदेकर, डॉ. सौ. कुंदा केळापुरे, डॉ. सौ. ज्योती लांजेवार व सौ. शोभा उबगडे.

अध्यक्षांनी आपल्या अधिकारात प्रा. शा. वा. खान (चंद्रपूर), श्री. शंकर कऱ्हाडे (बुलढाणा) व श्री. जयंत मादुस्कर (वर्धा) यांची कार्यकारिणीवर नामनियुक्ती केली.

सरचिटणीस

चित्र वसंत चव्हाण

युगवाणी
जाने-मार्च, '९५



अनुक्रमणिका

पोस्टल रजि. नं. एन.जी.पी. ४११
PRINTED MATTER PERIODICAL

विदर्भ साहित्य संघ
विक्रीस तयार असलेली प्रकाशने

१.	संशोधन लेखसंग्रह, भाग - २ कै. हरिभाऊ नेने	रु. ६/-
२.	प्रयोगक्षम मराठी नाटके डॉ. मु. श्री. कानडे	रु. ३०/-
३.	मराठी वर्णोच्चार विकास डॉ. द. ह. अग्निहोत्री	रु. ३२/-
४.	अध्यक्षीय भाषणे सा. भू. तु. ना. काटकर (विदर्भ साहित्य संघाच्या संमेलनाध्यक्षांच्या भाषणांचे संकलन)	रु. ७५/-
५.	आणखी भाषणे डॉ. मधुकर आर्ष्टीकर	रु. १०/-
६.	तीन भाषणे : गणेश व्याख्यानमाला १९७७ डॉ. र. श. केळकर	रु. ४/-
७.	"प्रातिभ" : लघुकथा संग्रह (१९८०)	रु. २०/-
८.	समग्र बजाबा	रु. २०/-
९.	हिंदी मराठी भाषा प्रवेशिका : श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	रु. ४/-
१०.	ज. के. उपाध्ये यांची १८८३-१९१३ कविता संपा. आशा सावदेकर	रु. ३०/-
११.	दक्षिणेतील दोन आचार्य : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी	रु. ५/-
१२.	मराठी गद्य : प्रा. श्री. गो. काशीकर	रु. ३/-
१३.	संपूर्ण गडकरी भाग - १ व २ (म. रा. सं. मं.)	रु. ७५/-
१४.	युगवाणी साहित्य सूची (संपादन केशव जोशी)	रु. ७०/-
१५.	कविता विदर्भाची डॉ. सौ. आशा सावदेकर	रु. ५०/-
१६.	छंदशास्त्र : एक अध्ययन : कुंदर दिवाण	रु. १०/-
१७.	वसंत वैभव : डॉ. सौ. कुंदा केळापुरे / डॉ. मदन कुलकर्णी	रु. ८०/-
१८.	धन्यतेची थाप डॉ. वि. भि. कोलते	रु. १००/-
१९.	वक्ता दशसहस्रेषु (प्रा. राम शेवाळकर) संपादक डॉ. वि. स. जोग	रु. १२५/-

- १. संमेलन स्थळी एकूण १००/- रु. किंमतीच्या पुस्तकांवर १० टक्के सूट.
- २. शाळा / महाविद्यालय / ग्रंथालये विक्रेत्यांकरिता २५ टक्के सूट.

"युगवाणी" : सभासद वार्षिक वर्गणी रु. ५० /-   ▪ त्रैवार्षिक वर्गणी रु. १२५/-

युगवाणी जाहिरात दर

आवरण पृष्ठ - ४	रु. ३०००/-	पूर्ण पान	रु. १०००/-
आवरण पृष्ठ - ३	रु. २०००/-	अर्ध पान	रु. ५५०/-
आवरण पृष्ठ - २	रु. २०००/-	पाव पान	रु. ३५०/-

संपर्क : सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, सीतानर्डी, नागपूर १२. ▪ भाष ५२३९२९